S P E A K | R E A D | W R I T E



# माय मराठी ६
# My Marathi 6

मार्गदर्शिका | ORIENTATION FOR COMMUNICATIVE MARATHI




NIRUPAMA JOSHI
VAISHALI KARLEKAR



UNIVERSITY OF MUMBAI

RAJYA MARATHI VIKAS SANSTHA

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

निरुपमा जोशी / NIRUPAMA JOSHI
वैशाली कार्लेकर / VAISHALI KARLEKAR

# माय मराठी ६
# My Marathi 6

मार्गदर्शिका / Orientation for Communicative Marathi

**संपादक / EDITORS**
माधुरी पुरंदरे / MADHURI PURANDARE
सोनाली गुजर / SONALEE GUJAR
विभा सुराणा / VIBHA SURANA
संजय कृष्णाजी पाटील / SANJAY KRUSHNAJI PATIL

**संकल्पना, निर्मिती आणि प्रकाशन / CONCEPT, PRODUCTION & PUBLICATION**
जर्मन विभाग, मुंबई विद्यापीठ
Department of German, University of Mumbai

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
**RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI**

मुंबई विद्यापीठ
**UNIVERSITY OF MUMBAI**

**ISBN No.: 978-93-5407-516-2**

**FIRST EDITION 2022**
**पहिली आवृत्ती २०२२**

**क्रिएटिव्ह कॉमन्स ॲट्रिब्यूशन – शेअरअलाईक लायसन्स (CC BY-SA 4.0) ह्याअन्वये उपलब्ध**
**Published under Creative Commons Attribution – ShareAlike License (CC BY-SA 4.0)**

- **प्रकल्प समन्वयक / PROJECT CO-ORDINATOR**
  विभा सुराणा / VIBHA SURANA

- **लेखक / AUTHORS**
  निरुपमा जोशी / NIRUPAMA JOSHI
  वैशाली कार्लेकर / VAISHALI KARLEKAR

- **संपादक / EDITORS**
  माधुरी पुरंदरे / MADHURI PURANDARE
  सोनाली गुजर / SONALEE GUJAR
  विभा सुराणा / VIBHA SURANA
  संजय कृष्णाजी पाटील / SANJAY KRUSHNAJI PATIL

- **संपादकीय मंडळ / EDITORIAL TEAM**
  मेहेर भूत / MEHER BHOOT
  प्र॰ ना॰ परांजपे / P.N. PARANJPE
  गिरिषा टिळक / GIRISSHA TILAK

- **मराठीसाठी तांत्रिक साहाय्य / TECHNICAL SUPPORT FOR MARATHI**
  अभिजित रणदिवे / ABHIJEET RANADIVE
  गुरुनाथ कलमकर (मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ) / GURUNATH KALAMKAR (DEPARTMENT OF MARATHI, UNIVERSITY OF MUMBAI)

- **कला, मांडणी, चित्रे / छायाचित्रे / अक्षर जुळणी**
  **LAYOUT DESIGN / PHOTOS / TYPESETTING**
  नागेश सिरसाल / NAGESH SIRSAL
  गिरिषा टिळक / GIRISSHA TILAK
  सुभाष गोपाळे / SUBHASH GOPALE

- **प्रकाशन / PUBLICATION**
  मुंबई विद्यापीठ / UNIVERSITY OF MUMBAI
  राज्य मराठी विकास संस्था, मुंबई / RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI

- **ई-पत्ता / E-MAIL**
  rmvs_mumbai@yahoo.com

- **संकेतस्थळ / WEBSITE ADDRESS**
  https://www.learn-marathi.com, www.mu.ac.in
  rmvs.maharashtra.gov.in

Online access link: https://mu.ac.in/mymarathi6

**ORIENTATION BOOK AND PRACTICE BOOK ₹ 1250 | $ 25 | € 20**

# प्रस्तावना

'माय मराठी' अभ्यासक्रमाची ही सहावी आणि अंतिम पातळी आहे. या पातळीसाठी दोन पुस्तके तयार करण्यात आली आहेत. त्यांपैकी एक मार्गदर्शिका असून दुसरे सरावपुस्तक आहे. आधीच्या पाच पातळ्यांमध्ये विद्यार्थ्यांची मराठी भाषेच्या अध्ययनाची जी तयारी झालेली असणे अपेक्षित आहे, त्यापुढची ही पातळी असेल. साहजिकच ही पातळी आणि पर्यायाने हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर विद्यार्थ्यांना निजभाषकांप्रमाणे मराठीत व्यवहार करणे शक्य व्हावे ही अपेक्षा आहे. त्यामुळेच प्रस्तुत पुस्तके ही सहाव्या पातळीच्या परीक्षेची तयारी करण्यासाठी तयार केलेली मार्गदर्शक पुस्तके आहेत. शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी केवळ या पुस्तकांतील मजकुरावर अवलंबून न राहता, त्यांचा उपयोग भाषेची अपेक्षित पातळी गाठण्यासाठी नमुना म्हणून करणे अभिप्रेत आहे. सहाव्या पातळीच्या लेखन परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना निवडक दोन साहित्यकृती अभ्यासावयाच्या आहेत. उदाहरणादाखल या सरावपुस्तकात दिलेल्या नमुना प्रश्नपत्रिकांमध्ये प्रकाश आमटे यांच्या 'प्रकाशवाटा' व मिलिंद गुणाजी यांच्या 'अनवट : शब्द, सूर, डोंगरवाटा' या साहित्यकृती अभ्यासणे अपेक्षित आहे. परीक्षा घेणारे मंडळ प्रस्तुत साहित्यकृतींऐवजी अन्य साहित्यकृती निवडू शकते. मात्र निवडलेल्या साहित्यकृतींविषयीची माहिती वेळेत जाहीर करणे अपेक्षित आहे.

**मार्गदर्शिकेचा आराखडा**

या पुस्तकातील प्रत्येक पाठात त्याच्या विषयाला अनुसरून विविध पैलू मांडण्यात आले आहेत. त्यावर विद्यार्थ्यांनी आपापसात चर्चा करावी, साधकबाधक विचार करावा व आपले म्हणणे त्यांना मुद्देसूदपणे मांडता यावे यासाठी उपयोगी ठरतील, अशा स्वरूपाच्या उताऱ्यांचा यात समावेश केला आहे. यासाठी पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके, इंटरनेटवरील ब्लॉग्ज, मुलाखती इत्यादींचा तसेच ध्वनिफिती व दृश्यफितींचा वापर करण्यात आला आहे. मजकुराच्या आवश्यकतेनुसार संपादन करण्यात आले आहे. भाषिक कौशल्याबरोबरच वाचन, लेखन, श्रवण व संभाषण यांसंबंधी अंतिम परीक्षेच्या दृष्टीने उपयुक्त ठरतील अशा स्वरूपाचे प्रश्न येथे देण्यात आले आहेत.

**सरावपुस्तकाचा आराखडा**

सरावपुस्तकामध्ये विभाग अ आणि विभाग ब असे दोन विभाग आहेत.

विभाग अ

या विभागात प्रथम सहाव्या पातळीच्या परीक्षेचे स्वरूप स्पष्ट केले असून वाचन, लेखन, श्रवण व संभाषण यांवरील प्रश्न कसे सोडवावेत यासंबंधी विस्तृत मार्गदर्शन केले आहे. उपरोक्त प्रत्येक कौशल्याचा सराव व्हावा यासाठी परीक्षेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांच्या धर्तीवर काही उतारे व त्यांवरील प्रश्न येथे देण्यात आले आहेत.

विभाग ब

पहिल्या पाच पातळ्यांमध्ये विद्यार्थ्यांचे व्याकरणाचे अध्ययन झालेले आहे. ते विचारात घेऊन आतापर्यंत शिकलेल्या व्याकरणाची उजळणी होईल, अशा स्वरूपाचे सरावाचे प्रश्न येथे देण्यात आले आहेत.

सरावपुस्तकाच्या शेवटी दोन नमुना प्रश्नपत्रिका दिल्या आहेत.

या कामात बहुमोल साहाय्य करणाऱ्या राज्य मराठी विकास संस्थेचे अधिकारी आणि कर्मचारी यांचे, तसेच, कुलगुरू सुहास पेडणेकर आणि प्र-कुलगुरू रवींद्र कुलकर्णी यांच्या नेतृत्वासह कार्यतत्पर अशा मुंबई विद्यापीठातील अधिकाऱ्यांचे व हा प्रकल्प सुरळीत चालण्यासाठी साहाय्य करणाऱ्या सर्वांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

माधुरी पुरंदरे, सोनाली गुजर, विभा सुराणा आणि संजय कृष्णाजी पाटील
संपादक

# अनुक्रमणिका


| पाठ | शीर्षक | विषय | उतारा, ध्वनिफीत व दृश्यफीत | लेखन व संभाषणकौशल्य, व्याकरण | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| १ | शब्द शब्द जपून ठेव | ✧ मराठी भाषेतील गंमती<br>✧ भाषेचा लवचीकपणा<br>✧ मराठीतील एकाक्षरी शब्द<br>✧ संवादाची माध्यमे<br>✧ माध्यमांचा प्रभाव | भाषा आणि भाषेचा लवचीकपणा / *पु. ल. देशपांडे*<br>खाणे : एक भाषिक व्यवहार / *नीलिमा गुंडी*<br>भाषेतील बदल / *प्र. ना. परांजपे*<br>एक एक अक्षर / *द. दि. पुंडे*<br>समाजमाध्यमे / *गजेंद्र देवडा*<br>समाजमाध्यमे<br>पेपर (कविता) / *इंदिरा संत* | मुलाखत, चर्चा, मतप्रदर्शन, सारांशलेखन, शब्दक्षेत्र, वाक्प्रचार, एकाक्षरी शब्द, सर्वनामांची रूपे, सामासिक शब्द, विशेषणे | ८ |
| २ | घे भरारी | ✧ शालेय शिक्षण, परीक्षा, गुण<br>✧ शिक्षणाचे तत्त्वज्ञान<br>✧ शैक्षणिक सहली<br>✧ शिक्षणाचे विविध पैलू | होम स्कूलिंग / *चेतन व प्रीती एरंडे*<br>बिगरी ते मॅट्रिक<br>पक्षी जाय दिगंतरा / *मारुती चितमपल्ली*<br>रूपकळा (कविता) / *बा. भ. बोरकर*<br>काव्यवाचन / सुनीताबाई देशपांडे<br>गोबीकन्या सुचेता / *सुचेता कडेठाणकर, वंदना अत्रे*<br>मुलाखत / मधुगंधा कुलकर्णी<br>जिद्द / *भीमसेन जोशी*<br>मुलाखत / रेणू दांडेकर<br>गीत / आकाशी झेप घे रे पाखरा | मुलाखत, चर्चा, चर्चेचे टिपण करणे, वादविवाद, शेवटी 'न' व 'ण' असणारे शब्द, 'झुळझुळणे' सारखे ध्वनिवाचक शब्द, समानार्थी शब्द | २६ |
| ३ | आस नित्य नव्याची | ✧ संशोधन व तंत्रज्ञान<br>✧ तंत्रज्ञानातील बदलांचा मानवी जीवनावरील परिणाम<br>✧ ललितकला व तंत्रज्ञान<br>✧ भारतीय वैज्ञानिक व त्यांचे शोध<br>✧ महिला वैज्ञानिक<br>✧ पेटंट | 'दशक'क्रिया लोकसत्ता अग्रलेख<br>व्याख्यान : इंटरनेट ऑफ थिंग्ज<br>विज्ञान गीत (कविता) / *शंकर वैद्य, सतीश सोळांकूरकर*<br>संगीत व तंत्रज्ञान / *ए. आर. रहमान, वंदना अत्रे*<br>गणित / *अच्युत गोडबोले*<br>डॉ. कमला सोहोनी / *अरविंद वैद्य*<br>डॉ. रघुनाथ माशेलकर<br>बौद्धिक संपदा / *मृदुला बेळे* | चर्चा, मतांची कारणमीमांसा, उतारालेखन, शब्दाला प्रतिशब्द, स्थल व अंतराशी संबंधित वाक्प्रचार, अर्थ न बदलता वाक्यांचे पुनर्लेखन, 'गल्लोगल्ली', 'पावलोपावली' सारखे शब्द | ४६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | कोणे एके काळी | ✧ पुरातत्त्वशास्त्र<br>✧ इतिहास<br>✧ आठवणी<br>✧ आख्यायिका<br>✧ काळविषयक जाणिवा | पुरातत्त्वाची वाटचाल / *मधुकर केशव ढवळीकर*<br>हरितात्या<br>पैठणी (कविता) / *शांता शेळके*<br>सोबत / *सुनीता देशपांडे*<br>काळभान / *वैशाली करमरकर* | मुलाखत, सादरीकरण, चर्चा, ऐतिहासिक, पौराणिक संदर्भ असलेले मराठीतील वाक्प्रचार, नाम-क्रियापद जोड्या, कमी-अधिक तीव्रतादर्शक शब्द, समानार्थी शब्द, काळाशी संबंधित शब्द | ६७ |
| ५ | हे जग सुंदर आहे | ✧ सृजन<br>✧ प्रकाश व प्रकाशाचे प्रदूषण<br>✧ प्रकाश आणि वर्तन<br>✧ आंतरिक पर्यावरण<br>✧ हवामान<br>✧ पर्यावरण प्रदूषण<br>✧ संस्कृती आणि पर्यावरण<br>✧ नाते निसर्गाशी | पिलू / *प्रकाश गोळे*<br>अनुभवकथन / किरण पुरंदरे<br>प्रकाश / *माधव आचवल*<br>प्रकाश निराळ्या दृष्टिकोनातून / *पु. श्री. लेले*<br>आंतरिक पर्यावरणाची हानी / *दिलीप कुलकर्णी*<br>ऋतुहीन (कविता) / *गुरू ठाकूर*<br>मुलाखत / पावसाचा अंदाज<br>कर्ब उत्सर्जन कसे कमी करायचे / *अतुल देऊळगावकर*<br>सांस्कृतिक पर्यावरण / *मधुकर केशव ढवळीकर*<br>गीत / सरीवर सर | संवाद, मतप्रदर्शन, अनुभवकथन, चर्चा, योग्य शीर्षके देणे, वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग, प्रकाशाचे शब्दक्षेत्र, प्रकाशाशी संबंधित विशेषणे, सारखीच अक्षरे पण कान्यामुळे फरक पडणारे शब्द | ८३ |
| ६ | तिसरी घंटा | ✧ अभिव्यक्तीचे माध्यम नाटक<br>✧ संगीतनाटक<br>✧ बालगंधर्व यांच्याविषयी<br>✧ नाटकांतील संगीत<br>✧ प्रायोगिक नाटक<br>✧ नाटकातील नटाचे स्थान<br>✧ रंगभूमीविषयी | नाटक / *पु. ल. देशपांडे*<br>नाट्यसंगीत<br>नाट्यगीत / काटा रुते कुणाला<br>बालगंधर्व / *सुहास लिमये*<br>नाट्यपरंपरा / *सतीश आळेकर*<br>नाट्यपरिचय / घाशीराम कोतवाल<br>अनुभवकथन / भास्कर चंदावरकर<br>मुलाखत / डॉ. श्रीराम लागू<br>प्रायोगिक नाटक म्हणजे नेमकं काय? / *निपुण धर्माधिकारी*<br>मुलाखत / विजया मेहता<br>नट (कविता) / *कुसुमाग्रज*<br>नट, नाटक आणि नाटककार / *महेश एलकुंचवार* | मतप्रदर्शन, कारणमीमांसा, लेखन, 'लक्ष' नामाबरोबरची क्रियापदे, एका शब्दसमूहाजागी अन्य शब्दसमूह वापरणे, समानार्थी शब्द वापरून वाक्य करणे, बोलभाषेतील वाक्ये लेखनभाषेत रुपांतरित करणे | १०५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | कलांच्या प्रांगणात | ✧ संगीत कलाकार<br>✧ संगीत महोत्सव<br>✧ पंडित जसराज यांच्याविषयी<br>✧ चित्रकला<br>✧ स्टेन्ड ग्लास<br>✧ शिल्पकार करमरकर | महाराष्ट्रातील संगीत महोत्सव / *चैतन्य कुंटे*<br>मोहक मार्तंड / *लोकसत्ता अग्रलेख*<br>मुलाखत / किशोरी आमोणकर<br>एका गायकाचे फेसबुक लाइव्ह / *सुहास किर्लोस्कर*<br>किलबिललेले उजाडताना (कविता) / *विंदा करंदीकर*<br>प्रकाशाशी जुळले नाते / *सुमन वाडये, स्वाती चंदगडकर*<br>आयुष्याची मौल्यवान माती / *सुहास बहुळकर*<br>सांगली वस्तुसंग्रहालय | मुलाखत, अभिप्राय देणे, उताऱ्याचे पुनर्लेखन, वाक्प्रचार, वर्तमान काळाऐवजी भूतकाळ वापरणे, विशेषण-विशेष्य जोड्या, रंग व ध्वनीशी संबंधित शब्द, नाम-विशेषणे जोड्या | १२५ |
| | साहित्य विविधा | | वाचनासाठी विविध साहित्य उतारे<br>अभिवाचन | | १४६ |

# १ शब्द शब्द जपून ठेव



नमस्कार. मराठी भाषाशिक्षणाच्या सहाव्या पातळीमध्ये तुमचे स्वागत. आधीच्या पाच पातळ्यांमध्ये मराठी भाषेची तोंडओळख होणे ते दोस्ती होणे इथपर्यंतचा पल्ला तुम्ही गाठला आहे. मराठी भाषेशी जुळलेले तुमचे नाते सहाव्या पातळीमध्ये अधिक घट्ट होईल. दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या मराठीबरोबरच मराठीतील विविध विषयांवरचे साहित्यिक, वैचारिक लेखन तुम्ही या पातळीमध्ये वाचाल. त्यांवर चर्चा कराल.

भाषा हे संवादाचे सर्वांत प्रभावी माध्यम आहे. ध्वनी आणि चिन्हांपासून भाषेचा प्रवास सुरू झाला. बोली व लिखित स्वरूपातील भाषेचे टप्पे पार करत, आता समाजमाध्यमांवर पुन्हा प्रचलित झालेल्या चिन्हांच्या भाषेपर्यंत येऊन तो पोहोचला आहे. भाषेचा हा वर्तुळाकार प्रवास निरखणे रंजक तर आहेच; त्याचबरोबर भाषेविषयी काही मूलभूत चिंतन करण्यास प्रवृत्त करणारेदेखील आहे. तेव्हा, भाषा आणि संवाद यांविषयी व्यक्त होत सहाव्या पातळीचा प्रारंभ करू या.

## १ मराठी भाषा शिकताना तुम्हाला आलेला एखादा छान अनुभव वर्गात सांगा.

## २ मुलाखत : तुम्ही दोन जणांशी संवाद साधा. त्यांना पुढील प्रश्न विचारा.

क. आजवरचा मराठी भाषा शिकण्याचा तुमचा प्रवास कसा होता?

ख. तुम्ही मराठी भाषेचा उपयोग कशासाठी करता?

ग. मराठी भाषा शिकण्याचा तुम्हाला काय फायदा झाला?

घ. सहाव्या पातळीवर मराठी शिकताना तुमच्या काय अपेक्षा आहेत?

च. तुम्ही कोणकोणत्या भाषा बोलता? दैनंदिन जीवनात, कामाच्या ठिकाणी किंवा शिक्षणात तसेच प्रवासात तुम्ही कोणत्या भाषांचा वापर करता?

छ. तुमच्या मातृभाषेव्यतिरिक्त अन्य कुठली भाषा तुम्हाला सर्वांत जास्त आवडते किंवा सर्वांत उत्तमरित्या बोलता येते? का?

ज. जेव्हा तुम्ही मराठीची तुमच्या मातृभाषेबरोबर तुलना करता, तेव्हा त्या दोन्ही भाषांमध्ये कोणते साधर्म्य आणि काय फरक आढळून येतो?

## ३ भाषा आणि भाषेचा लवचीकपणा




भाषेचा उगम हा शब्दकोशातून होत नसतो. माणसाचे आचार-विचार, आशा-आकांक्षा, नवी निर्मिती, जीवन अधिक सुंदर करणाऱ्या कल्पना, समाजाने स्वीकारलेली ध्येयधोरणं ह्यांतून भाषेची श्रीमंती वाढत असते. प्रत्येक नवा शब्द जीवनात एक नवा संदर्भ घेऊन येत असतो. एखादा शब्द डोळ्यांपुढे नाना प्रकारच्या चित्रमालिका उभ्या करून जातो. नुसतं 'जत्रा' असं म्हटलं की, एखाद्या देवाची जत्रा आपण कधी पाहिलेली असेल तर मनापुढून झरकन् त्या देवाच्या देवळाचं शिखर, मैदानातली फिरणारी ती प्रचंड फिरती चाकं, त्या परिसरात मांडलेली हलवायांची, खेळण्यांची, भांड्यांची, कपड्यांची दुकानं, पिपाण्या वाजवीत मोकाट सुटलेली मुलं, लाउडस्पीकरवरून कानांवर आदळणारी ती गाणी... असा चित्रपट डोळ्यांपुढून सरकून जातो. ही चित्रं मनात घर करून बसलेली असतात. व्यक्तिगत मनात असतात तशी जनमानसातही असतात. [...] ज्यांना त्या शब्दाच्या संदर्भाची जाण आली आहे अशा माणसांचा एक समुदाय तयार होतो. त्या त्या विशिष्ट ध्वनीचे संकेत त्या समुदायाला समजायला लागतात. ध्वनीचे असे असंख्य संकेत तयार होतात आणि ते समजणाऱ्या समुदायाची भाषा तयार होते. आणि प्रत्येक क्षेत्रात नवीन निर्मिती करायची ओढ ही निसर्गाने फक्त माणसालाच दिलेली असल्यामुळे त्या भाषेत नवे ध्वनिरूप संकेत तयार होतात. त्यात माणसाला आपल्याला आलेले सुखदु:खाचे नानाप्रकारचे अनुभव, संशोधनातून उलगडलेली सृष्टीतली रहस्यं, अशा निरनिराळ्या घटना असतात. आपल्याला जीवनात आढळलेलं जे काही असेल ते

दुसऱ्याला सांगायला भाषा नावाचं साधन सापडतं. नवी निर्मिती करायची आणि ती दुसऱ्यांना सांगायची ओढ फक्त माणसालाच दिलेली असल्यामुळे जीवनातल्या प्रत्येक क्षेत्रात सतत काहीतरी नवीन, काहीतरी निराळं करण्याची त्याची धडपड चालू असते. ह्या धडपडीतूनच नवी संस्कृती जन्माला येत असते. [...]

जेत्यांच्या भाषेबरोबर अपरिहार्यपणे त्यांची भाषा आणि संस्कृती येते. आणि मग ती भाषा, ती बोलणाऱ्यांचे रीतीरिवाज, त्यांचं साहित्य, त्यांचं संगीत ह्या गोष्टींचं कधी सक्तीनं, तर कधी लाचार वृत्तीनं अनुकरण सुरू होतं. [...]

परकीय भाषेतल्या शब्दाला स्वत:च्या भाषेतला प्रतिशब्द केवळ तयार करून भागत नाही. तो शब्द सतत कानांवर पडावा लागतो, तरच तो भाषेत येऊन बसतो आणि एकदा एखादा शब्द वाचण्यात रूढ झाला, की तो परकी आहे म्हणून उचलून बाहेर फेकणं कधीही शक्य नसतं आणि पुष्कळदा आवश्यकही नसतं. नवे शब्द बोलण्यात येतात तेव्हाच भाषा समृद्ध होते. "महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या स्वयंचलित वाहनाने मी आलो," असं कोणी म्हणताना मी तरी ऐकलेलं नाही. जनतेनं त्या सरकारी बसला 'येष्टी' म्हणायला सुरुवात केली. स्टेट ट्रान्सपोर्टची एस॰ टी॰ ही आद्याक्षरे आहेत, वगैरे काहीही त्या लोकांना माहीत नव्हतं. तिथल्या अधिकारी वर्गाने एस॰ टी॰ म्हणायला सुरुवात केली ते जनतेच्या कानावर पडायला लागलं आणि ती बस 'येष्टी' झाली.





मूळचा 'बस' हा इंग्रजी शब्दसुद्धा इतका मराठी केला की "बशीत लय गर्दी झाली", "बशीतनं आलो" अशीही भाषा सुरू झाली. बस चालवणाऱ्याला चालक, वाहक वगैरे कितीही शासकीय प्रतिशब्द काढले, तरी बसचा ड्रायव्हर 'डायवर'च राहिला. ड्रायव्हर आला, कंडक्टर आला, बस-ष्टाप आला, पाशिंजर आले, तिकीट आलं – 'तिकीट रिजवड' करणं आलं... आणि हे शब्द इतके मराठी झाले, की त्यांना मराठीसारखे विभक्तिप्रत्ययही लागायला लागले. ष्टेशनात गर्दी होती, गाडी टायमावर आली, डायवरने स्पीडमध्ये बस हाणली असली वाक्यं कानावर पडली तरी "हरहर! मराठी भाषेची काय ही विटंबना," असं काही वाटलं नाही. किंबहुना परकी शब्द सहजपणाने पचवायची भाषेतली ताकद तिला अधिक सशक्त बनवते. ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रात अनेक शोध लागत असतात. त्या त्या शोधाचं नामकरण ज्या देशातल्या प्रयोगशाळेत ते शोध प्रथम लागतात तिथल्या भाषेत होत असतं. एखादी नवी संकल्पना येते तीही जिथे तिचा जन्म झाला तिथल्या भाषेतून प्रकटते. अलीकडच्या काळात 'ग्लासनॉस्ट' आणि 'पेरिस्त्रोइका' हे शब्द सर्व देशांनी आपापल्या भाषेत जसेच्या तसे स्वीकारले. अशा परकीय शब्दांचा 'हॉबसन जॉबसन' नावाचा कोशही प्रसिद्ध झाला आहे. त्यांत निरनिराळ्या भारतीय भाषांतले निरनिराळे भारतीय शब्द केव्हा वापरले, इंग्रजी साहित्यात त्यांचा कोठे कोठे वापर केलेला आढळतो – हेदेखील संशोधन करून सांगितलं आहे. परक्या भाषेतल्या शब्दांमुळे आपली इंग्रजी भाषा बाटली असं त्यांना

वाटलं नाही. आपण मराठी शब्द ज्या सहजतेनं वापरतो त्या सहजतेनं परभाषेतला शब्द वापरला गेला पाहिजे. मात्र, इंग्रजी शब्द आपलं समाजातलं वरचं स्थान – किंवा मोठेपणा – सिद्ध करायच्या हेतूने वापरला तर ते मात्र चुकीचं ठरेल.

पु॰ ल॰ देशपांडे

**क. वरील उताऱ्याचा सारांश सुमारे १० ओळींत लिहा.**

**ख. 'जेत्यांच्या भाषेबरोबर अपरिहार्यपणे त्यांची संस्कृती येते.' या विधानावर लहान गटात चर्चा करा. उदाहरणे द्या. तुमच्या गटातील चर्चेचा सारांश वर्गात सादर करा.**

**ग. वरील उताऱ्यात 'जत्रा' या शब्दाशी संबंधित देव, देऊळ, दुकाने, प्रचंड फिरती चाके, मिठाई, खेळणी असे अनेक शब्द आले आहेत. हे जत्रा या शब्दाचे शब्दक्षेत्र आहे. पुढे दिलेल्या शब्दांसाठी तुम्ही अशीच शब्दक्षेत्रे तयार करा.**




अ. नोकरी

आ. मराठी संस्कृती

इ. बैठक (फक्त संस्थेची सभा या अर्थी. इतर अर्थ अभिप्रेत नाहीत)

ई. मुंबई

**घ. खाली दिलेल्या शब्दांसाठी वरच्या उताऱ्यात आलेला योग्य शब्द निवडा.**

अ. आचार आणि विचार ................................

आ. आशा आणि आकांक्षा ................................

इ. ध्येयाच्या दिशेने जाणारी धोरणं ................................

ई. चित्रांची मालिका ................................

उ. जनांचे (लोकांचे) मानस ................................

ऊ. रीती आणि रिवाज ................................

ए. विभक्तीचा प्रत्यय ................................

ॲ. पर (अन्य) असलेली भाषा ................................



## ४ खाणे : एक भाषिक व्यवहार

एखाद्या भाषेचा स्वभाव जाणण्यासाठी व्यवहारात शब्द झोकून देण्याची तिची रीत लक्षात घ्यावी लागते. त्यासाठी तिच्यात नाम, विशेषणे, क्रियापदे यांच्याशी निगडित असे किती शब्दप्रयोग आणि वाक्प्रचार आहेत, याचा शोध घेणे मनोरंजक ठरते. उदाहरणार्थ : आपल्या मराठी भाषेत 'खाणे' या एकाच क्रियापदाशी निगडित असलेले शब्दप्रयोग आणि वाक्प्रचार यांचा येथे विचार करू या. त्याआधी हेही लक्षात ठेवायला हवे, की वाक्प्रचार हा जसाच्या तसाच वापरावा लागतो. त्यात विभक्तिप्रत्ययांचा वापर नेमका असावा लागतो. जर 'एखाद्यावर खार खाणे' (म्हणजे एखाद्याचा रागराग करणे) हा वाक्प्रचार 'एखाद्याने खार खाणे' असा वापरला, तर त्यातील अर्थ भुईसपाट होईल!

'खाणे'शी निगडित आणखी काही मासलेवाईक शब्दप्रयोग असे आहेत : (१) वारा खाणे (२) खस्ता खाणे (३) पैसे/लाच खाणे (४) मार खाणे (५) दात-ओठ खाणे (६) दम खाणे (७) डोके खाणे (८) शेण खाणे (९) ठेचा/ठोकर खाणे (१०) गोते/गटांगळ्या खाणे (११) धक्के खाणे (१२) शब्द खाणे (१३) एखाद्याचे शब्द खाणे (१४) भाव खाणे (१५) वेळ खाणे (१६) जीव खाणे (१७) कच खाणे (१८) टक्केटोणपे खाणे (१९) हार खाणे (२०) डुलक्या खाणे (२१) एखाद्याचे मन त्याला खाणे (२२) हाय खाणे.

ही यादी आणखीही वाढवता येईल. (तसा 'डबा खाणे' हाही आपल्या दैनंदिन वापरातील लाक्षणिक शब्दप्रयोग आपल्या ओळखीचा आहेच!) भाषेतून समाजाचे अंतरंग कळते, असे म्हणतात. तेव्हा मराठी माणसाच्या आगळ्यावेगळ्या आहारक्षमतेचा हा पुरावा तर नव्हे? यातून मराठी माणसाच्या प्रवृत्तीवर काय भाष्य करणार?

मराठी माणूस खादाड मानायचा की बुभुक्षित? की त्याच्या रांगडेपणाचे प्रतिबिंब या भाषिक व्यवहारात प्रतिबिंबित झाले आहे; असे म्हणायचे? अर्थात, हे सहज विनोदाचे बोलणे झाले.

थोडे खोलात जाऊन आपल्याला भाषेतील अंगभूत अशी सुप्त अलंकरणशक्ती शोधता येईल. अमूर्तापासून मूर्तापर्यंत सर्व काही खाऊन पचविण्याची अजब अशी जिवट शक्ती सुचवण्याचा हा मार्ग तर नव्हे? 'खाणे' म्हणजे केवळ 'मुखाद्वारे पदार्थ भक्षण करण्याची क्रिया' असा वाच्यार्थ येथे उरत नाही. त्याव्यतिरिक्त इतर अनेक अर्थ यातून सूचित होतात.

कधी 'खाणे' म्हणजे वगळणे. उदा॰ तो लिहिताना अधलेमधले शब्द खातो. कधी 'खाणे' म्हणजे वर्चस्व गाजविणे. उदा॰ अमुक एका चित्रपटातील खलनायकच चित्रपट खाऊन टाकतो. कधी 'खाणे' म्हणजे छळणे. उदा॰ जीव खाणे, डोके खाणे. कधी 'खाणे' म्हणजे इंद्रियांच्याद्वारे अनुभवणे. उदा॰ मार खाणे, धक्के खाणे; तर कधी 'खाणे' म्हणजे मनाने अनुभवणे. उदा॰ हाय खाणे. या 'खाणे' गटातील मनाने अनुभवण्याच्या भावभावनांमध्ये किती विविधता आहे! राग व्यक्त करताना 'दातओठ खाणे' आणि पश्चात्ताप व्यक्त करताना 'एखाद्याचे मन त्याला खाणे' किंवा 'जिवाला खाणे'. एकंदरीत अगदी टोकाच्या भावभावनांची आंदोलने ही 'खाणे'शीच निगडित व्हावीत ना? सगळे रंग एकाच पांढऱ्या रंगात मिसळावेत तसे! अशा वेळी 'खाणे' ही भाषिक क्रिया एक प्रकारे जगण्याच्या सारसर्वस्वाचीच प्रतिमा वाटू लागते.



अन्न ही माणसाची सर्वांत पहिली मूलभूत गरज. त्यामुळे 'खाणे' ही क्रिया जैविक पातळीवरील सर्वांत महत्त्वाची कृती ठरते. तसेच, सुसंस्कृत मानव बनण्याच्या प्रक्रियेतीलही ती पहिली पायरी ठरते. कारण मनुष्य हा एक प्रकारे प्राणी असला तरी त्याने 'काय खावे नि काय खाऊ नये' (उदा॰ दुसऱ्याचे चोरून खाऊ नये; समोर इतर लोक उपाशी असताना खाऊ नये इत्यादी.) अशा नियमांचे पालन करीत करीतच मानवी संस्कृतीची पायाभरणी केली. त्यामुळेच 'पैसे खाणे', 'शेण खाणे'सारखे शब्दप्रयोग 'खाऊ नये ते खाल्ले जात आहे' हे सुचवून सुसंस्कृतपणाची सरहद्द ओलांडल्याबद्दलचा निषेधच एक प्रकारे नोंदवून टाकतात!

भाषिक व्यवहार हा शेवटी जीवनव्यवहाराचे एक अंगच असतो. त्यामुळे 'खाणे'शी संलग्न शब्दप्रयोगांतून आपली शारीरिक व मानसिक रगच कसाला लागत असावी. म्हणच आहे - 'चणे खावे लोखंडाचे, तेव्हा ब्रह्मपदी नाचे!' एकंदरीत 'काहीही खाल - तरच टिकून राहाल' असा जीवनव्यवहारासाठीचा मंत्रच या भाषिक व्यवहारातून जणू सुचवला जात आहे!

नीलिमा गुंडी

**क. या उताऱ्यात खाणे या विषयावर अनेक वाक्प्रचार आले आहेत. यातलेच काही वाक्प्रचार पुढील संवादात 'खाल्ले' - अर्थात गाळले - आहेत. पाहा बरं, तुम्हाला सापडतात का?**

(डोकं, दम, मार, माती, पैसे, बोलणी, दातओठ, भाव, फटके)

सुनंदा - अगं प्रिया, किती धापा टाकते आहेस! धावत आलीस की काय? बस आणि जरा (अ) ------------------- खा.

प्रिया - कालचा प्रकार सांगायचाय तुला म्हणून आले घाईनं.

सुनंदा - हो का? वा! मग बसच. पण आधी हा रव्याचा लाडू खा. अगदी ताजा आहे. हं, आता सांग.

प्रिया - सांगते. पण मी सांगितलं असं कुणाला सांगायचं नाही. मध्ये मध्ये प्रश्न विचारून माझं (आ) ------------------- खायचं नाही. कबूल?

सुनंदा - हो गं बाई, कबूल. बोल आता. किती (इ) ------------------- खातेस!

प्रिया - आधीच स्पष्ट केलेलं बरं. खास बातम्या गोळाही करायच्या आणि फार बडबडते म्हणून वर तुझी (ई) ------------------- ही खायची. परवडणार नाही.

सुनंदा - आता (उ) ------------------- खाशील हं, प्रिया!

प्रिया - ओ. के., ओ. के.! तर झालं असं की, काल शेजारचा समीर आणि खांडेकरांचा विनय, दोघं सपाटून भांडले. समीरचे वडील सोसायटीचे खजिनदार आहेत. त्यांनी (ऊ) ------------------- खाल्ले अशी बातमी पसरली आहे आणि ती विनयनंच पसरवली असं समीरचं म्हणणं आहे. म्हणून खांडेकरांच्या दरवाजासमोर जाऊन त्यानं अगदी (ए) ------------------- खात आरडाओरडा केला. विनयनं त्याला समजावायचा प्रयत्न केला. पण तो ऐकेचना! खांडेकरआजी मध्ये पडल्या म्हणून, नाही तर समीरनं विनयचा (ऍ) ------------------- खाल्ला असता. आमच्या बाल्कनीतून सगळं दिसत होतं ना!

सुनंदा - पण समीरच्या वडिलांनी खरंच (ऐ) ------------------- खाल्ली?

प्रिया - असली तर तेही कळेलच. चल निघते. बाकी लाडू मात्र छान होता, बरं का!

**ख. वरील उताऱ्यात 'एखाद्यावर खार खाणे' या वाक्प्रचाराचा उल्लेख झाला आहे. यातला खार हा शब्द विविध अर्थांनी कसा वापरला जातो हे लक्षात घ्या आणि त्यांचा स्वतःच्या वाक्यात उपयोग करा.**


तो खार - लोणच्यातला द्रव


तो खार - मीठ


ती खार - एक प्राणी

खार खाणे - एखाद्याबद्दल राग धरून ठेवणे
खार - पिकावर पडणारी खार (धुकेमिश्रित पाणी, बुरशी किंवा कीटकांची विष्ठा पडून पिकाचे नुकसान होणे.)
खार - मुंबईतील एका उपनगराचे नाव
खारं - तिखटमीठ लावलेला पदार्थ
पदराला खार लावणे - स्वतःचे पैसे किंवा श्रम खर्चून काम करणे.

**ग. खार या शब्दाप्रमाणेच एकच शब्द पण वेगवेगळे अर्थ असे दोन अनेकार्थी शब्द शोधा.**

उदा॰ : **मान**

**घ. खाणे या विषयावरचे वाक्प्रचार वापरून तुमच्या मित्रमंडळींशी संवाद साधा किंवा वर्गासमोर एखादा उतारा सादर करा.**



## ५ भाषेतील बदल

भाषा कधी स्थिर नसते. नदीच्या प्रवाहाप्रमाणे ती सापडेल त्या वाटेने वाहत राहते. म्हणूनच कबीराने भाषेला 'बहता पानी' म्हटले आहे. तिच्यात सतत बदल होत असतात. काही शब्द मागे पडतात, काही शब्दांचे अर्थ बदलतात, तर काही शब्द नव्याने दाखल होतात. भेटीतील नमस्कार-चमत्कारांच्या रीती बदलतात; व्यक्तींचे उल्लेख करण्याच्या पद्धती बदलतात. शुद्धलेखनाचे नियम बदलतात. शब्दांच्या सामान्यरूपांबाबतचे संकेत बदलतात. अगदी वाक्यरचनांचे साचेसुद्धा बदलतात. कुठलीही नैसर्गिक भाषा या सततच्या बदलांना अपवाद ठरत नाही. किंबहुना, असे बदल होणे हेच भाषेच्या जिवंतपणाचे लक्षण असते. भाषा बदलायची थांबली तर ती संपली, मृत झाली; असे म्हणता येते.

भाषेत बदल होतात कारण समाजात बदल होतात. पोषाखाच्या पद्धती, खाण्यापिण्याच्या सवयी, प्रवासाच्या सोयी, कुटुंबांची व नात्यांची घडण... जीवनाच्या सर्वच अंगांत सतत बदल होत असतो आणि

त्याचे प्रतिबिंब भाषेत उमटत असते. जीवनात भाषा आणि भाषेत जीवन असते, असे आपण म्हणतो ते याच अर्थाने. म्हणूनच जीवनाचा अभ्यास करणाऱ्यांना भाषेच्या अभ्यासाकडे वळावे लागते. वेद किंवा पुराण-काळातील जीवन कसे होते हे वेद-पुराणांच्या भाषेच्या अभ्यासातून समजते. तसेच इतिहासाच्या इतर कालखंडांच्या बाबतीत तत्कालीन समाजव्यवस्था, स्त्री-पुरुष संबंध, जाती व वर्गातील संबंध, श्रद्धा, आर्थिक स्थिती... जीवनाचे कुठलेही अंग घ्या, त्याचे प्रतिबिंब भाषेत पडलेले असते. आणि म्हणूनच सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक अशा कुठल्याही जीवनांगाच्या अभ्यासाची सुरुवात भाषेच्या अभ्यासापासून होते.

प्र॰ ना॰ परांजपे

**क. बदल हा भाषेचा स्थायिभाव आहे, असे तुम्हाला वाटते का? तुमचे मत उदाहरणे देऊन स्पष्ट करा.**

**ख. भाषा लवचीक हवी; पण तिच्यासाठी नियम आवश्यकच आहेत, याविषयी आपल्या सहाध्यायींबरोबर गटात चर्चा करा. तुमच्या गटातील चर्चेचे सार वर्गात सादर करा.**

**ग. पुढे दिलेल्या शब्दांचे मूळ अर्थ आणि मूळ अर्थाबरोबरच प्रचलित असलेले दुसरे अर्थ यांच्या जोड्या जुळवा.**

| मूळ अर्थ | सध्याचा प्रचलित अर्थ |
|---|---|
| १. पोपट* होणे | अ) झकास |
| २. सही* (स्वाक्षरी) | ब) गंडवणे |
| ३. कडक (टणक) | क) खूप छान |
| ४. भारी (जड) | ड) फजिती होणे |
| ५. मामा* बनवणे | इ) मस्त |



* 'सही' या उद्गाराचा उच्चार थोडासा जोरकस होतो.
* पोपट - एक पक्षी * मामा - आईचा भाऊ

शब्दाच्या केवळ मूळ उत्पत्तीच्या ज्ञानापेक्षाही त्या शब्दाची कुळकथा अधिक मनोरंजक व ज्ञानप्रद ठरते. एकच शब्द किंचित वेषांतराने, रूपांतराने जगातील अनेक देशांत, समाजात वावरतो व अभिमानास्पद होतो हे पाहिले म्हणजे एकंदर मानवी कुटुंबाविषयी आपलेपणाची भावना निर्माण झाल्याशिवाय कशी राहील?

न॰ चिं॰ केळकर



## ६ एक एक जे अक्षर

महाराष्ट्राला गेल्या दीडशे वर्षांची कोशरचना परंपरा आहे. दरेक दशकात कोणीतरी एक विद्वान उठतो आणि तनमनधन वेचून एखादा विशिष्ट कोश रचतो. प्रो॰ भा॰ म॰ गोरे यांनीही असेच एक वेड उराशी बाळगले होते. जेथे जेथे एकाक्षरी मराठी शब्द वाचण्यात आले किंवा ऐकण्यात आले, त्यांची त्यांनी सोदाहरण टिपणे तयार करून ठेवली. त्यासाठी त्यांनी 'काव्ये (प्राचीन व अर्वाचीन), नाटके, भावगीते, बोलभाषा, बालभाषा, स्त्रियांचे व प्रादेशिक, ग्रामीण (ग्राम्यही) वाक्प्रचार, कोकणी, खानदेशी, कोल्हापुरी, सांगली, सातारा भागांतील बोलण्याच्या छटा, विशिष्ट शब्द' अशी अमाप सामग्री 'अक्षरशः' पिंजून काढली, आणि आपल्या वयाच्या ८३ व्या वर्षी गोरे यांनी मराठीतील 'एकाक्षरी (शब्दांचा) लघुकोश' प्रसिद्ध केला.

वाचकहो! हा कोश तुम्ही पाहिला नसेल तर मुद्दाम पाहा; तुमची खूप करमणूकही होईल आणि तुमच्या ज्ञानातही भर पडेल. पहिली गोष्ट अशी की, मराठीत एकाक्षरी शब्द असून असून किती असणार! फार तर चिमूटभर असणार! या आपल्या समजुतीला हा कोश धक्का देतो. एकाक्षरी शब्दांनी व त्यांच्या विविधरंगी अर्थच्छटांनी कोशाची चक्क ७ ते ७५ म्हणजे एकूण ६९ पाने व्यापलेली आहेत. (गोरे यांनी या कोशाच्या पुढील आवृत्तीत भर घालण्यासाठी आणखी शब्दसामग्री गोळा करून ठेवली आहे म्हणे!) मराठीतल्या त्या सर्व व्यंजनांचे (ङ, ण वगळता) व सर्वच्या सर्व स्वरांचे मराठी एकाक्षरी शब्द आहेत, हे कळून आपण अगदी अचंबितच होतो.

हं
का
छे
उं
न
हां
ह्या:
बे

गमतीची गोष्ट अशी की, नेहमीच्या शब्दकोशात आढळणारी सर्व आश्चर्यस्थळे, सर्व गमती या एकाक्षरी कोशात आढळतात. उदाहरणार्थ, एका शब्दाला अनेक अर्थ असतात हा नियम एकाक्षरी शब्दाला लागू आहे. उदाहरणार्थ, 'न' या एका अक्षराने एक नव्हे, दोन नव्हे तर चक्क दहा प्रकारचे अर्थ व्यक्त होतात, हे कोशकार गोरे आपल्या नजरेस आणून देतात. याउलट एकाच अर्थासाठी वेगवेगळे अनेक शब्द असतात, हा नेहमीचा नियमही एकाक्षरी शब्दांना लागू होतो, हे गोरे यांच्या कोशाचे नीट निरीक्षण केले तर कळते. उदाहरणार्थ, 'मृत्यू पावलेला' या अर्थी कै॰ (कैलासवासी), पै॰ (पैगंबरवासी) आणि वै॰ (वैकुंठवासी) असे तीन एकाक्षरी शब्द मराठीत आहेत. (या खेरीज प॰ लो॰ वा॰ म्हणजे परलोकवासी किंवा ख्रि॰ वा॰ म्हणजे ख्रिस्तवासी अशी आणखी एकाक्षरी संक्षिप्त रूपे मराठीत आहेत, हीही माहिती प्रो॰ गोरे आपल्याला पुरवितातच).



इतकेच नव्हे, तर हिंदी भाषेचा प्रभाव म्हणून 'स्व॰' हा एकाक्षरी शब्द ('स्वर्गीय'साठी) आपण वापरतो ते चुकीचे आहे, असे प्रो॰ गोरे आपल्या निदर्शनास आणून देतात. कारण 'स्वर्गीय' हा शब्द मराठी भाषेत 'अतिशय सौंदर्यपूर्ण' या अर्थी वापरला जातो (उदा॰ स्वर्गीय दृश्य, स्वर्गीय आवाज इ॰) याकडे प्रो॰ गोरे आपले लक्ष हेतुतः वेधतात. या कोशाला निरनिराळी ८ परिशिष्टे जोडून गोरे यांनी एकाक्षरांबाबत भरपूर अधिकची माहिती दिलेली आहे. ती पाहताना वाचक समृद्ध होत जातो.

या कोशाची आणखी एक गंमत आहे. मराठीचे प्राध्यापक डॉ. गं. ना. जोगळेकर यांनी या कोशाला 'अल्पाक्षर' रमणीय अशी प्रस्तावना लिहिली आहे. त्या प्रस्तावनेचे शीर्षक एकाक्षरी आहे. काय असेल ते? ते आहे 'वा!' ते वाचून माझ्या मनात आले, की एखाद्या छिद्रान्वेषी समीक्षकाने जर या कोशावर परीक्षण लिहिले, तर तो परीक्षक त्या लेखाला शीर्षक देऊ शकेल 'हॅ:' किंवा 'ह्या:' किंवा 'शी:', 'छी:' हो की नाही? आणि वाचकहो! तुम्ही हा कोश पाहायला घेतलात आणि एखाद्या एकाक्षरी शब्दाचा गोऱ्यांनी दिलेला अर्थ तुम्हाला पटला नाही तर तुम्ही स्वतःशीच पुटपुटाल, 'हं!' (निषेधार्थी उद्गार) आणि समजा, एखादा अर्थ अगदी पटला तरीही वेगळा सूर काढून म्हणाल, 'हं!' (प्रशंसादर्शक उद्गार) तर मराठीतल्या एकेका अक्षराची अशी अक्षरशः खूप गंमत आहे. त्या कुठल्याशा कवीने म्हटले आहे की - "एक एक जो शब्द नवा तू शिकसी." प्रो. भा. म. गोरे यांचा एकाक्षरी कोश पाहिल्यावर त्यात किंचित बदल करून मला म्हणावे वाटते आहे की - "एक एक जे अक्षर नवे तू शिकसी."

द. दि. पुंडे

**क. हं, का, छे, उं, न, हां, ह्या:, बे असे अनेक एकाक्षरी शब्द आपण मराठीत वापरतो. अजूनही काही शब्द आठवा आणि खाली दिल्याप्रमाणे वेगवेगळे संवाद लिहा. पण प्रत्येक वाक्यात एक तरी एकाक्षरी शब्द आला पाहिजे असा प्रयत्न करा.**

राधा - काम संपवलंस का सगळं?

श्रेया - का गं?

राधा - असंच विचारलं गं.

श्रेया - हं.

राधा - छे! पण मी कोण विचारणार?

श्रेया - विचार ना, त्यात काय एवढं.

**एकाक्षरी शब्दकोशातून काही निवडक -**

| | | |
|---|---|---|
| आँ? | = | काय म्हणालात? या अर्थी प्रश्नार्थक उद्‌गार |
| आँ! | = | आश्चर्यदर्शक उद्‌गार |
| आंऽऽ | = | लहान मुले तक्रार करताना काढतात तो आवाज |
| च् च् | = | वाईट वाटणे, हळहळ व्यक्त करणे. उदा. च् च्! तो वारला हे फार वाईट झालं. |
| च् | = | चिडचिड व्यक्त करणे. उदा. च्! पुस्तक वाचायला घेतलं आणि नेमकी वीज गेली. |
| च | = | मुलांची भाषा. उदा. चलातू चगळंस चकटफू चवंह चसतंअ. |
| सु | = | उपसर्ग. उदा. सु-कुमार = सुकुमार, सुप्रभात, सुगंध |
| सू | = | समानार्थी शब्द सुई |

**'मराठीतील एकाक्षरी (शब्दांचा) लघुकोश' यावर आधारित**

**ख. लक्षात घ्या.**

| | | |
|---|---|---|
| <br>**कोश**<br>अ. साठा, संग्रह | **कोश**<br>आ. अळीभोवतीचे आवरण<br> | <br>**कोष**<br>खजिना |
| उदा. वाक्प्रचारांचा **कोश** आहे का तुझ्याकडे? | उदा. घाबरू नकोस, तो रेशमाच्या अळीचा **कोश** आहे. | उदा. युद्ध सुरू राहिल्याने हळहळू राज्याचा **कोष** रिकामा होऊ लागला. |

**ग. पुढील उताऱ्यात काही नामे पुन्हा पुन्हा येतात. त्यांच्याऐवजी सर्वनामे वापरून उतारा पुन्हा लिहा.**
शाळेपासून स्टेशन दीड किलोमीटर दूर आहे. शाळा टेकाडावर असल्यामुळे तिथून स्टेशन स्पष्ट दिसते. दुपारी साडेबारा वाजता शाळा सुटली, की मी, सदाशिव, प्रकाश आणि गोपाळ मागच्या बाजूने टेकडी उतरतो. रेल्वेचे रूळ तिथूनच जातात. मी, सदाशिव, प्रकाश आणि गोपाळ रुळांवरून चालत स्टेशनापर्यंत जातो. मुली रस्त्याने येतात म्हणून उशिरा पोचतात. सव्वा वाजता गाडी असते; पण गाडी कधीच वेळेवर येत नाही म्हणून बरे. मुलींना रुळांवरून जाण्याची परवानगी नसते. राऊतबाईंचे मुलींवर लक्ष असते. मला, सदाशिवला, प्रकाशला आणि गोपाळला राऊतबाई काही म्हणत नाहीत, म्हणून मुली माझ्यावर, सदाशिववर, प्रकाशवर आणि गोपाळवर खार खाऊन असतात. मुलींचे बरोबर आहे. मुलींना मुलग्यांसारखे काहीच करायला मिळत नाही; फक्त मुलांआधी गाडीमध्ये चढायला मिळते आणि बसायला जागा मिळते. मुलांना तेवढेही सहन होत नाही. त्यावरून मुलगे मुलींना सारखे टोमणे मारतात. मग कंटाळून मुली उभ्या राहतात आणि मुलांना जागा देतात. हे वाईट आहे.

**मराठी आणि तुमची मातृभाषा किंवा इतर भाषा यांमधील उच्चार किंवा लेखन यामधील साम्य असलेले काही शब्द तुमच्या लक्षात आले असले, तर ते नोंदवा आणि वर्गासमोर सादर करा.**

उदा. दात (मराठी), दंत (संस्कृत), dent (इंग्रजी)



## ७ पुढीलपैकी काही प्रसंगांमध्ये वेगवेगळ्या प्रकारे संवाद साधलेला आहे. ते प्रसंग शोधून काढा. त्याची कारणमीमांसा करा आणि तुमच्या सहाध्यायींबरोबर त्यावर चर्चा करा.

क. तुम्ही बाहेरून घरी आल्यावर तुमचा पाळीव कुत्रा तुमच्याभोवती उड्या मारत आहे.

ख. एक जोडपे मूकपणे रात्रीचे जेवण घेत आहे. तिथेच तेव्हा टी. व्ही. सुरू आहे.

ग. प्राध्यापक तास घेत आहेत. विद्यार्थी महत्त्वाचे मुद्दे नोंदवून घेत आहेत.

घ. तुम्ही घड्याळ पाहताय, कारण किती वाजलेत ते तुम्हाला जाणून घ्यायचंय.

च. एक रुग्णवाहिका भोंगा वाजवत रस्त्यावरून जात आहे.

छ. एक माणूस स्वत:ला आरशात न्याहाळत आहे.

ज. संगीत मैफलीत श्रोते माना डोलावत आहेत.

झ. एक कर्मचारी त्याच्या वरिष्ठासमोरून काही न बोलता खालमानेने जात आहे.

ट. बाळ रडत आहे. आई अंगाईगीत गात आहे.

ड. तुमच्या स्मार्टफोनने फोनची बॅटरी संपत आल्याचा संदेश दिला आहे.




## ८ समाजमाध्यमे

*माणसाची व्यक्त होण्याची गरज आणि त्या व्यक्त होण्याला मिळणारा प्रतिसाद हा संवादाचा पाया आहे. दोन व्यक्तींमधला संवाद अधिक व्यापक पातळीवर पोचवणारी संवादमाध्यमे म्हणजेच समाजमाध्यमे होत. ही समाजमाध्यमे आता आपल्या जगण्याचा अविभाज्य भाग बनली आहेत. त्यांच्याविषयी अधिक काही :*

इंटरनेटवर, अर्थात आंतरजालावर, आधारित जी माध्यमे आहेत, त्यांसाठी ‘सोशल मीडिया’ किंवा ‘समाजमाध्यमे’ हा शब्द वापरला जातो. फेसबुक, ट्विटर, युट्युब अशा अनेक माध्यमांचा सोशल मीडियात समावेश होतो. या माध्यमांत खरंच काही सामाजिकता आहे, की हे आभासी जग आहे, हा एक गहन प्रश्न आहे. माणूस जेव्हा शेती करत होता, तेव्हा कृषिप्रधान समाजाची निर्मिती झाली. औद्योगिक क्रांती झाल्यानंतर समाज उद्योगप्रधान झाला. आता २१व्या शतकातील आजचा समाज माहितीप्रधान समाज म्हणता येईल. कारण, माहितीला प्राप्त झालेले अनन्यसाधारण महत्त्व. ही माहिती आपल्याजवळ असणे किंवा या माहितीचे जलद गतीने हस्तांतरण करणे या गोष्टी महत्त्वाच्या ठरल्या आहेत. मुख्य प्रवाहातील मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर कुणाचे तरी वर्चस्व अथवा मालकी आहे. त्यामुळे या माहितीमधून हे वर्चस्व सतत डोकावत असते. समाजमाध्यमांचे मूलभूत वैशिष्ट्य असे की, सामान्य माणसांकडे याची मालकी आहे. इंटरनेटच्या माध्यमातून एक वेगळे आभासी जग प्रत्येक जण तयार करत असतो. अतिशय वेगाने बातम्यांचे आदान-प्रदान या समाजमाध्यमांतून होत असते. या सगळ्यात जाती, धर्म, लिंग, भाषा यांचा अडसर होत नाही, ही समाजमाध्यमांची मोठी ताकद आहे. पाश्चात्त्य राष्ट्रांत फेसबुक, ट्विटर, युट्युब

या सगळ्या माध्यमांचा वापर राजकीय व्यक्ती आणि संस्थांकडून राजकारणात आणि निवडणुकीत बऱ्याच काळापासून केला जातो. भारतात त्याचा वापर तितका होत नव्हता. मात्र २०१४च्या लोकसभा निवडणुकीपासून समाजमाध्यमांचा प्रचारासाठी पूर्ण उपयोग करून घेतला गेला. युवा वर्गात निवडणुकीबद्दल जागरूकता निर्माण होण्यात समाजमाध्यमांचा मोठा वाटा आहे. त्याआधी २०११ साली अण्णा हजारेंच्या आंदोलनाला समाजमाध्यमांतून मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळाला होता. प्रसिद्ध मान्यवर व्यक्ती समाजमाध्यमांवर सक्रिय राहण्याचे, त्याद्वारे लोकांशी संपर्कात राहण्याचे प्रमाण वाढले आहे.

मात्र आपण जसे 'अति तिथे माती' म्हणतो, तशी परिस्थिती सध्या समाजमाध्यमांबद्दल दिसून येत असून या माध्यमांतील उणिवा समोर येत आहेत. समाजमाध्यमांवर खूप सारी माहिती येत असते. माहितीच्या स्पर्धेत खोट्या माहितीचे प्रमाणही जास्त आहे. त्यामुळे माहितीच्या सत्यतेवर आणि विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. या माध्यमांवर सातत्याने आशयनिर्मिती होत असते. बऱ्याच वेळेला या आशयाचा निर्माता कोण आहे, हे सांगणे अवघड होऊन जाते. या माध्यमांत खासगीपणाचा अभाव असतो. अनेकदा ही माध्यमे अनियंत्रित आणि निरंकुश पद्धतीने वापरली जाताना दिसतात. माहितीचा वापर एक शक्ती म्हणून करत असताना एकांगी, सनसनाटी, बटबटीत स्वरूपाचा आशय समाजमाध्यमांवर पसरवला जातो. समाजमाध्यमांचे इतक्या मोठ्या प्रमाणावर जे जाळे पसरले आहे, त्याचा दुरुपयोग समाजविघातक प्रवृत्तींकडून होतानाही दिसतो. पण, त्याबाबत जनजागृती केल्यास या समाजमाध्यमांचा वापर नियंत्रित आणि सकारात्मक पद्धतीने होईल, अशी आशा ठेवायला हरकत नाही.



गजेंद्र देवडा

**क. पुढील मुद्द्यांच्या अनुषंगाने तुमच्या सहाध्यायींबरोबर चर्चा करा व चर्चेचा सारांश वर्गात सादर करा.**
– समाजमाध्यमांवर नियंत्रण आणणे आवश्यक आहे / शक्य आहे / योग्य आहे का?

**ख. संवादाची माध्यमे वाढल्यापासून माणसांचा एकमेकांतील संवाद वाढला आहे, हे विधान तुम्हाला पटते का? याविषयी तुमची भूमिका उदाहरणे देऊन स्पष्ट करा.**

**ग. समाजमाध्यमांमुळे भाषेच्या वापरात बरेच बदल झालेले दिसतात. तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव आणि भाषेचे अधिकाधिक इंग्रजीकरण होणे यांत अन्योन्यसंबंध असतो असे तुम्हाला वाटते का? तुमचे मत स्पष्ट करून तुमच्या सहाध्यायींबरोबर याविषयी चर्चा करा.**

**घ. काही विशेषणांमागे खूप शब्द लावून आपल्याला तसाच अर्थ असणारे एक नवीन विशेषण मिळते. पुढे दिलेल्या अशा प्रकारच्या काही विशेषणांच्या जोड्या तुम्हाला लावता येतील?**

उदा. खूप सुंदर – अतिसुंदर

| | |
|---|---|
| अ. खूप जुने | (एक) घनदाट |
| आ. खूप श्रीमंत | (दोन) अत्याधुनिक |

| | |
|---|---|
| इ. खूप छोटे | (तीन) तिखटजाळ |
| ई. खूप चांगले | (चार) प्रशस्त, ऐसपैस |
| उ. खूप सडपातळ | (पाच) सूक्ष्म |
| ऊ. खूप जड | (सहा) प्राचीन |
| ए. खूप तिखट | (सात) उत्कृष्ट |
| ॲ. खूप लांब-रुंद | (आठ) धनाढ्य |
| ऐ. खूप दाट | (नऊ) हडकुळा |
| ओ. खूप आधुनिक | (दहा) अवजड |



**९ पुढील मुलाखत ऐका. त्यावर आधारित प्रश्नांसाठी पुढे दिलेल्या पर्यायांतून योग्य पर्याय निवडा.**

क. नीलांबरी यांच्या मते समाजमाध्यमांचा विद्यार्थ्यांना होणारा फायदा कोणता?
अ) अचूक माहिती मिळते
आ) मते जाणून घेता येतात
इ) संपर्क साधन
ई) विविध शिक्षण क्षेत्रांची व संधींची घरबसल्या माहिती मिळते



ख. समाजमाध्यमांचे कोणते प्रमुख वैशिष्ट्य नीलांबरी यांनी सांगितले आहे?
अ) तंत्रज्ञानात्मक सुविधा आ) समीक्षण करणे
इ) एकमेकांशी जोडले जाणे ई) ऑनलाईन राहणे

ग. फेसबुकच्या सकारात्मक वापराचे कोणते उदाहरण अमोल यांच्या या ध्वनिफितीत नाही?
अ) फेसबुकवरून व्यवसाय वाढवला
आ) फेसबुकवरून लेखनक्षेत्रात संधी मिळाली
इ) फेसबुकमुळे लोकप्रियता मिळाली
ई) फेसबुकवरून विक्री केली

घ. अनुराग कश्यप यांनी अमोल यांना फोन का केला?
अ) अमोलच्या पटकथेवर चित्रपट करण्याबद्दल
आ) अनुरागच्या पटकथेवर अमोलचा चित्रपट करण्याबद्दल
इ) अमोलच्या पटकथावर चित्रपट करण्याबद्दल
ई) अमोलच्या पटकथावर चित्रपट करणे

च. चित्रपट-समीक्षणात पुढीलपैकी काय करणे अपेक्षित नाही?

अ) मूल्यमापन   आ) परीक्षण

इ) चिकित्सा   ई) उपचार



## १० कविता

### पेपर

पहाटेचा पहिला श्वास
कागदाच्या खरपूस वासाचा. ताज्या छपाईच्या शाईचा.
मथळ्यांतून, मजकुरांतून पुन्हा आकार घेते
एक घडून गेलेले विश्व :

काळ्या ठळक मथळ्यांतून
कधी गोळ्या झडतात एका महात्म्यावर.
पडतात बॉम्बगोळे एखाद्या टवटवीत शहरावर.
कधी फुगत येते आकाशाला भिडू पाहणारे उन्मत्त पाणी
अजस्र अजगरासारखे गिळत जाणारे :
ती गाज आणि तो घुसमटलेला आक्रोश...



त्याच्याच शेजारी बारीक अक्षरांत दिसतात
छप्पर फोडून बाहेर धावणारी काळ्या धुराची वेटोळी
बरोबर वास घेऊन येणारी चरबीचा, रॉकेलचा :
दिसतो हसत हसत स्वतांला पेटवून घेणारा
एक कंटाळलेला जीव
आणि दुसरीकडे
कसलेसे रसायन घेऊन टाचांनी भुई खणणारा
कुणी अगतिक राजीव.

या दोहोंच्या मध्ये असते एक वेगळेच जग
स्तंभांतून कोरलेले :
त्यात असतात प्रज्ञावंतांच्या समस्या आणि बोध,
शास्त्रवंतांचे उड्डाणांचे शोध,
असतात धुरीणांच्या योजना आणि झगडे,
असतात प्रतिभावंतांचे जाहिराती मुखडे.

पेपर मिटता मिटता भोवळल्यासारखे होते
पाण्याच्या वेगाने, बम्बाऱ्याच्या धुराने, हकनाक बळीने :
काळजाला भिडणारे असते ते एवढेच –
तेसुद्धा...

यांत्रिकपणे कागदाची नेटकी घडी होते.
तिच्यावर हळूहळू उमटतात चहाच्या उष्ट्या कपाचे
वर्तुळाकार डाग.

इंदिरा संत

**क. 'पेपर मिटता मिटता भोवळल्यासारखे होते... यांत्रिकपणे कागदाची नेटकी घडी होते... वर्तुळाकार डाग.' या ओळींचा पुढीलपैकी योग्य अर्थ कोणता?**

अ) वर्तमानपत्रात येणाऱ्या चांगल्या वाईट-बातम्या वाचताना थोडाफार परिणाम झाला तरी तो तात्पुरता असतो, वाचून झाल्यावर त्यांचे महत्त्व संपते.

आ) वर्तमानपत्र वाचताना भोवळ आली तर त्याची चांगली घडी घालून यंत्राप्रमाणे वारा घेता येतो आणि त्यावर चहाचा कपही ठेवता येतो.

इ) यंत्राने वर्तमानपत्र छापले जाते म्हणून आपण ते यांत्रिकपणे वाचतो आणि त्यावर चहाच्या डागांची नक्षी काढतो.

ई) वर्तमानपत्रात येणाऱ्या चांगल्या वाईट-बातम्या वाचताना भोवळ येते आणि त्यावर उपाय म्हणून चहा प्यावा लागतो. त्या चहाचा कपही त्या वर्तमानपत्रावरच ठेवावा लागतो.

**ख. कवितेतील शब्द आणि त्यांचे अर्थ यांच्या जोड्या जुळवा.**

| शब्द | अर्थ |
|---|---|
| अ. टाचांनी भुई खणणे | एक) पूर |
| आ. आकाशाला भिडू पाहणारे उन्मत्त पाणी | दोन) विनाकारण निष्पाप जिवाचा मृत्यू |
| इ. हकनाक बळी | तीन) वेदनादायक मृत्यू येणे |

**ग. माध्यमांचा सर्वसामान्य माणसाच्या रोजच्या जगण्यावर खरेच परिणाम होतो?! तुम्हाला काय वाटते? वरील कवितेच्या अनुषंगाने चर्चा करा.**

**घ. 'माध्यमांचा वापर' या विषयावर दोन सहाध्यायींबरोबर संवाद साधा. त्यासाठी पुढे दिलेल्या प्रश्नांचा उपयोग करा.**

अ. राजकीय आणि सामाजिक घडामोडींविषयी स्वत:चे मत व्यक्त करण्यासाठी तुम्ही कोणत्या माध्यमाचा वापर करता?

आ. पुढील गोष्टींसाठी तुम्ही कोणत्या माध्यमाचा वापर करता?
- दैनंदिन जीवनातील घडामोडींविषयी माहिती घेण्यासाठी
- प्रवास अथवा पर्यटनासाठी
- शिक्षण, नोकरी, व्यवसाय इत्यादींसाठी

इ. तुमच्या मते समाजमन प्रभावित करण्यात कोणते माध्यम सर्वाधिक महत्त्वपूर्ण आहे?

ई. तुम्ही जीवनातील कोणत्या क्षेत्रात समाजमाध्यमांचा वापर करत नाही? का?

**च. माध्यमांचा प्रभाव आणि सामर्थ्य या विषयावर पुढील विधानांच्या अनुषंगाने लहान गटात चर्चा करा. दिलेल्या विधानांशी तुम्ही सहमत आहात की नाही ते सांगा. तुमच्या मताची कारणमीमांसा करा. सर्वांची मते व कारणे ऐकून त्यांचा एकत्रित सारांश वर्गात सादर करा.**

पर्याय : (अ) सहमत (आ) असहमत (इ) अंशतः सहमत

अ. माध्यमे ही राजकारण आणि शासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी अत्यावश्यक आहेत.

आ. बहुतांश माध्यमे स्वतंत्ररित्या व निष्पक्षपणे काम करतात.

इ. माध्यमे जग बदलू शकतात.

ई. माध्यमांच्या सामर्थ्याचा स्वत: पत्रकारांकडूनच अवास्तव डंका पिटण्यात येतो.

उ. छापील माध्यमांची अवस्था 'दात काढलेल्या वाघासारखी' असते. राजकारणावर प्रभाव टाकण्यात ती कमकुवत ठरतात.

ऊ. बहुतेक लोक अगोदरच निश्चित केलेल्या स्वत:च्या मताला पुष्टी देण्यासाठी माध्यमांचा वापर करतात.

ए. पत्रकारितेच्या खालावत चाललेल्या दर्जामुळे माध्यमांचा प्रभाव कमीकमी होत आहे.

ॲ. नव्याने उदयाला आलेली समाजमाध्यमे अधिक ठोस व व्यापक राजकीय भूमिका घेताना दिसतात.

ऐ. राजकारणाबरोबरच माध्यमांनी समाजकारणही करणे आवश्यक आहे.

ओ. आपली विश्वासार्हता टिकवणे हेच माध्यमांपुढचे सर्वांत मोठे आव्हान आहे.



## ११ करा आणि शिका.

**क. रेडिओवरील / समाजमाध्यमांवरील रोजचे मराठी कार्यक्रम नियमित ऐका. त्यातून तुम्हाला मराठी भाषा आणि संस्कृती यांबाबत कोणती नवीन माहिती / दृष्टी मिळाली? त्यातील कोणत्याही पाच गोष्टींविषयी लिहून वर्गात सादरीकरण व चर्चा करा.**

**ख. तत्त्वनिष्ठ पत्रकारिता व पत्रकारितेचं बदलतं जग या विषयांवर आधारित 'दोन स्पेशल' हे नाटक किंवा 'सिंहासन' हा चित्रपट पाहा. या नाटकात / चित्रपटात कोणते विचार मांडले आहेत, ते दहा वाक्यांत लिहा. त्याबद्दलचे तुमचे विचार वर्गात सादर करा.**

**ग. एक प्रमाणित मराठी-मराठी शब्दकोश पाहून त्यात शब्द कोणत्या क्रमाने येतात, हे समजून घ्या आणि**

**त्याप्रमाणे अकारविल्हेनुसार सगळे स्वर व व्यंजने लिहा. कोणत्याही एका व्यंजनाची चौदाखडी लिहा व त्याच व्यंजनापासून सुरू होणारी जोडाक्षरे लिहा.**

**उदा॰ क, का, कि, की...**

**क + त = क्त, क + य = क्य, क + ल = क्ल, क + व = क्व, क + स = क्स**

## उत्तरसंच

**३. ग.** अ. नोकरी – बढती, बदली, पदोन्नती, पदावनती, पगार, कामाचा ताण, बैठक, वरिष्ठांशी वाद, वरिष्ठांबरोबर सहमती, सहकाऱ्यांशी चर्चा, घरी जाण्याची घाई, कचेरी, कार्यालय, जेवणाची सुट्टी, काम न झाल्याने बेचैनी, असमाधान, कामातील समाधान, आनंद, उत्साह...

आ. मराठी संस्कृती – प्रामाणिकपणा, कणखरपणा, स्पष्टवक्तेपणा, साधी राहणी उच्च विचारसरणी, प्रांजळपणा, साधेपणा, फटकळ बोलणे, पाय खेचण्याची वृत्ती, हट्टीपणा, कट्टा, परवचा, दिवेलागण, तोरण, रांगोळी, साखरपुडा, समृद्ध भाषा व साहित्य, वाचनवेड, नाटकवेड, गड, किल्ले, लेणी, मराठी बाणा...

इ. बैठक – वक्तशीरपणा, नियमित, वेळेवर, सादरीकरण, चर्चा, वादविवाद, मतमतांतरे, रद्द, कार्यसूची, वृत्तान्त, इतिवृत्त, कृती, पाठपुरावा, प्रस्ताव, अनुमोदन, दुजोरा, पाठिंबा, विरोध, पटणे, जमणे, मार्गदर्शन, राग, गटबाजी, वशिलेबाजी, चमचेगिरी, लांगूलचालन, स्पष्टवक्तेपणा, जी-हुजुरी करणे, पडते घेणे...

ई. मुंबई – महानगरी, गर्दी, वेग, लोकल, वाहने, टोलेजंग इमारती, झोपडपट्टी, समुद्र, गेट वे ऑफ इंडिया, चौपाटी, उपनगरे, आर्थिक उलाढाल, उद्योगनगरी, सिनेसृष्टी, विविधता...

**घ.** (अ) आचारविचार (आ) आशाआकांक्षा (इ) ध्येयधोरणं (ई) चित्रमालिका
(उ) जनमानस (ऊ) रीतीरिवाज (ए) विभक्तिप्रत्यय (ॲ) परभाषा

**४. क.** (अ) दम (आ) डोकं (इ) भाव (ई) बोलणी (उ) फटके (ऊ) पैसे
(ए) दातओठ (ॲ) मार (ऐ) माती

**५. ग.** १. ड २. अ / क / इ ३. अ / क / इ ४. अ / क / इ ५. ब

**६. ग.** शाळेपासून स्टेशन दीड किलोमीटर दूर आहे. शाळा टेकाडावर असल्यामुळे तिथून ते स्पष्ट दिसते. दुपारी साडेबारा वाजता शाळा सुटली, की मी, सदाशिव, प्रकाश आणि गोपाळ मागच्या बाजूने टेकडी उतरतो. रेल्वेचे रूळ तिथूनच जातात. **आम्ही** रुळांवरून चालत स्टेशनापर्यंत जातो. मुली रस्त्याने येतात म्हणून उशिरा पोचतात. सव्वा वाजता गाडी असते; पण **ती** कधीच वेळेवर येत नाही म्हणून बरे. **मुलींना** रुळांवरून जाण्याची परवानगी नसते. राऊतबाईंचे **त्यांच्यावर** लक्ष असते. **आम्हाला त्या** काही म्हणत नाहीत, म्हणून मुली **आमच्यावर** खार खाऊन असतात. मुलींचे बरोबर आहे. **त्यांना आमच्यासारखे** काहीच करायला मिळत नाही; फक्त **आमच्याआधी** गाडीमध्ये चढायला मिळते आणि बसायला जागा मिळते. **आम्हाला** तेवढेही सहन होत नाही. त्यावरून **आम्ही त्यांना** सारखे टोमणे मारतो. मग कंटाळून **त्या** उभ्या राहतात आणि **आम्हाला** जागा देतात. हे वाईट आहे.

**८. घ.** अ. सहा आ. आठ इ. पाच ई. सात उ. नऊ ऊ. दहा ए. तीन
ॲ. चार ऐ. एक ओ. दोन

**९.** क. ई ख. इ ग. ई घ. अ च. ई

**१०.** क. अ

**ख.** अ. तीन आ. एक इ. दोन

# २ घे भरारी



मराठी भाषा शिकणे, हा तुमच्यापैकी अनेक जणांसाठी एका मोठ्या कालावधीनंतर परत एकदा ‘पद्धतशीर’ शिक्षण घेण्याचा आरंभबिंदू ठरला असेल. आपल्यातला प्रत्येक जण आयुष्यभर विद्यार्थीच असला, तरी प्रत्येकाचा शैक्षणिक प्रवास वेगवेगळ्या वाटा-वळणांनी झालेला असतो. काही जणांसाठी हा सरळ रेषेत जाणारा राजमार्ग असतो, तर काही जणांसाठी खाचखळग्यांचा दमछाक करणारा रस्ता! आनंद, यश, अपयश, कंटाळा या सगळ्यांसह होणारी ही वाटचाल जशी आव्हानात्मक असते, तशी समाधानकारकही असते. शिकण्याच्या प्रक्रियेत विविध अनुभवांचे संचित प्रत्येकाच्या गाठीशी जमा होत असते. देश-काल-परिस्थिती आणि वयोमानानुसार शिक्षणविषयक संकल्पना घडत जातात, बदलत जातात. शिक्षणाच्या अशा विविध पैलूंविषयी, तसेच शिक्षण प्रक्रियेसंबंधी विचारांची आणि अनुभवांची देवाणघेवाण करू या.

## १ मुलाखत

**'माझे शालेय जीवन' या विषयावर तुमच्या दोन सहाध्यायींची मुलाखत घ्या. त्यांनी दिलेली उत्तरे माहिती स्वरूपात पुढील तक्त्यात भरा.**

| | सहाध्यायी १ | सहाध्यायी २ |
|---|---|---|
| क. विद्यार्थी-जीवनात तुम्ही मेहनती होतात का? | | |
| ख. तुमचे आवडते विषय कोणते होते? | | |
| ग. तुमचे कमकुवत दुवे कोणते होते? | | |
| घ. तुमच्या प्रांतातील / देशातील शिक्षण पद्धतीमध्ये गुणांना किती महत्त्व होते? | | |
| च. परीक्षेतील गुणांचा भावी आयुष्यावर परिणाम होतो असे तुम्हाला वाटते का? | | |

## २ 'होम स्कूलिंग'

*रूढ पद्धतीने मुलाला दररोज शाळेत न पाठवता घरीच त्याला वेळ देऊन शिकण्यात मदत करणाऱ्या आणि त्याद्वारे त्याला स्वतः शिकण्यास प्रवृत्त करणाऱ्या पालकांचे हे विचार.*

स्नेह तेव्हा सात-आठ वर्षांचा होता. तो सकाळी उठायचा तेच डोक्यात असंख्य नवनवीन कल्पना घेऊन! त्या कल्पना कधी लिहिण्याच्या, बोलण्याच्या असत, तर कधी एखाद्या मॉडेलच्या किंवा चित्राच्या माध्यमातून त्याला व्यक्त करायच्या असत. पण शाळेत जायची घाई असल्यानं हे सगळं गुंडाळून ठेवायला लागायचं. साहजिकच तो खट्टू व्हायचा. 'तुला जे काही करायचं आहे ते संध्याकाळी आल्यावर कर,' असं सांगून मी आणि प्रीती कसंबसं त्याला शाळेत पाठवायचो. संध्याकाळी आल्यावर घरी दिलेला अभ्यास, मग त्याचं खेळणं, हे सगळं करता करता तो इतका दमून जायचा की त्या कल्पना हवेत विरून जायच्या. त्याची दमछाक आणि मनातल्या कल्पना प्रत्यक्षात आणता येत नसल्यानं होणारी घुसमट आम्हाला अस्वस्थ करत होती. ही घुसमट कमी करण्यासाठी आम्ही शिक्षणाचा खरा अर्थ, मुलांची शिकण्याची नैसर्गिक प्रक्रिया समजून घेण्यासाठी अभ्यासाला लागलो.

मुलं शाळेत आठ तास बसून ज्या गोष्टी करतात त्या घरी तीन ते चार तासांत सहज होऊ शकतात हे आमच्या लक्षात आलं. बरं, मुलांचं 'सामाजीकरण' (socialization) व्हावं म्हणून त्यांना शाळेत पाठवावं, तर वर्गात शिक्षकांच्या दबावानं आणि १५-१५ मुलं कोंबलेल्या व्हॅनमध्ये ड्रायव्हरकाकांच्या दबावानं मुलांना एकमेकांशी फारसं बोलतासुद्धा येत नाही; हे आम्ही अनुभवलं. स्नेहची रोज होणारी चिडचिड बघून एक वर्ष त्याला शाळेत न पाठवण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय घेताना 'होम स्कूलिंग' हा शब्दसुद्धा आम्ही ऐकला नव्हता. आमची प्राथमिकता ही स्नेहच्या चेहऱ्यावर पुन्हा आनंद आणण्याला होती. आम्ही त्याला घरीच शिकवायला सुरुवात केली आणि आमचा अंदाज खरा ठरला. पहिल्या वर्षी आम्ही त्याला क्रमिक पुस्तकाच्या मदतीनं शिकवत असताना अभ्यासक्रम तीन-चार महिन्यांत पूर्ण झाला आणि त्याला भरपूर मोकळा वेळ मिळू लागला. त्याचा उपयोग सकाळी उठल्यानंतर त्याला ज्या नावीन्यपूर्ण कल्पना सुचत होत्या, त्या प्रत्यक्षात आणायला होऊ लागला. एकामागून एक अनेक गोष्टी नुसत्या शिकत बसण्यापेक्षा

त्यांचं आकलन करून घेण्याची त्याला सवय लागली. हा पहिल्या वर्षी आम्हाला झालेला 'होम स्कूलिंग'चा मोठा फायदा होता आणि तो बघूनच आम्ही 'होम स्कूलिंग' सुरूच ठेवण्याचा निर्णय घेतला.



'होम स्कूलिंग', अर्थात रीतसर शाळेत न जाता घरी राहून घेतलेलं शिक्षण, ही संकल्पना आता समाजात रूढ होत चालली आहे. अनेक मुलं आणि त्यांचे पालक जाणीवपूर्वक 'होम स्कूलिंग'चा पर्याय निवडताना दिसत आहेत. कारण शिक्षणाचा मूळ हेतू त्यामुळे साध्य होतो आहे, असा त्यांचा अनुभव आहे.

शिकणं ही माणसाची एक नैसर्गिक प्रेरणा आहे. ती जपली आणि तिचा वापर करण्यासाठी लागणारं वातावरण निर्माण केलं तर प्रत्येक सजीवाची मुलं स्वत:हून शिकतात. हे वातावरण म्हणजे शिकण्याची जबाबदारी मुलांची आहे हे मान्य करणं. त्यांना मुक्तपणे खेळू देणं, आवडीनिवडी जोपासू देणं, उपजीविकेसाठी जी साधनं वापरली जातात (सध्या कॉम्प्युटर व मोबाइल) ती मुक्तपणे हाताळू देणं, नवीन गोष्टी शिकण्यासाठी मुलांना गुणांच्या कसोटीवर न तोलता त्यांना हवं ते शिकण्यासाठी मदत करणारे गुरू उपलब्ध करून देणं, मुलांना सुरक्षित आणि आपलासा वाटेल असा गट तयार करणं हे आहे.

'होम स्कूलिंग' करणारी मुलं स्वत:च्या आवडीनिवडी ओळखून त्याप्रमाणे स्वत:हून शिकतात. मात्र याची अनुभूती यायला आधी 'होम स्कूलिंग'ला सुरुवात करावी लागते. 'होम स्कूलिंग' करायची इच्छा असली तरी तीन महत्त्वाच्या गोष्टींमुळे बरेच जण त्याकडे वळण्यास धजावत नाहीत. पहिली गोष्ट म्हणजे अर्थातच परीक्षा. दुसरी – मुलांचं सामाजीकरण (socialization) आणि तिसरी – मुलांना द्यायला लागणारा वेळ. परीक्षा हे आपल्या शिक्षणव्यवस्थेनं आणि समाजानं स्वीकारलेलं मूल्यमापनाचं एक साधन आहे. परीक्षा, गुण यांचा शिकण्याच्या प्रक्रियेशी संबंध नाही. परीक्षेशिवाय, खरं तर परीक्षा नसतील तरच, मुलं मनापासून शिकतात हे संशोधनातून सिद्ध झालं आहे.

'होम स्कूलिंग' करणाऱ्या मुलांना परीक्षा हे मूल्यमापनाचं साधन वापरता येतं का? तर, हो. शाळेत मुलं दरवर्षी परीक्षा देतात; मात्र 'होम स्कूलिंग' करत असताना जर तुम्ही 'महाराष्ट्र मुक्त शिक्षण बोर्डा'त प्रवेश घेतला, तर मुलं पाचवी व आठवीची परीक्षा आणि नंतर दहावीची परीक्षा देऊ शकतात. या परीक्षा सर्व विद्यापीठांमध्ये ग्राह्य धरल्या जातात. तुम्हाला जर केवळ पाचवी आणि आठवीची परीक्षा देण्याऐवजी पहिलीपासून परीक्षा द्यायची असेल, तर तुम्ही 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओपन स्कूलिंग'कडून (एनआयओएस) पहिली ते तिसरीसाठी 'लेव्हल ए', चौथी-पाचवीसाठी 'लेव्हल बी' व सहावी ते आठवीसाठी 'लेव्हल सी'ला प्रवेश घेऊन परीक्षा देऊ शकता. नंतर तुम्ही दहावी व बारावीची परीक्षा देऊ शकता. 'एनआयओएस'मध्ये तुम्ही वर्षभरात कधीही प्रवेश घेऊ शकता आणि कधीही परीक्षा देऊ शकता. 'महाराष्ट्र मुक्त शिक्षण बोर्ड' असो किंवा 'एनआयओएस' असो, यांनी स्वत:चे अभ्यासक्रम



तयार केले आहेत. हे अभ्यासक्रम राष्ट्रीय शिक्षण आराखड्याशी मिळतेजुळते असतात. अर्थातच त्यांचा भर हा शिक्षणाला जीवनाशी जोडण्यावर असतो. त्यामुळे मुलं शाळेत जसं भूगोल, इतिहास, विज्ञान, भाषा व गणित शिकतात, तसंच ते 'होम स्कूलिंग' करतानासुद्धा शिकू शकतात. हे विषय शिकण्यासाठी 'एनआयओएस'चं प्रचंड प्रमाणात अभ्यासाचं साहित्य ऑनलाइन उपलब्ध आहे.

दुसरा प्रश्न सामाजीकरणाचा. हा प्रश्न विचारण्याआधी शाळा सुरू होण्यापूर्वी ते होत होतं की नव्हतं, आणि सामाजीकरण हे बंदिस्त वातावरणात कुणाच्या देखरेखीखाली चांगलं होईल की मुक्त वातावरणात, या दोन गोष्टी आपण समजून घेतल्या पाहिजेत. शाळा जेमतेम २०० वर्षांपूर्वी सुरू झाल्या. त्याच्या आधी मुलं चार भिंतींच्या बाहेर अनेक गोष्टी शिकत होती. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे शाळा सुरू झाल्यापासून मुलं फक्त त्यांच्या वयाच्या मुलांबरोबरच जास्त वेळ राहू लागली. यात मोठ्या मुलांकडून प्रेरणा घेऊन शिकणं आणि लहान मुलांना सांभाळताना जबाबदारीची जाणीव शिकणं, या सामाजीकरणाच्या अत्यंत महत्त्वाच्या अंगाला आपण मुकलो. 'होम स्कूलिंग' करत असताना इयत्तेची मर्यादा नसल्यानं मुलं केवळ त्यांच्या वर्गातल्या नाही, तर जगातल्या कोणत्याही मुलाशी थेट संपर्क करून मैत्री करू शकतात.

तिसरी गोष्ट वेळेची. मुलांसाठी पुरेसा वेळ नाही ही तक्रार करत राहिलं तर काहीच करता येणार नाही. वेळ काढावाच लागेल. 'होम स्कूलिंग' करणाऱ्या मुलांचे पालकही उदरनिर्वाहासाठी काम करत आहेतच. त्यातून ते वेळ काढतात. पण एकदा का मुलांवर विश्वास टाकला, की अनेक गोष्टी सोप्या होतात.

ऑनलाइन किंवा शाळेबाहेरचं शिक्षण यशस्वी करायचं असेल तर शिकण्याच्या प्रक्रियेचं नियंत्रण हे विद्यार्थ्यांकडे देणं आवश्यक आहे, किंबहुना त्याशिवाय ही प्रक्रिया सुरूच होऊ शकत नाही, असं 'हार्वर्ड' विद्यापीठाच्या शिक्षण विभागाचं संशोधन सांगतं. आता जो ऑनलाइन-ऑफलाइन शिक्षणाचा गोंधळ सुरू आहे, तो थांबवायला काही दिवस अभ्यासक्रम बाजूला ठेवून शिकण्याचं नियंत्रण मुलांकडे देत त्यांना जे शिकायचं आहे ते शिकू दिलं पाहिजे. त्यामुळे मुलं पुस्तकातले धडे शिकली नाहीत तरी शिकण्याची प्रक्रिया मात्र नक्की शिकतील व त्या आधारावर धड्यांचं आकलन योग्य वेळी सहज करून घेतील हे स्वानुभवावरून सांगू शकतो.

चेतन एरंडे, प्रीती एरंडे

**क. तुमच्या दृष्टीने वरील उताऱ्यातील सर्वात महत्त्वाचे पाच मुद्दे कोणते? तुम्हाला ते मुद्दे सर्वाधिक महत्त्वाचे का वाटतात, ते थोडक्यात लिहा.**

**ख. 'परीक्षा, गुण यांचा शिकण्याच्या प्रक्रियेशी संबंध नाही' असे मत लेखकाने मांडले आहे. तुम्ही या मताशी सहमत आहात का? तुमच्या मताची कारणमीमांसा करा.**



**ग. तुमच्या मते मुलांना शाळेत पाठवण्यामागे कोणती कारणे असतात? सुमारे १५०-२०० शब्दांत लिहा.**

**घ. शाळेत जाऊन घेतले जाणारे शिक्षण व होम स्कूलिंग या दोन्ही शिक्षणपद्धतींची तुलना करून लेखकाने होम स्कूलिंगचे फायदे दाखवून दिले आहेत. या पार्श्वभूमीवर शाळेत जाऊन शिकण्याचे फायदे तुम्हाला सांगता येतील? प्रत्येकी दोन जणांच्या गटामध्ये यावर चर्चा करा व चर्चेचा सारांश वर्गात सादर करा.**

**च. उताऱ्यातील पुढील अधोरेखित केलेल्या शब्दांचा अर्थ शब्दकोशांच्या मदतीने सांगा आणि स्वतःच्या वाक्यात वापर करा.**

अ. खट्टू व्हायचा

आ. हवेत विरून जाणे

इ. हेतू साध्य होतो

ई. रूढ होत चालली आहे

उ. उदरनिर्वाहासाठी काम करत आहेत

## ३ पु॰ ल॰ देशपांडे यांच्या 'बिगरी ते मॅट्रिक' मधील अंश ऐका.

**पुढे उत्तरे दिली आहेत. त्यांचे योग्य प्रश्न निवडा.**

क. बिगरी

अ) पूर्वप्राथमिक शाळेच्या दोन वर्षांना काय म्हणतात?

आ) पहिल्या इयत्तेच्या आधीच्या वर्गाला काय म्हणत?

इ) प्राथमिक शाळेला काय म्हणतात?



पु॰ ल॰ देशपांडे

ख. तिसरीच्या

अ) शुद्धलेखन कितवीच्या मुलांसाठी योजलेले होते?

आ) कितवीच्या मुलाने अंगठे धरले होते?

इ) मास्तर कितवीच्या मुलांना गणित घालत होते?

ग. शंभर

अ) वर्गात किती मुले बसली होती?

आ) वर्गातील एका मुलाला शिक्षा म्हणून 'तिखट' हा शब्द किती वेळा लिहायला सांगितला होता?

इ) वर्गातील एका मुलाला शिक्षा म्हणून 'तिखट' हा शब्द कितीदा वाचायला सांगितला होता?

घ. वागळे

अ) कावळे या शब्दाशी जुळणारे दुसरे कोणते आडनाव या उताऱ्यात आले आहे?

आ) अंगठे धरून कोणाला उभे केले होते?

इ) 'विन्या' या मुलाचे आडनाव काय होते?

च. हौद

अ) दामले मास्तर कशावर बसले होते? ?

आ) गणितात कोणत्या गोष्टीचा उल्लेख आलेला आहे?

इ) सगळ्या मुलांनी मिळून काय बनवले?




## ४ पक्षी जाय दिगंतरा

गंगाचिल्लीचं ते पिल्लू उंच पर्वतातील खडकाच्या कंगोऱ्यात एकटं बसलं होतं. आदल्या दिवशीच त्याची तिन्ही भावंडं घरटं सोडून गेली होती. त्यात त्याची चिमुरडी बहीणही होती. त्यांच्याबरोबर उडण्याची त्याला मात्र भीती वाटे. एकदा सारं धैर्य एकवटून ते दुडदुडत पर्वताच्या कड्यावर आलं. त्यानं पंख फडफडविण्याचा प्रयत्न केला आणि समोरचं दृश्य पाहताच ते जागच्याजागी थिजून गेलं. सागराच्या अथांग पसाऱ्यावरील दिगंतरात* त्याची नजर गेली. अनंत योजनं पसरलेल्या त्या विस्ताराच्या गहिराईनं त्याचे डोळे फिरले. त्याला उगीच वाटलं, की आपले पंख आपल्याला साथ देणार नाहीत; आणि पराभूत वृत्तीनं खडकाच्या कंगोऱ्यात रात्रभर ते निपचित पडून राहिलं.

दोघे भाऊ व छोट्या बहिणीचे पंख त्याच्या पंखांपेक्षा लहान असूनही ते दुडदुडत कड्यापर्यंत गेले होते. त्यांनी पंख फडफडविले आणि एकामागून एक ते आकाशात झेपावले. त्याला मात्र उडण्याचं साहस झालं नाही. या भित्र्या पाखराची कीव येऊन त्याच्या आई-वडिलांनी त्याला चुचकारलं, आंजारलं, गोंजारलं, प्रसंगी कर्कश आवाजात ते रागं भरले. "उडण्याशिवाय तरणोपाय नाही; तुला इथं उपाशी मरावं लागेल," अशी धमकीही दिली; परंतु जिवाच्या भीतीनं ते लहान पाखरू तिथून हललं नाही.

तो दिवस तसाच गेला. त्याच्या आई-वडिलांनी व भावंडांनी त्याला जणू वाळीत टाकलं. त्याच्याकडं कुणीही फिरकलं नाही. आई-बापाबरोबर आकाशात विहार करणाऱ्या त्याच्या भावंडांकडं ते दिवसभर पाहात होतं. ते त्यांना पक्ष्यांच्या एकशेएक प्रकारच्या उड्डाणांतील रहस्य शिकवीत होते. पंख न फडफडविता, समुद्राच्या लाटांना स्पर्श न करता झटकन झेप घेऊन पुन: उडण्याची संपात-गतीतील* रहस्यं त्यांना समजावून देत होते. कारण ह्या उड्डाणकौशल्यावरच त्यांना खाण्यासाठी भरपूर मासे मिळणं अवलंबून होतं. आपले मोठे भाऊ, एका प्रचंड खडकावर बसून समुद्रातून पकडलेली ती पहिली माशाची शिकार खात असताना त्याला दिसत होतं. आता ही आपली दोन पोरं जाणती झाली, कर्तबगार झाली या आनंदाच्या जाणिवेनं त्याचे आईबाप हुरळून जाऊन त्यांच्याभोवती आकाशात घिरट्या घालीत होते. आनंदानं त्यांना



साद घालीत होते. त्या भित्र्या पाखराच्या घाबरटपणाला वाकुल्या दाखवीत, चिडवीत ते सारं पक्षी-कुटुंब सकाळीच समोरच्या पर्वताच्या पठारावर गेलं.

सूर्य मावळतीला कलला. सूर्याच्या किरणांची तिरीप खडकातील कंगोऱ्यात बसलेल्या त्या पाखराला लागली. कालपासून अन्नाचा एक कणही त्याच्या पोटात गेला

नव्हता. आजूबाजूला शीतभर अन्न कुठेही दिसत नव्हतं. उगीच वेड्या आशेनं त्यानं पुन: एकदा खोप्यातली गवतकाडी विसकटून पाहिली. इथंच ते आणि त्याची भावंडं जन्मली. विणीनंतर कोठारात पडलेली ती ठिपक्याठिपक्याची अंड्यांची कवचं त्यांनी कुरतडली. त्यांचं ते कृत्य म्हणजे एखाद्यानं स्वतःला खाण्यासारखंच होतं! [...]

खडकाच्या कंगोऱ्यावरून त्यानं स्वतःला झोकून दिलं असतं तरीही झंझावाती वाऱ्यानं ते आपोआपच त्यांच्या नजीक गेलं असतं. पण तिथं पोहोचल्यावर पुढं काय? कशावरून, कशाच्या आधारानं त्याला चालायला मिळालं असतं? तिथं काही खडकातले कंगोरे नव्हते. त्याची नजर दिगंतरात गेली. सारं काही अस्पष्ट, धूसर दिसत होतं. पर्वताचे कडे अतिशय दुर्घट* होते. समोरच्या खोल दरीपेक्षाही ती शिखरं कदाचित उंच असावीत!

ते हळूहळू खडकातील कंगोऱ्याच्या किनारी येऊन एका पायावर उभं राहिलं. दुसरा पाय त्यानं पंखात लपविला. एक डोळा झाकला. दुसरा किलकिला केला आणि झोपेचं सोंग केलं. तरीही पलीकडच्या पर्वतावरील त्याच्या आप्तस्वकीयांनी त्याची दखल घेतली नाही. त्याची भावंडं चोच मानेवर ठेवून त्या पठारावर डुलक्या घेत होती. त्याचे वडील पाठीवरील पिसं चोचीनं साफ करीत होते. आईचं मात्र सारं लक्ष त्या दुबळ्या, एकाकी पडलेल्या पिलापाशी होतं.

पठारावर एका उंच टेकडीवर त्याची आई बसली होती. तिच्या गौरवर्णी उरोजावरची पिसं वायुलहरीवर हळुवारपणं उडत होती. दोन्ही पायांत दाबून धरलेल्या माशाला ती अधूनमधून टोचा मारीत होती. मधूनच दगडावर चोच घाशीत होती. अन्न दिसताच पिल्लाचा इवलासा जीव वेडापिसा झाला. त्याला आठवलं की, अशा प्रकारे मासे कुरतडून खाणं आपल्याला भारी आवडायचं. चोच पाजळून ते मासा फाडून खात असे. हळुवार आवाजात त्यानं शीळ घातली. त्याला प्रतिसाद देऊन आईनं त्याच्याकडं पाहिलं.

'गा—गा—गा' असा दीनवाणा स्वर काढून त्यानं आईपाशी चारा मागितला. 'गाऊलवूल-अर' असं ती निर्भर्त्सनापूर्वक कर्कश ओरडली. परंतु त्याचं भुकेनं व्याकूळ होऊन दीनवाणेपणानं ओरडणं चालूच होतं. क्षणभरानं ती चोचीत मासा घेऊन, आकाशातून हिंडत हिंडत पिलाकडे निघाली. ते आनंदानं तिथल्यातिथं बागडू लागलं. तिनं पिलापाशी झेप घेतली. पण किती विलक्षण! त्याच्या चोचीत तिनं चारा भरविला नाही. ती मोठ्या कौशल्याने हवेत पंखांच्या साह्यानं स्थिरावली. पाय लोंबकाळत होते. चोचीत तिनं माशाचा तुकडा धरला होता. ते आमिष त्याला स्वतःच्या प्रयत्नानं मिळवावं लागणार होतं.

आई आता पूर्वीप्रमाणं चारा भरवीत नाही म्हणून त्याला आश्चर्य वाटलं. ते भुकेनं व्याकूळ झालं. आमिषाकडं त्यानं एकदम झेप घेतली, तोच कड्यावरून निसटून तो खाली खाली येऊ लागला. त्याच्या आईनं वर झेप घेतली. खाली येत असताना आईच्या पंखांमुळं हवेत होणारा ध्वनी त्याच्या कानावर येत होता.



आणि ते भीतीनं गर्भगळित झालं. त्याला काहीही ऐकू येईनासं झालं. क्षणैक अशी स्थिती अनुभवल्यावर दुसऱ्याच क्षणी त्याला आपले पंख आपोआप हवेत पसरलेले आढळून आले. त्याच्या छातीवरची, पोटावरची व पंखांची मुलायम पिसं हवेत भुरभुरत होती. ते उलटंच्यापालटं होऊन भिरभिरत खाली खाली कोसळत जात नव्हतं, उलट संथ गतीनं

आकाशात खाली-वर विहार करीत होतं. त्याची भीती पार पळून गेली. त्याला क्षणभर सुन्न झाल्यासारखं वाटलं. पण पुन: ते सावरलं व पंख फडफडवून उंच आकाशात उडू लागलं.

त्या हर्षासरशी त्यानं आनंदानं व्यक्त केलेल्या चीत्काराचे स्वर दशदिशांत पसरले. ते उंच उंच दिगंतरात जाऊ लागलं. छाती उंचावून त्यानं वळण्यासाठी खाली झेप घेतली. 'गा-गा-गा-गा-गा-गा गाऊल-वूल-अर' असा आवाज करून त्याची आई आकाशात झेप घेऊन त्याला सामोरी गेली. तिच्या पंखांचा जोरानं आवाज येत होता. त्यानं तिला साद घातली. पोराचा हा अवचित पराक्रम पाहून बापाला आनंद झाला, तसा तोही त्याच्या वरच्या अंगानं उडू लागला. आपली भावंडं आपल्या अवतीभोवती उडत असलेली त्याला दिसली. ते अवघं कुटुंब कधी वेडीवाकडी वळणं घेत, तर कधी खाली झेप घेत, तर कधी संथपणे उडत, तर कधी संपात-गतीचा अवलंब करीत उडत होतं.

आपल्याला कधीकाळी उडता येत नव्हतं, ही जाणीव विसरून नाना क्रीडा करीत ते आकाशात गात उडू लागलं. दिगंतरात उडत असताना सागराकडे त्याचं लक्ष गेलं. अथांग हिरव्या रंगाचा तो सागर समोर पसरला होता. [...] ते आनंदभरानं गाऊ लागलं. त्याचे माता-पिता व भावंडं त्या सागराच्या पाचूसारख्या दिसणाऱ्या पृष्ठभागावर तरंगत होती. त्याला साद घालीत होती. त्या हिरव्यानिळ्या सागरावर उभं राहण्यासाठी त्यानं आपले पाय लांब केले. त्याचे पाय पाण्यात बुडाले. आपले पंख फडफडवीत भीतियुक्त कातर स्वरात ओरडत ते वर उडू लागलं. ते थकलं होतं. भुकेनं व्याकूळ झालं होतं. त्याचे पाय समुद्रात बुडाले. त्याचं पोट पाण्याला स्पर्श करीत होतं. मात्र ते बुडालं नाही.

ते आता दिमाखानं पाण्यावर तरंगत होतं. लाटांवर हेलावत होतं. त्याच्या कुटुंबातील सर्व जण त्याच्याभोवती जल्लोष करीत होते. त्याच्या चोचीत आनंदानं माशाचा चारा भरवीत होते. असं होतं त्याचं ते पहिलं-वहिलं थरारक रोमहर्षक अद्भुत उड्डाण.

मारुती चितमपल्ली

**शब्दार्थ**

दिगंतर = आकाश    दुर्घट = जिंकण्यास कठीण    संपात-गती = उड्डाणाची एक पद्धत

**क. थोडक्यात उत्तरे लिहा.**

अ. गंगाचिल्लीचे पिल्लू उडायला का घाबरत होते?

आ. भित्रे पिल्लू उडावे यासाठी त्याच्या आईवडिलांनी काय प्रयत्न केले?

इ. शिकण्याची नैसर्गिक क्रिया आणि पिल्लाचे उड्डाण यांचा परस्पर संबंध कसा लावता येईल?

ई. कोणतीही नवी गोष्ट शिकताना किंवा नवे काम करताना वाटणारी भीती कशी घालवता येईल असे तुम्हाला वाटते?

उ. 'अनुभव हाच खरा गुरू' हे विधान तुम्हाला पटते का? वरील उताऱ्याच्या अनुषंगाने या विधानाबाबत तुमचे मत १५०-२०० शब्दांत लिहा.

**ख. खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा. आवश्यकता वाटल्यास कोशाची मदत घेऊ शकता.**

अ. जागच्याजागी थिजणे    आ. निपचित पडून राहणे

इ. रागे भरणे    ई. वाळीत टाकणे

उ. वाकुल्या दाखवणे    ऊ. गर्भगळीत होणे

**ग. पुढे 'न' व 'ण' अंती येणारे काही शब्द दिले आहेत. वाक्याचा अर्थ लक्षात घेऊन गाळलेल्या जागी कंसातील योग्य शब्द भरा.**

(वरून, करुण, दारुण, सन, खून, तरून, दारूनं, सण, खूण, तरुण, वरुण, करून)

अ. त्याचा ---------------- पराभव झाला.

आ. त्याचा ---------------- पराभव केला.

इ. आदेश मिळाला की ---------------- निघतो.

ई. ---------------- आदेश आला की तो निघतो.

उ. कथेचा शेवट किती ---------------- झाला!

ऊ. कथेचा शेवट ---------------- झाला.

ए. तो ---------------- जिवावरच्या संकटात गेला.

ॲ. संकटातून तो ---------------- गेला.

ऐ. इतिहासात ---------------- असतात.

ओ. ---------------- संस्कृतीचा अविभाज्य भाग असतात.

ऑ. त्याने ---------------- केला.

औ. त्याने ---------------- केली.

**घ. उताऱ्यात आलेल्या दुडदुडणे, फडफडणे या शब्दांप्रमाणे बडबडणे, धडधडणे, मळमळणे, फुरफुरणे, तळतळणे, सळसळणे, जळजळणे, गरगरणे, भिरभिरणे, गुरगुरणे, कुरकुरणे, भुरभुरणे, चुरचुरणे, झुळझुळणे असे अनेक शब्द आपण वापरतो. पुढे दिलेल्या वाक्यांमध्ये यातील काही शब्द बसतील. ते योग्य रूपात वापरा.**

उदा॰ जंगलाच्या मध्यभागी एक स्वच्छ पाण्याचा झरा ---------------- होता.
जंगलाच्या मध्यभागी एक स्वच्छ पाण्याचा झरा **झुळझुळत** होता.

अ. सिंह दिसत नव्हता, पण त्याचं ---------------- इथे ऐकू येत होतं.

आ. कोणत्याही क्षणी परीक्षेचा निकाल कळेल, या विचारानं तिचं हृदय ----------------

इ. शांत गावातून आलेल्या अनिताला शहरातल्या उंचच उंच इमारती, वाहनांची वर्दळ पाहून -----------

ई. दाट झाडीत रूपालीसमोरून बहुतेक सापच ---------------- गेला असावा.

उ. अशा ---------------- उन्हात कशाला आलास?

## ५ शिक्षणाचे तत्त्वज्ञान

*जगभरात अनेक विचारवंतांनी शिक्षण या विषयावर आपले चिंतन मांडले आहे. शिक्षण म्हणजे काय, त्याचा उद्देश काय असावा, ते कशा प्रकारे दिले जावे इत्यादी विविध मुद्दे शैक्षणिक धोरण ठरवताना महत्त्वाचे ठरतात. त्यामुळेच एखादी शिक्षणप्रणाली समजून घेताना त्यामागचा विचार समजून घेणेही आवश्यक असते. भारतातील काही तत्त्वज्ञांचे शिक्षणविषयक विचार पुढे उद्धृत केले आहेत. ते वाचा. त्यावर गटात चर्चा करा. चर्चेसाठी तुम्ही पुढे दिलेल्या मुद्द्यांचा आधार घेऊ शकता.*




शिक्षण म्हणजे मनुष्याच्या ठिकाणी जे पूर्णत्व आधीचेच विद्यमान आहे त्याचे प्रकटीकरण. शिक्षण म्हणजे जन्मात कधी पचनी न पडणारे, डोक्यात निरंतर धुडगूस घालणारे आणि आपल्या मेंदूत ठासून कोंबलेले माहितीचे भेंडोळे नव्हे. साऱ्या शिक्षणाचे ध्येय 'माणूस' निर्माण करणे हे असले पाहिजे. शिक्षणाचा उद्देश आहे माणसाला विकसित होण्याला साहाय्य करणे. ज्याने शील बनते, मानसिक शक्ती वाढतात, बुद्धी चौफेर, विशाल होते आणि ज्यायोगे मनुष्य आपल्याच पायावर उभा राहू शकतो अशा शिक्षणाची आज आपल्याला गरज आहे.

**स्वामी विवेकानंद**




शिक्षण हे काही साध्य नव्हे, ते एक साधन आहे. ज्या शिक्षणाने आपण चारित्र्यवान बनू तेच खरे शिक्षण मानता येईल. शिक्षणाने शरीर, बुद्धी व हृदय ह्या तिन्हींचा समतोल विकास साधला पाहिजे.

**महात्मा गांधी**



प्रत्येक विद्यार्थी ही अनन्यसामान्य अशी व्यक्ती असते. म्हणून तिची कुणाशीही तुलना करण्याजोगी नसते. या दृष्टीने जेव्हा शिक्षक विद्यार्थ्यांकडे पाहू लागेल, तेव्हा कुठल्याही विशिष्ट पद्धतीची किंवा व्यवस्थेची त्याला गरजच उरणार नाही. यानंतर विद्यार्थ्याला संस्कारबद्ध करीत राहणारे जे बाह्य व आंतरिक प्रभाव असतात, त्यांच्या स्वरूपाचे आकलन करून घेण्यास त्याला मदत करणे एवढेच शिक्षकाचे कार्य राहील. विद्यार्थ्याला एकदा असे आकलन झाले की, आपल्यापुढील गुंतागुंतीच्या जीवनाचा सामना तो सुज्ञतेने व निर्भयपणाने करू शकेल.

**जे. कृष्णमूर्ती**



शिक्षक आणि मुले, दोघेही एकमेकांच्या आचरणापासून शिकत असतात. दोघेही विद्यार्थीच आहेत. जे दिले जात नाही ते शिक्षण. जे घेतले जाते, ज्याचा हिशोब ठेवला जाऊ शकतो किंवा ज्याची काही नोंद ठेवली जाऊ शकते, ते शिक्षण नाही. जीवनच शिक्षण आहे. कॅलरीचा खरा हिशोब कागदावर नव्हे, शरीरावरच दिसून येतो. जे अनुभवले, खाल्ले, पचले, रक्तात मुरले, तेच शिक्षण.

**आचार्य विनोबा भावे**

**मुद्दे :**

- **शिक्षणाचे ध्येय तत्त्वत: उच्चच असते. ते प्रत्यक्षात आणणे मात्र कसोटीचे असते, असे तुम्हाला वाटते का?**
- **दिलेल्या अवतरणांमधील विचार तुमच्या प्रांतातील / देशातील शिक्षण-प्रणालीत प्रतिबिंबित झाले आहेत असे तुम्हाला वाटते का? असल्यास कोणते व कसे?**

- अवतरणांमध्ये व्यक्त केलेले विचार शिक्षण-प्रणालीत उतरविण्यासाठी तुम्ही कोणते नवे उपक्रम सुचवाल?
- 'शिक्षणविषयक माझा दृष्टिकोन' या विषयावर सुमारे १५० ते २०० शब्दांत तुमचे विचार मांडा.




६ कविता

'रूपकळा' ही बा. भ. बोरकर यांची सुनीताबाई देशपांडे यांनी सादर केलेली कविता पाहा.

रूपकळा

प्रति एक झाडा-माडा
त्याची त्याची रूपकळा
प्रति एक पाना-फुला
त्याचा त्याचा तोंडवळा
असो पाखरू, मासोळी
जीव, जिवार, मुंगळी
प्रत्येकाची टेवठेव*
काही आगळी वेगळी
असो ढग, असो नग
त्याची अद्भुत रेखणी
जी जी उगवे चांदणी
तिच्या परीने देखणी
उठे फुटे जी जी लाट
तिचा अपूर्वच थाट
फुटे मिटे जी जी वाट
तिचा अद्वितीय घाट
भेटे जे जे, त्यांत भरे
अशी लावण्याची जत्रा
भाग्य केवढे! आपुली
चाले त्यांतूनच यात्रा!



बा. भ. बोरकर

*टेवठेव – घडण, ठेवण

क. प्रत्येक व्यक्तीचे आपले असे वेगळेपण असते हे कवितेत कोणकोणत्या उदाहरणांतून सांगितले आहे?

**ख. प्रत्येक व्यक्तीचे वेगळेपण जपले पाहिजे, याविषयी शिक्षणक्षेत्रात चर्चा होत असते. ही गोष्ट प्रत्यक्षात आणणे शक्य आहे का? असल्यास ते प्रत्यक्षात कसे उतरवता येईल याविषयी तुमची भूमिका सुमारे २५०-३०० शब्दांत लिहून वर्गात सादर करा.**

**ग. कविता वर्गात सादर करा.**

## ७ गोबीकन्या सुचेता

*भाषांवर प्रभुत्व असणाऱ्या, नाजूक आणि लहान चणीच्या सुचेता यांनी 'एन्ड्यूरन्स स्पोर्ट्स'मध्ये रस घेतला. गिरिभ्रमण करता करता त्यांना नव्या साहसाने खुणावले आणि गोबीचे वाळवंट पायी चालून त्यांनी साहसाचा एक नवा मानदंड प्रस्थापित केला.*

शाळेत वक्तृत्वस्पर्धा, नाट्यवाचन, अभिनय यांमध्ये मी आघाडीवर होते. पण जेव्हा दहावी उत्तीर्ण होऊन महाविद्यालयात गेले आणि निवड करायची वेळ आली, तेव्हा मात्र मी नाट्यवाचन, अभिनय यांकडे न वळता क्रीडा आणि साहस याची निवड केली आणि चालणं, धावणं, डोंगर चढणं अशा खेळांतच मी खूप मनापासून रमू लागले. मला लेखन करायला अतिशय आवडतं आणि लेखन करूनच आपण आपली उपजीविका करायची असं मी ठरवलं होतं. शिवाय शिक्षणाबरोबरच माझा छंदही त्यामुळं मला जोपासता येणार होता. त्या वेळेस मला पुरातत्त्वशास्त्राचं आकर्षण वाटत होतं म्हणून मी इतिहास व संस्कृत हे विषय घेऊन बी.ए. आणि मग मराठी घेऊन एम.ए. केलं. त्याचबरोबर पत्रकारितेचा अभ्यासक्रमपण पूर्ण केला. या सगळ्या प्रवासात माझ्या पालकांची भूमिका खूप महत्त्वाची होती. त्यांनी माझ्यावर कधीही कुठल्याही बाबतीत दबाव आणला नाही. त्यांनी त्यांची स्वप्नं माझ्यावर लादली नाहीतच; उलट मला माझी स्वप्नं पाहण्याचं पूर्ण स्वातंत्र्य दिलं.

पुढे नोकरीमुळे आर्थिक स्थैर्याचं आश्वासन मिळाल्यावर नवी साहसं मला पुन्हा साद घालू लागली. तेव्हा काही जणांनी मला विचारलं, "तू हे का करतेस?" "टेकड्या चढून तुला काय मिळतं? पन्नास किलोमीटर एवढं अंतर पार करण्यासाठी धावायचं कशाला? त्यामुळं काय होतं?" गिर्यारोहण करणाऱ्या किंवा डोंगरात भटकंती करणाऱ्यांना अशा प्रश्नांना नेहमीच तोंड द्यावं लागतं. या प्रश्नांमुळं मी माझ्या आवडीविषयी परत एकदा विचार करू लागले. खरंच, मला नक्की काय आवडतं? सायकलवर भटकणं, डोंगरवाटा तुडवणं, की शिखरांवर चढाई करणं? हा माझा स्वतःचाच शोध होता. खूप विचारानंतर माझ्या मनाने कौल दिला तो 'एन्ड्युरन्स स्पोर्ट्स'च्या बाजूनं. केवळ शारीरिक नाही, तर मानसिक शक्तीची कसोटी बघणाऱ्या खेळाच्या बाजूनं. या मोहिमा अनेक वेळा विपरीत अशा नैसर्गिक परिस्थितीत असतात. त्यात तुमच्या शारीरिक क्षमतेचाच नाही तर मानसिक क्षमतेचा आणि संयम, धैर्य यांचाही कस लागतो. अशा विपरीत परिस्थितीत एखादी मोहीम पूर्ण करत पुन्हा पुन्हा स्वतःलाच पडताळून पाहणं, स्वतःचीच परीक्षा घेणं मला आवडतं हे माझ्या लक्षात आलं. एखादं साहस पूर्ण केल्यावर मला खूप आनंद होतो हे माझ्या लक्षात आलं.

जॉर्ज मेलोडी हे नामवंत गिर्यारोहक एव्हरेस्ट मोहिमेची तयारी करत असताना त्यांना कुणी तरी विचारलं, "का करताय तुम्ही ही एव्हरेस्ट मोहीम?" यावर ते शांतपणे उत्तरले, "कारण तो तिथे उभा आहे व आम्हाला साद देतोय." कदाचित अशीच हाक मला 'गोबीच्या वाळवंटा'नं मारली असावी.

गोबीचं वाळवंट पश्चिमेकडून पूर्वेकडे चालत जाण्याची जगातली ही पहिली मोहीम डेन्मार्कचे रीपली डेव्हनपोर्ट यांच्या पुढाकारातनं आखण्यात आली होती. या मोहिमेसाठी आमची तेरा जणांची टीम नऊ निरनिराळ्या देशांतून आली होती. याआधी हे वाळवंट कुणीही पार केलं नव्हतं. कमाल व किमान तापमानातील प्रचंड फरक हे या मोहिमेतलं मुख्य आव्हान होतं. तिथं उन्हाळ्यात सूर्योदय सकाळी पाच वाजता होतो आणि सूर्य मावळतो रात्री साडेनऊ वाजता. म्हणजे जास्तीत जास्त वेळ प्रखर सूर्यप्रकाशात चालणं ही या मोहिमेतली आणखी एक कसोटी होती. या मोहिमेत भाग घेणाऱ्या व्यक्तींनी आपल्या पाठीवर कमीतकमी सहा-सात किलोंचं वजन घेऊन दररोज किमान पस्तीस किलोमीटर्स चालणं अपेक्षित होतं.

मोहीम सुरू झाली. मंगोलियातलं हवामान खूपच वेगळं होतं. त्याची सवय होईपर्यंत सर्व जण आजारी पडले. त्यात सगळ्यांना चालून चालून पायाला फोड आले. या सगळ्या शारीरिक त्रासावर काहीही उपाय नव्हता. या सर्व त्रासाबरोबरच मोहीम पूर्ण करायची होती.

मला वाटतं कोणत्याही मोहिमेतच नाही, तर आयुष्यातही अनेक वेळा असे क्षण येतात जेव्हा तुम्हाला हातात घेतलेलं काम असह्य त्रास, कटकट, शारीरिक कष्ट यांमुळं सोडून द्यावंसं वाटतं. पण ती वेळ फार महत्त्वाची असते. तेव्हा तुमच्यासमोर दोन वाटा असतात. एक हातात घेतलेलं काम सोडून देणारी आणि दुसरी शारीरिक त्रास सहन करत पुढे नेणारी. त्याच वेळी स्वतःलाच हे सांगायची गरज असते की कष्ट, त्रास क्षणिक असतात. काम पूर्ण केल्याचं समाधान, यश ही आयुष्याची सर्वात मोठी कमाई असते.



या धड्याबरोबर आणखी एक शिकवण मोहिमेतील एका प्रसंगातून मिळाली. उंटाची लाथ लागल्यावर माझा एक खांदा अखंड दुखत होता. तसाही रोज माझा कुठला न कुठला अवयव दुखत असे. एकदा अशीच पायाची दुखावलेली करंगळी खूप ठणकू लागली. पण त्या दिवशी मात्र माझं सारं लक्ष दुखऱ्या खांद्याकडं नाही तर त्या करंगळीवर होतं. अशा वेळी माझा खांदा दुखत असल्याचं मी विसरून जात असे आणि माझं चालणं चालू राहत असे. मग मला जाणवलं की वेदनेचे स्रोत तुमच्या मनात असतात आणि जसे वेदनेचे असतात तसं त्या वेदनेतून बाहेर काढण्याचे, बरे करण्याचे स्रोतही तुमच्या मनात असतात. थोडक्यात, हे सगळे मनाचे व शरीराच्या संवेदनांचे खेळ आहेत आणि यात तुमचं मन हे दुखऱ्या शरीराला बरं होण्यासाठी एक प्रकारची शक्ती देत असतं .

मोहिमेच्या पहिल्याच दिवशी आम्हाला वादळाला तोंड द्यावं लागलं होतं. पुढं कशाला तोंड द्यावं लागणार आहे त्याचा जणू धडाच मिळाला. हे एक वादळ तीन दिवस चाललं. एकदा का वादळ सुरू झालं की, काही करता येत नसे. बसून राहावं लागत असे कारण वाऱ्याचा वेग ताशी ऐंशी-पंचाऐंशी किलोमीटर असे. त्यात तुम्ही उभं राहायचा प्रयत्न केलात तरी पडायला होत असे. त्यातला दीड दिवस आम्ही चष्मा घालून स्लीपिंग बॅगमध्ये शिरून बसलो होतो कारण त्या वेळेस हवामान खराब होऊन खूप थंडी पडली होती.

मुळात वाळवंटातील प्रवास हा एक सर्वस्वी वेगळा अनुभव होता. या प्रदेशाचं एक वेगळं सौंदर्य होतं. आम्ही जेव्हा मोहीम सुरू केली तेव्हा आमच्या आसपास 'अल्ताय'चे डोंगर होते. अतिशय सुंदर निसर्ग होता. पण तेव्हा आम्ही सर्व जण नवीन वातावरणाशी जुळवून घेत होतो त्यामुळं ते सौंदर्य निरखण्याइतकी आमची मानसिक अवस्था चांगली नव्हती. मृगजळाबद्दल अनेकदा ऐकलं होतं, ती भरपूर पाहायला मिळाली. मोहिमेच्या बत्तिसाव्या दिवशी अतिशय रमणीय असं 'ओॲसिस' पाहायला मिळालं.

वाळवंटातल्या रात्री अतिशय सुंदर असतात. निरभ्र आकाश फार सुंदर दिसतं. या मोहिमेत अशा सुंदर रात्री आम्ही अनेकदा निःशब्द शांततेचा अनुभव घेतला. या शांततेत मनाचा मनाशी संवाद झाला. नेहमीच्या आयुष्यात आपल्याला आधीचा दिवससुद्धा धड पूर्णपणे आठवत नाही; पण वाळवंटात मात्र मला आधीच्या दिवसाचा क्षणन्‌क्षण आठवत असे. मनाची एकाग्रता म्हणजे काय हे तिथं जाणवलं. हा अनुभव विलक्षण आणि आयुष्यभर जपण्यासारखा होता.




शारीरिक आणि मानसिक क्षमतांची इतकी कठोर परीक्षा बघणारी एवढी मोठी मोहीम मी आजवर केली नव्हती. त्यामुळं ती पार पडल्यावर मी स्वतःलाच विचारलं, 'काय दिलं या मोहिमेनं मला?' या मोहिमेतनं मला खूप महत्त्वाचे धडे मिळाले. त्यांचा माझ्या आयुष्यावर अगदी खोल परिणाम झाला. अगदी मुद्दे घेऊन मांडायचं तर पहिला धडा आहे — अशक्य असं काही नसतं.

प्रत्येक गोष्टीत तीन पायऱ्या असतात; काही सोप्या, काही अवघड व अशक्य वाटणाऱ्या. म्हणजे आपल्याला त्या अशक्य वाटत असतात. सोप्या आपण सहज पार करू शकतो. अवघड पायऱ्यांसाठी विचार करावा लागतो; पण अशक्य वाटणाऱ्या गोष्टींसाठी आपण थोडा धीर धरला — म्हणजेच वेळेचं बंधन जरा सैल केलं — तर त्या गोष्टी साध्य होतात. एकूण काय, मला जे अवघड, कठीण, अशक्यप्राय वाटत होतं ते तेवढं अवघड नव्हतं हे अनुभवानं पटलं.

या मोहिमेत मिळालेला आणखी एक धडा म्हणजे — त्रास, कष्ट क्षणिक असतात. त्यातून निर्माण होणारा अभिमान मात्र निरंतर असतो.

आमची ही मोहीम आम्ही साठ दिवसात पूर्ण करू असं ठरवलं होतं, पण प्रत्यक्षात मात्र आम्ही एकावन्न दिवस, अकरा तास आणि चाळीस मिनिटांत ही मोहीम पूर्ण केली. निरभ्र आकाशाखाली अथांग वाळू तुडवत केलेल्या या मोहिमेनं मला काय शिकवलं सांगू? इथं, या वाळवंटात असताना मी कोणाची बहीण नव्हते, कोणाची मुलगी, मैत्रीण, सहकारी काहीच नव्हते. मी 'मी' होते. कोणत्याही नात्याच्या चष्म्यातून ओळखली न जाणारी. फक्त माझ्या स्वतःच्या ओळखीसह असलेली मी. माझ्या अस्तित्वाची जाणीव मला या प्रवासात झाली. या मोहिमेनं मला दिलेली ही अमूल्य भेट आहे.

**सुचेता कडेठाणकर**

**शब्दांकन : वंदना अत्रे**

**क. थोडक्यात उत्तरे लिहा.**

अ. साहसी क्रीडाप्रकारांचे काय वैशिष्ट्य सांगता येईल?

आ. गोबीचे वाळवंट पश्चिमेकडून पूर्वेकडे चालत जाण्याच्या मोहिमेत कोणती आव्हाने होती?

इ. लेखिकेच्या आवडीनिवडी, तिचे छंद व तिने घेतलेले औपचारिक शिक्षण यांचा तिने हाती घेतलेल्या मोहिमेशी असलेला संबंध उलगडून सांगा.

ई. या मोहिमेतून लेखिका अनेक गोष्टी शिकली. ते शिक्षण कोणते होते ते तुमच्या शब्दांत लिहा.

**ख. वरील उताऱ्याच्या अनुषंगाने *शालेय विद्यार्थ्यांच्या सहली* या विषयावर गटात चर्चा करा. तुमच्या गटातील चर्चेचे एक टिपण तयार करून त्याचे वर्गात सादरीकरण करा. चर्चेसाठी तुम्ही पुढील मुद्द्यांचा आधार घेऊ शकता. या मुद्द्यांव्यतिरिक्त अन्य मुद्देही अर्थातच घेऊ शकता.**

- शालेय विद्यार्थ्यांच्या सहली न्याव्यात का?
- सहलींसाठी कोणती ठिकाणे निवडावीत? का?
- सहलींचा उद्देश काय असावा?
- सहलींचे स्वरूप कसे असावे?
- सहलींचा अपेक्षित शैक्षणिक परिणाम कशा प्रकारे साध्य करता येऊ शकतो?

**ग. पुढील उताऱ्यात ठळक केलेल्या शब्दांऐवजी त्याच अर्थाचे कंसातील दुसरे शब्द वापरा.**

(संपूर्णपणे, स्थिती, जमवून, खूप वेळा, सुंदरता, भाग, आजूबाजू)

मुळात वाळवंटातील प्रवास हा एक अ) **सर्वस्वी** वेगळा अनुभव होता. या आ) **प्रदेशाचं** एक वेगळं इ) **सौंदर्य** होतं. आम्ही जेव्हा मोहीम सुरू केली तेव्हा आमच्या ई) **आसपास** अल्तायचे डोंगर होते. अतिशय सुंदर निसर्ग होता पण तेव्हा आम्ही सर्व जण नवीन वातावरणाशी उ) **जुळवून** घेत होतो. त्यामुळं ते सौंदर्य निरखण्याइतकी आमची मानसिक ऊ) **अवस्था** चांगली नव्हती. मृगजळाबद्दल ए) **अनेकदा** ऐकलं होतं, ती भरपूर पाहायला मिळाली. मोहिमेच्या बत्तिसाव्या दिवशी अतिशय रमणीय असं ‘ओॲसिस’ पाहायला मिळालं.

**घ. नाम + क्रियापद किंवा इतर शब्द + क्रियापद यांची यादी पूर्ण करा. क्रियापदाचे एकापेक्षा जास्त पर्यायही असू शकतात हे लक्षात घ्या.**

उदा. वेळ **येणे / साधणे**

| | |
|---|---|
| अ. निवड -------------- | आ. उपजीविका -------------- |
| इ. दबाव -------------- | ई. चढाई -------------- |
| उ. डोंगरवाटा -------------- | ऊ. कौल -------------- |
| ए. कस -------------- | ॲ. पडताळून -------------- |
| ऐ. पार -------------- | ओ. सूर्य -------------- |
| ऑ. संवाद -------------- | औ. धडा -------------- |

## ८ लेखिका, पटकथाकार, अभिनेत्री असलेल्या मधुगंधा कुलकर्णी यांची डॉ. आनंद नाडकर्णी यांनी घेतलेली मुलाखत ऐका.

**शालेय जीवनात अभ्यासात मागे असलेली परंतु मोठे झाल्यावर स्वबळावर यशस्वी झालेली मधुगंधा कुलकर्णी यांच्यासारखी आणखी कोणती व्यक्ती तुम्हाला माहीत आहे? अशा व्यक्तीची माहिती मिळवून ती वर्गात सादर करा.**



## ९ जिद्द

*पारंपरिक भारतीय शिक्षणव्यवस्थेमध्ये गुरुकुल पद्धत प्रचलित होती. गुरुकुल पद्धतीमध्ये गुरूच्या घरी राहून शिष्य शिक्षण घेत असे. काळाच्या ओघात औपचारिक शिक्षणपद्धतीत गुरुकुल पद्धत मागे पडली असली, तरी शास्त्रीय संगीत, शास्त्रीय नृत्य या कलांचे शिक्षण आजही काही ठिकाणी गुरुकुल पद्धतीने दिले जाते. भारतीय शास्त्रीय संगीतातील विख्यात गायक भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांच्या 'जिद्द' या लेखातून त्यांनी आपल्या गुरूकडे राहून केलेली संगीत साधना आपल्याला समजते.*

'गाणं हेच आपलं जीवन आहे,' असे बालवयातच कधीतरी मनावर ठसले गेले. 'गाणं शिकू, नाव मिळवू' असे स्वप्नही मी त्या बालवयातच बघितले होते. गाण्याने मला पार झपाटून टाकले होते. त्याच भरात मोठा गायक होण्यासाठी म्हणून मी अगदी लहान वयात दोन वेळा घरातून पळून गेलो. गुरूच्या शोधात उत्तर भारत वणवण फिरलो. उपासमार सहन केली. पडतील ती कामे निमूटपणे केली. अगदी एका गवयाच्या घरी तर बाजारातून मटण आणण्यापासून पुढचे सारे सोपस्कारही केले ते केवळ गाणे शिकायला मिळेल या आशेने!

पुढे सवाई गंधर्वांकडे गाणे शिकायला म्हणून गेलो, तेव्हा पहिले दीड वर्ष मी केवळ पडतील ती घरकामे निमूटपणे करीत असे. या घरकामांत रोज घरापासून अर्धा किलोमीटर दूर असलेल्या ३०० फूट खोल विहिरीतून रहाटाने पाणी काढावे लागे. अशा किमान १० ते १२ भल्या मोठ्या घागरी घरी आणाव्या लागत. असे रोज पाणी भरताना पाहून गावकऱ्यांचा तर असा समज झाला होता की, सवाई गंधर्वांनी पाणी भरण्यासाठी एका पहिलवानाला आपल्याकडे नोकरीला ठेवलंय! माझ्याकडून गुरुजींचे कपडे धुणे, भांडी घासणे, पाणी भरणे अशी सारी कामे करून घेण्यामागे माझ्या गुरूचा हेतू मला पारखून घेणे हाच असावा! अन् गाणे शिकून मी माझ्या बळावर इकडची दुनिया तिकडे करू शकेन ही माझी जिद्द होती. त्यासाठी तशी मेहनतही मी घेत असे.

पुढे जेव्हा गाणे शिकू लागलो तेव्हा मी गाणे सोडून दुसरे काहीही करीत नसे. अर्जुनाला धनुर्विद्या शिकताना पक्ष्याचा केवळ डोळाच दिसत होता, तीच गत माझीही होती. मला फक्त गाणे आणि गाणेच ऐकू येत होते. असेच एकदा मल्हार रागाचा रियाझ गुरूसमोर करीत होतो. कुठेतरी स्वर नीट लागले नाहीत.

स्वर जरा हलला. ते लक्षात येताच गुरूंनी शेजारच्या तबकातील अडकित्ता उचलून माझ्या दिशेने फेकला. तो नेमका माझ्या डाव्या डोळ्याखाली लागला. त्या वेळीच निश्चय केला की, 'प्राण गेला तरी चुकायचं नाही! सतत सजग राहायचं!' आज चार हजारांहून अधिक मैफली होऊनही प्रत्येक मैफल ही माझी पहिलीच मैफल आहे आणि ती मी यशस्वी करीनच, या भावनेने मी जिद्दीने गायला सुरुवात करतो.

कशी कोण जाणे, पण पहिल्यापासूनच माझी जिद्द अशी की जे काम हजारो, लाखो करू शकणार नाहीत ते मी काय वाटेल ते झाले तरी करीनच! मी ज्याला जिद्द म्हणतो त्याला कोणी हट्टही म्हणत असतील. अर्थात ही जिद्द, हा हट्ट मी चांगल्या गोष्टीसाठीच वापरत आलो आहे. एकदा १९५८ साली दसऱ्याच्या निमित्ताने म्हैसूरला माझे गाणे होते. तिथे जाताना ड्रायव्हरला डुलकी लागल्याने आमची गाडी १०-१२ कोलांट्या खात साताऱ्याच्या खिंडीत ४०-५० फूट खाली कोसळली. तेव्हाच मी ठरवून टाकले की, यापुढे ड्रायव्हिंग आपण स्वत:च करायचे. मरण यायचेच असेल तर ते आपल्या हातून यावे! मग मी तो ध्यासच घेतला. तासन्‌तास खर्चून ड्रायव्हिंग, रिपेअरिंग शिकलो. भारतभ्रमण निदान १०-१२ वेळा स्वतः ड्रायव्हिंग करीत केले.

बडे गुलामअली खाँसाहेब काही झाले तरी रियाझात खंड पडू देत नसत. ती त्यांची एक प्रकारची जिद्दच होती. रियाझ करायला बसले की वेळेचे भान त्यांना राहत नसे. एका प्रवासात मुंबई ते कलकत्ता मी त्यांच्याबरोबर होतो. मुंबईला गाडीत बसल्यावर तंबोऱ्याची गवसणी जी निघाली ती कलकत्त्यापर्यंत. प्रवास संपला तेव्हाच रियाझ संपला.

मीही गुरुगृही असताना रात्री चिमणीत रॉकेल भरून चिमणी पेटवायचो आणि मेहनतीला प्रारंभ करायचो. चिमणीतले रॉकेल संपून ती विझली की माझी स्वरसाधना थांबायची. म्हणजे एकदा रात्री बैठक मारून रियाझ सुरू करायचो ते सकाळी थांबायचो. एक तान घेतली की तीच पुन:पुन्हा तासन्‌तास म्हणत राहायची. एकेक जागा पक्की करून मगच पुढे जायचे. डोके अगदी दुखू लागायचे. पण एका जिद्दीच्या जोरावर मी ते अग्निदिव्यही पार केले.



**भीमसेन जोशी**

**क. पुढील चुकीची विधाने उताऱ्याच्या आधारे बरोबर करून लिहा.**

अ. बालपणापासून पंडित भीमसेन जोशी यांनी सवाई गंधर्व यांनाच आपले गुरू मानले होते.

आ. बडे गुलामअली खाँसाहेब ठरावीक वेळेतच रियाझ करत.

इ. सतत सजग राहायचे हे पंडितजींना छडीचा मार खाऊन समजले.

ई. ड्रायव्हिंग करण्याची खूप आवड असल्याने पंडितजी स्वत:च ड्रायव्हिंग करत असत.

उ. गुरुगृही पंडितजी फक्त आणि फक्त रियाझ करायचे.

**ख. थोडक्यात उत्तरे लिहा.**

अ. पंडितजींची प्रत्येक मैफल अप्रतिम होण्यामागचे रहस्य कोणते?

आ. तुमचे कोणते स्वप्न होते का? ते स्वप्न पूर्ण करण्याकरिता तुम्हाला कोणकोणत्या कठीण प्रसंगांना तोंड द्यावे लागले आहे?

**ग. खालील शब्दार्थांकरता उताऱ्यातील कोणते शब्द तुम्ही वापराल?**

अ. मनाचा निर्धार

आ. प्रसिद्ध

इ. वेडे करणे, भारावून टाकणे

ई. काही न बोलता

उ. पाणी भरण्याचा घडा

ऊ. अंगाने तंदुरुस्त मनुष्य, मल्ल

ए. पुन्हा पुन्हा उजळणी करणे

ॲ. एखाद्याची नाना तऱ्हांनी परीक्षा घेऊन खात्री करून घेणे

ऐ. सावध राहणे

ओ. तंबोऱ्याचे आवरण

ऑ. एखाद्या गोष्टीवर क्रिया, प्रक्रिया करणे

औ. गायनाचा सराव

अं. अशक्य वाटणारी गोष्ट शक्य करणे

अ: कठीण प्रसंगातून यशस्वीरित्या बाहेर पडणे

**घ. पुढील विशेष्यांशी खाली दिलेल्या विशेषणांपैकी कोणकोणती विशेषणे जुळतात? एका विशेष्याशी एकापेक्षा अधिक विशेषणे जुळू शकतात.**

| विशेष्य | विशेषणे |
|---|---|
| अ. निश्चय | ठाम |
| आ. कष्ट | अपार |
| इ. विश्वास | दुर्दम्य |
| ई. इच्छाशक्ती | अखंड |
| उ. ध्यास | दृढ |
| | तीव्र |
| | अतोनात |
| | प्रबळ |
| | अहोरात्र |

**१० कलाशिक्षण, मूल्यशिक्षण, भाषाशिक्षण, कौशल्य शिक्षण, शारीरिक शिक्षण, परिसर शिक्षण यांचा शिक्षणात अंतर्भाव असावा असे मानण्यात येते. त्या अनुषंगाने पुढील मुद्द्यांवर चर्चा करा. चर्चेनंतर प्रत्येकाने त्यावर एक टिपण तयार करा.**


**कलाशिक्षण**
**मूल्यशिक्षण**
**भाषाशिक्षण**
**कौशल्य शिक्षण**
**शारीरिक शिक्षण**
**परिसर शिक्षण**

- या गोष्टींवर शालेय शिक्षणात पुरेसा भर दिला जातो का?
- विद्यार्थी, पालक व शिक्षक यांना या गोष्टींचे महत्त्व वाटते का?
- या बाबतीतला तुमचा वैयक्तिक अनुभव काय आहे?
- या गोष्टींचे शिक्षण सर्वांसाठी सक्तीचे असावे की वैकल्पिक असावे?
- या गोष्टींमुळे विद्यार्थ्यांचा समतोल विकास साधला जाऊ शकतो का? (म्हणजे यातून केवळ बौद्धिकच नाही तर शारीरिक, भावनिक, मानसिक, सामाजिक विकास साध्य होतो का?)

**११ रेणू दांडेकर यांची समीरण वाळवेकर यांनी घेतलेली मुलाखत ऐका. त्या अनुषंगाने तुमच्या एका सहाध्यायीबरोबर पुढील विषयावर चर्चा करा.**

**'शिक्षण प्रभावी होण्यासाठी प्रगत तंत्रज्ञानाचा वापर व आधुनिक सोयीसुविधा अत्यावश्यक आहेत'**

| समर्थन करणारे विधान | विरोध दर्शविणारे विधान |
|---|---|
| तंत्रज्ञानामुळे शिक्षण सर्वदूर पोहोचू शकते. आधुनिक सोयीसुविधांचा वापर केल्यास विद्यार्थी शिक्षणाकडे आकर्षित होतात. | शिक्षण तांत्रिक गोष्टींमध्येच अडकून पडते. विद्यार्थी निसर्गाशी, त्याच्या भवतालाशी जोडला जात नाही. |



**१२ करा आणि शिका.**

क. रेडिओवरील / समाजमाध्यमांवरील रोजचे मराठी कार्यक्रम नियमित ऐका. त्यातून तुम्हाला प्रेरणादायक प्रसंगांबाबत कोणती नवीन माहिती / दृष्टी मिळाली? त्यातील कोणत्याही पाच गोष्टींविषयी लिहून वर्गात सादरीकरण व चर्चा करा.

ख. तुम्हाला प्रेरणादायक वाटणारी कोणतीही एक प्रसिद्ध मराठी व्यक्ती निवडा. त्यांच्या मुलाखतीसाठी

**१० प्रश्न तयार करा. आता याच प्रश्नांचा वापर करून तुम्ही निवडलेल्या प्रसिद्ध व्यक्तीच्या काल्पनिक मुलाखतीचे वर्गात सादरीकरण करा.**

**ग. 'आकाशी झेप घे रे पाखरा' हे गाणे ऐकून पाठ करा आणि वर्गात सादर करा.**

## उत्तरसंच

**२. च.** अ. नाराज व्हायचा आ. नष्ट होणे इ. उद्देश सफल होतो, उद्दिष्ट पूर्ण होते
ई. प्रचलित होत चालली आहे उ. चरितार्थ चालविण्यासाठी काम करत आहेत
(अनेक उत्तरे शक्य)

**३.** क. आ ख. अ ग. आ घ. इ च. आ

**४. ख.** अ. स्तब्ध होणे आ. हालचाल न करता शांत पडून राहणे इ. रागावणे
ई. संबंध तोडणे उ. चिडवणे ऊ. खूप घाबरणे

**४. ग.** अ. दारुण आ. दारूनं इ. वरुण ई. वरून उ. करुण ऊ. करून
ए. तरुण ॲ. तरून ऐ. सन ओ. सण ऑ. खून औ. खूण

**४. घ.** अ. गुरगुरणं आ. धडधडलं इ. भिरभिरलं ई. सळसळत उ. तळतळणाऱ्या

**७. ग.** अ. संपूर्णपणे आ. भागाची इ. सुंदरता ई. आजूबाजूला उ. जमवून
ऊ. स्थिती ए. खूप वेळा

**७. घ.** अ. निवड करणे आ. उपजीविका करणे इ. दबाव आणणे ई. चढाई करणे
उ. डोंगरवाटा चालणे / तुडवणे ऊ. कौल देणे ए. कस लागणे
ॲ. पडताळून पाहणे ऐ. पार करणे ओ. सूर्य उगवणे / मावळणे
ऑ. संवाद होणे / असणे / तुटणे / साधणे / करणे औ. धडा मिळणे / शिकणे

**९. क.** अ. बालपणी पंडितजी एका गवयाकडे गाणे शिकत होते. नंतर सवाई गंधर्वांकडे शिकू लागले.
आ. बडे गुलामअली खाँसाहेब रियाझ करायला बसले की वेळेचे भान त्यांना राहत नसे.
इ. सतत सजग राहायचे हे पंडितजींना अडकित्त्याचा मार खाऊन समजले.
ई. ड्रायव्हरकडून अपघात झाल्याने आपणच ड्रायव्हिंग करायचे असे ठरवून पंडितजी स्वत:च ड्रायव्हिंग करत असत.
उ. गुरुगृही पंडितजी पडतील ती कामे निमूटपणे करत असत.

**९. ग.** अ. जिद्द आ. विख्यात इ. झपाटून टाकणे ई. निमूटपणे उ. घागर
ऊ. पहिलवान ए. रियाझ ॲ. पारखणे ऐ. सजग राहणे ओ. गवसणी
ऑ. सोपस्कार करणे औ. स्वरसाधना अं. इकडची दुनिया तिकडे करणे
अ:. अग्निदिव्य

**९. घ.** अ. ठाम, दृढ – निश्चय आ. अपार, अखंड, अतोनात, अहोरात्र – कष्ट
इ. ठाम, दृढ, दुर्दम्य, अतोनात – विश्वास ई. दुर्दम्य, प्रबळ, तीव्र – इच्छाशक्ती
उ. अखंड, अहोरात्र – ध्यास

# ३ आस नित्य नव्याची




नावीन्याची आवड हा माणसाचा स्थायिभाव. माणसाच्या ठायी असणाऱ्या कुतूहल आणि जिज्ञासेपोटी माणसाने जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात प्रगती केली. स्वयंपाकघरात उपयुक्त असणाऱ्या साध्यासुध्या प्रयोगांपासून अंतराळशास्त्रात लावलेल्या जटिल शोधांपर्यंत त्याने केलेल्या संशोधनाची व्याप्ती आहे. विज्ञान-तंत्रज्ञान हा विषय आता शालेय पाठ्यपुस्तकांपुरता सीमित न राहता, त्याचे दृश्य परिणाम आपण रोजच्या जगण्यात अनुभवत आहोत. संपर्क, दळणवळण, करमणूक अशा क्षेत्रांमध्ये बदलत्या तंत्रज्ञानामुळे घडून येत असलेली क्रांती अभूतपूर्व म्हणावी अशी आहे. तिच्या अफाट वेगाशी आपण स्वत:ला जुळवून घेत आहोत. नवनवे तंत्रज्ञान आत्मसात करत आहोत. कारण, अर्थातच, फक्त संशोधकांनाच नाही; तर आपल्यालाही नित्य नव्याची आस आहेच ना!

## १ 'दशक'क्रिया



सरते दशक तसे फारच मागास म्हणायचे. कारण दहा वर्षांपूर्वी १ जानेवारी रोजी ते सुरू झाले त्या वेळी 'आयपॅड' जन्मास यायचे होते, 'आयवॉच' किमान पाच वर्षे दूर होते आणि स्टीव्ह जॉब्स हयात होता. माणसे 'काल्यापिल्या' टॅक्सीतून प्रवास करीत कारण 'उबर' ही संकल्पनाच नव्हती. सर्वसाधारणपणे बाहेर खाण्यासाठी हॉटेलात जायची प्रथा होती. हवे ते हॉटेल हात जोडून हातातल्या फोनवर उभे नव्हते. पर्यटनास जायच्या आधी हॉटेल बुकिंग केले जायचे कारण 'एअर बीएनबी' म्हणजे काय हेच माहीत नव्हते. कोडॅक कॅमेरा होता आणि त्याच्या चित्रफिती तयार करून आल्यागेल्यास दाखवायची प्रथा होती. 'अलेक्सा' आणि 'सिरी' वगैरेंच्या प्रसववेदनादेखील सुरू झाल्या नव्हत्या. माणसे प्राधान्याने कागदी वर्तमानपत्रच वाचायची. त्यामुळे 'फेक न्यूज' हा प्रकारच माहीत नव्हता. बातम्या त्या वेळी शोधाव्या लागायच्या. हातातल्या यंत्रावर आपोआप येऊन त्या आदळायची सुरुवात झाली नव्हती. ट्विटर, व्हॉट्सॲप आदी वापरणाऱ्या कोट्यवधींच्या फौजा तैनात व्हायच्या होत्या. आयुष्य तसे सोपे आणि सरळ होते म्हणायचे.

गेल्या दहा वर्षांत ते बदलले. संगणकाच्या जन्माने सर्वसामान्यांच्या आयुष्यात गती आलीच होती. पण २००९ उलटले अन् ती अधिकच वाढली. इतकी, की आपण कसे बदललो ते आपणासच कळेनासे



झाले. तसे पाहू गेल्यास इंटरनेट या संकल्पनेचा जन्म १९८९ सालचा. या वर्षाने इतिहास आणि भूगोल, दोन्ही बदलले. मानवी समूहांना भौतिकदृष्ट्या विलग करणारी बर्लिनची भिंत याच वर्षात कोसळली आणि याच वर्षात टिम बर्नर्स ली या द्रष्ट्या अभियंत्याने इंटरनेटच्या माध्यमातून मानवी समूहांना जोडण्याचा सेतू जन्मास घातला. नंतर या तंत्राच्या वेगाचा दिवसागणिक फक्त गुणाकार होत राहिला. यानंतर आपल्या आयुष्यात जे काही घडले ते अद्भुत म्हणता येईल असे होते. २०१० सालच्या जानेवारी महिन्यात जॉब्सने पहिल्यावहिल्या आयपॅडचे अनावरण केले. संगणक त्याच्या सर्व तंत्रमंत्रासहित एखाद्या अवयवाप्रमाणे मानवी जीवनाचा अविभाज्य भागच बनला जणू. नंतर असे अनेक घटक तयार झाले, ज्यांनी आपल्या आयुष्याचे तंत्रावलंबित्व केवळ वाढवले. तोपर्यंत अन्न, वस्त्र आणि निवारा याच तीन मुख्य गरजा जगण्यासाठी महत्त्वाच्या असे समजले जायचे. त्यानंतरच्या दशकात अन्न, वस्त्र, निवारा यांच्या जोडीला 'डेटा' हादेखील जगण्यासाठी अत्यावश्यक घटक बनला. जे काही झाले, त्याचे गांभीर्य वा महत्त्व किती जणांना अवगत झाले हा प्रश्न असेल. पण हे तंत्रज्ञान बहुसंख्यांनी अवगत केले हे मात्र खरे. आज तर वास्तव हे आहे, की एखादा मनुष्यप्राणी हा साक्षर असेल वा नसेल, पण तो मोबाइलसज्ञान मात्र असतोच असतो आणि कोठल्या मोफत डेटावर काय करता येते याची माहिती त्यास असते. जे झाले ते झाले. त्याविषयी भाष्य करावे असे बरेच काही आहे. पण प्रश्न आपण काय अनुभवले हा नाही, तर सुरू होणारे नवे दशक आपणास आगामी १० वर्षांत काय दाखवणार, हा आहे.

१ जानेवारी २०३० हा दिवस उगवेल त्या वेळी मानवी आयुष्यात काय बदल झालेला असेल? त्याचा कल्पनाविलास रंगवण्यासाठी उच्च कोटीची विज्ञान-तंत्रज्ञान प्रतिभा हवी.

चालकरहित मोटारी हाकेच्या अंतरावर आहेत. त्या या दशकात रस्तोरस्ती दिसू लागतील? शक्य आहे. पण त्यापलीकडेदेखील काही घडले असेल. मोटारी आणि रस्ते यांचा संबंध अन्योन्य आहे. पण

या दशकातील मोटारींना धावण्यासाठी रस्त्याची गरज लागेलच असे म्हणता येणार नाही. त्या जमिनीवर असतील त्या फक्त उभ्या राहण्यापुरत्या. कारण त्यांना पंख फुटले असतील. उडत्या मोटारींचे प्रयोग आता सुरू आहेतच. अनेक बड्या कंपन्यांची संशोधन मंडळे त्या प्रत्यक्षात आणण्यासाठी झटताना दिसतात. कदाचित असेही होऊ शकेल, की सध्या एखादे पुस्तक वा खाऊचे डबे घेऊन जाणारे ड्रोन या दशकात माणसेही वाहून नेऊ शकतील. हे सारे आणि अधिक बरेच काही प्रत्यक्षात येणार यात तिळमात्र शंका नाही. ती असलीच तर इतकीच, की मग चालक आणि त्याचा 'क्लीनर' यांचे काय होईल? हॉटेलांत यंत्रमानवांनी कर्मचाऱ्यांची जागा घ्यायला सुरुवात झाली आहे. त्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड येत्या दशकात मिळेल. मग चालकांप्रमाणे हे कर्मचारीही दिसेनासे होतील.

आपल्या हातातील मोबाइल नामक आयताकृती उपकरणाने कशाकशाची जागा घेतली या दशकात, याचा कधी आपण विचार करतो? १ जानेवारीच्या निमित्ताने तो करावयास हरकत नाही. गेल्या दशकात या मोबाइलमधे कॅमेरा आला, संगीतसाठे आले. रेडिओ होताच; मोबाइलमध्ये तो अधिक प्रगत झाला. घड्याळ आले, त्यामुळे गजराची सोय आली. कॅलक्युलेटर आले, बँका आल्या, रस्ता दाखवायची यंत्रणा आली, काही प्रमाणात वैद्यकीय सेवा आल्या. ही यादी वाढवता येईल तितकी वाढेल. यातील बरेचसे काही हे काल सरलेल्या वर्षात घडले. आणि आज सुरू होणाऱ्या वर्षात, त्यानंतर सुरू होणाऱ्या दशकात यातील सर्व काही बदलेलच बदलेल. पण शक्यता ही, की खुद्द मोबाइल फोनच बदलेल. आता तो बाळगावा लागतो, दिवसातून किमान एकदा तरी त्याची बॅटरी पुनरुज्जीवित करावी लागते आणि त्याची काळजीही घ्यावी लागते. पुढच्या दशकाचे मोबाइल कदाचित शरीरात आरोपण करता येण्याजोगे सूक्ष्म असतील आणि हाताच्या बोटांनीच ते वापरता येतील. पुढच्या दशकातील बालके 'कराग्रे वसते लक्ष्मी...' अशा श्लोकाऐवजी न जाणो 'कराग्रे वसते मोबाइल...' असे म्हणू लागतील.

मानवी चेहरा ओळखण्याचे तंत्रज्ञान आताही तसे विकसित झालेले आहेच. चीनसारख्या देशाने तर सार्वजनिक ठिकाणी ही यंत्रणा तैनात केली असून त्यापासून स्वत:चा बचाव करण्याचा कोणताही पर्याय नाही. ही चेहरेशोधक यंत्रणा आणि सरकारी खात्यात जमा असलेली 'आधार'सारखी आपली माहिती या जोरावर चीनमध्ये कोणती व्यक्ती कधी कोठे होती हे सारे सरकारला समजून घेणे कमालीचे सोपे झाले आहे. त्यामागचा विचार हा, की राजकीय निदर्शने आदी मार्ग चोखाळण्याची सोयही नागरिकांना उपलब्ध राहू नये. या तंत्रज्ञानात भयावह ताकद आहे आणि तिचा उपयोग विधायक कारणांपेक्षा विघातक कारणांसाठीच अधिक आहे. त्यामुळे हे तंत्रज्ञान जन्मास घालणाऱ्या अमेरिकेतील सॅन फ्रान्सिस्कोसारख्या शहराने त्यावर बंदीच आणली आहे. आगामी दशकात या तंत्राचा विकास इतका होईल की त्यासाठी कॅमेरे लावायची गरजच राहणार नाही. अवकाशातील उपग्रहाचे कॅमेरेदेखील हे काम लीलया करू शकतील. तेव्हा आपले खासगीपण २०३० पर्यंत अधिकच आकसणार हे नक्की.

नव्या दशकाची चर्चा सुरू असताना ही चिंता अनेक शास्त्रप्रेमींच्या मनी असणार. अनेक आघाड्यांवर यास सुरुवात झाली आहे. छानच म्हणायचे हे सगळे. फक्त आपल्यासारखे अनेक या साऱ्यास किती तयार आहेत ही चिंता तेवढी आहे. नवे दशक काहींच्या मते आज उजाडले नसून ते २०२१ साली उजाडेल. संख्यामोजणीची पद्धत कोणतीही असो. बदल होणार आहेत हे निश्चित.

अग्रलेख 'लोकसत्ता' १ जानेवारी २०२०

**टीप :** उताऱ्याच्या 'दशक'क्रिया या शीर्षकात शब्दाचा खेळ केला आहे. याचा हिंदू धर्मातील 'दशक्रिया'

या शब्दाशी संबंध आहे. व्यक्तीच्या मृत्यूनंतर दहाव्या दिवशी काही धार्मिक विधी केले जातात, त्याला दशक्रिया म्हणतात. त्यानंतर जीवाचा पुढील प्रवास सुरू होतो, अशी समजूत आहे.

- क्रिया, कर्म, कृती, कार्य, काम, कर्तव्य हे शब्द 'करणे' या क्रियापदाशी संबंधित असून त्यांच्या अर्थच्छटा भिन्न आहेत. उदाहरणादाखल पुढील वाक्ये पाहा :
  जशी क्रिया, तशी प्रतिक्रिया!
  ज्याचे जसे कर्म असते, तसे त्याला फळ मिळते.
  परिणामांचा विचार करून कोणतीही कृती करावी.
  सर्वांच्या सहभागातून मोठे कार्य उभे राहते.
  पाटीलबुवांनी घरी कार्य काढले आहे. (कार्य हा शब्द लग्न, मुंज अशा अर्थानेही वापरला जातो.)
  अनिकेत रोज दहा तास काम करतो.
  वृद्ध आईचा सांभाळ तो मायेने नाही, तर कर्तव्य म्हणून करतो.

- क्रिया शब्द असणारे आणखी काही शब्द : प्रक्रिया, प्रतिक्रिया, पाकक्रिया, शस्त्रक्रिया, क्रियाशील, क्रियाशीलता, इ॰

**क. तंत्रज्ञानातील बदलांमुळे माणसाच्या जगण्यात काय काय बदल झाले, ते तुमच्या शब्दांत लिहा. (२०० ते २५० शब्द)**

**ख. पुढे एक विधान दिले आहे. त्याखाली दिलेल्या पर्यायांतून विधानाचे कारण सांगणारा योग्य पर्याय निवडा.**

अ. पुढच्या दशकातील बालके कदाचित 'कराग्रे वसते मोबाइल..' असे म्हणू लागतील, कारण

(एक) मोबाइल केवळ बोटभर उंचीचे असतील.

(दोन) मोबाइल शरीरात बसवून बोटांनी वापरता येतील.

(तीन) मोबाइल हाताच्या उष्णतेने पुनरुज्जीवित होतील.



आ. आपले खासगीपण २०३० पर्यंत अधिकच आक्रसेल, कारण

(एक) राजकीय निदर्शने करण्यावर बंदी घातली जाईल.

(दोन) सगळ्या जगात चेहरे शोधक यंत्रणा वापरली जाईल.

(तीन) अवकाशातील उपग्रह व्यक्तींना ओळखू शकतील.

इ. भविष्यात मानवी रोजगारांवर गदा येईल, कारण

(एक) कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढेल.

(दोन) इलेक्ट्रिक मोटारींची संख्या वाढेल.

(तीन) माणसांची वाहतूक ड्रोनमधून होईल.



**ग. उताऱ्याच्या आधारे पुढील जोडशब्दांचा अर्थ लक्षात घेऊन योग्य पर्याय ओळखा.**

उदा. : तंत्रावलम्बित्व

(एक) तंत्र आणि अवलंबित्व (दोन) तंत्र हेच अवलंबित्व (तीन) तंत्रावर अवलंबित्व

उत्तर : (तीन)



अ. कल्पनाविलास

(एक) कल्पनेचा विलास

(दोन) कल्पना आणि विलास

(तीन) कल्पना, विलास आणि इतर सगळे

आ. आल्यागेल्यास

(एक) आलेल्या आणि गेलेल्या (दोन) आलेल्या सर्वांना (तीन) आला आणि लगेच गेला

इ. दिवसागणिक

(एक) दिवसांची गणना (दोन) जाणाऱ्या प्रत्येक दिवशी (तीन) खूप दिवस

ई. रस्तोरस्ती

(एक) रस्त्यावर (दोन) खूप रस्ते असलेले ठिकाण (तीन) बऱ्याच रस्त्यांवर

उ. पहिल्यावहिल्या

(एक) पहिल्या आणि वहिल्या (दोन) पहिल्या आणि शेवटच्या (तीन) अगदी पहिल्याच


ऊ. चालकरहित

(एक) राहणारा चालक (दोन) चालकाविना (तीन) चालक असलेली

ए. संख्यामोजणी

(एक) संख्येने मोजणी (दोन) संख्येची मोजणी

(तीन) संख्या आणि मोजणी



**घ. पुढे काही वाक्ये दिली आहेत. कंसात दिलेले शब्द त्या वाक्यात योजून वाक्य पुन्हा लिहा.**

(प्रथा, गती, सरते, मागास, सेतू, हाकेच्या अंतरावर, तिळमात्र, अविभाज्य)

उदा. समाजमाध्यमे ही आधुनिक जीवनाचा जणू अतूट हिस्सा बनली आहेत.
समाजमाध्यमे ही आधुनिक जीवनाचा जणू **अविभाज्य** हिस्सा बनली आहेत.

अ. माझी शाळा माझ्या घरापासून अगदी जवळ होती.

आ. आमच्या घरी दहा दिवस गणपती बसवायची पद्धत आहे.

इ. टाळेबंदी कधी उठणार याची आम्हाला जरासुद्धा कल्पना नव्हती.

ई. हल्ली शहरांमध्ये आयुष्याचा वेग फार वाढला आहे.

उ. साहित्याचा अनुवाद हा दोन संस्कृतींना जोडणारा पूल असतो.

ऊ. हल्लीच्या जगात राहूनही अनेकांचे विचार जुनेच असतात.

ए. एकूणच हे संपत आलेले वर्ष जरा अडचणीचेच गेले.



**च. पुढे दिलेल्या विधानांच्या अनुषंगाने लहान गटात चर्चा करा. दिलेल्या विधानांशी तुम्ही सहमत आहात की नाही ते सांगा. तुमच्या मताची कारणमीमांसा करा. सर्वांची मते व कारणे ऐकून त्याचा एकत्रित सारांश वर्गात सादर करा.**

| | मान्य | अमान्य | अंशतः मान्य |
|---|---|---|---|
| अ. तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे माणूस अधिकाधिक परावलंबी होतो आहे. | | | |
| आ. सतत बदलणाऱ्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेताना माणसाची दमछाक होते. | | | |
| इ. तंत्रज्ञानाची कास धरल्यामुळे समाज अधिक विज्ञाननिष्ठ होतो. | | | |
| ई. नवे तंत्रज्ञान नव्या आजारांना जन्म देते, परंतु त्यावर उपायही शोधते. | | | |
| उ. जेवढे प्रगत तंत्रज्ञान तेवढी अधिक असुरक्षितता! | | | |
| ऊ. मानवी समाजापुढील सर्व समस्यांवर तंत्रज्ञानाकडे उत्तर आहे. | | | |
| ए. तंत्रज्ञानाच्या आहारी गेल्यामुळे माणसाची भावनाशीलता कमी होते आहे. | | | |
| ॲ. दैनंदिन जीवनातील तंत्रज्ञानाच्या हस्तक्षेपामुळे रोजचे जगणे सुकर झाले असले तरी त्यातील धोके वाढले आहेत. | | | |
| ऐ. मानवाला उपलब्ध झालेल्या अधिकच्या मोकळ्या वेळाचा तो सदुपयोग करत आहे. | | | |
| ओ. तंत्रज्ञानामुळे माणसे एकमेकांपासून दुरावली आहेत. | | | |



## २ 'इंटरनेट ऑफ थिंग्ज' या विषयावरील प्राध्यापक तिवारी यांच्या व्याख्यानातील अंश ऐका.

**क. ध्वनिफीत एकदा ऐकून पुढील विधानांसाठी दिलेल्या पर्यायातील योग्य पर्याय निवडा.**

अ. जनावरे ------------- जोडली गेली आहेत.

(एक) माणसांशी (दोन) इंटरनेटशी (तीन) मोबाइलशी

आ. दिवसभरातल्या ------------- वरून माणूस आजारी आहे की कसे ते आपण ओळखतो.

(एक) बोलण्या (दोन) हालचाली (तीन) चालण्या

इ. इंटरनेट ऑफ थिंग्ज म्हणजे वस्तूंचे -------------.

(एक) आंतरजाल (दोन) जाल (तीन) महाजाल

ई. आयओटीमध्ये पाण्याची बाटली ------------- शी जोडलेली असते.

(एक) सेन्सर (दोन) मोबाइल (तीन) इंटरनेट

**ख. तुम्ही निवडलेल्या योग्य पर्यायाच्या शब्दांवर वर्गात एक मिनिट न थांबता बोला.**

## ३ कविता

### विज्ञान गीत

संपला अंधार आता, सूर्य ज्ञानाचा उदेला ।
लागल्या वाटा दिसाया । शक्ती लाभे चालण्याला ॥

विश्व हे होते धुक्याने वेढलेले, झाकलेले
अंधश्रद्धांनी जगाचे, मार्ग होते घेरलेले ।
ज्ञानविज्ञानातुनी ये सत्य आता प्रत्ययाला
संपला अंधार आता, सूर्य ज्ञानाचा उदेला ॥

गूढ सृष्टीचे कळाया; ध्यास ज्यांचे श्वास झाले
पीडितांचे दु:ख जाता; सौख्य ज्यांना लाभलेले
थोर या ज्ञानी जनांचा; वारसा आम्हां मिळाला
संपला अंधार आता, सूर्य ज्ञानाचा उदेला ॥

शंकर वैद्य व सतीश सोळांकूरकर

**क. 'वैज्ञानिक दृष्टिकोनामुळे अंधश्रद्धांचे निर्मूलन होते' या विधानाबाबत २००-२५० शब्दांत तुमचे विचार व्यक्त करा.**

## ४ संगीत व तंत्रज्ञान

*अत्याधुनिक वाद्ये आणि तंत्रज्ञानाचा वापर करून अवीट गोडीचे संगीत निर्माण करणारे सुप्रसिद्ध संगीतकार ए. आर. रहमान यांनी संगीत आणि तंत्रज्ञान यांतील नात्यासंबंधी मांडलेले विचार, त्यांच्याच शब्दांत...*



ए. आर. रहमान

तंत्रज्ञान हा माझ्यासाठी कमालीच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. माझ्या संगीतात असलेल्या 'तंत्रज्ञाना'च्या वापराबाबत अनेकदा मी टीकाही झेललेली आहे. संगीतकाराची उपजत प्रतिभा आणि त्याला असणारी तंत्रज्ञानाची साथ हा विषय तसा सोडवून सोपा करून मांडणे कठीणच! त्यातले काय शुद्ध? काय पवित्र?... आणि काय तंत्रज्ञानाने निर्माण केलेले? कृत्रिम? मानवी हस्तक्षेपाला जणू काही वावच नाही असे वातावरण निर्माण करणारे तंत्रज्ञान राक्षसी होऊन संगीताच्या पावित्र्याला, त्याच्या 'आत्म्या'ला गिळंकृत करू पाहते आहे का? संगीतकार म्हणून माझ्या सर्जनशीलतेच्या मानेवर बसण्याइतके ते शिरजोर झालेले आहे का?



- हे प्रश्न महत्त्वाचे आहेत!

तंत्रज्ञानाचा वापर करायचा, त्याच्या मदतीने स्वत:च्या निर्मितीचा दर्जा उंचावायचा आणि तरीही संगीताच्या 'प्राणा'ला धक्का पोहोचू द्यायचा नाही; हे सोपे नव्हे. हा अवघड तोल संभाळणे हे आज प्रत्येक संगीतकारापुढे असलेले आव्हान आहे. कोण कोणावर राज्य करणार? तंत्रज्ञान माझ्या प्रतिभेवर स्वार होणार की मी तंत्रज्ञानावर, हा अगदी लाखमोलाचा प्रश्न बनला आहे, पण त्यासाठी केवळ तंत्रज्ञानाकडे बोट दाखवून चालणार नाही. मला सुचलेले उत्तर काय आहे?

तर, पुढच्या पिढीला संगीतातील अनादी-अनंत शाश्वत काय आहे आणि सतत बदलणारे काय याची ओळख करून द्यायला हवी.

बिस्मिल्ला खांसाहेबांच्या सनईमधून येणारा चोख, शुद्ध आलाप वाजवण्याचे सामर्थ्य माझ्याजवळच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानात नाही हे मला पुढच्या पिढीला सांगत राहावे लागेल. त्यांना त्या दर्जाच्या कलाकारांची आणि त्यांच्या तुलनेत तंत्रज्ञानाच्या मर्यादांची नीट ओळख करून द्यावी लागेल. हे सगळे या पिढीला तिच्या भाषेत सांगावे लागेल. प्रश्न फक्त आक्रमणाचा नाही. अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे तो, जे शाश्वत आहे ते टिकवून ठेवण्याचा. मी संगीताला देणे लागतो ते हे...

शब्दांकन : वंदना अत्रे

**क. केवळ संगीतावरच नाही, तर तंत्रज्ञानाचे सर्वच सर्जनशील कलांवर आज आक्रमण झाले आहे, असे तुम्हाला वाटते का? तुमचे मत कारणांसहित स्पष्ट करा.**

**ख. 'तंत्रज्ञानामुळे कलेचा, त्यातून होणाऱ्या रसनिष्पत्तीचा दर्जा उंचावतो.' या विषयावर चर्चा करा. चर्चेसाठी समर्थन करणारे एक व विरोधी मत दर्शविणारे एक अशी दोन विधाने पुढे दिली आहेत. त्यांपैकी एक बाजू निवडून तुम्ही निवडलेल्या बाजूचे समर्थन करा.**

| समर्थन करणारे विधान | विरोध दर्शविणारे विधान |
|---|---|
| उत्तम ध्वनिक्षेपक यंत्रणेमुळे संगीत मैफलीत रसिक कलेचा संपूर्ण आस्वाद घेऊ शकतात. | संगीत मैफलीत कलाकार आणि रसिक यांच्यामध्ये तांत्रिक गोष्टी अडथळे निर्माण करतात. |

**५ पुढे काही भारतीय वैज्ञानिक आणि त्यांनी लावलेल्या शोधांसंबंधी शब्दसमूह दिले आहेत. चौकटीत दिलेल्या माहितीवरून प्रत्येक वैज्ञानिकावर एक छोटा उतारा तयार करा.**



**क. सत्येंद्रनाथ बोस** (१८९४-१९७४) – मूलकणांविषयी संख्याशास्त्रीय नियम – निरनिराळे मूलकणांचे समूह – वेगवेगळे संख्याशास्त्रीय नियम – नियमांचा प्रथम १९२४ मध्ये शोध – नियमाला नाव 'बोस आईनस्टाईन स्टॅटिस्टिक्स' (Bose Einstein Statistics) – बोस सन्मानार्थ संख्याशास्त्रीय नियम पाळणाऱ्या मूलकणांना 'बोसॉन' नाव.

**ख. मेघनाद साहा** (१८९३-१९५६) – भारतात खगोलविज्ञान संशोधनाचा पाया – खगोलभौतिक वैज्ञानिक - प्रकाशदाबयंत्राचा शोध – अणुसिद्धांताची मदत घेत - सूर्याच्या वर्णपटलांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न – नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेस स्थापनेसाठी प्रयत्न कारणीभूत





**ग. बीरबल साहनी** (१८९१-१९४९) - – अतिप्राचीन वनस्पतींवर संशोधन - अतिप्राचीन काळातील वनस्पतींचे अश्मीभूत अवशेष – त्यावरून अभ्यास – जिम्नोस्पर्म (अनावृत्तबीजी) वनस्पती जीवाश्म संशोधन – भारतातील गोंडवन कालखंडातील नवीन वनस्पतींचा शोध

**घ. होमी भाभा** (१९०९-१९६६) भारतीय अणुसंशोधन कार्यक्रम जनक – 'शांततेसाठी अणू' संकल्पना पुरस्कार – भारताचे अणू धोरण – महत्त्वाची भूमिका - १९५६ 'अप्सरा' ही पहिली अणुभट्टी – उभारणी प्रयत्न





**च. चंद्रशेखर व्यंकटरामन अर्थात सी. व्ही. रामन** (१८८८-१९७०) – 'नोबेल' पारितोषिक विजेते पहिले आशियाई शास्त्रज्ञ - प्रकाशविषयक संशोधन – 'पारदर्शक पदार्थातून जाताना प्रकाशाचं प्रकीर्णन होतं' हे सिद्ध – 'रामन इफेक्ट' – १९३० मध्ये नोबेल – लेझर किरणांच्या शोधानंतर 'रामन इफेक्ट' अत्यंत मोलाचा

## ६ गणित

गणिताविषयी मला नेहमीच खूप आश्चर्य वाटत आलं आहे. कुठल्या गोष्टीत गणित सापडेल ते तर काही सांगताच येत नाही. आपण बुटासाठी वापरणाऱ्या लेसची किंवा पायजम्याच्या नाडीची गाठ मारतो. यात काय गणित असणार असा विचार आपल्या डोक्यात येईल. पण गणितज्ञांनी त्यातही गणित शोधलं आणि 'थिअरी ऑफ नॉट्स' जन्माला आली. त्याचा उपयोग कित्येक दशकांनंतर डीएनएच्या मॉलिक्यूलची किंवा क्वांटम मेकॅनिक्सची किंवा स्ट्रिंग थिअरीची गणितं सोडवण्यासाठी झाला. ओरिगामीचंही तसंच. माझा मित्र अनिल अवचट बघता बघता साधा कागद घेऊन त्यातून कितीतरी पक्षी, प्राणी आणि वेगवेगळ्या चित्रविचित्र पण आकर्षक अशा वस्तू तयार करतो. माझा दुसरा मित्र रवी केसकर तर ओरिगामीचा वापर करून मुलांना चक्क गणित शिकवतो! या ओरिगामीमध्ये कसलं आलंय गणित असंच आपल्याला वाटेल.



पण त्यातही खूप गणित दडलंय. मुळात जपानमध्ये ओरिगामी ही एक प्रथा होती. जपानी शेतकरी देवाला जेव्हा काही अर्पण करत असत तेव्हा ते साध्या सपाट कागदावर करण्याऐवजी कागदाला वेगवेगळ्या घड्या करून अर्पण करत असत. त्यातूनच ओरिगामीचा जन्म झाला. जपानमध्ये हा प्रकार प्रचंड लोकप्रिय आहे. आज पाश्चात्य जगतातही ओरिगामीचे उत्तमोत्तम निर्मिक आहेत. त्यांची अनेक पुस्तकं उपलब्ध आहेत. पण सगळ्यांचा बाप म्हणजे अकिरा योशिझावा. एका आयुष्यात हजारो कलाकृतींची निर्मिती त्यांनी केली. काही साध्यासुध्या तर काही कमालीच्या गुंतागुंतीच्या. त्यांनी ओरिगामी कुठल्याकुठे नेऊन ठेवली. आधी ती घरोघरी पक्ष्यांची माळ किंवा बेडूक तयार करण्याइतपत मर्यादित होती. तिच्या केवढ्या शक्यता योशिझावांनी दाखवल्या. ओरिगामीचा उगम जरी जपानमध्ये झाला असला, तरी इतरही देशांत ही कला किंवा त्याचं गणित स्वतंत्रपणे विकसित झालं. १९व्या शतकात युरोपमध्ये फ्रेडरिख फ्रॉबेल ह्याने ओरिगामीचा प्रसार केला. तो ओरिगामी वापरून मुलांना गणित शिकवे. १९०१ साली टी॰ सुंदरराव नावाच्या भारतीय गणितज्ञानं 'जॉमेट्रिक एक्सरसाईजेस इन पेपर फोल्डिंग' नावाचं एक पुस्तक लिहिलं. १९३६ साली मार्गारिटा बेलॉख या इटालियन गणितज्ञानं कुठल्याही लांबीचा कागद दिला, तरी तो एका विशिष्ट तऱ्हेनं घडी करून त्याच्या घनमुळाएवढ्या लांबीचा कागद आपल्याला बनवता येतो हे दाखवून दिलं. त्या वेळी त्यांच्या लक्षात आलं नसेल, पण कुठल्याही घनाच्या दुप्पट आकाराचा घन (क्यूब) बनवणं आणि कुठल्याही कोनाचे तीन समान भाग करणं हे ग्रीकांच्या वेळेपासून चालत आलेले गणिती कूट प्रश्न ओरिगामीच्या साहाय्यानं सोडवायला त्यांनी मदत केली होती. याची गणिती सिद्धता १९८० साली एका जपानी गणितज्ञानं आणि १९८६ साली एका अमेरिकन गणितज्ञानं दिली. युक्लिडनं फक्त पट्टी आणि कंपास वापरून भूमिती शिकवली होती. या जुनाट पद्धतीतून ओरिगामीनं भूमितीला मुक्त केलं. आज तर ओरिगामीचं गणित खूपच विकसित झालंय. [...]



आज गणित समाजशास्त्रातही शिरलंय. यासाठी 'जर्नल ऑफ मॅथेमॅटिकल सोशिऑलॉजी' या नावाचं एक नियतकालिकही निघतं.

सामाजिक रचना आणि संघटना यांच्यातले संबंध, जनमताविषयीची भाकितं किंवा समाजातल्या अनेक घटकांमधल्या आंतरक्रिया गणिती पद्धतीनं समजावून घेण्याकरता जी प्रारूपं बनवण्यात येतात, त्यात वापरलेल्या गणिताविषयीचे लेख या नियतकालिकात येतात. याचप्रमाणे भाषाशास्त्रातसुद्धा आज गणित शिरलंय. आज भाषेचा अभ्यास खूप महत्त्वाचा मानला जातो. त्यात कॉग्निटिव्ह मानसशास्त्रज्ञ, लॉजिशियन आणि कृत्रिम बुद्धिमत्तेतले तज्ज्ञ हे सगळे मोठ्या प्रमाणावर संशोधन करत आहेत आणि त्यासाठी ते गणित वापरतात.

गणिताचा आणि आपल्या जगाचा संबंध यावर दोन वेगवेगळी मतं आहेत. एका मताप्रमाणे या दोन्हींचा एकमेकांशी काहीही संबंध नाही. दुसऱ्या मताप्रमाणे त्यांचा घनिष्ठ संबंध आहे. यातला आत्तापर्यंत आपण चर्चिला तो प्रश्न गणिताच्या या जगातल्या उपयुक्ततेविषयी आहे. पण या संदर्भातला आणखी एक महत्त्वाचा तात्त्विक प्रश्न हा गणिताच्या निर्मितीप्रक्रियेशी निगडित आहे तो म्हणजे, गणित हे मानवी मनापासून संपूर्णपणे स्वतंत्र असतं का? म्हणजे थोडक्यात, माणूस आणि माणसाचं मन जरी नसतं, तरी गणित अस्तित्वात असतं का? म्हणजेच जसं ग्रह-ताऱ्यांचं अस्तित्व हे आपल्या मनावर अवलंबून नाही, तर आपण असलो-नसलो तरी ग्रह-तारे स्वतंत्रपणे या विश्वात असतात. आपण फक्त त्यांना शोधतो, तसंच गणित हे या विश्वात कुठेतरी दडलेलं असतंच आणि आपण फक्त ते शोधतो (डिस्कवर), असं असतं का? की आपण ते निर्माण करतो (इन्व्हेंट)? जर आपण अस्तित्वात असलेलं गणित फक्त शोधून काढत असलो, तर काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात. याचं कारण, जर गणित असंच कुठल्यातरी परीकथेतल्या विश्वात आपल्याशिवाय, आपल्या जगापेक्षा पूर्णपणे स्वतंत्र वावरत असेल, तर त्याच गणितामुळे या जगाचं आणि त्यातल्या नियमांचं स्पष्टीकरण आपल्याला कसं देता येतं? आणि जर गणिताचा या जगाची काहीच संबंध नसेल, तो फक्त आपल्या मनाचा एक तर्कशुद्ध खेळ असेल, तर या जगाचं स्पष्टीकरण ज्याच्या मदतीनं मिळेल असं गणित माणसाच्या मनानं शोधलं तरी कसं?

अच्युत गोडबोले


**क. वरील उताऱ्याचा सारांश सुमारे १० ओळींत लिहा.**

**ख. गणित हे मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे, असे तुम्हाला वाटते का? तुमच्या मताची कारणमीमांसा करा. तुमच्या सहाध्यायींबरोबर चर्चा करा. उदाहरणे द्या.**

**ग. '... त्यांनी ओरिगामी कुठल्याकुठे नेऊन ठेवली', '... त्यात गणित खूप खोलवर गेलंय' या वाक्यरचना वरील उताऱ्यात आल्या आहेत. स्थल व अंतराशी जोडलेले असे आणखी काही वाक्प्रचार / म्हणी तुम्हाला सांगता येतील? त्यांचा स्वत:च्या वाक्यात उपयोग करा.**

उदा. : उंचीवर नेऊन ठेवणे

पंडितजींनी आपल्या गायनाने संगीतकलेला फार मोठ्या उंचीवर नेऊन ठेवले.



(उदाहरणादाखल काही वाक्प्रचार व म्हणी : सातासमुद्रापार असणे, तळ गाठणे, मुळाशी जाणे, आकाशाला गवसणी घालणे, रसातळाला जाणे, सुतावरून स्वर्ग गाठणे, लंकेत सोन्याच्या विटा, दुरून डोंगर साजरे, काखेत कळसा गावाला वळसा, सरड्याची धाव कुंपणापर्यंत)


श्रीनिवास रामानुजन

**घ. प्रख्यात भारतीय गणिती श्रीनिवास रामानुजन यांच्याविषयी आंतरजालावरून अधिक माहिती मिळवा.**

**च. कंसात दिलेल्या सूचनेप्रमाणे बदल करा.**

अ. कुठल्या गोष्टीत गणित सापडेल ते तर काही सांगताच येत नाही. (अर्थ तोच ठेवून होकारार्थी करा.)

आ. या ओरिगामीमध्ये कसलं आलंय गणित असंच आपल्याला वाटेल. (अर्थ तोच ठेवून नकारार्थी करा.)

इ. जर आपण अस्तित्वात असलेलं गणित फक्त शोधून काढत असलो, तर काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात. (जर, तर काढून वाक्य तयार करा)

**छ. पुढील विधाने चूक की बरोबर सांगा.**

अ. ओरिगामी हा चित्रांचा प्रकार आहे.

आ. ओरिगामीच्या मदतीने गणितातील अवघड संकल्पना सोडवता आल्या.

इ. भाषाशास्त्र आणि गणित यांचा एकमेकांशी काही संबंध नाही.

ई. विज्ञानशिक्षणाचे गणित हे एक महत्त्वाचे अंग आहे.

## ७ डॉ. कमला सोहोनी


डॉ. कमला सोहोनी

गोष्ट आहे १९३४मधली. बंगलोरच्या 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स'च्या संचालकांच्या कार्यालयात, संचालकांसमोर एक तरुण मुलगी उभी होती. संचालकांना तिने प्रश्न विचारला होता, 'मी राहायचे की जायचे?' संचालकांच्या खुर्चीवर बसले होते प्रसिद्ध वैज्ञानिक नोबेल पारितोषिक विजेते सर सी. व्ही. रामन. आधीच्याच वर्षी, १९३३मध्ये केमिस्ट्री विषय घेऊन पहिल्या वर्गात बी.एस्सी. झालेली मुंबईची ही मुलगी शास्त्रीय संशोधनासाठी प्रवेश घ्यायला या संस्थेत आली होती. अन्यथा प्रवेशासाठी पूर्णपणे पात्र असूनही केवळ मुलगी म्हणून तिला प्रवेश नाकारण्यात आला होता. यावर तिने रामन यांची भेट घेऊन, 'आपण माझ्यावर अन्याय करत आहात. मी येथे आले ती परत जाण्यासाठी नाही.' असे सांगितले होते. रामन यांनी नाखुशीनेच केवळ एका वर्षासाठी तिला प्रवेश दिला होता. प्रा. श्रीनिवास यांच्या हाताखाली बायोकेमिस्ट्री विभागात पहाटे पाच ते रात्री दहा असे झपाटल्यासारखे काम करून तिने वर्षभरात स्वतःला सिद्ध केले होते, आणि आता ती रामनना उपरोक्त प्रश्न विचारत होती. मुलीचे नाव कमल भागवत. रामन यांनी तिच्या पाठीवर शाबासकीची थाप मारली आणि ते म्हणाले, "तुझी निष्ठा आणि चिकाटी पाहून असे वाटते की, या संस्थेत फक्त मुलींनाच प्रवेश द्यावा." अर्थात, पुढे याच संस्थेतून १९३७मध्ये तिने एम.एस्सी. पूर्ण केले.

नंतर मुंबई विद्यापीठाच्या दोन शिष्यवृत्या मिळवून कमलाबाई पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला गेल्या. केंब्रिज विश्वविद्यालयातील 'सर विल्यम डन लॅबोरेटरी' या जगप्रसिद्ध प्रयोगशाळेत त्यांनी प्रवेश घेतला. [...] तिथे दोन वर्षांत कमलाबाईंनी मूलभूत स्वरूपाचे संशोधन केले. प्राणिमात्रांप्रमाणेच वनस्पती साऱ्या जीवनक्रिया 'सायटोक्रोन-सी'मार्फत निरनिराळ्या एन्झाईम्स यंत्रणेद्वारे पूर्ण करतात, अशा आशयाचे त्यांचे संशोधन होते. [...] डॉक्टरेट मिळाल्यावर त्यांनी नोबेल पारितोषिक विजेते डॉ. चंद्रशेखर सुब्रह्मण्यम यांची भेट घेतली. त्यांनी बाईंना अमेरिकेत किंवा इंग्लंडमध्ये स्थायिक होण्याचा सल्ला दिला. परंतु तो न मानता राष्ट्रप्रेमामुळे त्यांनी भारतात परतण्याचे ठरवले. दिल्लीला लेडी होर्डिंग्ज मेडिकल कॉलेजमधील बायोकेमिस्ट्री विषयात एक रिकामी जागा त्यांची वाट पाहत होती. १९३९च्या सप्टेंबरमध्ये कमलाबाई या जागेवर रुजू झाल्या.

भागवत हे कमलाबाईंचे माहेरचे आडनाव. त्यांचे घराणे मूळचे पंढरपूरचे. घराण्याला श्रीमंतीबरोबरच विद्येचा वारसा होता. त्यांची आजी ही त्या काळात मॅट्रिक झालेली होती. कमलाबाईंचा जन्म १८ जुलै १९११ रोजी झाला. [...] कमलाबाईंचे वडीलही संशोधक होते. तेही बंगलोरच्या 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स'चे विद्यार्थी होते. कमलाबाईंना दोन बहिणी — मोठी दुर्गा आणि धाकटी विमल. विद्वत्ता, व्यासंग, संशोधन, लेखन अशा बहुविध क्षेत्रांत ठसा उमटवणाऱ्या दुर्गाबाई भागवत यांचे नाव महाराष्ट्रात सर्वांनाच परिचयाचे आहे. विमलाबाई कवयित्री, गायिका, चित्रकार होत्या. धाकटा भाऊ राजाराम डॉक्टर झाला. ही सारीच भावंडे अभ्यासाप्रमाणेच खेळातही निपुण होती. कमलाबाई स्वतः उत्तम टेनिस खेळत. अनेक प्रतिष्ठित सामन्यांमध्ये त्यांनी बक्षिसे मिळवली होती. लेडी होर्डिंग्ज मेडिकल कॉलेजमध्ये दोन वर्षे नोकरी केल्यानंतर कमलाबाई कुन्नूरला गेल्या. कुन्नूरच्या 'न्यूट्रिशन रिसर्च लॅब'मध्ये त्यांनी काही काळ संशोधन केले. इथेच त्यांचे लग्न एम. व्ही. सोहोनी यांच्याशी झाले व कमल भागवतच्या कमल सोहोनी होऊन त्या मुंबईत आल्या. मुंबईत त्यांनी 'इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स'मध्ये अध्यापनाचे आणि संशोधनाचे काम सुरू केले. १९६९मध्ये संस्थेच्या संचालक पदावर असताना वयाच्या ५८व्या वर्षी त्या सेवानिवृत्त झाल्या.

१९३४ ते १९६९ या काळात त्यांनी रोजच्या खाण्यातील पदार्थांवर – उदा. दूध, कडधान्ये तृणधान्ये, नीरा* इत्यादी – बरेच संशोधन केले व १५०हून अधिक शोधनिबंध लिहिले. [...] नीरा संशोधनाबद्दल त्यांना सर्वोत्कृष्ट संशोधनाबद्दलचे राष्ट्रपती पारितोषिक मिळाले. कमलाबाईंचे शोधनिबंध भारतातील व परदेशातील शास्त्रीय नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झाले. कडधान्यावरील त्यांच्या कामाला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली आणि त्या पोषण (न्यूट्रिशन) या विषयातील आद्य प्रवर्तक मानल्या जाऊ लागल्या. भारतातील पहिल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या महिला शास्त्रज्ञ ठरल्या. [...]



१९६९ साली बाई जरी नोकरीतून निवृत्त झाल्या, तरी संशोधनातून निवृत्त झाल्या नाहीत. घराचे स्वयंपाकघर हीच त्यांनी प्रयोगशाळा केली. स्वयंपाकघरातील वस्तू वापरण्याच्या चुकीच्या पद्धती, अन्न

शिजवण्याच्या व बनवण्याच्या पद्धतीतून होणारी पोषक घटकांची हानी, साधे साधे बदल करून अन्नातील पोषक घटक वाढवण्याचे मार्ग इत्यादी नाना विषयांवर चिकित्सक, अभ्यासपूर्ण लिखाण कमलाबाई करू लागल्या व त्यांचे हे लिखाण नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध होऊ लागले. [...] अन्नपदार्थांतील भेसळ ही एक मोठी समस्या आहे. त्याविरुद्ध कायदा असूनही भेसळ सुरूच असते व त्याचे कारण आहे ग्राहकांचे अज्ञान! निवृत्त झाल्यावर बाईंनी ग्राहक मार्गदर्शन संस्थेमध्ये काम सुरू केले. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, स्त्रीसंघटना व संस्था, रोटरी क्लब, लायन्स क्लब यांच्याकडे जाऊन त्यांनी अनेक व्याख्याने दिली. भेसळ कशी ओळखावी याची प्रात्यक्षिके दाखवली. अन्नातील भेसळ ओळखण्यासाठी बाईंनी एक छोटी शोधसाहित्यपेटी (किट) तयार केली होती व ती वापरण्यासंबंधीची ग्रामसेवकांची शिबिरेही घेतली होती.

अखेरपर्यंत त्या कार्यमग्न राहिल्या. १९९८ साली 'इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च' या संस्थेतर्फे दिल्ली येथे एका विशेष कार्यक्रमात त्यांच्या आयुष्यभराच्या कार्यासाठी त्यांना गौरवण्यात आले आणि त्याच समारंभात वयाच्या ८६व्या वर्षी त्यांचे दुर्दैवी निधन झाले.

जवळजवळ ३१ वर्षे केलेली विविध संस्थांमधील सेवा, साठ वर्षांपेक्षा अधिक काळ कष्टपूर्वक केलेले महत्त्वपूर्ण संशोधन आणि समाजकार्य ह्याबरोबरच अनेक संस्थांच्या उभारणीत बाईंचा मोलाचा वाटा आहे. अशा या संपन्न व्यक्तिमत्त्वाच्या भारतकन्येचे चरित्र भारतातील स्त्रीवर्गाला खचितच प्रेरणा देत राहील.

अरविंद वैद्य

**शब्दार्थ**

नीरा – भारतात चार तऱ्हेचे माड आहेत. नारळ, ताडगोळा, खजूर आणि सॅगो. यांच्या रसात साखर असते. म्हणूनच त्यांच्यातून निघणाऱ्या रसाची चव मधुर असते. या रसालाच 'नीरा' म्हणतात. या उपरोक्त माडांच्या खोडात वरच्या बाजूला खाच करून मडक्यात नीरा गोळा करतात.

**क. थोडक्यात उत्तरे लिहा.**

अ. संशोधन क्षेत्रातील कमलाबाईंचे योगदान तुमच्या शब्दांत लिहा.

आ. कमलाबाईंच्या माहेरचे वातावरण कसे होते?

इ. कमलाबाईंनी आपल्या ज्ञानाचा समाजासाठी कसा उपयोग केला?

**ख. पुढीलपैकी योग्य पर्याय ओळखा.**

अ. बंगलोरच्या 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स'च्या संचालकांच्या कार्यालयात कमल भागवत कशासाठी आल्या होत्या?

एक. आपल्या मुलीच्या प्रवेशासाठी

दोन. नोकरी मिळावी यासाठी

तीन. शास्त्रीय संशोधन करण्याकरिता प्रवेश घेण्यासाठी

आ. भागवत घराण्याला श्रीमंतीबरोबरच विद्येचा वारसा होता याचा अर्थ -

एक. श्रीमंती व सुखसमृद्धी होती.

दोन. श्रीमंती व समाधानी वृत्ती होती.

तीन. श्रीमंती व शिक्षणाची परंपरा होती.

इ. कमलाबाईंच्या संशोधनाचे मुख्य विषय कोणते होते?
एक. अवकाशातील ग्रहतारे
दोन. अन्नधान्य व पोषण
तीन. वैद्यकीय सुविधा

ई. अन्नपदार्थातील भेसळ म्हणजे
एक. त्यात नको ते इतर पदार्थ मिसळणे.
दोन. विविध कडधान्ये एकत्र करणे.
तीन. अन्नपदार्थ अधिक पोषक बनवणे.

उ. वर्षभर झपाटल्यासारखे काम करून तिने वर्षभरात स्वतःला सिद्ध केले, याचा अर्थ -
एक. वर्षभर झपाटल्यासारखे काम करून तिने वर्षभरात तिची प्रवेशाची पात्रता असल्याचे दाखवले.
दोन. वर्षभर झपाटल्यासारखे काम करून तिने वर्षभरात नोकरी मिळविली.
तीन. वर्षभर झपाटल्यासारखे काम करून तिने वर्षभरात पदवी मिळविली.

**ग. कंसात दिलेले शब्द वापरून आवश्यक ते इतर बदल करून वाक्य पुन्हा लिहा.**

उदा॰ अशा या संपन्न व्यक्तिमत्त्वाच्या भारतकन्येचे चरित्र भारतातील स्त्रीवर्गाला खचितच प्रेरणा देत राहील. ('निश्चितच' वापरा)

उत्तर अशा या संपन्न व्यक्तिमत्त्वाच्या भारतकन्येचे चरित्र भारतातील स्त्रीवर्गाला **निश्चितच** प्रेरणा देत राहील.

अ. रामन यांनी नाखुशीनेच तिला एका वर्षासाठी प्रवेश दिला होता. ('खुशीने' वापरा)

आ. अमेरिकेत किंवा इंग्लंडमध्ये स्थायिक होण्याचा सल्ला न मानता राष्ट्रप्रेमामुळे त्यांनी भारतात परतण्याचे ठरवले. ('मानला' वापरा)

इ. १९६९ साली बाई जरी नोकरीतून निवृत्त झाल्या, तरी संशोधनातून निवृत्त झाल्या नाहीत. ('चालू ठेवले' वापरा)

ई. अन्नपदार्थांतील भेसळ ही एक मोठी समस्या आहे आणि त्याचे कारण आहे ग्राहकांचे या विषयांतले अज्ञान. ('ज्ञान' वापरा)

ए. प्रवेशासाठी पूर्णपणे पात्र असूनही केवळ मुलगी आहे म्हणून तिला प्रवेश नाकारण्यात आला होता. ('देण्यात' वापरा.)

**घ. सुमारे पाऊणशे वर्षांपूर्वी कमला सोहोनी यांना स्त्री असल्यामुळे एका प्रख्यात विज्ञान संस्थेत सुरुवातीला प्रवेश नाकारण्यात आला होता. आज एकविसाव्या शतकात स्त्रिया अनेक क्षेत्रांत समर्थपणे पाय रोवून उभ्या असलेल्या दिसतात. तरीसुद्धा आजही स्त्रियांना स्वतःला सिद्ध करण्यासाठी तुलनेने अधिक परिश्रम करावे लागतात, असे तुम्हाला वाटते का? उत्तर होकारार्थी असल्यास हे चित्र बदलण्यासाठी काय करावे लागेल असे तुम्हाला वाटते? या विषयावर लहान गटात चर्चा करा. तुमचे मत सांगून कारणमीमांसा करा. उदाहरणे द्या. तुमच्या गटातील चर्चेचा सारांश वर्गात सादर करा.**

आपल्या आहारात पालेभाज्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर करावा. [...] असे विशेष पालेभाज्यांत आहे तरी काय? पालेभाज्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्यात काही लवणे व काही जीवनसत्त्वे फार मोठ्या प्रमाणावर असतात. ही दोन्ही एकाच पदार्थात मिळणे हा मोठा भाग्याचा योगायोग आहे आणि हीच निसर्गाची माणसाला मिळालेली बहुमोल देणगी आहे. पालेभाज्यांत विशेषतः चुना (कॅल्शियम), स्फुर (फॉस्फरस), लोह, जीवनसत्त्वे- अ, क, रिबोफ्लेव्हिन आणि फोलिक ॲसिड फार मोठ्या प्रमाणावर आढळतात व यांचे प्रमाण पालेभाज्यांत फळे, फळभाज्या किंवा कांद्यापेक्षा कितीतरी पटींनी जास्त असते. आहारशास्त्रात फळे व पालेभाज्यांना फार मोठे स्थान आहे ते याच कारणास्तव! त्यांना रक्षक अन्न (प्रोटेक्टिव्ह फूड्स) असे समजतात.

डॉ. कमला सोहोनी

## ८ ज्येष्ठ शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर यांच्यावरील दृश्यफीत पाहा.

**क. या दृश्यफितीवर आधारित वाक्यांमध्ये योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.**

अ. डॉ. माशेलकरांचा जन्म ------------- मध्ये झाला.
(एक) १९४३ (दोन) १९४६ (तीन) १९४२

आ. ------------- यासाठी डॉ. माशेलकर मुंबईत आले.
(एक) उच्च शिक्षण घ्यावे (दोन) पैसे कमवावे
(तीन) चांगले शिक्षण घेता यावे

इ. लहानपणी डॉ. माशेलकर यांची आर्थिक परिस्थिती ------------- होती.
(एक) उत्तम (दोन) मध्यम (तीन) हलाखीची

ई. डॉ. माशेलकर यांचे प्रेरणास्थान म्हणजे -------------.
(एक) आई (दोन) वडील (तीन) शिक्षक

उ. डॉ. माशेलकर ------------- शाळेत शिकले.
(एक) कॉन्व्हेन्ट (दोन) पालिका (तीन) खासगी


डॉ. माशेलकर

## ९ बौद्धिक संपदा

बौद्धिक संपदा वेगवेगळ्या प्रकारच्या असतात आणि त्या प्रत्येकीचे संरक्षण करणारे वेगवेगळे कायदे असतात. कुठल्याही कलाकृतीवरचा बौद्धिक संपदा हक्क म्हणजे कॉपीराइट. यात साहित्य, चित्रकला, शिल्पकला, संगीत, नृत्य, नाट्य आणि चलचित्र यांचा समावेश होतो. एवढेच नाही, तर संगणकाच्या सॉफ्टवेअर्सवरसुद्धा कॉपीराइटच दिला जातो. एखाद्या उत्पादनाचे किंवा सेवेचे चिन्ह, त्याचे बोधवाक्य, त्या उत्पादनाचे नाव हीसुद्धा एक बौद्धिक संपदा आहे आणि त्यावर दिला जातो तो ट्रेडमार्क. उदा॰ मर्सिडीजचा स्टार. [...]

कुठल्याही क्षेत्रातील नवा शोध – मग ते उत्पादन असेल किंवा प्रक्रिया – त्यावर दिले जाते ते पेटंट. पण हे संशोधन निव्वळ वैज्ञानिक संशोधन नको, तर त्याचा काही तरी औद्योगिक उपयोग असला पाहिजे. म्हणून न्यूटनचा सिद्धांत किंवा आईनस्टाईनचा सिद्धांत यांना, ते कितीही महान शोध असले तरी पेटंट मिळू शकत नाही, कारण त्यांची थेट औद्योगिक उपयुक्तता नाही. वेगवेगळी औषधे, मोबाइल फोन्स, कार आणि इतर वाहनांतले छोटे छोटे भाग या सगळ्यांवर पेटंट दिली जातात. [...] औद्योगिक वापरासाठी असलेला एखाद्या वस्तूमधला एखादा कलापूर्ण भाग – उदा॰ कारचा आकार, कपड्यांवरचे डिझाइन – यांना 'इंडस्ट्रीयल डिझाइन' या बौद्धिक संपदेच्या प्रकाराने संरक्षण देता येते. [...] भौगोलिक निर्देशांक (geographical indicator) हा बौद्धिक संपदेचा आणखी एक प्रकार. समृद्ध परंपरा आणि संस्कृती असलेल्या भारतासारख्या प्रत्येक देशासाठी अतिशय महत्त्वाचा. एखाद्या उत्पादनाचा दर्जा, ते जिथे बनवले गेले त्या भौगोलिक प्रदेशातील पीक, पाणी, हवामान किंवा तिथल्या कारागिरांचे विशिष्ट कौशल्य यावर अवलंबून असेल, तर तीही त्या त्या प्रदेशातील सर्वांची बौद्धिक संपदा ठरते आणि तिला संरक्षण दिले जाते ते भौगोलिक निर्देशांक म्हणून. [...]

पेटंट मिळायचे तीन निकष असतात. संशोधनाचे नावीन्य, असाधारणता आणि औद्योगिक उपयोग. आता नावीन्य म्हणजे काय, तर ते संशोधन त्याआधी जगात कुणालाही माहीत असता कामा नये. आणि ते कुणाला कसं माहीत असू शकतं? तर त्यावर आधीच पेटंट मिळालेलं असू शकतं किंवा शोधनिबंध लिहिले गेलेले असतात. एखाद्या पुस्तकात किंवा लेखात त्याचा उल्लेख असतो, किंवा मग ते कुणी तरी कुणाला तरी तोंडी सांगितलेलं असतं. ते बाजारात विकायला आलेलं असतं. किंवा मग ते दुसऱ्या कुठल्यातरी पद्धतीनं लोकांना आधीपासून माहिती असतं. आता दुसऱ्या कुठल्यातरी पद्धतीनं म्हणजे नक्की काय? तर 'जखम झाली की हळद लावावी', असं भारतात पिढ्यान्‌पिढ्या सगळ्यांना ठाऊक होतं. म्हणजे तो आपल्याकडे परंपरेनं चालत आलेला ज्ञानाचा ठेवा होता. म्हणूनच जगातल्या कुठल्याही देशाच्या अशा परंपरागत ज्ञानावर त्या देशात किंवा इतर कुठल्याही देशात कुणाही एका व्यक्तीला म्हणूनच पेटंट घेता येत नाही. कारण तसं ते दिलं, की ते एका व्यक्तीच्या मालकीचं होणार आणि दुसऱ्या कुणालाही ते वापरता नाही येणार. असं होऊ नये, म्हणून यावर कुठल्याही देशात पेटंट मिळत नाही. प्रत्येक देशाच्या पेटंट कायद्यात कलमच असतं तसं. [...]




१९९५मध्ये अमेरिकेतल्या मिसिसिपी विद्यापीठातल्या दोन संशोधकांना हळदीच्या जखम बरी करण्याच्या गुणधर्मावर अमेरिकेत पेटंट मिळालं! त्याच वर्षात डॉ॰ रघुनाथ माशेलकर दिल्लीमध्ये

सीएसआयआरचे (CSIR = वैज्ञानिक आणि औद्योगिक अनुसंधान परिषद) संचालक म्हणून रुजू झाले होते. त्यांनी वृत्तपत्रात अमेरिकेत हळदीच्या जखम बरी करण्याच्या गुणधर्मावर पेटंट दिलं गेल्याचं वाचलं आणि ते चक्रावूनच गेले. भारताच्या या पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या संचितावर कुणी मक्तेदारी कशी मिळवू शकतं, असा त्यांना प्रश्न पडला. त्यांनी हळदीच्या या पेटंटच्या विरोधात लढा द्यायचं ठरवलं आणि सीएसआयआरमधले शास्त्रज्ञ कामाला लागले. त्यासाठी हळदीचा हा गुणधर्म भारतातल्या लोकांना हे पेटंट फाइल (file) होण्याआधीपासून ठाऊक होता, हे सिद्ध करणं गरजेचं होतं. सीएसआयआरने असे ३२ संदर्भ शोधून काढले. हे संस्कृत, उर्दू आणि हिंदीमधले होते. यातील काही तर शंभर वर्षांपेक्षा जुने होते. त्यामुळे १९९८ साली हे पेटंट अमेरिकन पेटंट ऑफिसनं नाकारलं. एखाद्या विकसनशील देशाच्या पारंपरिक ज्ञानाला मान्यता देण्याच्या बाबतीत हळदीवरील पेटंटची केस हा एक मैलाचा दगड ठरला.

मृदुला बेळे

**क. बौद्धिक संपदा आणि पेटंटविषयी आणखी माहिती आंतरजालावरून मिळवा. पेटंट घेणे महत्त्वाचे आहे, असे तुम्हाला वाटते का? तुम्हाला कोणती पेटंट माहीत आहेत? तुमच्या सहाध्यायींबरोबर चर्चा करा.**

**ख. उद्योग, अर्थव्यवस्था आणि बौद्धिक संपदा हक्क यांचा एकमेकांशी असलेला संबंध उदाहरणे देऊन स्पष्ट करा.**


**ग. अ. पुढीलपैकी कोणत्या शब्दांचा अर्थ 'प्रत्येक' हा शब्द वापरून होणाऱ्या अर्थाप्रमाणे होतो ते ओळखा.** उदा॰ **पिढ्यान्‌पिढ्या = प्रत्येक पिढीत**

गल्लोगल्ली, रस्तोरस्ती, पदोपदी, देशोदेशी, वर्षानुवर्षे, कानोकानी, हातोहात, रातोरात, दारोदार, पाठोपाठ, लगोलग, काठोकाठ, घरोघरी, जागोजागी, वेळोवेळी, मैलोन्‌मैल, शतकानुशतके, गतानुगतिक, पावलोपावली, मनोमनी / मनोमन, दिवसेंदिवस, तासन्‌तास , मनामनांत, धावाधाव, मागोमाग, वारंवार, भारंभार, वरचेवर, क्षणोक्षणी, गारेगार, बनवाबनवी

**आ. उर्वरित शब्द व त्यांचा अर्थ यांच्या जोड्या जुळवा.**

| **उर्वरित शब्द** | **शब्दांचे अर्थ** |
|---|---|
| एक. कानोकानी | क. एका रात्रीत |
| दोन. हातोहात | ख. लबाडी, फसवणूक |
| तीन. रातोरात | ग. गडबडीत एखादी गोष्ट करणे |
| चार. पाठोपाठ | घ. मनातल्या मनात |
| पाच. लगोलग | च. थंड |
| सहा. काठोकाठ | छ. एकाकडून दुसऱ्याकडे माहिती जाणे |
| सात. गतानुगतिक | ज. परत परत |
| आठ. मनोमनी / मनोमन | झ. त्वरित |
| नऊ. धावाधाव | ट. पुन्हा पुन्हा, अधिक वेळा |
| दहा. मागोमाग | ठ. विचार न करता कोणाच्यातरी मागे जाणे |
| अकरा. वारंवार | ड. संपूर्ण भरणे |

| | |
|---|---|
| बारा. भारंभार | ढ. एकानंतर दुसरा |
| तेरा. वरचेवर | त. चटकन |
| चौदा. गारेगार | थ. एकामागे दुसरा |
| पंधरा. बनवाबनवी | द. खूप |




## १० करा आणि शिका.

**क. रेडिओवरील / समाजमाध्यमांवरील रोजचे मराठी कार्यक्रम नियमित ऐका. त्यातून तुम्हाला विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयाशी संबंधित कोणती नवीन माहिती / दृष्टी मिळाली? त्यातील कोणत्याही दोन गोष्टींविषयी लिहून वर्गात सादरीकरण व चर्चा करा.**

**ख. ख्यातनाम शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी लिहिलेली 'प्रेषित' ही विज्ञानकादंबरी वाचा आणि पुस्तकपरीक्षण लिहून वर्गात सादर करा.**



डॉ. जयंत नारळीकर



## उत्तरसंच

१. **ख.** अ. दोन आ. तीन इ. एक

१. **ग.** अ. एक आ. दोन इ. दोन ई. तीन उ. तीन ऊ. दोन ए. दोन

१. **घ.** अ. माझी शाळा माझ्या घरापासून हाकेच्या अंतरावर होती. आ. आमच्या घरी दहा दिवस गणपती बसवायची प्रथा आहे. इ. टाळेबंदी कधी उठणार याची आम्हाला तिळमात्र कल्पना नव्हती. ई. हल्ली शहरांमध्ये आयुष्याची गती फार वाढली आहे. उ. साहित्याचा अनुवाद हा दोन संस्कृतींना जोडणारा सेतू असतो. ऊ. हल्लीच्या जगात राहूनही अनेकांचे विचार मागास असतात. ए. एकूणच हे सरते वर्ष जरा अडचणीचेच गेले.

२. **क.** अ. दोन आ. दोन इ. तीन ई. एक

५. क. सत्येंद्रनाथ बोस यांनी मूलकणांविषयी संख्याशास्त्रीय नियम मांडले. निरनिराळ्या मूलकणांच्या समूहाचे वेगवेगळे संख्याशास्त्रीय नियम असतात. ते नियम बोस यांनी १९२५ साली प्रथम शोधले. त्याला 'बोस आईनस्टाईन स्टॅटिस्टिक्स' असं नाव आहे. संख्याशास्त्रीय नियम पाळणाऱ्या मूलकणांना बोस यांच्या सन्मानार्थ 'बोसॉन' असं म्हटलं जातं. ख. मेघनाद साहा (१८९३-१९५६) यांनी भारतात खगोलविज्ञान संशोधनाचा पाया घातला. ते खगोलभौतिक वैज्ञानिक होते. त्यांनी प्रकाशदाबयंत्राचा शोध लावला. अणुसिद्धांताच्या मदतीने सूर्याच्या वर्णपटलांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रयत्नांमुळेच नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेसची स्थापना झाली. ग. बीरबल साहनी (१८९१-१९४९) यांनी अतिप्राचीन वनस्पतींवर संशोधन केले. अतिप्राचीन काळातील वनस्पतींचा त्यांच्या अश्मीभूत अवशेषावरून त्यांनी अभ्यास केला. जिम्नोस्पर्म (अनावृत्तबीजी) वनस्पतींच्या जीवाश्मांचे संशोधन करून भारतातील गोंडवन कालखंडातील नवीन वनस्पतींचा शोध त्यांनी लावला. घ. होमी भाभा (१९०९-१९६६) हे भारतीय अणुसंशोधन कार्यक्रमाचे जनक म्हणून ओळखले जातात. 'शांततेसाठी अणू' या संकल्पनेचा पुरस्कार करून भारताचे अणू धोरण तयार करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. १९५६ मध्ये 'अप्सरा' या पहिल्या अणुभट्टीची उभारणी त्यांच्या प्रयत्नांमुळे झाली. च. चंद्रशेखर व्यंकटरामन अर्थात सी॰ व्ही॰ रामन (१८८८-१९७०) हे 'नोबेल' पारितोषिक विजेते पहिले आशियाई शास्त्रज्ञ ठरले. त्यांनी प्रकाशविषयक संशोधन केले. 'पारदर्शक पदार्थातून जाताना प्रकाशाचं प्रकीर्णन होतं' हे त्यांनी आपल्या संशोधनातून सिद्ध केलं. त्याला 'रामन इफेक्ट' म्हणतात. या संशोधनासाठी त्यांना १९३०मध्ये नोबेल पारितोषिक देण्यात आलं. पुढे लेझर किरणांचा शोध लागल्यानंतर 'रामन इफेक्ट' संशोधनासाठी अत्यंत मोलाचा ठरला.

६. **च.** अ. कुठल्याही गोष्टीत गणित सापडू शकते. आ. आपल्याला वाटेल की या ओरिगामीमध्ये गणित नाही. इ. आपण अस्तित्वात असलेलं गणित फक्त शोधून काढत असल्यास काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात.

६. **छ.** अ. चूक आ. बरोबर इ. चूक ई. बरोबर

७. **ख.** अ. तीन आ. तीन इ. दोन ई. एक उ. एक

७. **ग.** अ. रामन यांनी तिला एका वर्षासाठी प्रवेश काही **खुशीने** दिला नव्हता. आ. राष्ट्रप्रेमामुळे अमेरिकेत किंवा इंग्लंडमध्ये स्थायिक होण्याचा सल्ला त्यांनी **मानला** नाही आणि भारतात परतण्याचे ठरवले. इ. १९६९ साली बाई जरी नोकरीतून निवृत्त झाल्या, तरी त्यांनी संशोधन **चालूच ठेवले.** ई. अन्नपदार्थांतील भेसळ ही एक मोठी समस्या आहे आणि त्याचे कारण आहे ग्राहकांना याविषयातले **ज्ञान** नसणे. उ. प्रवेशासाठी पूर्णपणे पात्र असूनही केवळ मुलगी आहे म्हणून तिला प्रवेश **देण्यात** आला नाही.

८. **क.** अ. एक आ. तीन इ. तीन ई. एक उ. दोन

९. **ग.** अ. गल्लोगल्ली, रस्तोरस्ती, पदोपदी, देशोदेशी, वर्षानुवर्षे, दारोदार, घरोघरी, जागोजागी, वेळोवेळी, मैलोन्‌मैल, शतकानुशतके, पावलोपावली, दिवसेंदिवस, तासन्‌तास, मनामनांत, क्षणोक्षणी

आ. (एक) कानोकानी : छ. एकाकडून दुसऱ्याकडे माहिती जाणे, (दोन) हातोहात : त. चटकन, (तीन) रातोरात : क. एका रात्रीत, (चार) पाठोपाठ : ढ. एकानंतर दुसरा, (पाच) लगोलग : झ. त्वरित, (सहा) काठोकाठ : ड. संपूर्ण भरणे, (सात) गतानुगतिक : ठ. विचार न करता कोणाच्या तरी मागे जाणे, (आठ) मनोमनी / मनोमन : घ. मनातल्या मनात, (नऊ) धावाधाव : ग. गडबडीत एखादी गोष्ट करणे, (दहा) मागोमाग : थ. एकामागे दुसरा, (अकरा) वारंवार : ज. परत परत, (बारा) भारंभार : द. खूप, (तेरा) वरचेवर : ट. पुन्हा पुन्हा, अधिक वेळा, (चौदा) गारेगार : च. थंड, (पंधरा) बनवाबनवी : ख. लबाडी, फसवणूक

# कोणे एके काळी ४



कोणतेही रोप जसे मातीतून, भोवतालच्या पर्यावरणातून पोषकद्रव्य घेऊन मोठ्या वृक्षात परिवर्तित होते आणि सशक्त मुळांच्या बळावर अधिकाधिक उंचीवर जाते, तसे मानवसमूहांचे देखील होत असते. म्हणूनच वर्तमानात आणि भविष्यात प्रगतीची नवनवी शिखरे पादाक्रांत करतानाही माणसांची नाळ त्यांच्या भूतकाळाशी जोडलेली राहते. प्रत्येक माणसाच्या जनुकांवर उमटलेले त्याच्या ज्ञात-अज्ञात इतिहासाचे ठसे मानवीसमूहांच्या संदर्भात संस्कृतीच्या रूपाने सामोरे येतात. कधी दृश्य, तर कधी अदृश्य असणाऱ्या या ठशांची अमीट छाप मानवी वर्तनावर पडलेली असते. या वर्तनाचा अभ्यास करताना, त्यासंबंधीचे आडाखे बांधताना, तसेच आंतरसांस्कृतिक संबंध निर्माण करताना त्या त्या समाजाचा भूतकाळ म्हणूनच महत्त्वपूर्ण ठरतो. तेव्हा चला, पुरातत्त्वशास्त्र, इतिहास अशा विषयांचे बोट धरून मागोवा घेऊ या, कोणे एके काळच्या गोष्टींचा!


# ४ कोणे एके काळी

**१ मुलाखत. तुमच्या दोन सहाध्यायींना इतिहास या विषयाबाबत पुढील प्रश्न विचारा. त्यांनी दिलेली उत्तरे प्रश्नांपुढे दिलेल्या चौकटींमध्ये थोडक्यात लिहा.**



| | सहाध्यायी १<br>नाव ------------- | सहाध्यायी २<br>नाव ------------- |
|---|---|---|
| क. तुम्हाला इतिहास या विषयात रस आहे का? | | |
| ख. ऐतिहासिक घटना किंवा कालखंड यांच्याशी संबंधित पुस्तके तुम्ही वाचता का?<br>अशा विषयांवरील माहितीपट बघता का? | | |
| ग. कोणत्या ऐतिहासिक कालखंडात किंवा युगात राहायला तुम्हाला आवडेल? का? | | |
| घ. इतिहासातील अशी कोणती घटना तुम्ही सांगाल, की जी प्रत्यक्ष अनुभवावी असे तुम्हाला वाटते?<br>परिणाम होतो असे तुम्हाला वाटते का? | | |

**२ तुमच्या प्रांतातील / देशातील एखाद्या ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण घटनेबद्दल किंवा व्यक्तीबद्दल माहिती सांगा. सुमारे तीन मिनिटे या विषयावर बोला.**



## ३ पुरातत्त्वाची वाटचाल



पुरातत्त्वविद्या (Archaeology) ही इतर विद्याशाखांच्या तुलनेत अगदी अलीकडची म्हणावी लागेल. तिचे मुख्य उद्दिष्ट पुरावशेषांचा अभ्यास हे होय. पुरातत्त्वविद्या हे प्राचीन संस्कृतीच्या अभ्यासाचे एक अत्यंत महत्त्वाचे साधन आहे आणि त्यामुळे आता त्याची लोकप्रियता वाढत आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे सामान्य जनांना आपल्या पूर्वजांबद्दल असलेला आदर.

मध्ययुगात एक छंद म्हणून सुरुवात झालेल्या या विद्येला आता स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून मान मिळाला आहे आणि तिला शास्त्रीय स्वरूप देण्यात आले आहे. युरोप-अमेरिकेत पुरातत्त्व म्हणजे प्रागैतिहास (prehistoric times) समजले जाते. इतिहासाची दोन भागांत विभागणी केली जाते. ज्या काळाचा विश्वसनीय लिखित पुरावा उपलब्ध आहे, तो इतिहासकाळ, आणि ज्या काळात मानवाला लिहिण्याचे ज्ञान नव्हते, तो प्रागैतिहासिक काळ. तो कालखंड खूप मोठा, लाखो वर्षांचा आहे. लिहिण्याची कला फार तर पाच हजार वर्षे मागे जाते, ह्याउलट मानवाची प्राचीनता ३५ लाख वर्षे मागे जाते. या दोहोंमधला एक काळ आपल्या भारतात आहे. सिंधू संस्कृतीच्या लोकांना लिहिण्याचे ज्ञान होते, परंतु त्यांचे लिखाण आपल्याला वाचता येत नाही. त्यामुळे त्या काळाला प्रागैतिहासिक म्हणता येणार नाही. म्हणून त्याला 'इतिहासपूर्व' (protohistory) म्हटले जाते. आपल्याकडे अतिप्राचीन वैदिक वाङ्मय आहे. परंतु त्यात वर्णिलेले जीवन पुरातत्त्वीय दुजोऱ्याशिवाय आपल्याला ग्राह्य धरता येणार नाही. त्यामुळे तो काळही 'इतिहासपूर्व' म्हणावा लागेल. ज्या वेळी आपल्याला सिंधू लिपी वाचता येईल आणि वैदिक आर्यांच्या वसाहतींचा निश्चित शोध लागेल, त्या वेळी ते कालखंड इतिहास म्हणून गणले जातील.

पुरातत्त्वविद्येने केलेल्या प्रगतीमुळे ती शास्त्र आहे की कला आहे याबद्दल विद्वानांत मतभेद आहेत. ह्याचे मुख्य कारण असे की, पुरातत्त्वात आता पर्यावरणशास्त्राचे महत्त्व वाढल्यामुळे वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, भूशास्त्र या शास्त्रांतील प्रगतीचा उपयोग होऊ लागला आहे. त्याशिवाय शास्त्रोक्त पद्धतींचा कालमापनासाठी फार उपयोग होतो. त्यामुळे पुरातत्त्वीय संशोधनासाठी आता शास्त्रोक्त पद्धतींचा अवलंब करण्यात येतो. याचा एक परिणाम असा झाला आहे की, पूर्वी मानवाच्या सांस्कृतिक विकासाचे टप्पे हे फक्त वर्णिले जात; आता ते का घडून आले याचे स्पष्टीकरण द्यावे लागते. विसाव्या शतकात इतर शास्त्रांत – उदा॰ गणित, भूगोल, भाषाशास्त्र, अर्थशास्त्र इत्यादी – जी क्रांतिकारक प्रगती घडून आली, तशी पुरातत्त्वातही झाली आणि नवपुरातत्त्वाचा (New Archeology) उदय झाला. पुरातत्त्वाला शास्त्रीय बैठक लाभली. संशोधनात शास्त्रीय पद्धतींचा उपयोग सुरू झाला. याचे सोपे उदाहरण म्हणजे सिंधू संस्कृतीचा ऱ्हास. तिचा नाश आर्यांनी केला, असे ऋग्वेदातील आर्य आणि दास यांच्या संघर्षामुळे सांगितले जात असे. परंतु त्याला पुरातत्त्वीय पुरावा नाही. याउलट पर्यावरणीय बदल त्याला कारणीभूत होता असे आता स्पष्ट झाले आहे. त्यामुळे पूर्वीप्रमाणे केवळ वाङ्मयीन पुराव्यावर अवलंबून न राहता त्याला पुरातत्त्वीय पुराव्याचा आधार द्यावा लागतो. नाहीतर वाङ्मयीन पुरावा म्हणजे केवळ कविकल्पना ठरते.



पुरातत्त्वाची भारतातील प्रगती लक्षणीय आहे. मानवाने शेती करण्यास दहा हजार वर्षांपूर्वी सुरुवात केल्याचा पुरावा उत्तर प्रदेशात लहुरादेवा (जि॰ संत कबीरनगर) येथे मिळाला आहे. सिंधू संस्कृतीची आजवर दोन हजारांहून अधिक स्थळे सापडली आहेत. त्यातील १६०० भारतात आहेत. हडप्पा-मोहेंजोदारोपेक्षा मोठी शहरे (उदा॰ राखी गढी, लखमीरवाला) भारतात आहेत. सिंधू संस्कृतीच्या ऱ्हासानंतर सर्वत्र ताम्रपाषाणयुगीन खेडी होती. त्यांच्यामागे सिंधू संस्कृतीची प्रेरणा होती. ह्या काळात (इ॰पू॰ २००० – ५००) अनेक ठिकाणी वस्त्या उजाड झाल्या. अत्यंत प्रतिकूल पर्यावरणामुळे लोकांच्या नशिबी भटके जीवन आले. पुन्हा बुद्ध-महावीरांच्या काळापासून (इ॰पू॰ ६०० - इ॰स॰ ४००) दुसरे नागरीकरण झाले. लोखंडाच्या तंत्रामुळे ते घडून आले असे सांगितले जाते. परंतु लोखंडाचे तंत्रज्ञान इ॰पू॰ १४०० पर्यंत मागे जाते, मग त्यावेळी नागरीकरण का घडून आले नाही असा प्रश्न इथे उपस्थित होतो. प्रतिकूल पर्यावरणामुळे ते शक्य नव्हते असे वाटते.

इ॰पू॰ सहाव्या शतकापासून भारताचा इतिहासकाळ सुरू होतो. यापुढील एक हजार वर्षे अत्यंत अनुकूल पर्यावरण होते. त्यामुळे मौर्यांपासून गुप्तांपर्यंत साम्राज्ये उभी राहिली आणि त्यानंतर पुन्हा ऱ्हास सुरू झाला. साम्राज्ये लयाला गेली, सर्वत्र छोटी राज्ये झाली, त्यामुळे परकीयांचे फावले. त्यात देशाचे अपरिमित नुकसान झाले. असा हा पर्यावरणीय बदलाचा इतिहास लिहिण्यास आपल्याकडे साधने फार थोडी आहेत. त्यामुळे इतिहासकाळासाठीसुद्धा पुरातत्त्वाची मदत घ्यावी लागते.

निरनिराळ्या शास्त्रांची – प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र इत्यादी – पुरातत्त्वात आता मोठ्या प्रमाणावर मदत घ्यावी लागते. शास्त्रात नवनवीन शोध लागत आहेत, त्यामुळे त्यांचा उपयोग करून प्राचीन मानवाच्या संस्कृतीच्या अनेक अंगांवर प्रकाश पडतो. लोकांचे आरोग्य, त्यांचा आहार जाणून घेता येतो. ते मांसाहार करत होते की शाकाहारी होते, हे सांगता येते. आता तर गुणसूत्र (DNA) पद्धतीचा शोध लागल्यामुळे प्राचीन लोकांच्या नात्यागोत्यावरही प्रकाश पडतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्राचीन स्थळे शोधून काढता येतात. जमिनीवरून चालताना एखाद्यावेळी आपल्याला प्राचीन वस्तीच्या खुणा जाणवणार नाहीत, परंतु विमानातून घेतलेल्या छायाचित्रातून त्या ओळखता येतात; आणि असे एखादे स्थळ किती महत्त्वाचे आहे हे ठरवण्यासाठी रडारचा उपयोग होतो. त्यामुळे कोणत्या भागात मानवी वस्ती होती, कोणत्या ठिकाणी कारखाने होते, कोठे स्मशानभूमी होती हे समजते. त्यामुळे आपल्या उद्दिष्टानुसार कोठे उत्खनन करावे हे ठरवता येते. २१व्या शतकात पुरातत्त्वाचे स्वरूप काय असावे याबद्दल तज्ज्ञांचे मत असे आहे की, आता ह्या शतकातील पुरातत्त्वीय संशोधन अधिक प्रमाणात शास्त्रीय प्रयोगशाळांमध्ये करावे. विसाव्या शतकात उत्खनने मोठ्या प्रमाणावर केली गेली. त्यातून जो पुरावा हाती आला आहे त्याची शास्त्रीयदृष्ट्या छाननी करावी. आता उत्खनन अगदी आवश्यक असेल तरच करावे. उदा. एखादा प्रदेश धरणाखाली जाणार असेल तर अशा ठिकाणी उत्खनन आवश्यक असते. एखाद्या स्थळी जमिनीत कोणत्या प्रकारचे अवशेष आहेत हे जर आपणाला समजणार असेल तर उत्खनन करण्याची आवश्यकता नाही.



मधुकर केशव ढवळीकर

**क. वरील उताऱ्याच्या आधारे पुढील काळांचे वर्णन करा.**

अ. इतिहासकाळ ----------------------------------------

आ. इतिहासपूर्व काळ ----------------------------------------

इ. प्रागैतिहासिक काळ ----------------------------------------

**ख. पुरातत्त्वशास्त्राच्या अभ्यासात इतर शास्त्रांचा कसा उपयोग होतो, ते साधारणपणे १५० शब्दांत लिहा.**

**ग. पुढील विधाने चूक की बरोबर ते लिहा.**

उदा॰ पुरातत्त्वशास्त्राची मदत इतिहासकाळासाठी आवश्यक नाही. – चूक

अ. अन्य शाखांतील संशोधन पुरातत्त्व अभ्यासासाठी पूरक ठरले आहे.

आ. भविष्यातही उत्खननांवर भर दिला जाईल.

इ. वाङ्मयीन पुरावा हा पुरातत्त्व अभ्यासात निर्णायक ठरतो.

ई. आर्यांबरोबरच्या संघर्षामुळे सिंधू संस्कृतीचा विनाश झाला.

उ. पर्यावरणातील बदल हे अनेक पुरातत्त्वीय घडामोडींमागचे महत्त्वाचे कारण आहे.

ऊ. सिंधू संस्कृतीतील अनेक नगरे भारतात सापडली आहेत.

ए. पुरातत्त्वविद्या ही एक प्राचीन विद्याशाखा आहे.

ॲ. वैदिक कालखंड हा प्रागैतिहासिक कालखंड आहे.

**घ. पुढील वाक्यांमधील अधोरेखित केलेल्या शब्दांच्या जागी वेगळे शब्द वापरून वाक्ये लिहा. वाक्याचा अर्थ तसाच राहील याची काळजी घ्या. त्यासाठी वाक्यरचनेत आवश्यक ते बदल करा. यासाठी कंसात दिलेल्या शब्दांची मदत घेऊ शकता.**

(पैलू, हानी, आधार, उल्लेखनीय, स्वीकारता, भरून न येण्यासारखी, समोर येतात, उपयुक्त ठरते)


उदा॰ एखादे स्थळ किती महत्त्वाचे आहे हे ठरवण्यासाठी रडारचा उपयोग होतो.
उत्तर : एखादे स्थळ किती महत्त्वाचे आहे हे ठरवण्यासाठी रडार **उपयुक्त ठरते.**

अ. प्राचीन मानवाच्या संस्कृतीच्या अनेक अंगांवर प्रकाश पडतो.

आ. त्यात देशाचे अपरिमित नुकसान झाले.

इ. पुरातत्त्वाची भारतातील प्रगती लक्षणीय आहे.

ई. ते वर्णन आपल्याला पुरातत्वीय दुजोऱ्याशिवाय ग्राह्य धरता येणार नाही.



## ४ पु. ल. देशपांडे यांच्या हरितात्या या व्यक्तीचित्रणातील निवडक अंश पुढे ऐका.

**क. पुढील प्रश्नांची एका शब्दात उत्तरे लिहा.**

अ. ध्वनिफितीमध्ये कोणत्या किल्ल्याचा संदर्भ आला आहे? --------------

आ. हरितात्यांनी मुलांचे नाते इतिहासाशी जोडले. त्यातून मुलांना काय मिळाले? --------------

**ख. पुढे दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडा.**


अ. वर्गातल्या इतिहासात कशावर जास्त भर दिला जात असे?
(एक) घटनाक्रम (दोन) सन (तीन) वंशावळी

आ. काळाच्या ओघात पुढीलपैकी कोणती व्यक्ती मृत्यू पावली नाही?
(एक) आई (दोन) आजी (तीन) वडील

इ. पुढीलपैकी कोणती गोष्ट भूतकाळाची आठवण करून देत नाही?
(एक) उदबत्तीचा वास (दोन) जुनी गोधडी (तीन) नव्या-कोऱ्या छत्रीवर पडलेलं पावसाचं पाणी

ई. हरितात्यांनी कशाचे पंख धारण केले होते?
(एक) शिवशाहीचे (दोन) पेशवाईचे (तीन) इतिहासाचे

**ग. मुलांना इतिहासाची गोडी लागावी यासाठी काय करता येईल, असे तुम्हाला वाटते?**



## ५ इतिहासाचा तास

**क. तुमच्या सोबत्याला पुढील प्रश्न विचारा. त्याने दिलेली उत्तरे वर्गात सांगा.**

अ. तुम्हाला शाळेत इतिहासाचा तास आवडायचा का? आवडत असल्यास का? नसल्यास का नाही?

आ. तुम्हाला तुमचे इतिहासाचे शिक्षक / शिक्षिका अजून आठवतात का? आठवत असतील तर त्यांच्याबद्दल माहिती सांगा.


इ. तुमच्या मते शाळेतील इतिहासाच्या तासात कोणत्या गोष्टींवर अधिक / कमी भर दिला पाहिजे?

**ख. ऐतिहासिक, पौराणिक संदर्भ असलेले मराठीतील काही शब्द, वाक्प्रचार व त्यांचा संदर्भ पुढे दिला आहे. त्या शब्दांच्या त्यांच्या अर्थाशी जोड्या लावा.**

| शब्द, वाक्प्रचार, उक्ती | संदर्भ | अर्थ |
|---|---|---|
| अ. यक्षप्रश्न | (महाभारत) | (एक) आदर्श राज्यव्यवस्था |
| आ. लंकेत सोन्याच्या विटा | (रामायण) | (दोन) फार कष्टपूर्वक एखादी गोष्ट साध्य करणे |
| इ. ध चा मा करणे | (पेशवाई) | (तीन) लहानसा सहभाग |

| | | |
|---|---|---|
| ई. भीष्मप्रतिज्ञा | (महाभारत) | (चार) कठीण प्रसंगातून स्वत:ला सिद्ध करणे |
| उ. पानिपत होणे | (पेशवाई) | (पाच) मोठे काम पूर्ण करणे |
| ऊ. जाणता राजा | (शिवकाल) | (सहा) पराभूत होणे |
| ए. रामराज्य | (रामायण) | (सात) अवघड पेच |
| ॲ. भगीरथ प्रयत्न | (पौराणिक) | (आठ) दृढनिश्चय |
| ऐ. शिवधनुष्य पेलणे | (रामायण) | (नऊ) दूरदर्शी शासक |
| ओ. नरो वा कुंजरो वा | (महाभारत) | (दहा) वस्तू दुष्प्राप्य असल्याने उपयोग नसणे |
| ऑ. खारीचा वाटा | (रामायण) | (अकरा) धूर्तपणे हानिकारक फेरबदल करणे |
| औ. अग्निदिव्य | (रामायण) | (बारा) उत्तरातील अनिश्चितता दाखवणे |

**ग. इतिहासाशी नाते सांगणारे असे काही वाक्प्रचार तुमच्या मातृभाषेत आहेत का? त्यामागची घटना / प्रसंग / कथा / दंतकथा वर्गात सांगा.**



## ६ आठवणी

**पुढे दिलेल्या प्रश्नांपैकी दोन प्रश्न निवडा. वर्गात फिरून वर्गातील जमेल तेवढ्या जास्तीत जास्त जणांना ते प्रश्न विचारा. त्यातून मिळालेली रंजक माहिती वर्गात सांगा.**

क. तुमच्या आयुष्यातील कोणत्या घटनेची आठवण तुम्हाला विशेष प्रिय आहे?

ख. तुम्हाला तुमचे बालपण आठवायला आवडते का? जर आवडत असेल तर काय आठवते?


ग. दैनंदिन जीवनात दिसणाऱ्या विविध जाहिरातींपैकी कोणती एखादी जाहिरात तुमच्या विशेष आठवणीत राहिली आहे? असली तर कोणती आणि का?

घ. गेल्या वर्षी पाहिलेला एखादा चित्रपट किंवा वाचलेले एखादे पुस्तक यांतील कथाभाग तुम्हाला आठवतो का? तुमच्या लहानपणी पाहिलेल्या एखाद्या चित्रपटाची किंवा वाचलेल्या पुस्तकाची कथा आठवते का?

च. तुम्ही शाळेत असताना शिकलेलं; पण अजूनही तुमच्या आठवणीत राहिलेलं असं काही आहे का?

## ७ कविता

### पैठणी



फडताळात एक गाठोडे आहे त्याच्या तळाशी अगदी खाली
जिथे आहेत जुने कपडे, कुंच्या, टोपडी, शेले, शाली,
त्यांतच आहे घडी करून जपून ठेवलेली एक पैठणी
नारळी पदर, जरी चौकडी, रंग तिचा सुंदर धानी*.

माझी आजी लग्नामध्ये ही पैठणी नेसली होती
पडली होती साऱ्यांच्या पायां हाच पदर धरून हाती
पैठणीच्या अवतीभवती दरवळणारा सूक्ष्म वास
ओळखीची... अनोळखीची... जाणीव गूढ आहे त्यास.

धूप-कापूर-उदबत्त्यांतून जळत गेले किती श्रावण
पैठणीने या जपले एक तन... एक मन...
खस-हिन्यात माखली बोटे पैठणीला केव्हा पुसली
शेवंतीची, चमेलीची आरास पदराआडून हसली.

वर्षांमागून वर्षे गेली, संसाराचा सराव झाला
नवा कोरा कडक पोत एक मऊपणा ल्याला
पैठणीच्या घडीघडीतून अवघे आयुष्य उलगडत गेले
अहेवपणी मरण आले, आजीचे माझ्या सोने झाले.

कधी तरी ही पैठणी मी धरते उरी कवळून
मऊ रेशमी स्पर्शामध्ये आजी भेटते मला जवळून
मधली वर्षे गळून पडतात; कालपटाचा जुळतो धागा
पैठणीच्या चौकड्यांनों, आजीला माझे कुशल सांगा.

शांता शेळके

**शब्दार्थ**

धानी : फिकट हिरवा किंवा पोपटी रंग

**क. पुढे काही शब्द दिले आहेत. त्यांच्या अर्थाशी मिळताजुळता असलेला कवितेतील शब्द लिहा.**

अ. बोचके  आ. कपाट  इ. बुडलेली

ई. अत्तरे  उ. सौभाग्यवती असताना

**ख. ‘आठवण’ या शब्दाबरोबर वापरली जाणारी काही क्रियापदे पुढे दिली आहेत. दिलेल्या वाक्यांमध्ये योग्य क्रियापदाचे योग्य रूप वापरा.**

(जागवणे, उगाळणे, विसरणे, बुडणे, रमणे, हरवणे, गढणे)

उदा. लग्नाचा अल्बम पाहताना सुरेखा एवढी **गढली** होती, की रात्रीचे बारा वाजून गेले तरी ती झोपायचं नाव काढत नव्हती.

अ. त्याच त्याच कटू आठवणी परत परत ------------- काय फायदा?

आ. प्रेयसी प्रियकराच्या आठवणीत आकंठ ------------- आहे आणि गाणं म्हणते आहे हा हिंदी सिनेमांमधला ठरलेला प्रसंग!

इ. तिला कदाचित आठवत नसेल, पण मी ती आठवण ------------- नाहीये.

ई. आठवणींमध्ये ------------- माणसाला काळवेळेचं भान उरत नाही म्हणतात.

उ. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आपल्या जीवाचं मोल दिलेल्या वीरांच्या आठवणी ------------- हे आपलं कर्तव्यच आहे.

ऊ. जुने फोटो बघताना आपण सगळेच जण त्या आठवणींमध्ये ------------- जातो.


**ग. तुम्ही तुमच्या प्रियजनांच्या आठवणी कशा जपल्या आहेत ते लिहा. (सुमारे २००-२५० शब्द)**

**घ. आठवणी आणि छायाचित्रे यांचा अतूट संबंध असतो.**
**तुमच्याजवळची काही छायाचित्रे वर्गात घेऊन या.**
**त्यांच्याशी संबंधित आठवणी सांगा. सुमारे तीन मिनिटे बोला.**



## ८ सोबत


आमचे धामापूरचे घर म्हणजे प्रचंड चौसोपी वाडा होता. मधल्या चौकात सुंदर गोल बांधलेली, खोल, काळ्याशार पाण्याची विहीर होती आणि आंघोळीला आणि कपडे धुवायला चार-पाच पाथऱ्या* आणि डोणी* होत्या. विहिरीत छान मोठे मासे पोहताना दिसत, पण पाणी काढताना ते कधी घागरीत येत नसत. या विहिरीचा दगडी कठडा चांगला रुंद होता. त्यावर आजी तऱ्हेतऱ्हेच्या फुलझाडांच्या कुंड्या ठेवी. इतकी सुंदर दुसरी विहीर अगदी चित्रातदेखील मी पाहिलेली नाही. त्या विहिरीत कुणी पडल्याचे, जीव दिल्याचे, असले काहीही घडलेले नव्हते. ती आमची अगदी खाजगी, घरगुती होती. घरातलीच कुणी चारित्र्यशील बाई असल्यासारखी. या वाड्याच्या जोडीने जन्माला आलेली, तिथे घडलेल्या सगळ्या अकल्पितांना साक्षी असलेली; निर्मळपणा, गारवा, ओलावा यांनी रसरसलेली. आता त्या वाड्यात आजीच्या सोबतीने राहणारी. त्या वेळी मला वाटे, रोज रात्री मी झोपल्यावर आजी आणि ती नक्कीच गप्पा मारत बसत असतील.



आमचा धामापूरचा तलाव त्या परिसरात नावाजलेला होता. असे सांगतात, की गावात कुणाकडे काही कार्य असलं आणि परिस्थितीमुळे दागिने पुरेसे नसले, तर हवे असलेले सर्व दागिने त्या त्या आकाराचे फुलांचे करायचे आणि एका परडीत घालून ती परडी तळ्यात उतरणाऱ्या एखाद्या पायरीवर ठेवून द्यायची. दुसऱ्या दिवशी ती खऱ्या दागिन्यांनी

भरलेली असायची. मग ते दागिने वापरून झाल्यावर, कार्य संपले की पुन्हा त्या परडीत घालून त्या पायरीवर नेऊन ठेवायचे. पुढे म्हणे कधीतरी कुण्या करंट्याने ती परडी परत केलीच नाही आणि तेव्हापासून तलावाने गावाला दागिने द्यायचे थांबवले. पण असा हा उदार बापाजी. [...]

आमच्या धामापूरच्या तलावात असंख्य मासे होते. भगवतीच्या देवळात गेले, की सभामंडपात खेळता खेळता पायऱ्यांवरून धावत पावलं तलावापाशी जात. मग पाण्याजवळच्या पायरीवर बसून पाय पाण्यात सोडायचे. पावलांच्या छोट्या छोट्या बोटांएवढे मासे मग थव्याथव्यांनी येत आणि पावलांना झोंबत. गुदगुल्याही होत आणि चावेही जाणवत. बोटं हलवली की ते मासे दूर पळत. पुन्हा स्तब्ध बसलं की तेही परत पावलांजवळ जमत. ती बोटंच जणू मासे बनून या छोट्या दोस्तांशी नवा खेळ सुरू करत. गप्पा, गोष्टी, सुखदुःखांची देवघेव. आजी, आमच्या वाड्यातली ती विहीर, तिच्यातले ते मोठे मासे, या तलावातले हे असंख्य इवले इवले मासे – आमचा सगळ्यांचा तो घरगुती, अगदी खाजगी मेळावा असे. तलावाच्या काळ्याशार खोल पाण्यातली कितीतरी गुपितं ते त्या पावलांना सांगत आणि आमच्या वाड्यातल्या अनेक गोष्टी आम्ही त्यांना सांगत असू. सगळ्यांचे संवाद मीच म्हणत असे, मीच रचलेले. कधी मोठ्याने तर कधी अगदी हळू, कानात सांगितल्यासारखे.



ही पानां-फुलांशी, झाडांशी, कावळ्या-चिमणीशी, किडी-मुंग्यांशी, किंबहुना कोणत्याही हलत्या सोबतीशी बोलायची सवय पुढे कधी गेली नक्की पत्ता नाही. कधी वाटते, ती सवय तशी खऱ्या अर्थाने गेलीच नाही. फक्त ते संवाद मुके झाले आणि पुढे आयुष्यभर तासन्‌तास चालणाऱ्या हरतऱ्हेच्या घरकामात मनात खेळत राहिले, इतकाच काय तो फरक. त्या नाटकातली पात्रे बदलत गेली आणि पार्श्वसंगीतासारखी कविताही मग त्यांच्या सोबतीने घुमत राहिली.

सुनीता देशपांडे

**शब्दार्थ**

पाथरी : अंघोळ, कपडे धुणे यासाठी वापरायचा सपाट दगड

डोण : पाणी साठविण्याचे खोलगट दगडी पात्र

**क. वरील उताऱ्यात धामापूर तलाव आणि दागिने याबद्दलची आख्यायिका आली आहे. ऐतिहासिक घटना आणि त्याभोवती गुंफलेल्या आख्यायिका व दंतकथा यांचे इतिहासात एक आगळेवेगळे स्थान असते. आख्यायिकांमुळे ऐतिहासिक घटना अधिक रंजक बनतात, चिरकाळ स्मरणात राहतात की त्यातून केवळ सत्याचा अपलाप होतो, चुकीच्या समजुती प्रचलित होतात? तुम्हाला काय वाटते? तुमचे मत सांगून तुमच्या सहाध्यायींबरोबर चर्चा करा.**

**ख. घागर, कळशी यांचा उपयोग विहिरीतून पाणी काढण्यासाठी आणि ते साठविण्यासाठी होतो. साधारण या भांड्यांसारखाच घाट असणाऱ्या परंतु आकाराने लहान-मोठ्या असणाऱ्या काही भांड्यांची नावे पुढे दिली आहेत. ती कशासाठी वापरली जातात तुम्हाला सांगता येईल?**




**९ वस्तूंप्रमाणेच आठवणी आणि सुगंध यांचेही एक नाते असते. त्याबद्दल पुढील प्रश्नांच्या आधारे बोला.**

अ. कोणता वास तुम्हाला आवडतो?

आ. तुमच्या बालपणीच्या आठवणींशी निगडित असा कोणता वास आहे का?

इ. कशाचा वास तुम्हाला अजिबात आवडत नाही?

ई. तुमच्या आवडत्या किंवा नावडत्या वासाशी निगडीत तुमची एखादी आठवण आहे का?

**क. कमी-अधिक तीव्रता दर्शविणाऱ्या काही शब्दांच्या जोड्या पुढे दिल्या आहेत. त्यांचा वापर करून वाक्ये तयार करा.**

उदा॰ अत्तर : दरवळ - घमघमाट

वाक्य - अत्तराचा दरवळ कुठून येत होता हे शोधत मी दुकानात पोहोचले तर त्याच अत्तराचा एकदम घमघमाट आला.

अ. पाऊस : भुरभुर – मुसळधार

आ. वारा : झुळझुळ – सोसाट्याचा

इ. लढाई : लुटुपुटीची – घनघोर

ई. औषध : कडसर – कडूजहर

उ. पदार्थ : गोडसर – गोडमिट्ट

**१० आठवणी जतन करण्याचे विविध मार्ग असतात. त्यांपैकी काही पुढे दिले आहेत. त्यांच्याबद्दल तुम्हाला काय वाटते ते सांगा. आठवणी जतन करण्याचे आणखी कोणते मार्ग तुम्हाला सांगता येतील?**

**आठवणी जतन करण्याचे मार्ग**

- पुतळे उभारणे, चित्र काढणे
- स्मृतिदालन तयार करणे
- स्मृतिशिला, स्मृतिस्तंभ उभारणे
- जयंती, पुण्यतिथी साजरी करणे
- पोस्टाची तिकिटे काढणे
- संग्रहालय उभारणे
- साहित्य निर्माण करणे
- माहितीपट, चित्रपट तयार करणे
- रस्त्यांना, शहरातील विविध ठिकाणांना, संस्थांना नावे देणे
- स्मृतिप्रीत्यर्थ देणग्या देणे
- एकत्र जमून आठवणी सांगणे

## ११ काळभान

काळ हा शब्द उच्चारला, की चटकन आपल्या डोळ्यांपुढे येतं ते त्याचं अथांग, असीम असं स्वरूप! आपली नजरही पोचू शकणार नाही, असं अमर्यादपण!

आपल्या भारतीय संस्कृतीत आपण जेव्हा काळाच्या संदर्भात बोलायला जातो, तेव्हा त्याचं हे रूप सारखं त्याच्या आगेमागे घोटाळत असतं. 'काळाचा महिमा', 'काळ कोणाला सांगून आलाय!' – अशा अनेक वाक्प्रचारांमधून काळाचं आपल्या संस्कृतीला कळलेलं भान सामोरं येत राहतं.

परंतु हाच शब्द जर्मन भाषेचा पेहराव घालून जर्मन संस्कृतीत वावरायला लागला, की त्याचं अथांगपण संपून या 'काळ'पुरुषाच्या अंगावर 'मौल्यवान' किंवा 'किमती' हा अलंकार चढतो. तो एक खजिना असतो आणि तो सुयोग्यपणे प्रत्येकानं वापरायचा असतो. त्याचा अपव्यय करणं म्हणजे स्वतःच्या पायावर कुऱ्हाड चालवण्यासारखं!

म्हणजे प्रत्येक संस्कृतिसमूहानं आपापल्या निरीक्षणानुसार आणि अनुभवानुसार आपापलं काळभान ठरवलं. काळभानाच्या या आदिप्रेरणेतून संस्कृतिस्वभाव बनत गेले! इतर संस्कृतिसमूहांबरोबर बोलताना, वागताना हे प्रत्येक समूहाचं आपापलं अलग काळभान संदेशवहनाचा एक महत्त्वाचा भाग बनून राहिलं. काळभान हा शब्द म्हणजे टेम्पोरॅलिटी (temporality) या इंग्रजी शब्दाचा अनुवाद करण्याचा प्रयत्न आहे.

आदिमानवी टोळ्यांचे संस्कृतिसमूह बनता बनता काळाचे जे अनेक टप्पे मानवसमूहांनी ओलांडले, त्या वेळी त्यांना आजूबाजूचा निसर्ग हा काळाचं विभाजन शिकवत होता. मानव आपली दिनचर्या, पोटापाण्याची सोय, विश्रांतीचा काळ या दररोजच्या क्रियांची निसर्गातील बदलांशी सांगड घालत होता. ऋतुचक्र त्याला अनेक तऱ्हेचे पाठ शिकवत होतं. उन्हाळा सरून पावसाळा तोंडावर आला, की शाकारलेल्या निवासाच्या शोधात राहिलं पाहिजे; झाडाची पानं केशरी, पिवळी होऊन गळू लागली, की आता बर्फ पडायला लागण्याचा काळ जवळ आला, म्हणजे उबदार निवाऱ्याची सोय करण्यासाठी धडपड करायला हवी, अशा तऱ्हेचं भान त्याला



येऊ लागलं. त्यात कुचराई झाली, तर त्याची हिवाळ्यात जबर शिक्षा भोगावी लागते, गारठून मरून जायला होतं. अन्नाची योग्य प्रमाणात साठवण केली नाही, तर हिवाळ्यात पोटाची सोय होत नाही, असं सर्व काही तो शिकत होता. सूर्याचं असणं आणि नसणं या मूलभूत गोष्टींचा संबंध बरंच काही ठरवतो, हे त्याच्या ध्यानात येऊ लागलं. ध्रुव प्रदेशाच्या जवळच्या क्षेत्रांमध्ये आभाळात सूर्य असण्याचा आणि नसण्याचा काळ भलताच लांबरुंद! तेथील ऋतुचक्राची गती ही एकदम निराळी. तेव्हा तेथील कालचक्राच्या भानानं तेथील माणसांना आपल्या दैनंदिन जीवनाचं नियोजन एकदम वेगळ्या तऱ्हेनं करायला शिकवलं.

त्याच्या अगदी उलट परिस्थिती विषुववृत्ताच्या आसपासच्या मानवसमूहांची होती. तिथे सूर्याच्या प्रखरतेचा कालावधी आणि पावसाचं येणं-जाणं यावर तेथील मानवसमूहांच्या दैनंदिन व्यवहाराचं नियोजन अवलंबून राहिलं. तेथील निसर्ग त्यांना वेगळंच काळभान शिकवत होता.

सूर्योदय ते सूर्यास्त, अमावास्या ते पौर्णिमा, उन्हाळा ते पावसाळा किंवा हिवाळा असे काळाचे टप्पे ध्यानात घेतले आणि ते अचूक ओळखले, की आपलं जीवन सुखकर होतं, हे मनुष्यप्राण्यानं ओळखलं. मग या काळभानावर समूहाची राहण्या-वागण्याची रीत ठरू लागली. [...] उपलब्ध सूर्यप्रकाशाचा काळ योग्य तऱ्हेनं वापरण्यावर त्या समूहांचं जीवनमरण अवलंबून होतं. म्हणून या काळभानाला प्रत्येक संस्कृतीत अपार महत्त्व होतं. ते आजवरही तसंच आहे. काळाच्या नियोजनाच्या माध्यमातून प्रत्येक संस्कृती काही संदेश देत असते. प्रत्येक काळभानाची एक वेगळी भाषा असते.

'अरे! आज एकदम सकाळी सकाळी इकडे कुठे?' असं आपण जेव्हा कोणालातरी विचारतो, तेव्हा त्यात अनुस्यूत अर्थ असतो – 'काहीतरी विशेष, महत्त्वाचं काम असणार!' कारण सकाळची वेळ आणि अपेक्षित घटना याचं एक समीकरण प्रत्येकाच्या मनात बनलेलं असतं.

दिवसाचं कोष्टक आणि कामांचा प्राधान्यक्रम याचा असा अतूट संबंध जोडण्याचं कसब आपल्याला आपल्या संस्कृतीच्या काळभानानं शिकवलेलं असतं. त्यात जरा उलथापालथ झाली, तर त्याला वेगळ्याच अर्थवहनाचं परिमाण लाभतं. [...]

दिवस, आठवडा, पंधरवडा, महिना, वर्ष आणि मग ऋतुचक्र अशा पायऱ्या-पायऱ्यांनी आपण सर्व जण कालगणना शिकत असतो. दिवसाच्या चोवीस तासांचं सकाळ-दुपार-रात्र असं ढोबळ विभाजन मनात असतं. त्यातल्या तासांचं पुन्हा पाच मिनिटं, दहा मिनिटं, पंधरा मिनिटं असं नेमकं विभाजनही डोळ्यांसमोर असतं. 'मी पाच मिनिटांत येतो', या उद्गारांचा प्रत्येक संस्कृतीमध्ये अध्याहृत असणारा अर्थ मात्र वेगवेगळा असू शकतो. तो बरोबर पाच मिनिटांना बांधील असतोच, असं मात्र नाही. प्रत्येक संस्कृतीमध्ये हे काळाचं विभाजन, त्यातला अध्याहृत अर्थ आणि त्यानुसार बेतलेला कामांचा प्राधान्यक्रम बरंच काही बोलून जात असतो. [...]

कालविभाजनाचे यापलीकडचे मोठे टप्पे म्हणजे वर्तमानकाळ, भूतकाळ आणि भविष्यकाळ! या टप्प्यांनाही प्रत्येक संस्कृती वेगळ्या तऱ्हेनं हाताळते, असं दिसून येतं. तीन-चार हजार वर्षांचा इतिहास असणारे प्राचीन संस्कृतिसमूह आपल्या भूतकाळाला अत्यंत जिवंत स्वरूपात सतत बरोबर वागवताना दिसतात. दक्षिण आशियातील काही संस्कृतिसमूह, अरब संस्कृतिसमूह यांचा उल्लेख उदाहरणादाखल करता येईल. अशा संस्कृतिसमूहांमध्ये वर्तमानातले बरेचसे निर्णय हे त्यांच्या भूतकाळाच्या साक्षीनं आणि त्याच्या

घनदाट छायेखाली घेतले जात असतात. काळसागराची खोली त्यांच्या सर्व वर्तनाचा एक अविभाज्य भाग बनलेली असते. त्यांचं काळभान म्हणजे जणू प्रचंड मोठा भूतकाळ आणि बेताचा वर्तमानकाळ इतपतच सीमित राहतं! भविष्यकाळ हा त्यांच्यासाठी फारसा निर्णायक नसतो. एखाद्या पुलाच्या बांधकामासाठी ठरवलेला काळ पाच-दहा वर्षांनी पुढे गेला, तरी तो त्यांना अजिबात बोचत नाही, कारण अशा समूहांचं भविष्याचं काळभान अतिशय धूसर असतं.

याउलट त्या मानानं अर्वाचीन इतिहास असलेले संस्कृतिसमूह – उदा॰ अमेरिकन, ऑस्ट्रेलियन किंवा काही उत्तर-मध्य युरोपियन संस्कृतिसमूह. यांच्यासाठी भविष्यकाळ हा काळभानाचा सर्वांत महत्त्वाचा टप्पा मानला जातो. त्यांचा सर्व वर्तमान हा या भविष्यावर बेतलेला असतो. त्यामुळे आजरोजी पूल किंवा रस्ते बांधताना आगामी शंभरेक वर्षांचा विचार करून ते बांधले जातात. प्रोजेक्ट डेडलाईन (project deadline) ही गोष्ट अतिशय गंभीरपणे घेतली जाते. 'डेड' (dead) या शब्दाने त्यातली गंभीरता अधोरेखित केली जाते. भविष्याच्या अनुषंगानं वर्तमान रेखला-जोखला जातो. त्यामुळे काळ ही गोष्ट म्हणजे उत्पादनाचं आणि गुंतवणुकीचं महत्त्वाचं भांडवल या स्वरूपात मानली जाते. साहाजिकच त्यातला क्षणन्‌क्षण मोलाचा. किमतीचं लेबल असलेला. म्हणून या संस्कृतिसमूहांच्या भाषासुद्धा काळाला अनुलक्षून 'विभाजन', 'गुंतवणूक', 'नियोजन', 'बचत', 'अंदाजपत्रक', 'काळ-कामाचं कोष्टक', 'वेळ-खर्चाचं कोष्टक' अशा अनेक पद्धतींनी या भांडवलाच्या सुयोग्य वापराला साजेशी शब्दसंपदा वापरत असतात.

वैशाली करमरकर

**क. वरील उताऱ्याचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.**

**ख. एखाद्या समूहाचे काळभान ठरविण्यामध्ये त्या समूहाच्या भौगोलिक परिस्थितीचाही हातभार कसा लागतो, ते तुमच्या शब्दांत सांगा. उदाहरणे द्या.**

**ग. तुमच्या प्रांताच्या / देशाच्या काळभानाविषयी तुम्ही काय सांगाल?**

**घ. अधोरेखित शब्दाच्या जागी कंसातील सूचनेप्रमाणे बदल करा.**

उदा॰ काळ हा शब्द उच्चारला, की चटकन आपल्या डोळ्यांपुढे येतं, ते त्याचं अथांग, असीम असं स्वरूप! ('की' न वापरता जोडवाक्य करा)

उत्तर: काळ हा शब्द **उच्चारल्यावर** चटकन आपल्या डोळ्यांपुढे येतं, ते त्याचं अथांग, असीम असं स्वरूप!

अ. जर अन्नाची योग्य प्रमाणात साठवण केली नाही, तर हिवाळ्यात पोटाची सोय होत नाही. ('जर... तर' न वापरता होकारार्थी वाक्य करा.)

आ. या काळभानाला प्रत्येक संस्कृतीत अपार महत्त्व राहिलं. ('महत्त्वपूर्ण' शब्द वापरा.)

इ. मनात दिवसाच्या चोवीस तासांचं सकाळ-दुपार-रात्र असं ढोबळ विभाजन असतं. ('विभागलेले' हा शब्द वापरा.)

**च. वरील उताऱ्यात आलेले काही शब्द पुढे कंसात दिले आहेत. त्या शब्दांशी समानार्थी शब्द वापरून खाली काही वाक्ये दिली आहेत. वाक्यांतील अधोरेखित केलेल्या समानार्थी शब्दांच्या जागी कंसातील जुळणारा योग्य शब्द वापरून व आवश्यकतेनुसार व्याकरणाचे बदल करून वाक्ये पुन्हा लिहा.**

(अनुलक्षून, अपव्यय, सांगड, कुचराई, अध्याहृत)

उदा॰ त्यांच्या बोलण्यात लपलेला अर्थ हा असा आहे.
उत्तर : त्यांच्या बोलण्याचा **अध्याहृत** अर्थ हा असा आहे.

अ. बदली होऊन आलेल्या नव्या अधिकाऱ्याला कामात टाळाटाळ केलेली अजिबात खपत नाही.

आ. तासन्‌तास मोबाइलवर गेम खेळत राहणे म्हणजे वेळ वाया घालवणे आहे.


इ. सासूबाई मुलीला जे बोलल्या ते खरं तर सुनेला उद्देशून होतं.

ई. हाती येणारा पैसा आणि वाढता खर्च यांचा मेळ कसा घालायचा ते सामान्य माणसाला अनेकदा कळेनासं होतं.

**छ. पुढे दिलेले शब्द खालील उताऱ्यात योग्य जागी लिहा.**

(दिवसाढवळ्या, भरदुपारी, दिवसभर, मध्यरात्री, दुपारभर, दिवस, रात्रभर)

मोहितला (अ) ------------- ताप भरला. त्यामुळे (आ) ------------- मीना त्याच्या उशाशी बसून होती. खरं तर काल (इ) ------------- काम करून ती अगदी थकून गेली होती. रात्री जागरण झालं म्हणून उद्या (ई) ------------- काही तिला झोपता येणार नव्हतं. त्यात हा पाऊस. काल सकाळी जो सुरू झाला होता, तो (उ) ------------- कोसळत होता. दोन वाजताच इतकं अंधारून आलं होतं की, (ऊ) ------------- संध्याकाळ झाल्यासारखं वाटत होतं. पुढचे दोन (ए) ------------- आपली परीक्षा पाहणार आहेत, हे मीनाच्या लक्षात आलं.



## १२ करा आणि शिका.

**क. रेडिओवरील / समाजमाध्यमांवरील रोजचे मराठी कार्यक्रम नियमित ऐका. त्यातून तुम्हाला इतिहास या विषयाशी संबंधित कोणती नवीन माहिती / दृष्टी मिळाली? त्यातील कोणत्याही दोन गोष्टींविषयी लिहून वर्गात सादरीकरण व चर्चा करा.**

**ख. तुम्हाला माहीत असलेली किंवा तुम्ही ऐकलेली 'काळ' या विषयाशी संबंधित एखादी कविता किंवा गाणे वर्गात सादर करा.**

**ग. तुम्हाला अचंबित करणारी आणि तुम्हाला आवडलेली एखादी आख्यायिका वर्गात सादर करा.**

## उत्तरसंच

३. ग. अ. बरोबर आ. चूक इ. चूक ई. चूक उ. बरोबर ऊ. बरोबर
ए. चूक ॲ. चूक

३. घ. अ. प्राचीन मानवाच्या संस्कृतीचे विविध पैलू समोर येतात.
आ. त्यात देशाची भरून न येण्यासारखी हानी झाली.
इ. पुरातत्त्वाची भारतातील प्रगती उल्लेखनीय आहे.
ई. ते वर्णन आपल्याला पुरातत्वीय पुराव्यांच्या आधाराशिवाय / धाराविना स्वीकारता येणार नाही.

४. ख. अ. दोन आ. एक इ. दोन ई. तीन

५. ख. अ. सात आ. दहा इ. अकरा ई. आठ उ. सहा ऊ. नऊ
ए. एक ॲ. दोन ऐ. पाच ओ. बारा ऑ. तीन औ. चार

७. क. अ. गाठोडे आ. फडताळ इ. माखली ई. खस-हिना उ. अहेवपणी

७. ख. अ. उगाळून आ. बुडली इ. विसरले ई. हरवल्यावर उ. जागवणं
ऊ. रमून

८. ख. अ. पाणी ओतून घेण्यासाठी आ. मंगल कार्यासाठी इ. पाणी थंड करण्यासाठी
ई. दहिहंडी उत्सवात फोडण्यासाठी

११. घ. अ. अन्नाची योग्य प्रमाणात साठवण केल्यास हिवाळ्यात पोटाची सोय होते.
आ. हे काळभान प्रत्येक संस्कृतीत अत्यंत महत्त्वपूर्ण ठरलं.
इ. मनात दिवसाचे चोवीस तास सकाळ-दुपार-रात्र असे ढोबळपणे विभागलेले असतात.

११. च. अ. कुचराई आ. वेळेचा अपव्यय आहे. इ. अनुलक्षून ई. यांची सांगड कशी घालायची

११. छ. अ. मध्यरात्री आ. रात्रभर इ. दिवसभर ई. दिवसाढवळ्या
उ. दुपारभर ऊ. भरदुपारी ए. दिवस


# हे जग सुंदर आहे ५



देवा, तुझे किती । सुंदर आकाश ॥
सुंदर प्रकाश । सूर्य देतो ॥

माणसाची निसर्गाप्रती असलेली कौतुकाची आणि कृतज्ञतेची भावना व्यक्त करणाऱ्या कविवर्य ग. ह. पाटील यांच्या कवितेतील या ओळी. निसर्गातल्या सर्व घटकांना सामावून घेणारी पर्यावरणपूरक जीवनशैली आपल्या संस्कृतींनी आपल्याला दिली. बारकाईने पाहिले तर लक्षात येते की, जगातील जवळपास सर्वच संस्कृतींमध्ये साजरे होणारे विविध सण, उत्सव हे ऋतुचक्राशी आणि नैसर्गिक बदलांशी जोडलेले आहेत. माणूस निसर्गाचेच एक अपत्य असल्यामुळे खरे तर माणसाचे निसर्गाशी असलेले नाते प्रेमाचे होते. पण गेल्या काही दशकांपासून वाढता चंगळवाद आणि विकासाच्या काही भ्रामक कल्पनांमुळे माणूस व निसर्ग यांच्यातले सौहार्दपूर्ण नाते आता संघर्षाचे बनले आहे. निसर्गाचे अनिर्बंध शोषण करून आणि सर्व नैसर्गिक स्रोतांचे प्रदूषण करून मानव स्वतःच पर्यावरणीय असंतुलनाला कारणीभूत ठरला आहे. त्यातून होणारे नुकसान हे पर्यावरणाचे तर आहेच; परंतु त्याहूनही अधिक मानवाचे आहे. कारण पर्यावरणाचा मानवाच्या शारीरिक, मानसिक स्वास्थ्याबरोबरच त्याच्या संस्कृतीवरही दूरगामी परिणाम होत असतो. या वास्तवाची जाणीव झाली आणि पर्यावरणाची जपणूक करण्याचे कृतिशील भान मानवाला आले, तर हे जग आणखी सुंदर होईल!

## १ पिलू



नवा जीव जन्माला येणं ही घटनाच मोठी आनंददायी असते. मग ते माणसाचं अर्भक असो किंवा पक्ष्याचं पिलू असो. मला वॉल्ट डिस्नेचं एक कार्टून पाहिलेलं आठवतं. बदकी अंडी उबवीत असते. अंड्यातून पिलं बाहेर पडण्याची वेळ आलेली असते. पिलांचा बाप अस्वस्थपणे येरझारा घालत असतो. शेवटच्या घटकेला बदकीकडून अंडी उबविण्यात काही चुकू नये म्हणून तिला सूचना देत असतो, समजावत असतो, धीर देत असतो. केवढी उत्कंठा त्याच्या चेहऱ्यावर ओसंडत असते! पिलं अंड्यातून सुखरूप बाहेर पडतात तेव्हा त्याचा आनंद गगनात मावेनासा होतो आणि बदकीच्या चेहऱ्यावर कृतकृत्यतेचं अपार समाधान पसरतं!

आमच्या घरी आम्ही काही पांढरे शुभ्र हंस पाळलेले आहेत. त्यांच्यापैकी एका हंसीने अंडी घातली. अन्नपाण्याची पर्वा न करता हंसी अंडी उबवू लागली. असा जवळजवळ महिना लोटला. एक दिवस आम्ही पाहिलं तर एक हंस तिच्याजवळ बसून राहिला होता. खायला घातलं तर नेहमीप्रमाणे तो धावत आला नाही. त्या दिवशी त्यानेही अन्नपाण्याची पर्वा केली नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी हंसीच्या जवळ गेलो, तिला थोडं खायला घालावं म्हणून. तिनं नेहमीप्रमाणे मान वेळावली नाही, तर नाजूक आवाज काढून चोच पंखात खुपसली. शुभ्र पंखांखाली सोनेरी लोकरीचे चार चेंडू मला दिसले. आठ चिमुकल्या डोळ्यांनी माझ्याकडे पाहिलं आणि ते चेंडू आईला आणखीनच बिलगले. हंस हे सर्व लक्षपूर्वक पाहात होता. त्याच्या चेहऱ्यावर समाधान होतं, आनंद होता आणि किंचित काळजीही होती. मी पिलांना काही करणार नाही ना, अशी!

पुष्कळदा पक्ष्यांच्या जीवनातला परमोत्कर्षाचा बिंदू, परमसुखाचा क्षण म्हणजे पिलाचा जन्म. पिलाला जन्म देण्यासाठीच पक्षी आणि पक्षीण एकत्र येतात. पिलाच्या संगोपनाची जबाबदारी संपली की ते दूर जातात आणि ही मोठी जबाबदारी पार पाडताना वाटेल त्या खस्ता आनंदाने खातात, प्रसंगी जीव पणास लावतात. मला लडाखमधली क्रौंची आठवली. हान्ले गावाजवळ नदी वाळवंटातून वळणे घेत वाहते. तिच्या भुजा वाळवंटात पसरल्या आहेत. अशा एका प्रवाहात जलवनस्पतींचा ढिगारा करून क्रौंच आणि क्रौंचीने घरटे बांधले होते. ते आळीपाळीने आपली दोन अंडी उबवीत होते. एक दिवस हवा अचानक बिघडली. हिमवृष्टी सुरू झाली. क्रौंची घरट्यात बसून होती. रात्रभर हिमवृष्टी चालू होती. नदी गोठून गेली. क्रौंचीच्या पिसावर बर्फ साचे, तो ती झटकून टाकी. रात्रभर ती अंड्यांवरून हलली नाही. दिवस उजाडताच ती उठली. आखडलेलं अंग तिनं मोकळं केलं आणि बाजूच्या निसरड्या बर्फावर आपला तोल सांभाळीत ती न्याहारी शोधण्यासाठी दूर जाऊ लागली. इतका वेळ तिच्या शेजारी घरट्याचे संरक्षण करीत उभा राहिलेला क्रौंच आता घरट्यावर गेला आणि अंडी उबवू लागला.



अंडी उबविण्याचे काम फक्त पक्षीण करते असे नाही तर पक्षीही तिला मदत करतो किंवा स्वत:ही ही जबाबदारी पेलतो. एम्परर पेंग्विन हे पक्षी अंटार्क्टिकाच्या बर्फाळ

प्रदेशात राहतात. पेंग्विन पक्षीण एकच अंडे घालते आणि ते पक्ष्याच्या हवाली करते. हा पक्षी ते अंडे आपल्या दोन पायांवर ठेवतो. त्याची दाट पिसे ते अंडे झाकून त्यांना ऊब देतात. अंडे पायांवर ठेवले की पेंग्विन पक्ष्याची तपश्चर्या सुरू होते. ते अंडे सोडून त्याला कुठेही हलता येत नाही. मग हे पंधरावीस नरपक्षी एकत्र येतात. एकमेकांना खेटून उभे राहतात. या सुमारास अंटार्क्टिकाचा भयानक हिवाळा सुरू होतो. तपमान शून्याच्या खाली १५० ते २०० सेंटिग्रेडपर्यंत उतरते. हिमवादळे थैमान घालतात, सर्वत्र अंधार पसरतो. जिथे मानवाला जगणे अशक्य होईल अशा वातावरणात थंडी आणि वादळाशी सामना देत ते पक्षी जवळपास दोन महिने एका जागी स्तब्ध उभे असतात. एकमेकांच्या शरीराची ऊब एकमेकांना लागेल तेवढीच. आपल्या पायांवरचे अंडे सोडून अन्नपाण्यासाठीही त्यांना कुठे जाता येत नाही. दोन महिने पुरे होतात न होतात तोच अंड्यातून पिलू बाहेर पडते. याच सुमारास आतापर्यंत दूर गेलेली मादी परत येते, नर तिच्या हवाली पिलू करतो आणि स्वत:चा उपास सोडण्यास बाहेर पडतो.

मला नेहमीच आश्चर्य वाटत आलं आहे की, अशा प्रकारची प्रचंड शक्ती, सहनशीलता, अचाट ताकद या चिमुकल्या जिवांच्या शरीरात कोठून पैदा होत असावी? कशाच्या प्रचंड ओढीनं पक्षी पाचसहा हजार किलोमीटर स्थलांतर करतात? वाटेत महासागर, वाळवंटे, उत्तुंग पर्वत ओलांडतात. जिवावरची संकटं लीलया झेलतात, त्यात स्वत:चे बळी देतात?

स्थलांतर करून पक्षी आपल्या जन्मभूमीकडे परत येतो. गेली हजारो वर्षं हे चक्र चालू आहे. हिवाळ्याच्या सुमारास पक्षी दक्षिणेकडे स्थलांतर करतात, तर उन्हाळ्याची चाहूल लागते न लागते तोच ते आपल्या जन्मभूमीकडे परतू लागतात. प्रथम परत येणारे बहुधा नरपक्षी असतात. ते जन्मभूमीकडे परत येताच स्वत:ची अशी एक जागा नक्की करतात. त्या जागेचं इतरांपासून रक्षण करतात, ती जागा आपली आहे हे दाखविण्यासाठी इतरांशी भांडतात. कालांतराने पक्षिणींचे थवे या ठिकाणी दाखल होतात. जे जागेचे मालक असतात, अशांमधूनच त्या आपल्या सहचरांची निवड करतात. मग त्या दोघांची मैत्री जमते, मैत्रीचं रूपांतर प्रेमात होतं. तो तिला आपल्या गोड गाण्याने, नृत्याने किंवा सुंदर पिसाऱ्याच्या दर्शनानं खूष ठेवतो. ती आनंदानं ते सारं स्वीकारते. त्याच्या गळ्यात गळा घालते. त्यानं आपल्याला भरवावं म्हणून हट्ट धरते आणि जेव्हा इतरांशी भांडण्याचा, लढण्याचा प्रसंग येतो तेव्हा त्याला साथही देते. अशा गाढ मैत्रीची परिणती अर्थातच प्रणयात होते आणि त्यांचं मीलन होतं. मग कधी दोघं घरटं बांधतात, कधी तो एकटाच बांधतो किंवा कधी ती एकटी बांधते आणि तो शेजारी उभा राहून चिवचिव करून तिचं मनोरंजन करून तिचे कष्ट हलके करतो.



आपण माणसं जेव्हा हे सर्व पाहतो, पक्ष्यांच्या हालचालीचा, वर्तणुकीचा अभ्यास करतो, तेव्हा आपल्याला हे कळतं, की या सर्व गोष्टींची योजना निसर्गानेच केली आहे. त्यानंच पक्षी-पक्षिणींना एकत्र येण्यास, एकमेकांवर प्रेम करण्यास प्रवृत्त केलं. कारण त्याला त्याचा कार्यभाग या दोघांच्याकडून साधून घ्यायचाय. या दोघांच्या मीलनातून पुढची पिढी जन्माला घालायचीय, निसर्गाची सारी चक्रं अव्याहतपणे, अबाधितपणे चालू ठेवायची आहेत, पक्षी आणि पक्षीण, सृष्टीतला कोणताही जीव ही निसर्गाच्या हातातली निव्वळ खेळणी आहेत!

पण माणूस मात्र या सर्वांपासून, या नैसर्गिक शक्तींपासून जास्तीत जास्त अलिप्त, निराळा होत चाललाय. त्याला या नैसर्गिक शक्तीचे विचार, हेतू कळतात. कारण त्याला स्वत:ची बुद्धी आहे. त्याला स्वार्थ समजतो, त्याचा स्वत:चा, तो राहतो त्या समाजाचा, अनेक समाज एकत्र आले की जे राष्ट्र बनते त्या राष्ट्राचा! असे अनेक स्वार्थ आहेत की जे नैसर्गिक शक्तींना न जुमानता कार्य साधण्यास तयार आहेत. ज्या अस्त्रांनी निसर्ग इतर जिवांच्या संख्येचं नियंत्रण करतो, ती अस्त्रं मानवानं पुष्कळशी निष्प्रभ करून टाकलेली आहेत. निसर्गावर आपण केवढा विजय मिळवला अशी घमेंड माणसाला आहे. पण मनात असाही विचार येतो, की निसर्गाच्या बंधनातून मुक्त झालेला माणूस काही मूलभूत नैसर्गिक गोष्टी विसरत तर चालला नाही? काही अदृश्य शक्तींनी पक्षी आणि पक्षीण एकत्र येतात. केवढं निर्व्याज, प्रामाणिक प्रेम करतात ती एकमेकांवर! स्वार्थाचा या प्रेमाला जरासुद्धा वास येत नाही. कारण ज्या गोष्टीत त्याची परिणती होणार, ती गोष्ट निसर्गाने ठरवून टाकलेली असते आणि वैयक्तिक स्वार्थ या निसर्गधारणेत बसूच शकत नाही. असं प्रेम माणूस करू शकेल का? अलौकिक मानवी प्रेमाच्या कथा फिक्या पडाव्यात अशा घटना, अशा गोष्टी निसर्गात दररोज, दरवर्षी घडत असतात. त्या ज्याला पाहायला मिळतील तो भाग्यवान. मानव हा सर्वश्रेष्ठ प्राणी आहे, असा अहंकार त्या वेळी गळून पडतो.

प्रकाश गोळे

**क. पुढील विधाने चूक की बरोबर ते ओळखून त्याप्रमाणे खुणा करा. जर विधान उताऱ्याशी जुळत नसेल तर त्यात सुधारणा करा.**

| | चूक | बरोबर |
|---|---|---|
| अ. लडाखमध्ये हिवाळ्यात तापमान उणे १०० ते १५० सेंटिग्रेडपर्यंत खाली जाते. | | |
| आ. पेंग्विन पक्ष्यांचे नर त्यांच्या शरीराच्या उबेने अंडी उबवतात. | | |
| इ. पक्ष्यांचे स्थलांतर दक्षिण गोलार्धातून उत्तर गोलार्धात होते. | | |
| ई. प्रजातीचे सातत्य अबाधित राखणे हा निसर्गाचा हेतू असतो. | | |
| उ. मानवी संबंध प्रेम आणि स्वार्थावर आधारित असतात. | | |

**ख. पुढे दिलेल्या वाक्प्रचारांचा त्याखालील वाक्यांमध्ये योग्य उपयोग करा.**

(परिणती होणे, फिके पडणे, दाखल होणे, जीव पणास लावणे, खस्ता खाणे, निष्प्रभ होणे, प्रवृत्त करणे, घमेंड असणे, पर्वा करणे, आनंद गगनात न मावणे)

**वाक्प्रचारांचा अर्थ :**

परिणती होणे – निष्पत्ती होणे किंवा शेवट होणे, फिके पडणे – कमी पडणे, दाखल होणे – हजर होणे, जीव पणास लावणे – जीव धोक्यात घालणे, खस्ता खाणे – खूप कष्ट करणे, निष्प्रभ होणे – प्रभावहीन होणे, प्रवृत्त करणे – भाग पाडणे, घमेंड असणे – गर्व असणे, पर्वा करणे – तमा बाळगणे, आनंद गगनात न मावणे – अतिशय आनंद होणे

उदा. आपला ------------- ------------- झाल्यावर अनेक जण काहीच संपर्क ठेवत नाहीत.
उत्तर : आपला **कार्यभाग साधून** झाल्यावर अनेक जण काहीच संपर्क ठेवत नाहीत.

अ. विद्यापीठाच्या परीक्षेत सुवर्णपदक मिळाल्यामुळे सागरचा ----------- ----------- -----------.

आ. तरुण मुलं पालकांच्या सांगण्याची फारशी ------------- ------------- नाहीत असं त्यांच्या पालकांना वाटत असतं.

इ. छत्रपती शिवाजीमहाराजांनी गनिमी काव्याने लढून शत्रूसैन्याला ------------- -------------.

ई. त्या दोघांच्या सततच्या भांडणांची ------------- अखेरीस घटस्फोटात -------------.

उ. श्रीमंती जरूर असावी, पण त्याची ------------- ------------- नये.

ऊ. नेत्याच्या चिथावणीखोर भाषणामुळे कार्यकर्ते कायदा हातात घ्यायला ------------- -------------.

ए. अर्जुनाच्या धनुर्विद्येतील कौशल्यापुढे कर्णाचे कौशल्य ------------- -------------.

ॲ. अनसूयाबाईंनी मुलांच्या शिक्षणासाठी फार ------------- -------------.

ऐ. एव्हरेस्ट सर करणारे गिर्यारोहक आपला ------------- ------------- -------------.

ओ. कालच नवे वरिष्ठ अधिकारी कार्यालयात ------------- -------------.

**ग. तुमच्या सहाध्यायीला पुढील प्रश्न विचारा. तुमची व त्याची उत्तरे पुढील तक्त्यात लिहा व नंतर टिपण स्वरूपात वर्गात सादर करा.**



| | | तुम्ही | सहाध्यायी |
|---|---|---|---|
| १. | घरात प्राणी / पक्षी पाळणे तुम्हाला योग्य वाटते का? | ---------- | ---------- |
| २. | तुम्ही पाळला असल्यास त्यासंबंधातील एखादा विशेष अनुभव सांगा. | ---------- | ---------- |
| ३. | पशुपक्ष्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात पाहणे, की प्राणीसंग्रहालयात पाहणे तुम्हाला अधिक आवडते? का? | ---------- | ---------- |
| ४. | तुम्ही एखाद्या अभयारण्याला भेट दिली आहे का? | ---------- | ---------- |
| ५. | पशुपक्ष्यांविषयी काम करणाऱ्या संस्था तुम्हाला माहीत आहेत का? तुम्ही अशा एखाद्या संस्थेचे सदस्य आहात / होतात का? | ---------- | ---------- |



## २ दृश्यफीत

**विख्यात पक्षीनिरीक्षक किरण पुरंदरे यांची त्यांच्या पक्षीनिरीक्षणाविषयीची चित्रफीत पाहा.**
**क. या चित्रफितीतील वक्त्याचे कोणते गुणविशेष तुम्हाला आढळले ते सविस्तर लिहा.**
**ख. कोणतेही तांत्रिक उपकरण सोबत नसताना किरण पुरंदरे पक्षीनिरीक्षण कसे करत?**
**ग. तुमच्या सहाध्यायाला पुढील प्रश्न विचारा. हो किंवा नाही या उत्तरांबरोबरच त्याची कारणमीमांसा करायला सांगा. त्याने दिलेल्या उत्तरांचे एक टिपण तयार करून त्याविषयी तुम्ही वर्गात बोला.**



- तुम्हाला जंगलांमध्ये भटकंती करायला आवडते का?
- वाढते वन्य पर्यटन माणसांना निसर्गाच्या अधिक जवळ नेते आहे, असे तुम्हाला वाटते का?
- वाढत्या वन्य पर्यटनामुळे नैसर्गिक अधिवासांना धोका पोहोचतो, असे तुम्हाला वाटते का?
- ‘हल्लीचे निसर्गपर्यटन हा छंद कमी आणि फॅशन जास्त’ हे विधान तुम्हाला पटते का?
- पक्षिनिरीक्षण, प्राणिनिरीक्षण यातून काय मिळते असे तुम्हाला वाटते?



## ३ प्रकाश

प्रकाश हा प्रकाश म्हणून जाणवण्याचे आपले क्षण आता मर्यादित झाले आहेत. एरवी नेहमीच तो आपणांभोवती पसरलेला असतो आणि म्हणून त्याच्यासंबंधी आपली जाणीवही अगदी निबर* झालेली असते. “भरपूर असावा!” एवढीच सामान्यतः आपली त्याच्याबद्दलची अपेक्षा. तोंडात घातलेला घास नाकात गेला नाही, पायाला ठेच लागून जीव कळवळला नाही आणि गल्लीचे टोक ओलांडून वळताना वळचणीला* उभ्या असलेल्या गायीच्या अंगावर आदळले नाही, म्हणजे झाले. प्रकाश भरपूर हवा! आमच्या मागच्या बाजूच्या रस्त्यापलीकडे एक तीन मजली इमारत आहे. तिच्या तिसऱ्या मजल्यावर एक सिंधी बिऱ्हाड* आहे. ते लोक व्हरांड्यात दिवा लावतात आणि इकडे माझ्या बैठ्या घराच्या खिडकीत बसून मी त्या प्रकाशात वाचतो. खूप, भरपूर प्रकाश आहे! नवीन बांधलेल्या घरांत जावे. खोल्या रखरखीत, कर्कश वाटतात. रात्री मध्यभागी टांगलेल्या दिव्याच्या भक्कन पडलेल्या प्रकाशात खायला उठतात. आपण स्वतःच त्या दिव्याच्या काचेत गेल्यासारखे वाटते. त्या प्रकाशाने खोलीतल्या साऱ्या वस्तू अगदी निर्जीव

होऊन जातात. शहराच्या गजबजलेल्या भागांत रात्री जावे; वीज-अळ्यांनी* व रंगीत नळ्यांनी घातलेल्या हैदोसाने साऱ्या भागाचे रूप बकाल, हिडीस होऊन गेलेले असते. जणू वाकड्यातिकड्या जळवाच* गावाच्या अंगाला चिकटल्या आहेत. प्रकाश खूप असतो. त्याचा पडघम* वाजत असतो आणि सारे संगीत लोपून जाते.

माधव आचवल

**शब्दार्थ**

निबर – टणक
वळचण – छपराचा भिंतीबाहेरील भाग
बिऱ्हाड – कुटुंब
वीज-अळ्या – वेटोळ्यांची (spiral) ट्यूबलाईट
जळवा – जळू हा प्राण्यांचे-माणसांचे रक्त पिणारा अळीसारखा एक कीटक आहे. त्याचे अनेकवचन
पडघम – पूर्वी युद्धभूमीवर वाजवले जाणारे मोठ्या आवाजाचे चर्मवाद्य; नगारा

**क. 'प्रकाश खूप असतो. त्याचा पडघम वाजत असतो आणि सारे संगीत लोपून जाते.' या वाक्याचा अर्थ तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.**

**ख. तुमच्या संस्कृतीमध्ये प्रकाशाला कोणते स्थान आहे? त्यासंबंधी काही प्रथा-परंपरा, समजुती असल्यास त्याबद्दल बोला. उदाहरणार्थ, मराठी घरांमध्ये संध्याकाळी दिवा लावल्यावर त्याला नमस्कार करावा, प्रार्थना म्हणावी, तेलाचा दिवा फुंकर घालून विझवू नये, तो हाताने वारा घालून विझवावा अशा अनेक पारंपरिक पद्धती आहेत. दिवा हे जीवनाचे, मांगल्याचे प्रतीक असल्याने तो पवित्र मानतात.**

**ग. 'प्रकाश' या शब्दाच्या शब्दक्षेत्रातील काही शब्द आणि वाक्प्रचार पुढे दिले आहेत. त्यांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करा आणि त्यांना अकारविल्हेनुसार क्रमाने (वर्णक्रमाने) लावा.**

| नाम | विशेषण | क्रियापद / वाक्प्रचार |
|---|---|---|
| | | |



उजेड, उष:काल, पहाट, उगवती, पूर्व, किरण, तेज, तेजस्वी, सूर्य, प्रभा, दिवस, झगमग, लखलख, झगमगाट, लखलखाट, चमक, चमकदार, उजाळा, प्रकाशझोत, तेजोवलय, उज्ज्वल, उजळ, सतेज, प्रखर, भगभगीत, झगझगीत, तीव्र, संधिप्रकाश, दिवेलागण, कातरवेळ, चंद्र, चांदोबा, चंद्रप्रकाश, चांदणी, तारा, तारका, कवडसा, सावली, छाया, अंधार, काळोख, पौर्णिमा, अमावस्या, झुंजूमुंजू होणे, तांबडे फुटणे, उजळणे, प्रकाशमान होणे, प्रकाशणे, मंदावणे, सांजावणे, अंधारणे, मावळणे, दिवा, निरांजन, समई, पणती, लामणदिवा, वात, कंदील, झुंबर, मशाल, मेणबत्ती, विजेरी, आतषबाजी, दिवा लावणे, तेवणे, जाळणे, मालवणे, विझवणे, डोळे दिपणे, ज्वाळा, दीपोत्सव, दिवाळी, दिव्यांची आरास, प्रकाश पडणे, दिवे लावणे, दिवे पाजळणे

**घ. वरील यादीतून पुढे दिलेल्या अर्थांशी जुळणारे वाक्प्रचार शोधून लिहा. एका अर्थाचे दोन वाक्प्रचार असू शकतात.**

एक. समजणे, आकलन होणे

दोन. मोठा पराक्रम करून दाखवणे, कर्तृत्व गाजवणे

तीन. पहाट होणे

चार. आश्चर्य वाटणे









## ४ चिंता 'प्रकाशा'च्या प्रदूषणाची



वायू, जल आणि ध्वनिप्रदूषणाबरोबरच 'प्रकाश'प्रदूषणातही दिवसेंदिवस वाढ होत आहे. उंच इमारती, प्रकाशाची आरास यामुळे मोठ्या प्रमाणावर 'प्रकाशा'चे प्रदूषण होत आहे. माणसांबरोबरच पशु-पक्ष्यांनाही याचा धोका आहे. प्रकाशाच्या प्रदूषणाचे पुढीलप्रमाणे दुष्परिणाम आहेत :

- वनस्पती आणि प्राण्यांमध्ये जनुकीय बदल होणे.
- प्राण्यांच्या झोपण्याच्या कालावधीवर दुष्परिणाम होणे.
- निशाचर प्राणी आणि पक्ष्यांच्या जीवनपद्धतीत बदल होणे.
- मानवाला लठ्ठपणा, औदासीन्य, झोपेचे विकार, मधुमेह इत्यादी आजार जडणे.

**क. 'प्रकाशाचे प्रदूषण' होण्यास पुढील गोष्टी कारणीभूत ठरतात. त्यावर गटात चर्चा करा.**

**प्रकाशाचे प्रदूषण**

- हमरस्त्यांवरील जाहिरातींचे रात्रभर उजळलेले फलक
- अव्याहतपणे सुरू असणारी वाहतूक
- वाहनांचे प्रखर दिवे
- कामांचे बदललेले स्वरूप व वेळा
- बदललेल्या मनोरंजनाच्या वेळा
- उपलब्ध फावला वेळ
- रात्री करावी लागणारी विविध प्रकल्पांची कामे
- चोवीस तास सुरू ठेवाव्या लागणाऱ्या सेवा
- कायदा व सुव्यवस्था सुरक्षित राखण्याची आवश्यकता
- विकासाच्या कल्पना

**ख. प्रकाशाचे प्रदूषण कसे कमी करता येईल, असे तुम्हाला वाटते? या बाबतीत तुमच्या सहाध्यायींबरोबर चर्चा करून उपाय सुचवा.**

**ग. झगझगीत, प्रखर, भगभगीत, लख्ख, अंधारी, काळोखी ही विशेषणे प्रकाशाशी संबंधित आहेत. त्यांचा पुढील वाक्यांत योग्य जागी उपयोग करा.**

उदा॰ इतक्या **मंद** प्रकाशात वाचणे डोळ्यांसाठी चांगले नाही.

अ. चित्रीकरणासाठी अत्यंत ----------- प्रकाशझोत वापरतात.

आ. ती जागा फारच ----------- आणि कोंदट आहे.

इ. आज कित्येक दिवसांनंतर इतका ----------- सूर्यप्रकाश पडलाय!

ई. हल्लीच्या नवीन गाड्यांच्या ----------- दिव्यांचा समोरच्या वाहनचालकाला त्रास होतो.

उ. अमावास्येची ----------- रात्र आणि निर्जन रस्ता! कोणाला भीती वाटणार नाही?

ऊ. खिडकीतून येणाऱ्या ----------- उजेडामुळे या खोलीला पडदे लावणे अत्यावश्यक आहे.

## ५ प्रकाश – निराळ्या दृष्टिकोनातून

प्रकाशाबद्दलचे कुतूहल फक्त भौतिकशास्त्रज्ञांनाच आहे असे नाही. प्रकाशाचा शोध मनोवैज्ञानिक व डॉक्टरपण घेत आहेत. [...] मनोवैज्ञानिकांना असे आढळून आले की, मद्यपी व इतर मादक पदार्थांचे सेवन करून दंगामस्ती करणाऱ्या लोकांना भडक गुलाबी रंग दिलेल्या खोलीत बसवून त्यांच्या अंगावर तशाच प्रकारचे झोत सोडल्यास ते काही वेळाने शांत होतात. एवढेच नाही, तर त्यांना झोपपण येऊ लागते.

रंगात काहीतरी गूढ शक्ती आहे अशी पूर्वापार समजूत आहे. सर्वसामान्य माणूससुद्धा नकळत मन व रंग यांच्यातले नाते मान्य करतो. आपण भविष्याची चित्रे नेहमी गुलाबी रंगवतो, तर निराशा काळ्या रंगाची — अंधारी मानली जाते. या समजुतीत काही तथ्य आहे असे आता मनोवैज्ञानिकांनासुद्धा वाटू

लागले आहे व त्या दृष्टीने संशोधन चालू आहे. आणि त्यांची खात्री होत चालली आहे की काही काही रंगांचा आपल्या वागणुकीवर, विचारांवर, शरीरावर, स्वभावावर जबरदस्त पगडा बसतो – परिणाम होतो.

प्रकाशाचा रंग हा एक ऊर्जेचा प्रकार आहे. त्याच्या तरंगलहरी असतात व त्या डोळ्याने ग्रहण केल्या की मेंदूमध्ये रासायनिक क्रिया होऊन प्रकाशाच्या रंगाची जाणीव उत्पन्न होते.

प्रकाशाचे रंग नुसत्या डोळ्यांनाच दिसतात असे नाही; तर मनालापण दिसतात, मनावर परिणाम करतात. निरनिराळ्या प्रकाशात उंदरांना ठेवून प्रयोग करण्यात आले. हिरव्या रंगाच्या प्रकाशात उंदरांच्या हालचाली मंद झाल्याचे आढळून आले, तर लाल रंगाच्या प्रभावाखाली उंदीर सर्व हालचाली मोठ्या चपळतेने करत आहेत असे दिसले. शेवाळ्यासारख्या काही खालच्या जातीच्या वनस्पतींची वाढ लाल रंगात जास्त होत असल्याचे आढळले. काही पक्ष्यांमध्ये व उंदरांमध्ये हार्मोन्सची वाढ होऊन प्रजोत्पादनाची इच्छा तीव्र झाल्याचे आढळून आले. मेंदूतील (विद्युत प्रवाहाने काढलेले) आलेख लाल रंगाच्या प्रभावाखाली बदलतात. एवढेच नव्हे, तर माणसाच्या शरीराच्या कातडीतून जाणारा विद्युतप्रवाहसुद्धा बदलतो. [...] प्राणिशास्त्रज्ञांना असे आढळून आले आहे की, मासे व इतर सरपटणारे सरड्यासारखे काही प्राणी आपल्या दुसऱ्या बांधवांना संकटाचा इशारा देण्यासाठी रंग बदलतात व तो रंगाचा बदल पाहून दुसऱ्या प्राण्यांच्या शरीराचा रंगपण बदलतो व अशा प्रकारे संकटाचा इशारा सगळीकडे पोहोचवला जातो. काही प्राणी माजावर आले असताना रंग बदलून आपल्या प्रजातीतील विरुद्धलिंगी प्राण्याला आकर्षित करतात.

आपण माणसे बरीच उत्क्रांत पावलेलो आहोत. म्हणून आपल्यात असे काही भावानोद्रेकाचे परिणाम रंग बदलून दृश्य होत नाहीत, असे वाटते. पण ते चूक आहे. भीतीने आपण पांढरेफटक पडतो, शरमेने काळवंडतो, तर प्रेमामुळे आपल्या गालावर गुलाब फुलतो – हे नुसते वाक्प्रचार नसून आपल्या चेहऱ्याचा रंग बदलतो हे सत्य आहे. हे सर्व आपल्या मनोव्यापाराचे, भावनांच्या उद्रेकाचे आपोआप झालेले रंगफरक नाहीत तर काय? रक्ताभिसरणात बदल होऊनही हे फरक दृश्य होत असतील, पण रक्ताभिसरणात बदलसुद्धा भावनाविष्कारच नव्हे का?

व्यापारी लोक आपल्या मालाच्या उठावासाठी कोणत्या रंगाचे पॅकिंग वापरावे याचा सल्ला मनोवैज्ञानिकांना जबर फी देऊन घेत असतात. सर्वसाधारणपणे लाल व पिवळ्या रंगाला या बाबतीत प्राधान्य मिळते. या रंगाचे पॅकिंग हे प्रत्यक्ष असलेल्या आकारापेक्षा आकार मोठा असल्याचा भास निर्माण करते. निळा रंग समाधान व मनाची शांती वाढवतो तर गडद निळा रंग संरक्षणाची भावना वाढवतो, असे मनोवैज्ञानिकांचे याबद्दलचे निरीक्षण आहे. पिवळा रंग आधुनिकतेची आवड, कार्यक्षमता यांच्याशी संलग्न असल्याचे आढळून आले आहे. लाल रंग सत्ता, जिंकण्याची जिद्द, चैतन्य यांचा द्योतक, तर पारवा रंग स्वतःविषयी अभिमान उत्पन्न करतो. लहान मुलांना भडक रंगाची आवड असते, तर प्रौढ माणसे जरा फिकट रंग पसंत करतात. माणूस कोणत्या रंगाचे कपडे पसंत करतो, त्याच्या घरातील सजावटीत कोणत्या रंगाचे प्राबल्य आहे, त्यावरून त्याच्या स्वभावाचा मनोवैज्ञानिक अंदाज बांधू शकतात.

पु॰ श्री॰ लेले

**क. आवडता रंग आणि स्वभाव यांच्यात नाते असते, असे वरील उताऱ्यात म्हटले आहे. प्रत्येक संस्कृतीगणिक रंगांचे अर्थ व महत्त्व वेगळे असू शकते. ठरावीक रंग आवडणाऱ्या व्यक्ती आणि त्यांचा स्वभाव यातील संबंध जैविक असतो की सांस्कृतिक असतो? तुम्हाला काय वाटते? तुमची मातृभाषा / प्रांत / संस्कृतीमधील उदाहरणे देऊन याबाबतीतले तुमचे मत लिहा. (२५०-३०० शब्द)**

**ख. पुढे दिलेल्या अर्थाचे उताऱ्यातील शब्द शोधून लिहा.**

उदा॰ जोडलेले

उताऱ्यातील शब्द : **संलग्न**

अ. उत्सुकता

आ. समजण्यास अवघड; अनाकलनीय

इ. खूप

ई. भावनांचे प्रकटीकरण

उ. निदर्शक

ऊ. बऱ्याच काळापासून चालत आलेली

## ६ आंतरिक पर्यावरणाची हानी

**पुढे दिलेल्या उताऱ्यातील प्रत्येक चौकटीसाठी खालीलपैकी योग्य शीर्षक निवडा.**

कोलाहल | मनोकायिक आजार | दळणवळण | संकीर्णता

समायोजनाचे आव्हान | प्रदूषण | वेगे वेगे धावू | ऊर्जा

**विषय प्रवेश**

*'पर्यावरण' म्हटलं की, आपल्या डोळ्यापुढे बहुदा बाह्य पर्यावरणच येते. पण, असंच एक 'आंतरिक पर्यावरण'ही आहे, आणि ते बाह्य पर्यावरणाशी अतूटपणे जोडलेलं आहे, हे आपल्या सहसा लक्षात येत नाही. बाह्य पर्यावरणात काय घडतं याचे परिणाम आपल्या शरीरावर, मनावर, अगदी विचारांवरसुद्धा होत असतात. मग, अडीचशे वर्षांची ही जी विकास प्रक्रिया आहे, हा जो ऊर्जा वापर आहे, त्याचे कोणते हानीकारक परिणाम आंतरिक पर्यावरणावर झालेले आहेत?*

**चौकट क**

शारीरिक दुष्परिणामांचा विचार करायचा, तर इतक्या प्रचंड प्रमाणातल्या ऊर्जावापरामुळे हवा-पाणी-जमीन यांचं जे प्रदूषण, विषीभवन झालेलं आहे, ती सारी विषं आपल्याही शरीरात शिरलेली आहेत, आपल्याला ती सतत पोखरत आहेत, हळूहळू ठार करत आहेत. ही विषं श्वासातून, पाण्यातून, अन्नातून, त्वचेतून अशी सर्व मार्गांनी शरीरात शिरतात. एक साधं शिशाचं उदाहरण घेऊ. आपण पेट्रोल मोठ्या प्रमाणावर वापरतो. त्यात काही विशिष्ट हेतूनं शिसं (Tetra-Ethyl-Led) मिसळलेलं असतं. मोटारींच्या धुरातून ते बाहेर टाकलं जातं नि हवेत मिसळतं. त्याच हवेत आपण राहतो. अशाच प्रकारे अक्षरश: हजारो विषारी द्रव्यं, रसायनं, घटक आपल्या शरीरात प्रवेश करत असतात. कधी वरच्या उदाहरणाप्रमाणे थेट ऊर्जावापरामुळे, तर कधी ऊर्जावापरातून होणाऱ्या अन्योन्य प्रक्रियांमुळेच ही विषं तयार होत आहेत. अडीचशे वर्षांपूर्वी ती अस्तित्वात नव्हती.

**चौकट ख**

असंच प्रदूषण ध्वनीचं. निसर्गात ते तात्कालिक आणि अत्यंत दुर्मीळ असतं. आपल्या ऊर्जावापरामुळे मात्र ते आता स्थायी बनलं आहे. ऊर्जेमुळे मोटारींची घरघर आहे, रूळगाड्यांचा खडखडाट आहे, विमानांचा भयकंपित करणारा आवाज आहे, घरोघरीचे रेडिओ- टीव्ही- मिक्सर आहेत, लाउडस्पीकर आहेत, जनरेटर आहेत, असंख्य प्रकारची यंत्रसामग्री आहे. ह्या साऱ्यांमुळे किती ध्वनिप्रदूषण होतं! ऊर्जावापराच्या वाढीशी समांतर अशी त्यातली वाढ आहे. हे प्रदूषण शारीरिक हानी करतं, मन-मेंदूवरही दुष्परिणाम करतं, कानांना इजा होऊन बधीरपणा येतो, चिडचिड वाढते, विचार करण्याची मेंदूची शक्ती घटते.



**चौकट ग**

ऊर्जावापराचा फार मोठा परिणाम आपल्या मनावर झाला आहे – होतो आहे. हा परिणाम म्हणजे मनावरचा ताण वाढणं. त्याची कारणमीमांसा अशी आहे : ऊर्जा (आणि अर्थातच तंत्रज्ञानही) मोठ्या प्रमाणात वापरल्यानं मानवी जीवनात तीन बाबतीत प्रचंड वाढ झाली आहे : १. जीवनाची गती, २. जीवनाचं क्षेत्र आणि ३. जीवनातली गुंतागुंत.

**चौकट घ**

तीनशे वर्षांपूर्वीच्या माणसाच्या जीवनाची गती आणि आजच्या आपल्या जीवनाची गती यांचा एकाच वेळी विचार केला, तर आपल्याला विरोधाभासी पद्धतीनं आजची प्रचंड गती क्षणार्धात जाणवेल. गेल्या पन्नास वर्षांत तर ही गती अतिप्रचंड वाढली आहे. किंबहुना, अगदी आजही एखाद्या महानगरातल्या जीवनाची गती आणि एखाद्या खेड्यातल्या जीवनाची गती यांची तुलना केली, तर ऊर्जा वापर आणि ती गती ह्यातली समांतरता कुणालाही जाणवेल.

**चौकट च**

जीवनाचं क्षेत्रही तीनशे वर्षांत असंच विस्तारत गेलं आहे. ऊर्जेच्या अभावी त्यापूर्वीचं जीवन प्राय: स्थानिक होतं. देशांतर्गत वा आंतरराष्ट्रीय व्यापार नव्हता असं नाही, पण त्याचं प्रमाण अत्यल्प होतं. उत्पादित ऊर्जा उपलब्ध झाल्याबरोबर वाहतुकीच्या साधनांत झपाट्याने वाढ होऊन सर्व प्रकारची वाहतूक वाढली. माणसं, कच्चा माल, पक्का माल; सारं काही मोठ्या प्रमाणात इकडून तिकडे जाऊ लागलं. सध्याचं युग हे 'जागतिकीकरणा'चं आहे. जीवनाच्या विस्तारलेल्या क्षेत्राचं वर्णन करणारा तो चपखल शब्द आहे.

**चौकट छ**


गती आणि क्षेत्र वाढल्यामुळे जीवनातली गुंतागुंत, जटिलता तीनशे वर्षांत प्रचंड वाढली. वस्तू, पैसे, माहिती, संदेश इत्यादींची वाहतूक, देवाणघेवाण प्रचंड प्रमाणावर होऊ लागली. गेल्या दोन-तीन दशकांत तर संगणक ही एक अत्यावश्यक बाबच बनून गेली आहे : ती जटिलतेची निर्देशक आहे.

**चौकट ज**

वरील तीनही वाढींना 'विकास' असं म्हटलं जातं खरं; पण वस्तुत: त्या वाढींनी मानवी क्षमतांच्या मर्यादा ओलांडल्यानं त्या शरीर-मनाला आतून अक्षरशः पोखरताहेत : आपली शरीरं दुबळी, अ-प्रतिकारक्षम, रोगग्रस्त बनत आहेत, तर, मनावरचा ताण प्रचंड वाढून मनोजन्य शारीरिक व्याधींचा अक्षरशः स्फोट झाला आहे. आपण वाहनं (ऊर्जा!) वापरतो, त्यामुळे पायांची चालण्याची क्षमता कमी झाली आहे, अन् तशीच ती पोटाची अन्न पचवण्याची, आतड्यांची मलनि:सारणाची, डोळ्यांची बघण्याचीही कमी झाली आहे. 'रात्रीचा दिवस' करण्याची सोय (!) उपलब्ध झाल्यानं शरीराचं चक्र (Circadian rhythm) बिघडलं आहे. आपण किती वाढीव गती, क्षेत्र वा गुंतागुंत स्वीकारू शकतो ह्याला एक मर्यादा आहे. ती ओलांडली गेल्यानं मनावरचा ताण आणि त्यामुळे मानसिक असंतुलन वाढत गेलं आहे. ह्यामुळे मानसिक आजारांतही प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे आणि मनोजन्य शारीरिक व्याधीतही. हृदयविकार, उच्च रक्तदाब, मधुमेह, कर्करोग, दमा, आम्लपित्त, अर्धशिशी, डोकेदुखी, सांधेदुखी अशांसारख्या व्याधींचा जो स्फोट – विकास आणि ऊर्जावापराच्या समप्रमाणात – झालेला दिसतो, तो विकासामुळे वाढणाऱ्या मानसिक ताणामुळेच आहे.

**चौकट झ**

हा ताण का वाढतो? - आपण बदलत्या परिस्थितीशी तितक्या वेगानं जुळवून घेऊ शकत नाही, म्हणून! अधिक ऊर्जा आणि अधिक सुधारित तंत्रज्ञान वापरण्याचा वेग प्रचंड असू शकतो (आहेही); कारण ती प्रक्रिया यांत्रिक (Mechanical) स्वरूपाची आहे. मात्र त्या वेगाशी स्वत:ला समायोजित करण्याची शारीरिक-मानसिक प्रक्रिया ही सेंद्रिय (Organic) स्वरूपाची आहे. तिचा वेग केव्हाही कमीच असणार. ह्या दोन्हीतल्या फरकाला 'मनावरचा ताण' (Psychological stress) असं म्हणतात. जेवढ्या अधिक ऊर्जा वापराव्यात, तेवढा हा मनावरचा ताण वाढणारच. हा मनावरचा ताण शरीरावर हळूहळू दुष्परिणाम करून वरील प्रकारच्या व्याधी निर्माण करतो.




दिलीप कुलकर्णी

## ७ कविता

**ऋतुहीन**

शहराला हळवं करत नाही कधीच चैत्र पालवी,
शहराला होत नाही कधीच हिरवी रंगबाधा
शहराच्या पाठीवर उमटत नाही कुजबुजणाऱ्या ऋतूंची लिपी...
अन् चैत्र चाहुलीने कंठ फुटल्या पाखराचं गाणं, पोहोचतच नाही
शहराच्या डेसीबल झोकून बधीरलेल्या कानात!!
फुटलेच इथल्या निबर भिंतींना लालुस पोपटी डोळे,
तर ते फोडले जातात व्यावहारिक शहाणपणाने.
सिमेंटच्या कातड्याखाली दबलेल्या मातीचा दरवळ
मातीखालीच विरून जातो...!
म्हणून हल्ली प्रत्येक ऋतू, शहर दिसताच दुरून जातो.
शहर मात्र वाहत राहतं डोळे मिटून,
कधी घामेजल्या चिंतांच्या पखाली सांभाळत
तर कधी बेगडी जल्लोषात बेभान होत, यंत्रवत शुभेच्छा देत राहतं...
चैत्राच्या, वसंताच्या, श्रावणाच्या...!!!



गुरू ठाकूर

**क. शहरातील माणसांचं जगणं निसर्गापासून तुटलं आहे, हे वरील कवितेतून कशा प्रकारे सांगितलं आहे, ते तुमच्या शब्दांत मांडा. (सुमारे १०० ते १५० शब्द)**

**ख. पुढील अर्थ व्यक्त करणारी कोणती विशेषणे कवितेत वापरली आहेत हे सांगून ती विशेषणे कोणत्या मूळ शब्दांपासून तयार झाली आहेत ते सांगा.**

अ. अगदी हळू बोलणाऱ्या

आ. सुन्न झालेल्या

इ. दाबून ठेवलेल्या

ई. घाम आलेल्या



## ८ पावसाच्या अंदाजाविषयी हवामानशास्त्रज्ञ जीवनप्रकाश कुलकर्णी यांच्याशी अभिजित घोरपडे यांनी साधलेला संवाद ऐका. 

क. महाराष्ट्रातील कोणत्या भागात सरासरीपेक्षा सर्वात कमी पाऊस झाला?
(अ) विदर्भ (आ) कोकण (इ) मध्य महाराष्ट्र

ख. पावसाने जूनची सरासरी गाठली नाही व तो विस्तृत प्रमाणात सर्वदूर पडला नाही, कारण
(अ) पूर्व किनारपट्टीवरील चक्रीवादळ
(आ) जागतिक हवामान बदल
(इ) नैसर्गिक चढउतार

ग. एल निनोमुळे अनेकदा मान्सून सरासरीपेक्षा
(अ) जास्त होतो. (आ) कमी होतो. (इ) खूप जास्त होतो.

घ. सास्कोप म्हणजे
(अ) हवामानाचे मॉडेल आहे.
(आ) दक्षिण आशियाई देशांची संघटना आहे.
(इ) दक्षिण आशियाई देशांचा समूह आहे.

## ९ कर्ब उत्सर्जन कसे कमी करायचे?



'हवामान बदल आणि पर्यावरण' या विषयावर ग्रेटा मिळेल ते वाचत आणि पाहत होती. जगाच्या तापमानात वाढ का होते आहे, हवामान का बदलून जाते आहे, या प्रश्नांच्या खोलात ती जाऊ लागली. कार्बन डायऑक्साईडच्या पातळीत होणारी वाढ ही या सगळ्यांच्या मुळाशी आहे, हे तिच्या लक्षात आले. मग ती हवेतील कार्बन डायऑक्साईड का वाढतो, हे शोधून पाहण्याच्या मागे लागली. कोणत्या कृतीतून किती प्रमाणात कर्ब वायू बाहेर पडतात, हे मोजता येते, याला कार्बनची पदचिन्हे (Carbon footprint) म्हणतात. ग्रेटाला त्याचा नाद लागला, ते ती समजून घेऊ लागली.

आपला आहार शाकाहारी असेल, तर त्यासाठी दररोज सुमारे ३.८ किलो कर्ब वायूचे उत्सर्जन होणार. ज्या व्यक्तींना दूधसुद्धा चालत नाही, अशा शुद्ध शाकाहारी (Vegan) व्यक्तींच्या आहाराकरिता सुमारे २.८ किलो कर्ब वायू, मत्स्याहार करणाऱ्यांसाठी ३.९१ किलो कर्ब वायू, अल्प प्रमाणात मांसाहार करणाऱ्यांसाठी ४.६७ किलो कर्ब वायू, मध्यम प्रमाणात मांसाहार करणाऱ्यांसाठी ५.६३ किलो कर्ब वायू तर अति प्रमाणात मांसाहार करणाऱ्यांसाठी ७.१९ किलो कर्ब वायू उत्सर्जित होत असतो. (ही सरासरी आहे. प्रत्येक ठिकाणी आहारानुसार यात फरक पडू शकतो.)



श्रीमंत देशांचे माणशी कर्ब उत्सर्जन हे प्रचंड आहे. ऑस्ट्रेलियातील प्रत्येक व्यक्ती दर वर्षाला १५.४ टन कर्ब उत्सर्जन करते (१ टन = १००० किलो). अमेरिकेत हे प्रमाण प्रति व्यक्ती १६.५ टन इतके आहे. चीनमध्ये प्रत्येक व्यक्ती दरवर्षी ७.५ टन तर भारतातील प्रत्येक व्यक्ती दरवर्षी १.७ टन इतका कर्ब वायू उत्सर्जित करते.

ग्रेटाच्या लक्षात आले की, श्रीमंत देशांतील नागरिकांच्या राहणीमानातून अधिक कर्ब उत्सर्जन होते आहे. म्हणजे प्रगत देशांतील रहिवाशांनी त्यांचा आहार, वाहतूक, वीज, शेती व उद्योग यातून कमीत कमी कार्बन उत्सर्जन होईल, असा बदल केला पाहिजे.

हे लक्षात येताच ग्रेटाने स्वत:च्या कुटुंबाकडे निरखून पाहिले. आपला मांसाहार पूर्णपणे बंद केलाच पाहिजे, असा तिने मनोमन निर्णय घेतला आणि घरातील सर्वांना सांगून टाकला. तिच्या वडिलांना अनेक मांसाहारी पदार्थ आवडत होते. परंतु ग्रेटाने सांगितलेली कारणे त्यांना पटली आणि ते घर शाकाहारी झाले. मग ग्रेटाने आईचा विमानप्रवास मोजला. विमानप्रवासातून होणारे अतिरिक्त कर्ब उत्सर्जन वाचवण्यासाठी ग्रेटाने आईला रेल्वेने वा बसने प्रवास करण्याचा आग्रह धरला. तिच्या आईवडिलांचा आहार बदलला, प्रवासाची साधने बदलली. एका छोट्या मुलीने आपल्या आईवडिलांना उच्चभ्रू, उधळ्या जीवनशैलीकडून साधेपणाकडे नेले.

२०१९च्या मे महिन्यात युरोपियन संघाची निवडणूक चालू होती. हवामानबदल हा सर्वात कळीचा मुद्दा आहे, असे मानणाऱ्या मतदारांच्या संख्येत वाढ झाली आहे, असे त्या वेळी घेतलेल्या सर्वेक्षणात आढळून आले. विमानामुळे कर्ब उत्सर्जन जास्त होत असल्याने ग्रेटाने हवाई प्रवासाला नकार दिला. त्यामुळे अनेक संवेदनशील व्यक्तींनी स्वत:च्या विमानप्रवासाबाबत विचार सुरू केला. त्यातून ‘फ्लाईट शेम’ असा नवा शब्दप्रयोग वापरात आला. म्हणजे विमानाने प्रवास करण्याविषयी अपराधी वाटणे. रेल्वे अथवा बस अशा सार्वजनिक वाहनांकडील ओढा वाढू लागला. परंतु हवाई प्रवास अटळच असेल आणि त्यामुळे अपराधीपणा वाटत असेल तर त्याची प्रतिरूप भरपाई (Offsetting) ही संकल्पना पुढे आली. हवाई प्रवासाचे अंतर मोजून त्यातून होणारे कर्ब उत्सर्जन वा कार्बनची पदचिन्हे मोजता येतात. जगभरातील गरीब देशांत निर्धूर चूल, सौर-वीजप्रकल्प अथवा वृक्षलागवड या प्रयत्नांतून कर्ब उत्सर्जन कमी केले जाते. हवाई प्रवासात एक टन कर्ब उत्सर्जन होत असेल तर असा प्रवास अपरिहार्य म्हणून करणाऱ्यांनी तेवढाच पैसा कर्ब उत्सर्जन रोखण्याच्या प्रयत्नांना दिल्यास त्याला प्रतिरूप भरपाई मानले जाते. यासाठी अनेक विमान कंपन्या कार्यरत झाल्या असून त्या गरीब आफ्रिकी देशांतील प्रकल्पांना मदत करीत आहेत.

अतुल देऊळगावकर

**क. ‘आधी केले मग सांगितले’ ही उक्ती ग्रेटाने कशी सार्थ ठरवली, ते तुमच्या शब्दांत लिहा.**

**ख. कर्ब उत्सर्जन कमी करण्यासाठी कोणकोणते उपाय करता येतील याबाबत तुमच्या सहाध्यायींबरोबर चर्चा करा. मुद्द्यांचे टिपण तयार करून ते वर्गात सादर करा.**

**ग. पुढील वाक्प्रचारांचा वाक्यांत उपयोग करा.**

उदा॰ कळीचा मुद्दा असणे - कोरोना काळात अर्थव्यवस्था सावरण्याला प्राधान्य देणे हा अर्थमंत्र्यांच्या भाषणातील **कळीचा मुद्दा होता.**

१. नाद लागणे

२. खोलात जाणे

३. मुळाशी असणे

४. आग्रह धरणे

## १० चर्चा

**विषय : पर्यावरण कर**

**तुम्हाला एका चर्चेत सहभागी होण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. पर्यावरण कर लावून पर्यावरणाचा प्रश्न सुटू शकतो का, या विषयावर चर्चेत सहभागी झालेल्या तुमच्या जोडीदाराबरोबर तुम्ही चर्चा करायची आहे. पुढे दिलेल्या दोन विधानांपैकी एक विधान निवडून तुम्ही निवडलेल्या विधानाच्या बाजूने चर्चा करा.**



**चर्चा करताना :**

तुमच्या जोडीदाराने मांडलेल्या मुद्द्यांचा योग्य परामर्श घ्या.

दोन जणांनी चर्चा करावी. एकाने समर्थन करणाऱ्या विधानाच्या बाजूने तर दुसऱ्याने विरोध दर्शविणाऱ्या विधानाच्या बाजूने चर्चा करावी.

जी बाजू तुम्ही निवडाल त्या बाजूचे तुम्ही समर्थन करणे आवश्यक आहे. तुमच्या जोडीदाराला तुमची बाजू पटवून देण्याचा प्रयत्न करा. काही उदाहरणेही द्या.

| समर्थन करणारे विधान | विरोध दर्शविणारे विधान |
|---|---|
| पर्यावरणाची समस्या सोडवायची असल्यास पैशांची गरज आहे. सर्वांवर पर्यावरण कर लावल्यास त्याचा भार समप्रमाणात विभागला जाईल आणि पर्यावरणाच्या प्रश्नाविषयी जागरुकता निर्माण होईल. | पर्यावरणाला धोका निर्माण करण्यात सामान्य जनतेचा वाटा कमी आहे. त्यामुळे घरगुती ग्राहकांवर कर लावणे योग्य नाही. पर्यावरणाचे प्रदूषण करण्यासाठी मोठे उद्योग कारणीभूत आहेत, तेव्हा पर्यावरणाची हानी भरून काढण्यासाठीचा बोजाही त्यांनीच उचलावा. |

## ११ सांस्कृतिक पर्यावरण

एखाद्या देशाचा इतिहास विशिष्ट दिशेने का घडतो याचा आता अभ्यास सुरू आहे आणि त्याला एक महत्त्वाचे कारण म्हणजे त्यातील विशिष्ट पर्यावरण. [...] पर्यावरणातील बदलामुळे सांस्कृतिक बदल घडून येतात. त्याच्या अभ्यासासाठी आता पुरातत्त्वात 'सांस्कृतिक पर्यावरण' ही नवीन ज्ञानशाखा निर्माण झाली आहे. अमेरिकन पुरातत्त्वज्ञ ज्युलियन स्ट्युअर्ड हे या ज्ञानशाखेचे मुख्य प्रणेते आहेत. मानवाने पर्यावरणाशी जुळते करून घेण्यासाठी जे जे केले त्याचा अभ्यास म्हणजे सांस्कृतिक पर्यावरण. प्राण्यांच्या, वनस्पतींच्या गरजा असतात, मानवाला तर असतातच, परंतु त्याचबरोबर त्याच्या आशा-आकांक्षाही असतात. प्राण्यांना अन्न मिळवण्याचे ज्ञान उपजत असते, ते त्यांना शिकवावे लागत नाही. मानवाला मात्र ते शिकून घ्यावे लागते. अन्न मिळवण्यासाठी त्याला हत्यारे, उपकरणे वगैरेसारखी साधने निर्माण करावी लागतात. ज्या प्रकारचे प्राणी, वनस्पती असतील, त्याप्रमाणे ती तयार करावी लागतात. कंदमुळे उकरून काढण्यासाठी

विशिष्ट प्रकारची हत्यारे लागतात. प्राण्यांना ते करावे लागत नाही, त्यामुळे पुरातत्त्वात आता संस्कृतीची व्याख्या नव्याने करण्यात आली आहे. 'पर्यावरणाशी जुळते घेण्यासाठी मानव जे काही करतो, ते म्हणजे संस्कृती'. विशिष्ट पर्यावरणात विशिष्ट हत्यारे, उपकरणे उपयोगी पडतात आणि मानवाला ती तयार करावी लागतात. त्यामुळे तो कोणत्याही पर्यावरणात राहू शकतो आणि त्यामुळेच निरनिराळ्या प्रदेशातील पर्यावरण भिन्न असल्यामुळे, प्रत्येक ठिकाणची संस्कृती भिन्न असते.



मानवी संस्कृतीच्या विकासातील पर्यावरणाचे स्थान किती महत्त्वाचे आहे, हे सर्वप्रथम थोर पुरातत्त्वज्ञ गॉर्डन चाईल्ड यांनी दाखवून दिले. मानवी इतिहासातील सर्वप्रथम क्रांती म्हणजे शेतीचा शोध. अन्नाच्या शोधात वणवण करण्यात त्याची लाखो वर्षे गेली, शेतीच्या शोधामुळे ती वणवण थांबली. त्याला स्थिर जीवन लाभले, घरे बांधून तो राहू लागला, गायीगुरे, शेळ्यामेंढ्या पाळू लागला. ते त्याचे अन्नच होते. पाहिजे तेव्हा ते खाता येत होते. हा क्रांतिकारी बदल पर्यावरणामुळे कसा घडून आला, हे चाईल्ड यांनी दाखवून दिले. त्यांच्या मते पर्यावरणात सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी बदल घडून येऊ लागला होता. पश्चिम आशियात हवामान हळूहळू शुष्क होऊ लागले. त्यामुळे छोटे जलाशय (ओॲसिस) निर्माण झाले. साहजिकच पाण्यासाठी माणूस आणि प्राणी एकमेकांजवळ आले. मानवाने प्राण्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवून त्यांना माणसाळवण्यास सुरुवात केली आणि त्यातून पुढे गाय-बैल, शेळी-मेंढी इत्यादी प्राणी पाळण्यास सुरुवात झाली आणि स्थिर जीवन शक्य झाले. शेती करणेही यामुळेच शक्य झाले. एका ठिकाणी काही काळ वस्ती केल्यामुळे माणूस निसर्गात उगवणाऱ्या धान्याची अन्नासाठी लागवड करू लागला. पश्चिम आशियात



गहू, बार्ली ही धान्ये निसर्गतः उगवतात. खाण्यासाठी मानवाने त्यांचा उपयोग केला. दर मोसमात धान्याचे दाणे जमिनीवर पडून उगवतात, हे पाहून तो धान्य पेरू लागला. शेतीची सुरुवात अशी झाली. ही मानवी जीवनातील आद्य क्रांती होय. पर्यावरणातील बदलामुळे ती घडून आली.

मधुकर केशव ढवळीकर

**क. निसर्गाचा, पर्यावरणाचा मानवी जीवनावर कसा परिणाम होतो ते तुमच्या प्रांतातील / देशातील सण, उत्सव, चालीरीती यांची उदाहरणे देऊन तुम्हाला स्पष्ट करता येईल? (१५०-२०० शब्द)**

**ख. कंसात दिलेले शब्द पुढे दिलेल्या वाक्यांमध्ये गाळलेल्या जागी लिहा.**

(उपजत, भिन्न, विशिष्ट, लागवड, वस्ती, आद्य, वणवण, क्रांतिकारी, शुष्क)

उदा॰ या ठिकाणी पूर्वी ----------- असल्याच्या काही खुणा मिळाल्या आहेत.
उत्तर : या ठिकाणी पूर्वी **वस्ती** असल्याच्या काही खुणा मिळाल्या आहेत.

अ. गेल्या वर्षी या जिल्ह्यातील किती हेक्टर क्षेत्रात उसाची ----------- झाली होती?

आ. भारतीय शास्त्रीय संगीतात राग त्यांच्या ----------- वेळेला गायले जातात.

इ. अचानक घोषित झालेल्या टाळेबंदीमुळे मजुरांना बरीच ----------- करावी लागली.

ई. जनतेचे भले करणे हे नेत्यांचे ----------- कर्तव्य असले पाहिजे.

उ. ----------- विचार समाजाच्या सहज पचनी पडत नाहीत.

ऊ. कलेचे ----------- ज्ञान आणि त्याला दिलेली कष्टांची जोड यातून महान कलाकार निर्माण होतात.

ए. एकेकाळी हिरवागार असलेला डोंगर वणव्यानंतर ----------- बनून गेला होता.

ॲ. त्या दोघांची मते जरी ----------- असली तरी त्याचा त्यांच्या मैत्रीवर कधीच परिणाम झाला नाही.

**ग. कंसातील सूचनेप्रमाणे बदल करून वाक्ये तयार करा.**

उदा॰ मानवी संस्कृतीच्या विकासातील पर्यावरणाचे स्थान किती महत्त्वाचे आहे! ('महत्त्व' शब्द वापरून वाक्य तयार करा.)
उत्तर : मानवी संस्कृतीच्या विकासात पर्यावरणाचे अतिशय महत्त्व आहे.

अ. गहू, बार्ली ही धान्ये निसर्गतः उगवतात. खाण्यासाठी मानवाने त्यांचा उपयोग केला. (जोडवाक्य तयार करा.)

आ. मानवी इतिहासातील सर्वप्रथम क्रांती म्हणजे शेतीचा शोध. ('म्हणजे' काढून वाक्य तयार करा.)

इ. निरनिराळ्या प्रदेशातील पर्यावरण भिन्न असल्यामुळे प्रत्येक ठिकाणची संस्कृती भिन्न असते. ('कारण' शब्द वापरून वाक्य तयार करा.)

## १२ पुढील गीत ऐका.

**गीत** – सरीवर सर – संदीप खरे

**क. हे गीत ऐकून ते लिहून काढण्याचा प्रयत्न करा.**

**ख. या गीतात वर्णन केलेला निसर्ग आणि कवीची मन:स्थिती यांचा संबंध उलगडून दाखवा.**

**ग. साहित्य, कला, प्रवास यांमधून माणसाचे निसर्गाशी नाते जडते. त्याचा पर्यावरण संवर्धनासाठी उपयोग होऊ शकतो, असे तुम्हाला वाटते का? याबाबतीतला तुमचा अनुभव वर्गात सांगा.**

**घ. एखाद्या कान्याचा फरक असणारे, पण सारखीच अक्षरे असलेले काही शब्द पुढे दिले आहेत. वाक्य वाचून त्यात योग्य शब्द भरा.**

उदा॰ भर, भार, भारा
एक. पुस्तके पिशवीत **भर**.
दोन. लाकडाचा एक मोठा **भारा** तिने उचलला.
तीन. अमितची नोकरी सुटल्यामुळे अंजनीवर घराचा सगळा **भार** आला.

अ. तर, तार, तारा
एक. आकाशात एक चमकदार ---------- दिसत होता.
दोन. तू लवकर गेलीस ---------- सूर्यास्त पाहता येईल.
तीन. चालताना तिच्या पायात अचानक लोखंडाची ---------- घुसली.

आ. वर, वार, वारा
एक. ती दुसऱ्या मजल्या ---------- राहत होती.
दोन. भणाणणारा ---------- सुटला होता.
तीन. उद्या कोणता ---------- आहे?

इ. घर, घार, घारा
एक. समोरच्या गल्लीत माझं ---------- आहे.
दोन. आकाशात एक ---------- उंच उडत होती.
तीन. त्याचे डोळे काळे नाहीत, पक्का ---------- आहे तो.

ई. गर, गार, गारा
एक. त्या फळात भरपूर ---------- आहे.
दोन. माठातलं पाणी किती ---------- आहे.
तीन. फक्त पाऊस नाही; त्याच्याबरोबर खूप ---------- पडल्या.

## १३ करा आणि शिका

क. सामान्यत: गजबज दिवसाशी आणि शांतता रात्रीशी निगडित असते. रात्रीमुळे मिळणारा एकांत, अंतर्मुख होण्याची संधी, शारीरिक, मानसिक विश्रांती अशा अनेक गोष्टी माणसासाठी महत्त्वाच्या असतात. केवळ दिवसाचे किंवा केवळ रात्रीचे वर्णन करणारी तुमच्या मातृभाषेतील एखादी कविता निवडून वर्गात सादर करा. त्या कवितेचा अर्थ मराठीत सांगा. ती कविता निवडण्यामागचे कारणही सांगा.

ख. जाँ जिओनो यांची 'झाडं लावणारा माणूस' ही माधुरी पुरंदरे यांनी अनुवादित केलेली लघुकादंबरी मिळवून वाचा आणि ती वर्गात सादर करा.

## उत्तरसंच

१. क. अ. नाही आ. हो इ. नाही ई. हो उ. हो

१. ख. अ. आनंद गगनात मावत नव्हता आ. पर्वा करत इ. निष्प्रभ केले
ई. परिणती ... झाली उ. घमेंड असू ऊ. प्रवृत्त झाले ए. फिके पडले
ॲ. खस्ता खाल्ल्या ऐ. जीव पणाला लावतात ओ. दाखल झाले

३. ग.

| नाम | विशेषण | क्रियापद / वाक्प्रचार |
|---|---|---|
| अंधार, अमावस्या, आतषबाजी, आरास, उगवती, उजाळा, उजेड, उष:काल, कंदील, कवडसा, कातरवेळ, काळोख, किरण, चमक, चंद्र, चंद्रप्रकाश, चांदणी, चांदोबा, छाया, ज्वाळा, झगमग, झगमगाट, झुंबर, तारका, तारा, तेज, तेजोवलय, दिवस, दिवा, दिवाळी, दिवेलागण, दीपोत्सव, निरांजन, पणती, पहाट, पूर्व, पौर्णिमा, प्रकाशझोत, प्रभा, मशाल, मेणबत्ती, लखलख, लखलखाट, लामणदिवा, वात, विजेरी, समई, संधिप्रकाश, सावली, सूर्य | उगवती, उजळ, उज्ज्वल, चमकदार, झगझगीत, तीव्र, तेजस्वी, पूर्व, प्रखर, भगभगीत, सतेज | उजळणे, अंधारणे, जाळणे, झुंजूमुंजू होणे, डोळे दिपणे, तांबडे फुटणे, तेवणे, दिवा लावणे, दिवे लावणे, दिवे पाजळणे, प्रकाश पडणे, प्रकाशणे, प्रकाशमान होणे, मालवणे, मावळणे, मंदावणे, सांजावणे, विझवणे |

घ. एक. प्रकाश पडणे दोन. दिवे लावणे, दिवे पाजळणे
तीन. झुंजुमुंजू होणे, तांबडे फुटणे चार. डोळे दिपणे

४. ग. अ. प्रखर / भगभगीत आ. अंधारी / काळोखी इ. लख्ख
ई. झगझगीत / प्रखर / भगभगीत उ. काळोखी / अंधारी
ऊ. लख्ख / भगभगीत / प्रखर / झगझगीत

५. **ख.** अ. कुतूहल आ. गूढ इ. जबरदस्त ई. भावनाविष्कार उ. द्योतक
ऊ. पूर्वापार

६. क. प्रदूषण ख. कोलाहल ग. ऊर्जा घ. वेगे वेगे धावू च. दळणवळण
छ. संकीर्णता ज. मनोकायिक आजार झ. समायोजनाचे आव्हान

७. **ख.** अ. कुजबुजणाऱ्या - कुजबुज आ. बधीरलेल्या - बधीर
इ. दबलेल्या - दबणे ई. घामेजल्या - घाम

८. क. अ ख. इ ग. आ घ. आ

९. **ग.** अनेक उत्तरे शक्य. उदाहरणादाखल काही वाक्ये :

१. आनंदला लहानपणीच बुद्धिबळाचा **नाद लागला.**

२. कोणताही विषय नीट समजण्यासाठी त्याच्या **खोलात जावे लागते.**

३. सिनेसृष्टीतील असुरक्षितता आणि स्पर्धा अनेक कलाकारांना नैराश्य येण्याच्या **मुळाशी असते**, असे मानसोपचारतज्ज्ञांचे मत आहे.

४. शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी आमच्या बाबांनी नेहमी योगाभ्यासाचा **आग्रह धरला.**

११. **ख.** अ. लागवड आ. विशिष्ट इ. वणवण ई. आद्य उ. क्रांतिकारी
ऊ. उपजत ए. शुष्क ॲ. भिन्न

११. **ग.** अ. गहू, बार्ली या निसर्गतः उगवणाऱ्या धान्यांचा मानवाने खाण्यासाठी उपयोग केला.
आ. शेतीचा शोध ही मानवी इतिहासातील सर्वप्रथम क्रांती होय.
इ. प्रत्येक ठिकाणची संस्कृती भिन्न असते, कारण निरनिराळ्या प्रदेशातील पर्यावरण भिन्न असते.

१२. **घ.** **अ.** एक. तारा दोन. तर तीन. तार
**आ.** एक. वर दोन. वारा तीन. वार
**इ.** एक. घर दोन. घार तीन. घारा
**ई.** एक. गर दोन. गार तीन. गारा

# तिसरी घंटा ६



मराठी माणूस आणि नाटक यांचं अतूट नातं आहे. महाराष्ट्रात लोकनाट्याची परंपरा बरीच जुनी असली, तरी आधुनिक मराठी नाटकाचा प्रारंभ १८४३मध्ये झाला. काळाच्या ओघात नाटकांच्या स्वरूपांत, विषयांत, हाताळणीत अनेक बदल झाले. नाटकाच्या कालावधीपासून नाटकाच्या सादरीकरणापर्यंत अनेक बाबतीत इथल्या रंगभूमीवर नवे प्रयोग झाले. इथल्या नाट्यकर्मींनी केवळ देशाच्या विविध प्रांतांतीलच नव्हे; तर जगभराच्या रंगभूमीशी आपले नाते जोडून घेतले, टिकवून ठेवले. त्यातून आशयाचे, अभिव्यक्तीचे, तंत्राचे आगळेवेगळे प्रयोग इथे घडले. अगदी करोनासारख्या नव्या आव्हानांना तोंड देताना नवे तंत्रज्ञान वापरून 'नाटक'चे 'नेटक' करण्यासारखे प्रयोगशील प्रयत्न इथे होताना दिसतात. अनेक अडचणींवर मात करत मराठी रंगभूमीचा प्रवास सुरू राहिला आहे. संगीत नाटके, ऐतिहासिक नाटके, एकांकिका, व्यावसायिक नाटके, बालनाट्ये, प्रायोगिक नाटके इत्यादी विविध नाट्यप्रकारांनी मराठी रंगभूमीला सशक्त केले आहे. मराठी रंगभूमीच्या समृद्ध परंपरेची थोडक्यात ओळख करून देण्याचा हा प्रयत्न.

## १ नाटक




नाटकांना 'प्रेक्षक' येतो. तो नुसता 'ईक्षक' म्हणजे पाहणारा नसतो. प्र अधिक ईक्षक असतो. म्हणजे विशेष चोखंदळपणाने पाहणारा असतो. संगीताला 'श्रोता' येतो. म्हणजे फक्त ऐकणारा. गवई डोळ्याला दिसला नाही तरी तो गायनाचा आनंद घेऊ शकतो. आणि कादंबरीला वाचक असतो. म्हणजे पुस्तक हाती घेऊन वाचणारा. वाचणारा किंवा वाचलेले फक्त ऐकणारा माणूस मनापुढे ती ती दृश्ये आणतो. नाटकाचा प्रेक्षक मात्र डोळ्यांनी पाहण्यासाठी आणि कानांनी ऐकण्यासाठी येत असतो. त्यामुळे नाटककाराला ती दृश्ये डोळ्यापुढे रंगमंचावर आणून ती खरी आहेत असा आभास निर्माण करायचा असतो. हा आभास आहे हे प्रेक्षकाला ठाऊक असूनही तो क्षणभर ते खरे आहे, असे मानण्याच्या तयारीने आलेला असतो. रंगभूमीवरचा महालाचा देखावा हा पडद्यावर रंगवलेला आहे हे ठाऊक असूनही तो त्याला नाटकापुरता खरा महाल मानायला तयार होतो. शिवाजीमहाराज होऊन आलेल्या नटाने खोटी दाढीमिशी लावली आहे हे ठाऊक असूनही तो त्या आभासाला घटकाभर सत्य मानायच्या तयारीने आलेला असतो. परंतु जर नटाने तो आभास आपल्या अभिनयकलेने टिकवला नाही, तर मात्र त्याचे लक्ष उडते. म्हणजेच नाटक रंगमंचावर अयशस्वी होते. म्हणून नाटकाचे लेखन उत्तम असून चालत नाही. ते प्रेक्षकांपुढे आणणारे नट, नेपथ्यकार, त्या प्रसंगाला उठाव देणाऱ्या प्रकाशाची योजना करणारे कलावंत किंवा प्रसंगात व्यक्त केलेल्या भावनांना आणि वातावरणाला अधिक परिणामकारक करणारे संगीत-नियोजक ह्या सर्वांना आपली कला पणाला लावूनच ते दरवेळी उभे करावे लागते. [...]

नाटकाला इंग्रजीत 'प्ले' म्हणजे 'खेळ' म्हणतात. आपणही पूर्वी 'नाटकाचे खेळ झाले' असे म्हणत होतो. जुन्या मराठीत नटांना 'खेळिये' म्हटले आहे. हा माणसामाणसांतल्या निरनिराळ्या कारणांनी निर्माण होणाऱ्या तेढीचा, मैत्रीचा, शत्रुत्वाचा, आकांक्षांच्या पूर्तीचा किंवा अपूर्तीचा, जय-पराजयाचा खेळच असतो. हा खेळ आजच्या जगातल्या माणसांचा असला तर त्याला आपण सामाजिक नाटक म्हणतो, पुराणातल्या पात्रांचा असला तर पौराणिक म्हणतो, ऐतिहासिक काळात वावरलेली पात्रे असली तर ऐतिहासिक नाटक म्हणतो. पात्रे कुठल्याही काळातली का असेनात, नाटककाराच्या प्रतिभेने त्यांच्यातला संघर्ष कसा खेळवला आहे हे महत्त्वाचे. कित्येकदा प्रसंग इतिहासातला असतो; परंतु नाटककाराने त्या प्रसंगाच्या आधाराने त्या

प्रसंगात असणाऱ्या संघर्षाला ती ऐतिहासिक काळातली पात्रे कशी सामोरी गेली असतील ह्याची कल्पना करून, त्यातून नाटकाची उभारणी केलेली असते. [...]



तो खेळ पाहताना आपणदेखील त्यांच्या सुखदुःखांशी समरस होतो. म्हणजे जणू काय आपण तो प्रसंग खरोखरीचा अनुभवतो आहोत अशा रीतीने आपण त्यांचा तो खेळ पाहतो. त्यांतल्या काही पात्रांच्या दुःखाने आपण दुःखी होतो. 'एकच प्याला' नाटकात सुधाकरला दारूचे भयंकर व्यसन लागते. त्याच्या संसाराची धूळधाण होते. त्याची बायको सिंधू हालांत दिवस काढायला लागते. तिचे हाल पाहून आपल्या डोळ्यांत पाणी येते. वास्तविक त्या सुधाकर-सिंधूची आपली ओळखदेखही नसते. किंबहुना, ती केवळ गडकऱ्यांनी लिहिलेल्या नाटकाच्या पुस्तकातली माणसे आहेत हेही आपल्याला ठाऊक असते. तरीही आपण त्यांच्या सुखदुःखांचे वाटेकरी होऊन रंगमंदिरात बसतो. मग रंगमंचावरील पात्रे आजच्या काळातील असोत, ऐतिहासिक काळातील असोत की अद्भुत वातावरणातील असोत. [...]

नाटककार रंगमंचावर जो भावनांचा खेळ दाखवतो तो आपल्या मनातही सुरू होतो. तात्पर्य, त्या नाटकातला प्रसंग ऐतिहासिक किंवा आधुनिक, कुठल्याही काळातला का असेना, त्यातले नाट्य आणि त्यातून निर्माण होणारा भावनांचा खेळ या गोष्टी महत्त्वाच्या. कधी कधी हा खेळ एखादे तात्पर्य सुचवून जाईल. कधी समाजातल्या दोषांचे त्यात दर्शन घडेल. कधी समाजाच्या प्रगतीचा विचारही सांगून जाईल. परंतु त्या पात्रांवर आलेल्या प्रसंगांच्या दर्शनातून जर बोध घडला नाही तर मात्र त्या नाटकातल्या संवादांना चर्चेचे स्वरूप येईल. खेळाने आरोग्य सुधारते; परंतु आपण काही 'चला, थोडे आरोग्य सुधारू या' म्हणून खेळायला जात नाही. खेळाचा आनंद आपल्याला हवा असतो. त्यातही उत्कंठा असते. हार-जीत असते. तो खेळ खेळता खेळता शरीरालाही लाभ होतो. उत्तम कलेतून समाजाचे आरोग्य सुधारते.

पु. ल. देशपांडे

**क. नाटकात कशा प्रकारे वास्तवाचा आभास निर्माण केला जातो, ते वरील उताऱ्याच्या आधारे स्पष्ट करा. (१००-१५० शब्द)**

**ख. खालील अर्थाची वरील उताऱ्यात आलेली विधाने लिहा.**

अ. केवळ मनोरंजनच नाही; तर प्रबोधन करणे हासुद्धा नाटकाचा हेतू असतो.

आ. नाटकात होणाऱ्या विविध भावभावनांचा आविष्कार आपल्या मनातही होत असतो.

इ. नाटक एक सामूहिक कलाविष्कार आहे.

ई. नाटकात वास्तवाचा आभास असतो.

**ग. सामाजिक, पौराणिक, ऐतिहासिक अशा नाटकांच्या काही प्रकारांचा उल्लेख वरील उताऱ्यात आला आहे. तुम्हाला नाटकाचे आणखी कोणते प्रकार सांगता येतील? तुमच्या प्रांतात, देशात कोणते प्रकार प्रचलित आहेत / लोकप्रिय आहेत?**

**(उदाहरणादाखल मराठीतील काही नाट्यप्रकार : संगीतनाटक, बालनाट्य, पथनाट्य, एकांकिका, एकपात्री प्रयोग इत्यादी)**





**घ. तुम्हाला नाटक पाहायला आवडते का? तुमचे मत कारणांसहित मांडा.**

**च. 'लक्ष' या नामाबरोबर विविध क्रियापदे वापरली जातात. कंसात अशी काही क्रियापदे दिली आहेत. पुढे दिलेल्या वाक्यांमध्ये त्यातील योग्य क्रियापदाचा योग्य रूपात वापर करा.**

(देणे, पुरवणे, जाणे, घालणे, न देणे, वेधणे, असणे, उडणे, नसणे, लागणे, ठेवणे)

उदा॰ : नावडत्या विषयाच्या तासाला बऱ्याच मुलांचे वर्गात लक्ष -----------

उत्तर : लक्ष नसणे. वाक्यातील योग्य रूप : नावडत्या विषयाच्या तासाला बऱ्याच मुलांचे वर्गात लक्ष **नसते.**

अ. शिवाजी महाराजांच्या गुप्तहेर खात्याचा प्रमुख बहिर्जी नाईक शत्रूच्या सर्व हालचालींवर बारकाईने लक्ष ----------- -----------.

आ. अनेकदा तक्रार दाखल करूनही महानगरपालिकेने त्या भल्यामोठ्या खड्ड्याकडे लक्ष ----------- -----------, म्हणूनच हा अपघात घडला.

इ. इतके आर्थिक घोटाळे केलेल्या मंत्र्याच्या पूर्वेतिहासाकडे आयकर विभागाच्या समितीचे लक्ष ----------- स्वाभाविकच होते.

ई. यंदाच्या अर्थसंकल्पात कररचनेत कोणते बदल होणार आहेत त्याकडे सर्वांचे लक्ष ----------- आहे.

उ. अनेक वर्षे प्रलंबित राहिलेल्या खटल्यांकडे जिल्हा सत्र न्यायालयाने लक्ष ----------- गरजेचे आहे.

ऊ. स्पर्धेतील नेत्रदीपक कामगिरीमुळे सर्वेशकडे सर्वांचे लक्ष ----------- -----------.

ए. कोकणातील आजोबांच्या मृत्युपत्रातील अनपेक्षित मुद्द्यांमुळे त्यांच्या पुण्यातल्या कुटुंबियांचे कामातील लक्ष -----------.

ॲ. नालासोपारा येथे घडलेल्या दुहेरी खुनाच्या घटनेत पोलिसांनी त्वरित लक्ष ----------- आवश्यक आहे.

ऐ. अखिलेशच्या आईचे त्याच्या अभ्यासावर नेहमीच बारीक लक्ष -----------.

ओ. प्रत्येकाने स्वत:च्या तब्येतीकडे व्यवस्थित लक्ष ----------- असा सल्ला डॉक्टर देत असतात.

## २ नाट्यसंगीत

लोकरंगभूमीच्या विविध प्रकारांमधून आधुनिक मराठी रंगभूमीचा उदय झाला. कथानकातील आशय केवळ संवादांमधून न पोचवता, तो सूर-तालात गुंफून अधिक प्रभावीपणे प्रेक्षकांपर्यंत पोचवण्याची लोकरंगभूमीची परंपरा त्या काळात निर्माण झालेल्या नाटकांनी जपली. १८४३मध्ये विष्णुदास भाव्यांनी सादर केलेले 'सीतास्वयंवर' हे नाटक संगीतप्रधान होते. पौराणिक तसेच सामाजिक विषयांवरच्या नाटकांमध्येही संगीत हा घटक अविभाज्य होता. केशवराव भोसले, मास्टर दीनानाथ, बालगंधर्व यांच्या गायनाने मराठी जनांची सांगीतिक अभिरुची घडवली. नाटकांतील पदांना, ती सादर करणाऱ्या गायक नटांना इतकी अफाट लोकप्रियता लाभली, की 'नाट्यसंगीत' हा महाराष्ट्राचा मानबिंदू ठरला. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र चित्रपटसंगीत, भावसंगीत आदींच्या वाढत्या प्रभावामुळे नाट्यसंगीताची काहीशी पीछेहाट सुरू झाली. तरीही विषयांमध्ये वैविध्य आणत नाट्यपदांची रचना, संगीत, सादरीकरणाची शैली या साऱ्यांत बदल करत संगीत नाटक टिकून राहिले. जितेंद्र अभिषेकी, वसंतराव देशपांडे, राम मराठे यांच्यासारख्या नव्या दमाच्या कलाकारांमुळे नाट्यसंगीत साठोत्तर काळात पुन्हा लोकप्रिय ठरले. 'घाशीराम कोतवाल', 'लेकुरे उदंड झाली'सारख्या नाटकांमधून रंगभूमीवर संगीताचे वेगळे प्रयोग केले गेले. जागतिकीकरणाच्या लाटेत नाट्यसंगीताचा प्रवाह थोडा क्षीण झाला, तरी हौशी आणि प्रायोगिक रंगभूमीच्या आधारे वाहता राहिला. आज एकविसाव्या शतकात कालसुसंगत मांडणी आणि सादरीकरणाच्या बळावर मराठी संगीत रंगभूमी पुन्हा नव्याने उभी राहू पाहत आहे. नव्या संगीत नाटकांचा आस्वाद घ्यायला आजचा रसिक उत्सुक आहे.

**क. वरील उताऱ्यातील काही शब्द कंसात दिले आहेत. खाली दिलेल्या वाक्यांमध्ये ते योग्य जागी भरा.**

(परंपरा, पीछेहाट, मानबिंदू, अभिरुची, आस्वाद, कालसुसंगत)

उदा॰ परंपरा
भारतीय शास्त्रीय संगीताला फार मोठी **परंपरा** आहे.

अ. कलेचा ----------- घ्यायला त्या कलेचे शास्त्रशुद्ध ज्ञान असण्याची गरज नाही. रसिक असणे महत्त्वाचे!

आ. चित्रप्रदर्शनांना भेटी दिल्याने चित्रकलेविषयीची ----------- घडण्यास मदत होऊ शकते का?

इ. आपल्या विचारांत ----------- बदल करणे सर्वांसाठीच गरजेचे असते.

ई. क्रिकेट मालिकेतील पहिल्या सामन्यात झालेल्या पराभवानंतर संघाची ----------- सुरूच राहिली.

उ. 'भारतरत्न' ह्या सर्वोच्च सन्मानाने गौरविलेल्या पार्श्वगायिका लता मंगेशकर आणि क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर हे दोघे महाराष्ट्राचे ----------- आहेत.

**ख. 'काटा रुते कुणाला' हे नाट्यगीत ऐका व त्याचा अर्थ स्पष्ट करा. 'हे बंध रेशमाचे' (१९७२) या नाटकातील या नाट्यगीताचे लेखन कवयित्री शांता शेळके यांनी केले असून पंडित जितेंद्र अभिषेकी हे या गीताचे गायक व संगीतकार आहेत.**

## ३ बालगंधर्व



नारायणरावांचा जन्म मराठी रंगभूमीची 'पंढरी' म्हणून गाजत असलेल्या सांगलीतील नागठाणे गावचा. जन्म दिनांक २६ जून, १८८८. संगीत नाटकांत स्त्रीभूमिका करणारे अभिनेता म्हणून आयुष्यभर गाजलेल्या, नावाजलेल्या आणि नाणावलेल्या* नारायणरावांना बालगंधर्व ही उपाधी लोकमान्य टिळकांनी दिली, हे लोकविश्रुत* आहे. बालगंधर्वांचे पूर्ण नाव होते नारायण श्रीपाद राजहंस.

त्यांचे संगीताचे पहिले गुरू होते पं॰ भास्करबुवा बखले. पंडितजींच्या मार्गदर्शनाखाली नारायणरावांनी नाट्यगीते, ख्याल, ठुमरी, गझल, दादरा, भक्तिगीते या गायनप्रकारांवर प्रभुत्व मिळविले. हे प्रशिक्षण पुढे नारायणरावांना रंगभूमीवर अतिशय उपयुक्त ठरले.

नारायणरावांच्या 'स्त्रीभूमिका करणारा गायक नट' या कारकिर्दीचा प्रारंभ १९०५मध्ये किर्लोस्कर नाटक मंडळीत झाला. ही मंडळी पुढे डबघाईस आली आणि १९१३मध्ये बालगंधर्वांनी स्वतःची 'गंधर्व संगीत मंडळी' स्थापन केली. या मंडळीच्या स्थापनेत त्यांच्या सवे* होते गणेश गोविंद ऊर्फ गणपतराव बोडस आणि गोविंदराव टेंबे. या संगीत मंडळीसमोर आर्थिक समस्या तर सतत 'आ' वासून उभ्या




असत*. स्वतःच्या अभिनय आणि संगीताच्या बळावर बालगंधर्व या समस्येवर मार्ग काढीत राहिले. १९२१मध्ये त्या मंडळीचे एकमेव मालक होते नारायणराव राजहंस तथा बालगंधर्व.

बालगंधर्वांनी सुमारे २५ संगीत नाटकांत भूमिका केल्या. ही नाटके अण्णासाहेब किर्लोस्कर, कृ॰ प्र॰ तथा काकासाहेब खाडीलकर, राम गणेश गडकरी, वसंत शांताराम देसाई या नामांकित नाटककारांनी लिहिलेली होती. यांतील गाजलेली नाटके होती संगीत शाकुंतल, संगीत सौभद्र, संगीत मृच्छकटिक, संगीत मानापमान, संगीत संशयकल्लोळ, संगीत शारदा, संगीत मूकनायक, संगीत स्वयंवर, संगीत विद्याहरण, संगीत एकच प्याला इ. 'एकच प्याला' मधील 'सिंधू'ची भूमिका ही त्यांची अखेरची भूमिका. त्यानंतर त्यांनी रंगभूमीवरून निवृत्ती स्वीकारली. नाटकात वापरलेले वस्तुजात* खरेखुरे असले पाहिजे हा त्यांचा आग्रह असे. त्यांनी नाटकात वापरलेली लुगडी* खरोखरी अतिशय किंमती असून अलंकार अस्सल 'वाटावे' असे नव्हे, तर अस्सलच असत. या त्यांच्या आग्रहापोटी गंधर्व नाटक मंडळींना भरपूर पैसा खर्च करावा लागे. हा भुर्दंड* होता. असं म्हणतात की नाटककार राम गणेश गडकरी यांनी गंधर्वांचा हा आग्रह त्यांच्यावर पलटवायचे ठरविले आणि अवतरली 'एकच प्याला' मधली 'सिंधू'. 'एकच प्याला'च्या पूर्वार्धात सिंधू भरजरी, लफ्फेदार साड्यांत वावरत असते तर उत्तरार्धात तिच्यावर कोसळणाऱ्या विपदांमुळे तिला अक्षरशः ठिगळं लावलेल्या जाड्याभरड्या* साड्या नेसून दळण-कांडण करावं लागतं. असो! बालगंधर्वांनी पुरुष भूमिका केल्या नाहीतच असे नाही. प्रभात कंपनीच्या 'धर्मात्मा' चित्रपटात त्यांनी एकनाथांची भूमिका केली होती.

गंधर्वांच्या खडतर अडचणींवर मात करीत खळाळत पण सरळ मार्गाने वाहणाऱ्या जीवनप्रवाहाला वेगळे वळण लागावे हे विधिलिखितच असावे. पारशी मंडळीचे एक पारशी नाटक पाहण्यासाठी ते एकदा गेले होते. तेथे त्यांना भेटली अभिनेत्री गोहरबाई कर्नाटकी. गोहर कर्नाटकी गात असे. ती गायिका

अभिनेत्री होती. १९३८मध्ये गोहर कर्नाटकी यांचा गंधर्व नाटक मंडळीत प्रवेश झाला. पुढे काळाच्या ओघात १९५१मध्ये उभयतांचा विवाह झाला. बालगंधर्वांसमोर जेव्हा जेव्हा ज्या ज्या अडचणी कोसळल्या तेव्हा तेव्हा त्या त्या अडचणींना सामोरे जाताना गोहरबाईसुद्धा गंधर्वांच्या खांद्याला खांदा लावून उभ्या* राहिल्या.



स्वतःच्या कलागुणांना किंचिन्मात्र* बाधा येऊ न देता परिस्थितीशी संघर्ष करता करता गंधर्वांना अखेर वार्धक्याने ग्रासले. प्रकृतीचे स्वास्थ्यही ढळले आणि अखेर १५ जुलै १९६७ रोजी बालगंधर्वांनी देह ठेवला. एक जबरदस्त ताकदीचा संगीत अभिनेता पंचत्वात विलीन* झाला.

बालगंधर्वांच्या कलेची प्रेक्षकांनी कदर केलीच. बेचाळिसाव्या मराठी नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद (१९२९) त्यांना बहाल करण्यात आले होते. १९५५मध्ये त्यांना संगीत नाटक अकादमीतर्फे राष्ट्रपतिपदक देण्यात आले. १९६४मध्ये 'पद्मभूषण' ही उपाधी त्यांना देण्यात आली. सांगलीचा विष्णुदास भावे स्मारक पुरस्कारही त्यांना मिळाला होता. अर्थात, प्रेक्षकांचे उदंड* प्रेम हा त्यांना मिळालेला सर्वोत्तम पुरस्कार होता.

सुहास लिमये

**शब्दार्थ**

| | | | |
|---|---|---|---|
| सवे = बरोबर | लुगडे = साडी | उदंड = खूप | भुर्दंड = अनावश्यक खर्च |

नाणावलेले = कौशल्य प्राप्त केलेले
पंचत्वात विलीन होणे = मृत्यू पावणे
खांद्याला खांदा लावून उभे राहणे = साथ देणे
लोकविश्रुत असणे = सर्वांना माहीत असणे
'आ' वासून उभे राहणे = सामोरे येणे
वस्तुजात = विविध वस्तू
जाड्याभरड्या साड्या = मऊ, जाड सुताच्या खरबरीत साड्या
किंचिन्मात्र = थोडीही

**क. पुढील वाक्यांमधील अधोरेखित शब्दसमूहाऐवजी त्याच अर्थाचा कंसातील शब्दसमूह वापरा.**

(आर्थिकदृष्ट्या कमकुवत होणे, निधन होणे, मान राखणे, आत्मसात करणे, तब्येत बिघडणे, काम थांबवणे, सन्मानपूर्वक देणे, वृद्धत्वामुळे विविध त्रास होणे)

उदा॰ : नारायणरावांनी विविध गायनप्रकारांवर प्रभुत्व मिळविले.

उत्तर : नारायणरावांनी विविध गायनप्रकार **आत्मसात केले.**

अ. ही नाटकसंस्था पुढे डबघाईस आली.

आ. त्यानंतर त्यांनी रंगभूमीवरून निवृत्ती स्वीकारली.

इ. बालगंधर्वांच्या कलेची प्रेक्षकांनी कदर केली.

ई. गंधर्वांना अखेर वार्धक्याने ग्रासले.

उ. बालगंधर्वांच्या प्रकृतीचे स्वास्थ्यही ढळले.

ऊ. अखेर बालगंधर्वांनी देह ठेवला.

ए. मराठी नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद त्यांना बहाल करण्यात आले होते.

## ४ नाट्यपरंपरा

*मराठी रंगभूमीवरील एक सशक्त नाटककार, दिग्दर्शक व अभिनेता म्हणून सतीश आळेकर परिचित आहेत. विजय तेंडुलकर, महेश एलकुंचवार यांच्याप्रमाणे आळेकरांनीही मराठी रंगभूमीवर नवे प्रयोग केले. आपल्या नाटकांमधून संगीताचा प्रभावीपणे वापर करणाऱ्या सतीश आळेकरांचे त्यासंबंधीचे विचार त्यांच्या पुढील मुलाखतीत वाचू या.*

**प्रश्न** - 'महानिर्वाण' (१९७४) आणि 'बेगम बर्वे' (१९७९) ही तुमची सर्वांत अधिक महत्त्वाची नाटके. दोन्ही नाटकांत भारतीय सांगीतिक परंपरेचा आधार कथनासाठी घेतलेला आहे. या परंपरेत नेमके कोणते बळ तुम्हाला जाणवते?

**उत्तर** - नाट्य परंपरेतील अनेक जुन्या गोष्टी मला आवडतात. कीर्तने मी बरीच ऐकलीत. भक्तिभावाने नाही; अपरिहार्य म्हणून. तीच गोष्ट मंगल कार्यालयामधून वाजणाऱ्या ब्रास बॅण्डची. हे बॅण्डवाले मला फार आवडतात. त्यांना बघायला, ऐकायला मजा येते. त्यांचे पोशाख बॅण्डच्या व्यावसायिक यशस्वितेवर भाष्य करीत असतात. सिंथेसायझरचा शिरकाव बॅण्डमध्ये होण्यापूर्वीचे बॅण्डवाले म्हणतोय मी. नाट्यसंगीत मला आवडते. छोटा गंधर्वांचे सौभद्र मी बघितले आहे. पण अन्य नाटके नाही. परंपरागत तमाशा मला आवडतो. दादा कोंडकेंचे 'विच्छा माझी पुरी करा', दादू इंदुरीकरांचे 'गाढवाचे लग्न' पूर्वी मी अनेकदा बघितले आहे. ह्या जुन्या प्रकारात विलक्षण नाट्यमयता असली पाहिजे असे जाणवते. आत्ताच्या काळात ही नाट्यमयता कदाचित विस्कळीत वाटते किंवा तेच तेच चालले आहे असेही वाटते. [...] तशीच जुनी मराठी भाषा! 'बेगम बर्वे'मधली भाषा आपोआप येत गेली. गाणी त्या त्या वेळेला बरोबर सुचत गेली. गाण्यातील शब्दांसाठी फक्त मुळातल्या संहिता बघाव्या लागल्या.

माझ्या जाणतेपणी जी संगीत नाटके मी बघितली ती विद्याधर गोखल्यांची नाटके. जुनी संगीत नाटके टिकली नाहीत, पण नाट्यसंगीत टिकले. आजही 'चंद्रिका ही जणू', 'खरा तो प्रेमा' अशा गाण्यांचे सूर ऐकू येतात तेव्हा शास्त्रीय संगीताच्या मैफलीचे नाही, तर नाटकाचेच वातावरण आपोआप तयार होते. ऑर्गनच्या सुरात विलक्षण नाट्यमयता आहे असे वाटते.

'जस्मा ओडन', 'हयवदन', 'घाशीराम...' नंतर 'महानिर्वाण' ह्या नाटकात लोकसंगीताचा वापर आधुनिक जाणिवेमधून आलेला आहे. ह्या संगीताच्या वापरामध्ये 'गोइंग बॅक टू द रुटस' (मुळांकडे परत जाणे) असा प्रकार अजिबात नव्हता. त्या त्या नाटककारांना त्या नाटकाच्या ओघात तो कलाप्रकार सुचला. 'घाशीराम...'मध्ये झुलणाऱ्या ब्राह्मणांची रांग केवळ फॅशन म्हणून आलेली नाही किंवा कीर्तनकलेची थट्टा करण्यासाठी 'महानिर्वाण'मध्ये निरूपण आलेले नाही. नानाची आणि आईची भेट झाल्यावर 'नेत्री जळी वाहो सदा। आनंदाचे रोमांच। तुका म्हणे कृपादान। इच्छी मन हे जोडी।' हे अत्यंत गांभीर्यपूर्वकच येते. कोणत्याही परंपरेचा दु:स्वास करून नवे काही घडत नाही. परंपरा समजावून घ्यायला लागते.


मुलाखतकार : रेखा इनामदार-साने

क. "कोणत्याही परंपरेचा दु:स्वास करून नवे काही घडत नाही. परंपरा समजावून घ्यायला लागते." आळेकरांच्या या विधानाविषयी तुम्हाला काय वाटते? उदाहरणे देऊन तुमचे मत २००-२५० शब्दांत लिहा.

**५ 'घाशीराम कोतवाल' हे नाटक मराठी रंगभूमीवरचा मैलाचा दगड म्हणून ओळखले जाते. आशय, मांडणी, सादरीकरण अशा विविध पातळ्यांवर हे नाटक वेगळे ठरते. या नाटकाची कल्पना येण्यासाठी सोबत जोडलेली चित्रफीत पाहा आणि त्यात काय वेगळेपणा जाणवतो त्यावर वर्गात चर्चा करा.**



**क. 'घाशीराम कोतवाल' या नाटकाचे संगीतकार भास्कर चंदावरकर यांचे त्या नाटकातील संगीताबद्दलचे विचार ऐका व पुढे दिलेल्या बहुपर्यायी प्रश्नांसाठी उत्तराचा योग्य पर्याय निवडा.**



विजय तेंडुलकर

१) विजय तेंडुलकर कोण होते?
   अ) संगीतकार  आ) नाटककार  इ) नेपथ्यकार
२) संगीत नाटकातील नवीन कल्पनांसाठी कशाची चौकट मोडायला हवी?
   अ) संगीताची  आ) समाजाची  इ) व्यवस्थेची
३) पारंपरिक नाट्यसंगीत कशावर आधारलेलं असतं?
   अ) कथानकावर  आ) लोकसंगीतावर  इ) संगीतातील रागांवर
४) घाशीराम नाटकातील संगीत हे भास्कर चंदावरकर यांच्या मते कसं होतं?
   अ) अर्थवाही व नाट्यपूर्ण  आ) अर्थवाही व समर्पक  इ) अर्थवाही व मधुर
५) संगीताविना केलेला घाशीरामचा प्रयोग यशस्वी का होत नाही?
   अ) कारण त्यामुळे नाटकातील बराच भाग कमी होतो.
   आ) कारण त्यामुळे नाटकाचा बाज बदलतो.
   इ) कारण त्यामुळे नाटकातील नाट्य हरवतं.



## ६ मराठी रंगभूमीवरचे ज्येष्ठ अभिनेते डॉ॰ श्रीराम लागू यांची सुधीर गाडगीळ यांनी घेतलेली मुलाखत ऐका. त्यावर आधारित बहुपर्यायी प्रश्नांसाठी उत्तराचा योग्य पर्याय निवडा.



डॉ॰ श्रीराम लागू

१. कोणाचे नाटक वाचताना ते अंगावर येते?
   (अ) तेंडुलकर (आ) गडकरी (इ) माडगूळकर
२. पुढीलपैकी कोणाचे नाटक डॉ॰ लागू आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी करायला घेतले?
   (अ) गडकरी (आ) खाडिलकर (इ) अत्रे
३. पुढीलपैकी कोणते नाटक आधुनिक मानले जायचे?
   (अ) भावबंधन (आ) उद्याचा संसार (इ) एकच प्याला
४. १९५५च्या सुमारास कोणत्या लेखकाने लेखन सुरू केले?
   (अ) वसंतराव कानेटकर (आ) पु॰ ल॰ देशपांडे (इ) राम गणेश गडकरी
५. तेंडुलकरांचे पहिले नाटक कोणते?
   (अ) वेड्याचं घर उन्हात (आ) माणूस नावाचे बेट (इ) उद्याचा संसार
६. प्रायोगिक नाटकांची टिंगल उडवण्यात सुरुवातीला कोण सहभागी नव्हते?
   (अ) गो॰ नी॰ दांडेकर (आ) ग॰ दि॰ माडगूळकर (इ) पी॰ एल॰ (पु॰ ल॰ देशपांडे)
७. लागूंच्या मते त्यांच्यासमोरचे आव्हान कोणते होते?
   (अ) प्रेक्षकसंख्या वाढवणे (आ) नाटकासाठी हॉल मिळविणे (इ) प्रेक्षकांची अभिरुची बदलणे



## ७ प्रायोगिक नाटक म्हणजे नेमकं काय?

'वसंत व्याख्यानमाले'साठी या वर्षी निमंत्रण आलं. विषय होता 'आजचं नाटक आणि प्रायोगिकता'.

प्रायोगिकता... प्रायोगिक नाटक म्हणजे नेमकं काय? मी जे करतो (असं मला वाटतं) त्याची नेमकी व्याख्या काय? याचा खोलात जाऊन विचार केला आहे का मी? विचार नक्की केला आहे. पण अगदी मुळापाशी पोचलो आहे का? या निमित्ताने मी त्याच्याबद्दल वाचायला लागलो. पण तरी ठोस उत्तर मिळेना. कारण प्रत्येकाला काहीतरी वेगळं म्हणायचं होतं!

काय आहे व्यावसायिक नाटक आणि प्रायोगिक नाटक? मी तर हा भेद कधी मानला नाही. मनापासून नाटक करत आलो. खरं सांगू का? मला तर प्रत्येक नाटक 'प्रायोगिक'च वाटतं. आपण नाटकाचा 'प्रयोग' म्हणतो! मला कल्पना आहे की हा तर्क अगदी ओढून-ताणून आणलेला वाटेल. त्यात 'प्रयोग' या शब्दाचा उगम वगैरे सांगितलं जाईल; सांगितलं गेलंही आहे. पण ते काही मला फारसं पटत नाही. [...]

मग काहीतरी अगम्य, अतर्क्य नाटक म्हणजे प्रायोगिक का? पण मग त्याला प्रायोगिक का म्हणायचं?

अगम्य, अतर्क्य नाटक म्हणू ना! म्हणजे अशी अनेक नाटकं आहेत जी कळतात, तर्कशुद्ध असतात आणि 'प्रायोगिक रंगभूमी'वर असतात. विषयामुळे ठरतं का की कुठलं प्रायोगिक आहे ते? 'बोल्ड' विषय असेल तर प्रायोगिक, असं? किंवा अगदी सरधोपट विषय असेल तर ते 'व्यावसायिक'? की मग सादर करायच्या पद्धतीवर ठरतं? नेहमीच्या रंगमंदिरात, एका ठोकळ्यावर भव्य नेपथ्य उभारलं की व्यावसायिक आणि एका छोट्या खोलीत तोकड्या नेपथ्यानिशी किंवा नेपथ्यवर्ज्य नाटक केलं की ते प्रायोगिक, असं असतं का? पण अनेक प्रायोगिक नाटकांमध्ये चांगलं नेपथ्य असतं आणि तीपण रंगमंदिरांमध्ये होतातच! मग कलाकार? नावाजलेले कलाकार, दिग्दर्शक, तंत्रज्ञ वापरले की व्यावसायिक आणि नाही तर प्रायोगिक? पण जितेंद्र जोशी, सचिन खेडेकर, अतुल कुलकर्णी यांच्यासारख्या अनेक प्रथितयश कलाकारांनी अशी बरीच नाटकं केली, ज्यांना 'प्रायोगिक' म्हटलं गेलं. की वेळेचा संबंध आहे? कमीत कमी दोन अंकी, अडीच तासांचं नाटक म्हणजे व्यावसायिक. प्रायोगिक रंगभूमीवरची तमाम अशा नाटकांची नावं, जे हे निकष पूर्ण करतात, इथे लिहायला घेतली तर काही लेखांची शब्दमर्यादा संपेल! थोडक्यात काय, तर या सगळ्या गोष्टींमुळे नेमकी 'प्रायोगिक'ची व्याख्या ठरवणं अवघड आहे. किंवा हे मापदंड योग्य नाहीत.


'महानिर्वाण' नाटकातील दृश्य

त्यात व्यावसायिकच्या विरुद्ध म्हणजे प्रायोगिक का? असे दोन गट का पडावेत? आणि कोणी पाडले हे दोन गट आपल्याकडे? आणि जेव्हा काही प्रायोगिक नाटकं काही महिन्यांतच व्यावसायिक रंगभूमीवर येतात, तेव्हा काय म्हणायचं त्यांना? म्हणजे मग ते नाटक कोणत्या गटात टाकणार आपण?

फार प्रश्न झाले. आता उत्तरं शोधायचा प्रयत्न करू. मला काय वाटतं हे सांगतो. नाटक हे नाटक असतं. ते छोटं किंवा मोठं असतं! नाटकाचा प्रयोग करण्याचा मूळ 'हेतू' बघितला पाहिजे आणि ते नाटक कोणत्या गटात मोडतं हे पाहायला पाहिजे. म्हणजे नाटकातल्या प्रत्येक माणसाचा प्रयोग करायचा मूळ हेतू हा जर व्यवसाय असेल तर ते आपोआप व्यावसायिक नाटक होतं. निर्माता पैसे खर्च करतो, कारण त्याची अपेक्षा असते की, आवक खर्चापेक्षा जास्त असेल आणि त्याला फायदा होईल. कलाकार आणि तंत्रज्ञ यांना त्यांच्या कामाचा आर्थिक मोबदला मिळतो. थोडक्यात, या नाटकाचा प्रयोग करण्यामागचा मूळ हेतू हा 'व्यवसाय' करणं असा असतो. आणि सध्या ज्या नाटकांना 'प्रायोगिक' म्हटलं जातं, त्यांचा मुख्य हेतू हा प्रयोग करण्याचा असतो इतकंच! तेव्हा माझ्या मते तरी नाटकांचे गट हे फक्त आणि फक्त त्यातल्या अर्थकारणावर ठरतात.

निपुण धर्माधिकारी

**क. तुम्हाला आवडलेल्या किंवा न आवडलेल्या एखाद्या नाटकाविषयी थोडक्यात माहिती लिहा. त्यासाठी हवे असल्यास पुढे दिलेल्या मुद्द्यांचा वापर करा. (२५०-३०० शब्द)**

मुद्दे : नाटकाचे व नाटककाराचे नाव, नाटकाचा प्रकार, नाटकाचा विषय, पात्रसंख्या, नाटकाचे नेपथ्य, संगीत, प्रकाशयोजना, कलाकारांचा अभिनय, नाटकातील संवाद इत्यादींबाबतचे तुमचे मत, नाटक आवडण्याची किंवा नावडण्याची कारणे

**ख. वरील उताऱ्यात आलेले काही शब्द व त्यांचे समानार्थी शब्द पुढे दिले आहेत. त्यांच्या जोड्या लावा. कंसातील प्रत्येक शब्द वापरून वाक्य तयार करा.**

(तोकडे, ठोस, सर्वसामान्य, अनाकलनीय, प्रसिद्ध, निश्चित, अगम्य, सरधोपट, फायदा, नफा, प्रथितयश, कमी, आखूड)

उदा. ठोस = निश्चित

अ. कोणतेही **ठोस** आश्वासन मिळेपर्यंत आंदोलन चालूच राहील.

आ. कामगारांनी पुकारलेला संप **निश्चित** आश्वासन मिळाल्यावर मागे घेण्यात आला.

## ८ ज्येष्ठ रंगकर्मी विजया मेहता यांच्या गिरीश कुबेर यांनी घेतलेल्या मुलाखतीतील 'रंगायन'विषयीचा भाग ऐका. त्यावर आधारित बहुपर्यायी प्रश्नांसाठी उत्तराचा योग्य पर्याय निवडा.

टीप : या मुलाखतीमध्ये आलेला 'वलय' हा शब्द वर्तुळ या अर्थाने वापरला आहे.



विजया मेहता

१) विजया मेहता यांना त्यांची कर्मभूमी कितव्या वर्षी सापडली?
   अ) २०-२१व्या वर्षी  आ) १५-१६व्या वर्षी  इ) १७-१८व्या वर्षी

२) चित्रकला क्षेत्रातील कोणत्या व्यक्तीचा समावेश गिरगावच्या गँगमध्ये होता?
   अ) माधव वाटवे  आ) प्रफुल्ला डहाणूकर  इ) विजय तेंडुलकर

३) रंगायन ही कोणत्या प्रकारची संस्था होती?
   अ) नाट्यसंस्था  आ) कलासंस्था  इ) सामाजिक संस्था

४) पुढीलपैकी कोणत्या मासिकामध्ये सर्व प्रकारचे साहित्य समाविष्ट केले जायचे?
   अ) लघुकथा  आ) नवकथा  इ) सत्यकथा

५) रंगायनच्या संगीत विभागात पुढीलपैकी कोण सहभागी नव्हते?
   अ) भीमसेन जोशी  आ) जितेंद्र अभिषेकी  इ) पु. ल. देशपांडे

६) रंगायनमध्ये किती वलये होती?
   अ) ५  आ) ४  इ) ६

## ९ कविता

### नट

नांदीनंतर
पडदा उघडला
तेव्हा मी तुडुंब भरलेला होतो
हजारो रंगीबेरंगी शब्दांनी,
शरीरभर रोरावणाऱ्या
असंख्य आविर्भावांनी,
भीतींनी, आशांनी, अपेक्षांनी;
आता
भरतवाक्य संपल्यावर
सर्व प्रेक्षालय रिते झाले आहे
आणि संहितेत नसलेल्या
प्रयाणाची तयारी करीत
मी उभा आहे
रंगमंचावर, एकटा,
समोरच्या प्रेक्षालयाप्रमाणेच
संपूर्ण रिकामा.

मी उच्चारलेले
काही शब्द, अजूनही
प्रेक्षालयातील धूसर
मंदप्रकाशित हवेवर
पिंजारलेल्या कापसासारखे
तरंगत आहेत,
माझे काही आविर्भाव
रिकाम्या खुर्च्यांच्या हातांना
बिलगून बसले आहेत,

मी निर्माण केलेले
हर्षविमर्षाचे क्षण
पावसाने फांद्यांवर ठेवलेल्या
थेबांसारखे
भितींच्या कोपऱ्यावर
थरथरत आहेत
अजूनही.

हा एक दिलासा
माझ्या रितेपणाला.
नाटक संपल्याची खंत –
ती आहेच.

नाटक नव्हे, तीन तासांचे
एक अर्करूप अस्तित्व
संपले आहे.
पण संपले आहे ते फक्त
इथे – माझ्याजवळ.

माझ्या त्या अस्तित्वाच्या
कणिका घेऊन
हजार प्रेक्षक घरी गेले आहेत;
मी एक होतो
तो अंशाअंशाने
हजारांच्या जीवनात
– कदाचित स्मरणातही –
वाटला गेलो आहे.

कुसुमाग्रज

**क. नाटक सुरू असताना आणि ते संपल्यानंतर नटाला येणारा अनुभव वरील कवितेत मांडला आहे. एक प्रेक्षक म्हणून, तुम्ही अनुभवलेले नाटक सुरू होण्याआधीचे प्रेक्षागृह आणि नाटक संपल्यानंतरचे प्रेक्षागृह यांचे वर्णन करा. (१००-१५० शब्द)**

**ख. नाटकातील कलाकारांसाठी तसेच प्रेक्षकांसाठीही 'तिसरी घंटा' म्हणजे उत्सुकतेची परिसीमा असते. कलाकार म्हणून किंवा प्रेक्षक म्हणून ही उत्कंठा तुम्ही अनुभवली आहे का? तुमचा अनुभव वर्गात सांगा.**




## १० नट, नाटक आणि नाटककार

*पुढील उतारा हा नाटककार महेश एलकुंचवार यांच्या भाषणातील भाग असून त्यात बोलभाषेच्या सैल रचनेचा बराच वापर आढळून येतो. भाषणातील विचारांचा नैसर्गिक प्रवाह व संवादात्मक शैली तशीच राहावी यासाठी उताऱ्याचे लेखी भाषेत रूपांतर करणे टाळले आहे.*

महाराष्ट्रात नाटककारांना बऱ्यापैकी प्रतिष्ठा आहे, इतर प्रांतांच्या मानानं. इथं नाटककारांची साखळीच आहे, अगदी १८५४ सालापास्नं. आज सहा पिढ्यांचे नाटककार लिहिताहेत. पण म्हणून नाट्यव्यवहारात नाटककार सर्वांत महत्त्वाचा असतो का? असं काही समजू नका. नाटककाराला मात्र वाटतं, तोच सर्वांत महत्त्वाचा, कारण तोच सुरुवात करतो. त्यानं लिहिलंच नाही, तर नाटक होणारच कसं?

१९६०च्या दशकात दिग्दर्शकांची नवी पिढी आली महाराष्ट्रात; विजयाबाई वगैरे. ही सर्व मंडळी म्हणू-सांगू लागली की, नाटककार हा काही प्राथमिक महत्त्वाचा नसतो; दिग्दर्शक महत्त्वाचा असतो. कारण नाटकाला शारीर रूप तो देतो. नुसत्या संहितेला काही 'लोकस स्टँडी*' नाही. तिच्यात प्राण आम्ही – म्हणजे दिग्दर्शक – फुंकतो. तर आम्हीच महत्त्वाचे.

मला मात्र हे सगळं असमाधानकारक वाटत होतं कायम. काहीतरी चुकतंय, बरोबर नाही, असं काहीतरी. मग मला वाटू लागलं की, नटांचं काय? नाटककार आणि दिग्दर्शक, दोघं महत्त्वाचे असतील तर नट? तोही नाही तितकाच महत्त्वाचा? त्याच्याशिवाय नाटक होईल तरी का? खरं तर पहिले दोन घटक, म्हणजे नाटककार आणि दिग्दर्शक नसले तरी नाटक होईल एक वेळ, पण नटाशिवाय नाहीच होऊ शकणार.



पीटर ब्रूकचं 'ओपन स्पेस' तुम्ही वाचलं असेल. ब्रूकची नाटकाची व्याख्या काय? तर सभागृहात एक प्रेक्षक बसलेला आहे आणि रंगमंचावर एक नट या विंगेतून त्या विंगेत जाताना तो पाहतो, याला नाटक म्हणायचं. प्रेक्षकच तिथं नसला तर ते नाटक नाही होणार. ती फार तर तालीम होईल. बघणारा हवाच. आणि समजा प्रेक्षक आहे पण रंगमंचावर नट नाही, तर तेही नाटक नाही होणार. तर या दोन घटकांशिवाय नाटकाला काही लागत नाही. एक प्रेक्षक आणि एक नट एवढं पुरे आहे नाटक सिद्ध व्हायला.

यर्झी ग्रोटोव्स्की यांच्या सहवासात मी काही दिवस पोलंडमध्ये होतो. त्यांनी मला काही प्रश्न विचारायला सुरुवात केली. 'महेश, समज, प्रकाशयोजना नसली, तर नाटक होईल का?' मी म्हटलं, 'होईल.' 'मेकअप?' 'होईल.' 'नेपथ्य नसेल तर?' मी म्हटलं, 'तरी होईल नाटक.'


अशा रीतीनं ज्याच्याशिवाय नाटक होऊ शकत असेल, तर ते कशाला हवं? उडवा ते, असं संक्षिप्तीकरण – ॲब्रीव्हिएशन – करत आम्ही नाटककारांवर आलो. फापटपसारा, अनावश्यक गोष्टी काढूनच टाकायच्या. ते म्हणाले, 'नाटककार नसला, तर होईल का

नाटक?' मी बोललो नाही, तेव्हा तेच म्हणाले, 'होईल. आणि दिग्दर्शक नसला, तरीही होईल. एक नट रंगमंचावर उभा राहील आणि आपल्या मनानं त्याच्या मनातल्या मनात संहिता निर्माण करून तो काहीतरी करेल. चांगल्या वाईटाचा मुद्दा नाही इथं, पण ते नाटकच असेल हे नक्की.'

म्हटलं, खरंय. आणि खरंच आहे ते. लेखकानं आपलं कितीही महत्त्वाचं नाटक लिहिलं आणि दिग्दर्शकानं अगदी प्राण ओतून ते बसवलं, तरी रंगमंचावर राजा असतो नटच. तो जे काही तिथं करेल तेच नाटक. त्याच्यावर आता लेखकाचा ताबा नाही की दिग्दर्शकाचं नियंत्रण नाही. नटाला तिथं काही एकदम नवं सुचलं, तर तो ते करतो आणि लेखक काय किंवा दिग्दर्शक काय, वैतागून हात चोळत बसण्यापलीकडे काही करू शकत नाही अशा वेळी. नट एखाद्या नाटकाचा संपूर्ण आशय एका फटक्यात बदलू शकतो जो न लेखकाला अभिप्रेत होता, न दिग्दर्शकाला. [...]

मी लिहायला सुरुवात केली आणि उत्साहानं केली. स्वतःला तपासून कोण बघत बसतो? अशा वेळी विजयाबाई मला म्हणाल्या की, महेश, तुझ्या नाटकांत कायम दोन-तीन पात्रं असतात फक्त आणि रंगमंचाचा अवकाश तू नीट वापरत नाहीस. ३६ × ४० चा रंगमंचाचा अवकाश. आपण कधी विचारच नाही केलेला याचा! माझ्या एकदम लक्षात आलं. या अवकाशातच तर सगळं घडतं, घडवतो आपण. संस्कृतींचे उदयास्त, त्यांचे विनाश, अध:पात, व्यक्तींची, समूहांची भांडणं, प्रेम, मृत्यू. सगळं मानवी जीवनच या छोट्याशा अवकाशात कोंडून दाखवायचं आहे. हा झाला दृश्य अवकाश. दुसरा एक अवकाश असतो रंगभूमीवर. काळाचा अवकाश. नाटक कादंबरीसारखं हजार पानं लिहून चालत नाही. एका विशिष्ट कालमर्यादेत ते बसवावं, संपवावं लागतं. हजार वर्षांच्या घटना नव्वद मिनिटांत दाखवाव्या लागतात एका कालावकाशात. या दोन अवकाशांबरोबर आणखी तिसरा एक अवकाश असतो रंगभूमीवर, शब्दांचा अवकाश. श्रवणावकाश. आकुस्तिक स्पेस. माझ्या शब्दांमध्ये मी किती अवकाश ठेवतो तेही महत्त्वाचं असतं. या तीन प्रकारचे रंगमंचीय अवकाश आहेत ते समजून घेऊन, त्यांचा योग्य वापर करून त्यांच्याशी मैत्री केल्याशिवाय मला नाटकात काही करता येणार नाही हे कळलं. नाहीतर लिहितोच आहे आपण! [...]

रंगभूमीचा एक महत्त्वाचा नियम माझ्या लक्षात आला तो असा, की तिथं अनावश्यक असा एकही तपशील चालत नाही. जी जी गोष्ट अनावश्यक ती ती गोष्ट स्वतंत्रपणे कितीही सुंदर असली तरी तिथं कुरूप होते. व्हॉट इज अननेसेसरी बिकम्स अनब्युटीफूल. हे सगळ्या अवकाशांना लागू होणारं तत्त्व आहे. फार सुंदर संवाद लिहिला, टाळी पडली असं लोक सांगतात तेव्हा काळजी वाटते. टाळीसाठी लिहितोस का, बाळा? सुंदर असेल, पण आवश्यक आहे का? नसेल तर काप ते. हे झालं श्रवणावकाशाबद्दल. दृश्यावकाशाबद्दलही तेच करतो आपण. तपशिलांची खेचाखेच अनावश्यक आणि त्याला वास्तववाद म्हणतो आपण. माझ्या महाविद्यालयाची मुलं नाटक करायची स्नेहसंमेलनानिमित्त अन् रंगीत तालमीला बोलवायची. रंगमंचावर सामानाची ही गर्दी. मी म्हणायचो, अरे, हे काय? हा बुद्धाचा पुतळा, ही नटराजाची मूर्ती, हा गालिचा; याचा काही संबंध आहे का नाटकाशी? आणि हा टेलिफोन. हा का? हा वाजतो का नाटकात एकदा तरी? आणि नाही वाजत तर का नाही वाजत हे तरी स्पष्ट होतं का? तर, ठेवलाय वास्तववाद म्हणून, असं उत्तर. असं मग अनावश्यक काढून टाकता टाकता रंगमंचावरचं सगळं सामानच गायब झालं. अवकाश मोकळा. म्हटलं करा



महेश एलकुंचवार

आता अभिनय. तर त्यांना जमेना. इतर प्रॉप्सची मदत घेतल्याशिवाय, फक्त स्वतःचं शरीर एवढीच सामग्री घेऊन अभिनय करणं त्यांना माहीतच नव्हतं. पण हे त्यांनाच काय, नाटककाराला आधी माहीत असावं लागतं. काही अनावश्यक दृश्यं लिहिली आहेत का आपण? हे दृश्य गमतीदार आहे, आकर्षक आहे, एवढंच पुरेसं नाही, तर त्यामुळे नाटकाच्या मूलाधाराला काही मदत होतेय का त्याची हे महत्त्वाचं. नसेल तर निर्ममपणे कापायचं ते दृश्य. तसंच अमुक एक पात्र. इंटरेस्टिंग आहे, पण ते नसलं, तरी नाटकाचं काही बिघडणार आहे का? नाही ना? मग कापा त्याला, उडवा नाटकातून. संक्षिप्तीकरण, संपादन, एडिटिंग हे लिहिण्याइतकंच महत्त्वाचं असतं नाटकात. लिहिण्याबरोबर काटछाटही करता आली पाहिजे. हे सर्व अवकाश वापरताना काय आवश्यक आणि काय अनावश्यक हे ठरवायला काही सूत्रं आहेत, ती अशी : हे वाक्य, हा संवाद, हे पात्र, हे दृश्य नाटकाला पुढे नेतं का? याच्यामुळे नाटकाच्या मूळ आशयद्रव्याला काही पोषण मिळतं का? याच्यामुळे पात्रांवर आणि त्यांच्या परस्परसंबंधावर काही प्रकाश पडतो का? याच्यामुळे भावस्थिती व वातावरणनिर्मिती होते का? – हे सर्व प्रश्न नाटककारानं स्वतःला विचारावेत. यातल्या सगळ्यांना होकारार्थी उत्तर आलं तर उत्तमच. पण निदान एकाला तरी ते तसं आलं पाहिजे. सगळ्याच प्रश्नांना नकारार्थी उत्तर येत असेल, तर उडवा तो संवाद, दृश्य, पात्रं. कात्री हातांत घेऊनच बसावं लागतं. पहिला खर्डा लिहिणं तसं सोपं. तो असू दे बेबंद. पण नंतर काय नको ते लाल शाईनी आपण खोडायला बसलो, अन् तसं बसावंच लागतं, की खूपदा अर्धीच संहिता उरते. पण उरते ती पूर्ण नाटक असते. अर्थात खूप काळ तुम्ही लिहीत असाल, तर मग काटछाटीची ही प्रक्रिया लिहितानाच मनातल्या मनात सुरूच असते आणि पहिलाच खर्डा निर्दोष उतरतो. पण यालाही रियाजाची गरज आहेच.

महेश एलकुंचवार

**शब्दार्थ**

लोकस स्टँडी : ही एक संज्ञा आहे. अर्थ : स्वबळावर परिणामकारक ठरण्याची क्षमता.

**क. पुढे दिलेली विधाने उताऱ्यातील आशयाशी जुळतात का ते 'हो' किंवा 'नाही' यांपैकी योग्य पर्याय निवडून सांगा.**

| | हो | नाही |
|---|---|---|
| अ. नाटकात नाटककार दुय्यम असतो. | | |
| आ. नट आणि प्रेक्षक यांच्यातील देवाणघेवाण म्हणजे नाटक. | | |
| इ. नाटकासाठी दोन अवकाशांचा विचार करावा लागतो. | | |
| ई. नाटकात अनेक गोष्टी दाखवून ते वास्तववादी करता येते. | | |
| उ. उत्तम नाटककार हा उत्तम संपादक असावा लागतो. | | |

**ख. थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. नटाचे नाटकातील अनन्यसाधारण महत्त्व नाटककार एलकुंचवारांनी कसे दाखवून दिले आहे?

२. रंगमंचावरील कोणत्या अवकाशांबद्दल एलकुंचवारांनी चर्चा केली आहे?

३. एलकुंचवारांच्या मते नाटकात नेमकेपणा कसा आणता येऊ शकतो?

**ग. वरील उताऱ्यात आलेले काही वाक्प्रचार वापरून पुढे काही वाक्ये दिली आहेत. त्या वाक्प्रचारांचे अर्थ कंसात दिले आहेत. वाक्प्रचाराचा कंसात दिलेला अर्थ लक्षात घेऊन दिलेल्या वाक्यात तो योग्य प्रकारे वापरा.**

(अपेक्षित असणे, कमी करणे, मान असणे, तयार होणे, दाद मिळणे, हरवणे)

उदा॰ : (वाक्प्रचार) प्रकाश पडणे – (अर्थ) स्पष्ट होणे

आजच्या तुमच्या भाषणातून ह्या विषयाच्या अनेक पैलूंवर प्रकाश पडला.

उत्तर : आजच्या तुमच्या भाषणातून ह्या विषयाचे अनेक **पैलू स्पष्ट झाले.**

अ. त्या विनोदी नटाची लोकप्रियता एवढी आहे की, रंगमंचावरील त्याच्या नुसत्या प्रवेशालाच टाळी पडते.

आ. गेल्या काही दिवसांपासून आमच्या गच्चीची चावी गायब झाली आहे.

इ. या प्रश्नाला नक्की काय उत्तर मिळणे तुला अभिप्रेत आहे?

ई. पाटीलसाहेबांच्या घराण्याला गावात मोठी प्रतिष्ठा आहे.

उ. लेख आटोपशीर होण्यासाठी त्यात बरीच काटछाट करावी लागली.

ऊ. एव्हरेस्ट मोहिमेसाठी गिर्यारोहक सिद्ध झाले.

**घ. वरील उताऱ्यात बोलभाषेत आलेली काही वाक्ये पुढे दिली आहेत. लेखननियमांनुसार आवश्यक ते बदल करून ती पुन्हा लिहा.**

अ. महाराष्ट्रात नाटककारांना बऱ्यापैकी प्रतिष्ठा आहे, इतर प्रांतांच्या मानानं. इथं नाटककारांची साखळीच आहे, अगदी १८५४ सालापास्नं.

आ. १९६०च्या दशकात दिग्दर्शकांची नवी पिढी आली महाराष्ट्रात; विजयाबाई वगैरे.

इ. एक प्रेक्षक आणि एक नट एवढं पुरे आहे नाटक सिद्ध व्हायला.

ई. यर्झी ग्रोटोव्स्की यांच्या सहवासात मी काही दिवस पोलंडमध्ये होतो.

उ. नट एखाद्या नाटकाचा संपूर्ण आशय एका फटक्यात बदलू शकतो जो न लेखकाला अभिप्रेत होता, न दिग्दर्शकाला.

ऊ. दुसरा एक अवकाश असतो रंगभूमीवर.

ए. हजार वर्षांच्या घटना नव्वद मिनिटांत दाखवाव्या लागतात एका कालावकाशात.

ऐ. माझ्या महाविद्यालयाची मुलं नाटक करायची स्नेहसंमेलनानिमित्त अन् रंगीत तालमीला बोलवायची.



## ११ करा आणि शिका.

**क. बालगंधर्वांचा आणि मराठी संगीतनाटकाच्या सुवर्णकाळाचा परिचय करून देणारा चित्रपट 'बालगंधर्व' पाहा आणि त्याची कथा वर्गात सादर करा.**

**ख. फिल्म्स डिव्हिजन प्रस्तुत मराठी रंगभूमीच्या इतिहासाचा आढावा घेणारी 'We the theatre' ही ध्वनिचित्रफीत आंतरजालावर पाहून त्यावर वर्गात सादरीकरण व चर्चा करा.**

**ग. तुम्ही कधी नाटकात अभिनय केला आहे का? किंवा अभिनय सोडून अन्य कुठल्या भूमिकांमधून (उदा॰ दिग्दर्शक, नाटककार, संगीतकार, नेपथ्यकार, निर्माता इ॰) तुम्ही नाटकाशी जोडले गेले आहात का? त्या बाबतीतला तुमचा अनुभव वर्गात सांगा.**

## उत्तरसंच

**१. ग.** अ. त्या पात्रांवर आलेल्या प्रसंगांच्या दर्शनातून जर बोध घडला नाही तर मात्र त्या नाटकातल्या संवादांना चर्चेचे स्वरूप येईल.
आ. नाटककार रंगमंचावर जो भावनांचा खेळ दाखवतो तो आपल्या मनातही सुरू होतो.
इ. ते प्रेक्षकांपुढे आणणारे नट, नेपथ्यकार, त्या प्रसंगाला उठाव देणाऱ्या प्रकाशाची योजना करणारे कलावंत किंवा प्रसंगात व्यक्त केलेल्या भावनांना आणि वातावरणाला अधिक परिणामकारक करणारे संगीत-नियोजक ह्या सर्वांना आपली कला पणाला लावूनच ते दरवेळी उभे करावे लागते.
ई. नाटककाराला ती दृश्ये डोळ्यापुढे रंगमंचावर आणून ती खरी आहेत असा आभास निर्माण करायचा असतो.

**१. च.** अ. लक्ष ठेवणे. योग्य रूप : ठेवत असे
आ. लक्ष न देणे. योग्य रूप : दिले नाही
इ. लक्ष जाणे. योग्य रूप : जाणे
ई. लक्ष लागणे. योग्य रूप : लागले
उ. लक्ष पुरवणे. योग्य रूप : पुरवणे
ऊ. लक्ष वेधणे. योग्य रूप : वेधले गेले
ए. लक्ष उडणे. योग्य रूप : उडाले
ॲ. लक्ष घालणे. योग्य रूप : घालणे
ऐ. लक्ष असणे. योग्य रूप : असते
ओ. लक्ष देणे. योग्य रूप : द्यावे

**२. क.** अ. आस्वाद आ. अभिरुची इ. कालसुसंगत ई. पीछेहाट उ. मानबिंदू

**३. क.** अ. आर्थिकदृष्ट्या कमकुवत झाली आ. काम थांबवले इ. मान राखला
ई. वृद्धत्वामुळे विविध त्रास सुरू झाले उ. तब्येत बिघडली ऊ. निधन झाले
ए. सन्मानपूर्वक देण्यात आले होते

**५. क.** १. आ २. अ ३. इ ४. अ ५. इ

६. १. आ २. इ ३. आ ४. अ ५. आ ६. अ ७. इ

७. **ख.** अगम्य – अनाकलनीय, सरधोपट – सर्वसामान्य, फायदा – नफा, प्रथितयश – प्रसिद्ध, तोकडे – कमी, आखूड

अ. पारितोषिकप्राप्त चित्रपट नेहाला अनेकदा अगम्य वाटतात.

आ. काही चित्रे कळतात तर काही अनाकलनीय असतात.

अ. दूरचित्रवाणीवरील मालिकांचे विषय अनेकदा सरधोपट असतात

आ. त्या नियतकालिकामधील लेख फारच सर्वसामान्य असतात.

अ. भरघोस फायदा दिसत असल्याशिवाय अजित कोठेही गुंतवणूक करत नाही.

आ. दर तिमाहीत कंपनीला किती नफा झाला याकडे मोठ्या गुंतवणूकदारांचे बारीक लक्ष असते.

अ. ऑलिंपिक पात्रता फेरी गाठण्यात त्या धावपटूचे प्रयत्न तोकडे पडले.

आ. साथीचा फैलाव रोखण्यात सर्वांचे प्रयत्न कमी पडले.

इ. मितालीला आखूड कपडे घालायला आवडतात.

अ. प्रथितयश कलाकारांना घेऊन केलेला चित्रपट नेहमीच यशस्वी होतो असे नाही.

आ. कालच्या नृत्याच्या कार्यक्रमाला नृत्य क्षेत्रातील सर्व प्रसिद्ध नर्तक उपस्थित होते.

८. १. इ २. आ ३. आ ४. इ ५. अ ६. अ

१०. **क.** अ. हो आ. हो इ. नाही ई. नाही उ. हो

१०. **ग.** अ. दाद मिळते आ. हरवली आहे इ. अपेक्षित आहे ई. मोठा मान आहे उ. तो बराच कमी करावा लागला ऊ. तयार झाले

१०. **घ.** अ. इतर प्रांतांच्या मानाने महाराष्ट्रात नाटककारांना बऱ्यापैकी प्रतिष्ठा आहे. अगदी १८५४ सालापासून इथे नाटककारांची साखळीच आहे.

आ. १९६०च्या दशकात महाराष्ट्रात विजयाबाई वगैरे दिग्दर्शकांची नवी पिढी आली.

इ. नाटक सिद्ध व्हायला एक प्रेक्षक आणि एक नट एवढे पुरे आहे.

ई. मी काही दिवस पोलंडमध्ये यर्झी ग्रोटोव्स्की यांच्या सहवासात होतो.

उ. लेखकाला किंवा दिग्दर्शकाला अभिप्रेत नसलेल्या प्रकारे नट एखाद्या नाटकाचा संपूर्ण आशय एका फटक्यात बदलू शकतो.

ऊ. रंगभूमीवर दुसरा एक अवकाश असतो.

ए. एका कालावकाशात हजार वर्षांच्या घटना नव्वद मिनिटांत दाखवाव्या लागतात.

ऐ. स्नेहसंमेलनानिमित्त माझ्या महाविद्यालयाची मुले नाटक करायची आणि रंगीत तालमीला बोलवायची.

# कलांच्या प्रांगणात ७









महाराष्ट्र. जितका 'राकट, कणखर, दगडांचा', तितकाच 'नाजूक, कोमल, फुलांचा' हा देश. गड-किल्ल्यांच्या या भूमीत गायन, वादन, नृत्य, चित्रकला, शिल्पकला अशा विविध कला बहरल्या. जात्यावरच्या ओव्या, भजने, देवांच्या मूर्ती, त्यांच्यासाठी केली जाणारी फुलांची आरास... दैनंदिन जगण्यातल्या अशा अनेक साध्यासुध्या गोष्टींमधून स्वर, ताल, लय, आकार, रंग यांच्याशी इथल्या सामान्य माणसाचे नाते जडले. नकळतपणे मिळालेला कलेचा वारसा कित्येकांनी जाणीवपूर्वक जोपासला. विचारपूर्वक, परिश्रमपूर्वक आपले योगदान देऊन तो अधिक समृद्ध केला. गुरु-सान्निध्यातून गायन, वादन, नर्तनाचे संस्कार करणारी सांगली, कोल्हापुरातील गुरुकुले असोत, किंवा १८५७ साली स्थापन झालेले चित्रकला, शिल्पकला, वास्तुकला यांचे शिक्षण देणारे मुंबईतील सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्स असो; कलेतील परंपरा आणि नवता यांचा मेळ साधत त्या कला जोपासणाऱ्या कलावंतांना इथे प्रोत्साहन मिळाले. प्रयोगशीलतेचे इथे नेहमीच स्वागत झाले. अनेक कलाकारांना वेगळी वाट चोखाळण्याचे बळ मिळाले. अनेक कलावंत इथे जन्मले, वाढले. बाहेरून आलेल्या अनेकांनी या भूमीला आपले मानले. महाराष्ट्रानेही या कलावंतांना भरभरून दिले. नाव, पैसा, प्रसिद्धी, मानमरातब, रसिकांचे अफाट प्रेम... बरेच काही. म्हणूनच आज इथल्या कलांच्या प्रांगणात अनेक बुजुर्ग, प्रथितयश कलाकारांसोबतच कितीतरी उगवते, उभरते कलाकार आनंदाने समरस झालेले आपल्याला दिसतात.

# ७ कलांच्या प्रांगणात

**१ महाराष्ट्रातील काही प्रसिद्ध कलाकारांचे फोटो पुढे दिले आहेत. ते तुम्हाला ओळखता येतील?**



भीमसेन जोशी (गायक)

किशोरी आमोणकर (गायिका)

मकबूल फिदा हुसेन (चित्रकार)

विठ्ठल उमप (शाहीर)

वासुदेव गायतोंडे (चित्रकार)

सुरेश तळवलकर (तबलावादक)

रोहिणी भाटे (कथ्थक नृत्यांगना)

यमुनाबाई वाईकर (लावणी कलाकार)

२ तुम्हाला संगीत ऐकायला आवडते का? तुम्ही कोणत्या प्रकारचे संगीत ऐकता?

३ तुम्ही संगीत कुठे आणि कधी ऐकणे पसंत करता?

निसर्गाच्या सान्निध्यात असताना

घरात एकटे असताना

काम करताना इयरफोनवर

घरात मोठ्या आवाजात

रात्री झोपताना

**तुम्ही संगीत कुठे आणि कधी ऐकणे पसंत करता?**

प्रवासात

मैफलींमध्ये

मोटार चालवत असताना

मित्र-मैत्रिणींसोबत पबमध्ये

पार्टीत

म्युझिक कॉन्सर्टमध्ये

व्यायाम करत असताना



## ४ महाराष्ट्रातील संगीत महोत्सव



महाराष्ट्रातील सांस्कृतिक महोत्सव आवर्जून दखल घेण्याजोगे असतात. विशेष म्हणजे जवळपास वर्षभर कुठे ना कुठे संगीत महोत्सव सुरू असतात. मुंबई तर सांगीतिक उलाढालीचे मोठे केंद्र. त्यामुळे इथे संगीत महोत्सव व म्युझिक सर्कल्सना काय तोटा! एन.सी.पी.ए., म्युझिक फोरम, दादर-माटुंगा कल्चरल सेंटर, बॉम्बे म्युझिक सर्कल, पार्ले म्युझिक सर्कल, हलीम अकॅडमी ऑफ म्युझिक, शारदा संगीत विद्यालय, गुणिदास संगीत समारोह, सूरसिंगार संसद इत्यादी मुंबईतल्या गाजलेल्या संगीत संस्था होत. 'मुंबई फेस्टिव्हल', 'कालाघोडा फेस्टिव्हल', 'गुणिदास महोत्सव', 'पंचमनिषाद महोत्सव' इत्यादी संगीतसमारंभ मुंबईत होतात. [...] आता साठीच्या घरात येत असणारा 'सवाई गंधर्व भीमसेन महोत्सव' हा तर महाराष्ट्रातला सर्वात जास्त लोकप्रिय व पुण्याची कीर्ती आंतरराष्ट्रीय स्तरावर नेणारा महोत्सव आहे. २००९मध्ये पुण्यात 'गाजाबाजा' हा मैफली, सेमिनार, सप्रयोग व्याख्याने, श्रवणसत्र, प्रदर्शन, तसेच वाद्ये, पुस्तके, सी.डी.चे स्टॉल्स असे सारे काही असणारा अनोखा संगीतमेळा प्रथमच भरवण्यात आला. [...] औरंगाबादचा 'एलोरा फेस्टिव्हल', नागपूरचा

'कालिदास फेस्टिव्हल', मिरजेचा 'उस्ताद अब्दुल करीम खाँ स्मृती उत्सव' अशा अनेक संगीतोत्सवांना रसिकांची गर्दी असते. [...]

सध्या 'कॉर्पोरेट शोज'च्या जमान्यात मैफलींचे रंगरूप खूपच पालटलेले दिसते. मैफलीचा अवधी, आविष्काराचे स्वरूप हे सारेच बदलले आहे. १९३०पूर्वी ७-८ तास चालणाऱ्या मैफलींचा अवधी १९६०-७०च्या दशकात ४-५ तासांवर आला होता. १९८०-९०च्या दशकात तो ३ तासांवर आला आणि आता तर 'लोकांना ऐकायला सवड नाही', यासारख्या कारणांनी तो जेमतेम दीड-दोन तासांवर आला आहे! केवळ सादरीकरणाची शैली नव्हे, तर त्याची गुणवत्ता हा निकषसुद्धा विचार करण्यासारखा आहे. आता नव्या युगधर्मानुसार मैफली या केवळ श्राव्य न राहता त्यांचे दृश्य परिमाण वरचढ होऊ पाहत आहेत, त्यामुळे सारे काही आखीवरेखीव, नेत्रदीपक; पण तितकेच अल्पजीवी व ढोबळ झालेले दिसते.



चैतन्य कुंटे

**क. कंसातील शब्द पुढे दिलेल्या उताऱ्यात योग्य जागी भरा.**

(अल्पावधीत, बुजुर्ग, आखीवरेखीव, भव्य, आकर्षक, सांगीतिक, सांस्कृतिक, अलोट, चोख, आंतरराष्ट्रीय, गुणवत्ता, उदयोन्मुख)

पुण्यात वर्षभर (अ) -------------- कार्यक्रमांची अगदी रेलचेल असते. व्याख्यानं, चित्रप्रदर्शनं, प्रायोगिक नाटकांचे प्रयोग, पुस्तक प्रकाशनं, परिसंवाद, गायन-वादनाचे कार्यक्रम यातलं काही ना काही इथे सतत चालूच असतं. पण साधारण ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यानंतर इथल्या संगीत मैफलींना विशेष बहर येतो. काही वर्षांपूर्वी सुरू झालेला आणि (आ) --------------च लोकप्रिय झालेला, दिवाळीच्या पहिल्या दिवशी होणारा कार्यक्रम म्हणजे 'दिवाळी पहाट'. तेव्हापासूनच रसिकांना वेध लागतात, ते 'सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सव', 'वसंतोत्सव' अशा (इ) -------------- पातळीवर प्रसिद्धी पावलेल्या संगीत महोत्सवांचे. या महोत्सवांना रसिकांची (ई) -------------- गर्दी होते. एवढ्या मोठ्या कार्यक्रमांचं नियोजन अर्थातच (उ) -------------- असावं लागतं. व्यासपीठाच्या (ऊ) -------------- मांडणीपासून (ए) -------------- मंडप उभारणीपर्यंत संयोजकांना असंख्य बारीकसारीक गोष्टींकडे लक्ष द्यावं लागतं. (अॅ) -------------- सादरीकरणाबरोबरच (ऐ) -------------- टिकवण्याचं दुहेरी आव्हान पेलावं लागतं. अशा संगीत महोत्सवांमधून अनेक (ओ) -------------- कलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळतं. रसिकांना नव्या दमाच्या कलाकारांसोबतच (ऑ) ----------- कलाकारांना ऐकण्याची संधी मिळते. समाजाची (औ) ------------ अभिरुची घडवण्यात अशा महोत्सवांचा हातभार लागत असतो.

**ख. पुढील वाक्प्रचारांचा उपयोग करून वाक्ये तयार करा.**

आव्हान पेलणे, रेलचेल असणे, हातभार लागणे, व्यासपीठ मिळणे, वेध लागणे

## ५ मोहक मार्तंड

मैफलीची यथासांग तयारी झालेली असते. तबला आणि हार्मोनिअमचे संगतकार स्थानापन्न झालेले असतात आणि स्वरमंचावर एका अतिशय रुबाबदार व्यक्तिमत्त्वाचे आगमन होते. बरोबर तंबोरा वाजवण्यासाठी शिष्यगण. अभिजात म्हणता येईल असा सिल्कचा कुरता, त्यावर रुद्राक्षापासून अनेक तऱ्हेच्या रुळणाऱ्या माळा, मानेवर रुळणारे शुभ्र केस असा हा थाट. तंबोरे लागल्याची खात्री होताच गुणगुणायला सुरुवात करताना मनोमन प्रार्थनेची आळवणी सुरू होते आणि पहिल्याच स्वरात सगळा आसमंत भारून जातो. नंतर मंचावर उमटत राहते ते एक अखंड, सौंदर्यपूर्ण, तरल आणि अभिजात स्वरशिल्प. पंडित जसराज यांच्या प्रत्येक मैफलीत हा अनुभव भारतातील आणि जगातील रसिकांनी घेतलेला असेल.

वयाच्या नव्वदाव्या वर्षातही स्वरांवरचा ताबा जराही ढळू न देता गायन करण्याची क्षमता बाळगत जसराज स्वरांच्या दुनियेत मश्गूल होते. प्रचंड कष्टाने स्वरांना धार लावत ते गेली आठ दशके गात राहिले. स्वर हाच श्वास आणि स्वर हाच ध्यास, ही त्यांची जगण्याची प्रेरणा. त्यामुळेच स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय अभिजात संगीतातील गायन परंपरेची मशाल तेवत ठेवण्याचे कार्य ते एकविसाव्या शतकातही करत राहू शकले. अभिजात संगीताच्या क्षेत्रात गेल्या शेकडो वर्षांच्या काळात अनेकदा मळभ दाटून आले. त्या प्रत्येक वेळी आपल्या असामान्य प्रतिभेने ते मळभ दूर करण्याची अचाट क्षमता असणारे कलावंत पुढे आले आणि संगीत परंपरेची ही मशाल त्यांनी अधिकच तेजस्वी करण्याचा प्रयत्न केला. पंडित जसराज हे याच मालिकेतील. आसपास भीमसेनजी, कुमार गंधर्व, मल्लिकार्जुन मन्सूर, वसंतराव देशपांडे, किशोरी आमोणकर असे एकापेक्षा एक मातब्बर तेजाळ कलाकार असताना त्यांच्या प्रभावळीत जसराज यांचाही स्वरदीप लक्ष वेधून घेण्याइतका प्रभावी होता.


पंडित जसराज

एखाद्या शास्त्रज्ञाने अथक परिश्रमांतून नवे संशोधन करावे आणि त्यापूर्वी जे कुणी अनुभवले नाही, त्याची अपूर्वाई सिद्ध करावी, हे जेवढे महत्त्वाचे, तेवढेच ख्याल संगीतात अभिव्यक्तीची स्वतंत्र शैली निर्माण करणेही. दोन्ही क्षेत्रांत प्रतिभेचे लेणे आवश्यक. तरीही एक मूर्त आणि दुसरे अमूर्त. संगीतातील ही अमूर्तता केवळ बुद्धीला आणि मनाला साद घालणारी. जसराज यांनी त्यांच्या पूर्वसूरींच्या पावलावर पाऊल ठेवत ही नवी शैली विकसित केली. प्रत्येक घराण्याची ही शैली हा त्या गायन पद्धतीचा नकाशा. मार्ग ठरलेला आहे. तो आधीपासूनच विचारपूर्वक ठरवून ठेवला आहे. तरीही त्याच मार्गावरून जाताना यापूर्वी कुणाच्या लक्षात न आलेली सौंदर्यस्थळे टिपून स्वत:ची नवी पायवाट तयार करण्याचे हे काम अवघड आणि आव्हानात्मक. जसराज यांनी या पायवाटेचा विशाल मार्ग करताना, पाठीमागून येणाऱ्या आपल्या शिष्यांनाही स्वरांच्या काफिल्यात सहजपणे समाविष्ट केले. मेवाती घराण्याची शैली लोकप्रिय करताना संगीतातील आपली सौंदर्यदृष्टी त्यांनी अधिकच तरलपणे सांभाळली. त्यामध्ये अनेक नव्या प्रवाहांना सामावून घेतले. वडील पंडित मोतीराम हे मोठे गायक. पण त्यांचे स्वरछत्र वयाच्या चौथ्या वर्षीच हरपल्याने जसराज यांचे संगीत अध्यापन करण्यासाठी ज्येष्ठ बंधू प्रताप नारायण यांना पुढाकार घ्यावा लागला. संगीतात स्वरांएवढेच महत्त्वाचे स्थान असणाऱ्या तालाला जसराज यांनी जवळ केले. ते उत्तम तबलावादक बनले. पण मैफलीत मध्यभागी बसून आपली कला सादर करण्याच्या जिद्दीपोटी त्यांनी

आपला मोहरा गायनाकडे वळवला. अथक परिश्रमांना सर्जनाची जोड मिळाली की कलावंताच्या कलेला तपश्चर्येचे फळ येते, हे जसराज यांनी सिद्ध केले.

जसराजजींकडे त्यांची स्वत:ची सौंदर्यदृष्टी होती. स्वरांचा रत्नजडित दागिना घडवताना प्रत्येक बारीक गोष्टीकडे लक्ष देण्याची आवश्यकता असते. त्याशिवाय दागिना परिपूर्ण होत नाही. संगीतातील अशा अलंकारांचा जसराज यांनी प्रचंड अभ्यास केला. त्या अलंकारांवर हुकूमत मिळवली. परिणामी त्या संगीताला सौंदर्यपूर्णतेचा आशीर्वाद लाभला. संगीतातील रंजनाबरोबरच त्यातील वैचारिकतेकडे अभ्यासपूर्वक लक्ष देत जसराज यांनी मेवाती घराण्याच्या मूळ शैलीला धक्का न लावता आपली स्वतंत्र ओळख देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. कला पातळ होऊ न देता संगीताची लोकप्रियता वाढवण्यासाठी त्यांनी केलेले परिश्रम म्हणूनच अधिक महत्त्वाचे. एक नवी शैली स्थापित करणे आणि ती रसिकप्रिय करणे हे संगीताच्या क्षेत्रात महाकठीण. जसराज यांना ते साध्य झाले, याचे कारण त्यांच्या व्यक्तिमत्वात असलेली अभिजातता आणि त्यात सहजपणे मिसळलेले लालित्य. स्वरांशी लडिवाळपणे खेळत, त्यांना आंजारत गोंजारत सौंदर्याची एक नवी अनुभूती देताना स्वत:सह सगळ्यांना त्यात बुडवून टाकण्याची किमया त्यांना साध्य झाली होती. स्वर आणि लय हेच या सगळ्या कलाकुसरीचे मुख्य साधन. ते त्यांनी अतिशय हळवेपणाने सांभाळले. त्यामुळेच त्यांच्या लोकप्रियतेत शेवटपर्यंत खंड पडला नाही.



ज्या काळात जगभर भारतीय संगीताचा प्रसार करण्यासाठी पंडितजी हिंडत होते, त्याच काळात आपली गायनशैली शिष्यांमध्ये संक्रमित करण्यासाठीही जिवापाड कष्ट घेत होते. मेवाती घराण्याची पताका फडकत राहावी, यासाठी त्यांनी पुढील पिढीकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले. तंत्रज्ञानाच्या आजच्या जगातही केवळ भारतीय अभिजात संगीत ही एकमेव कला अशी असेल, की जी केवळ गुरुमुखातूनच शिकणे शक्य आहे. गुरुकडून मिळणारी सौंदर्याची नजर आणि सादरीकरणाची कौशल्ये शिष्यांच्या जडणघडणीत फार महत्त्वाची असतात. जसराज यांनी ते न थकता अखंडपणे केले. अगदी शेवटपर्यंत दूरस्थ राहूनही प्रत्यक्ष संगीत शिकवण्याची त्यांची ऊर्जा विलोभनीयच. व्यक्ती म्हणूनही पंडित जसराज हे असेच लोभस होते. संगीतातून व्यक्त न होणारा 'क्रोध' त्यांच्या स्वभावातही नव्हता. जसराजजींना 'संगीत मार्तंड' या उपाधीने गौरविण्यात आले. मार्तंड म्हणजे सूर्य. पण हा सूर्य शिशिरातल्या पहाटेचा. आल्हाददायक आणि हवाहवासा. आता तो कायमचा मावळला असला तरी रसिकांच्या मनांत नेहमीच तेजाळत राहील.

अग्रलेख 'लोकसत्ता' १९ ऑगस्ट २०२०

**क. पुढील उताऱ्यातील घटना पूर्ण भूतकाळात घडल्या आहेत, अशी कल्पना करून त्यानुसार क्रियापदामध्ये योग्य तो बदल करून लिहा.**



उदा॰ : मैफलीची यथासांग तयारी झालेली ------------- (असते).

उत्तर : मैफलीची यथासांग तयारी झालेली **होती.**

तबला आणि हार्मोनिअमचे संगतकार स्थानापन्न झालेले

(अ) ---------------- (असतात) आणि स्वरमंचावर एका अतिशय रुबाबदार व्यक्तिमत्त्वाचे आगमन (आ) ---------------- (होत असते). बरोबर तंबोरा

वाजवण्यासाठी शिष्यगण (इ) ---------------- (असतात). अभिजात म्हणता येईल असा सिल्कचा कुरता, त्यावर रुद्राक्षापासून अनेक तऱ्हेच्या रुळणाऱ्या माळा, मानेवर रुळणारे शुभ्र केस असा हा थाट (ई) -------------- (असतो). तंबोरे लागल्याची खात्री होताच गुणगुणायला सुरुवात करताना मनोमन प्रार्थनेची आळवणी सुरू (उ) ------------- (होत असते) आणि पहिल्याच स्वरात सगळा आसमंत भारून (ऊ) ------------- (जातो). नंतर मंचावर उमटत (ए) ---------------- (राहते) ते एक अखंड, सौंदर्यपूर्ण, तरल आणि अभिजात स्वरशिल्प.

**ख. पुढील विशेषणे आणि विशेष्य यांच्या जोड्या लक्षात घ्या आणि येथे वापरलेल्या विशेषणांऐवजी कंसात दिलेली विशेषणे निवडा. एखादे विशेषण दोन विशेष्यांना योग्य ठरू शकते हेही लक्षात घ्या. तुम्ही याव्यतिरिक्त वेगळी विशेषणेही सुचवू शकता.**

(कर्णमधुर, विलक्षण, किमती, प्रेमळ, प्रचंड, अपार)

उदा. असामान्य प्रतिभा - विलक्षण प्रतिभा

अ. अभिजात संगीत - ----------- संगीत, ----------- संगीत

आ. रत्नजडित दागिना - ----------- दागिना, ----------- दागिना

इ. अचाट क्षमता - ----------- क्षमता, ----------- क्षमता

ई. जिवापाड कष्ट - ----------- कष्ट, ----------- कष्ट

उ. लोभस व्यक्तिमत्त्व - ----------- व्यक्तिमत्त्व, ----------- व्यक्तिमत्त्व

**ग. कंसात काही वाक्प्रचार दिले असून त्यांचा अर्थ स्पष्ट करणारे काही शब्द वापरून तयार केलेली वाक्ये पुढे दिली आहेत. वाक्यांचा अर्थ लक्षात घेऊन त्यात कंसातील कोणता वाक्प्रचार वापरता येईल ते ओळखा व तो वापरून वाक्य पुन्हा लिहा.**

(आस्वाद घेणे, आकृष्ट करणे, पीछेहाट होणे, योगदान देणे, वारसा चालवणे, पेश करणे, चेहरामोहरा बदलणे, मश्गूल असणे)

उदा. : वाक्प्रचार : चिरकाल टिकणे – अर्थ : दीर्घकाळ टिकणे

परवाची मैफल माझ्या दीर्घकाळ स्मरणात राहील.

वाक्प्रचाराचा उपयोग करून तयार केलेले वाक्य : परवाची मैफल माझ्या चिरकाल स्मरणात राहील.




अ. नृत्यात निपुण असलेल्या मोहिनीने स्नेहसंमेलनात लावणी नृत्य सादर केले.

आ. पानिपतच्या तिसऱ्या लढाईत मराठी सैन्याला माघार घ्यावी लागली.



इ. वाढदिवसाच्या निमित्ताने जमलेल्या सर्व पाहुण्यांनी जेवणाचा मनसोक्त आनंद घेतला.

ई. बाजीप्रभू देशपांडे, तानाजी मालुसरे, येसाजी कंक, बहिर्जी नाईक या सर्वांनी स्वराज्य निर्मितीत मोलाचे कार्य केले.



उ. नवीन आर्थिक धोरणामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेचा कायापालट झाला.

ऊ. पॅरिसच्या लूव्र म्युझियममध्ये मोना लिसाच्या चित्राकडे सर्व पर्यटक आकर्षित होतात.

ए. अथर्व टी.व्ही. पाहण्यात इतका मग्न होता, की मी तिथे जाऊन उभी राहिल्याचं त्याला कळलंच नाही.

## ६ प्रसिद्ध गायिका किशोरी आमोणकर यांची मुलाखत ऐकून त्यावर विचारलेल्या प्रश्नांसाठी उत्तराचा योग्य पर्याय निवडा.

१. किशोरीताईंच्या आई आणि गुरू असलेल्या माई यांच्या मते गाणं शिकण्याचं प्रयोजन –

अ) मान सन्मान मिळवणे, हे आहे.

आ) प्रसिद्धी मिळवणे, हे आहे.

इ) स्वतःचं अस्तित्व शोधणे, हे आहे.

२. गुरूंकडे शिकताना शिष्याने स्वतःचा अहंकार घालवण्यासाठी –

अ) गुरूंनी दिलेले सर्वांगीण ज्ञान संपादन केले पाहिजे.

आ) गुरूंनी दिलेले ज्ञान नि:शंक मनाने आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

इ) स्वतःचे मन शांत ठेवले पाहिजे.

३. शिष्याला रागावण्यामागे गुरूचा हेतू –

अ) शिष्याने गाण्याचा रियाज करावा हा असतो.

आ) शिष्याचे ज्ञान वाढावे हा असतो.

इ) शिष्याला अपमान पचवता यावा हा असतो.

४. सुरांची प्रभा अक्षरे वापरल्याने पसरू शकणार नाही, असे किशोरीताई का सांगतात?

अ) कारण अक्षरांमुळे सूर चुकतात.

आ) कारण अक्षरांमुळे सुरांचा उच्चार योग्य प्रकारे होत नाही.

इ) कारण अक्षरांमुळे सुरांत सलगता राहत नाही, तो तुटतो.

५. स्वरभाषेतून स्वत:ला समजलेले काही सांगायचे असेल, तर कशाची आवश्यकता असते?

अ) दमसांस   आ) मैफल   इ) लय



## ७ एका गायकाचे फेसबुक लाईव्ह

*फेसबुक लाईव्ह हे एक वेगळेच प्रकरण आहे. काही जण कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण या माध्यमातून करतात, तर काही जण आपण कुठे आहोत आणि काय करत आहोत हे जगाला सांगण्यासाठी याचा उपयोग करतात. एखादा होतकरू गायक एखादे गाणे म्हणतो आणि फेसबुकवर टाकतो, एखादा वादक एखादी धून वाजवतो आणि फेसबुकवर पोस्ट करतो. बघता बघता फेसबुकवरील मित्र 'लाइक' करतात, भन्नाट 'कॉमेंट' करतात... धमाल असते.*

*पुढे आहे एका युवा गायकाचे फेसबुक लाईव्ह, अर्थातच काल्पनिक.*

वार - रविवार

प्रहर - सकाळचा दुसरा


फेसबुकवर एकदम 'पॉप-अप' येतो आणि होतकरू पंडितजी दिसतात. गायक – म्हणजेच पंडितजी – टी शर्ट आणि बर्म्युडा शॉर्टवर आहेत. त्यांना बघितल्यावरच पाच-दहा दोस्त लाइक करतात. काही मुली उईऽऽऽऽ अशी आरोळी पाठवतात आणि टेडी बेयरचा गोंडस फोटो कॉमेंटमध्ये टाकतात.

"नमस्कार मित्रांनो... आज रविवारची सकाळ मला तुमच्याबरोबर घालवावी असं वाटलं. बरेच दिवसात लाईव्ह गायलो नाही. आज तुम्हाला काही ऐकवायचा विचार आहे."

(लगेच एका मागोमाग एक मेसेज दिसू लागतात)

- हाऽऽय

- हॅलो सर



- हॅलो पंडितजी, हॅप्पी संडे.

"अरे, मला पंडित म्हणू नका..."

- पण तुम्ही पंडितच आहात...

- वॉव. कसला भारी रविवार आहे. तुमचं गाणं फ्रीमध्ये लाईव्ह ऐकायला मिळतंय...

- हाय स्वीटी, कशी आहेस तू? हाय स्वामिनी, हाय... हाय... सगळ्यांना हाय...

"आज मी तुम्हाला काहीतरी खास ऐकवायचं ठरवलं आहे. सकाळची वेळ आहे, अहिर भैरव ऐकवतो... आऽऽऽ"

(लगेच पाच-दहा बदामाची चिन्हे स्क्रीनवर दिसायला लागतात.)

"अरे हो... मला गाऊ तर द्या! रसिकांची एवढी दाद आणि प्रेम इतक्या लगेच...! आ ऽऽऽ"

- सरजी, प्लीज ते अलबेला म्हणा ना...

"ओके ओके... अलबेला साजन आ..."

(आतापर्यंत ४० लाइक आलेले आहेत, त्यातले २० बदाम आहेत.)

- लय भारी आवाज हाय

"बेला सांज न आऽऽऽ "

- सर, प्लीज जरा मारवा गाऊन दाखवा ना...

"अरे आत्ता सकाळ आहे, मारवा कसा गाऊ?"

- अहो, आम्ही अमेरिकेत आहोत. इथे आत्ता संध्याकाळ आहे.

"सुझो ना आज कछु मोहें रे...

- सर. आमच्याकडे रात्र झालीय. तेव्हा मालकंसच गा.

- प ऽ ग ऽ ला ऽऽऽगन दे ऽऽऽ

- पंडितजी, सूर निरागस... होऊन जाऊ दे.

- "सूर निरागस होऽऽऽ"

- सर, तुम्ही कधी शिकलात गाणं?

"अरे, मी लहानपणापासून माझ्या गुरूकडे शिकायला सुरुवात केली. वयाच्या तिसऱ्या-चौथ्या वर्षापासून..."

- काय काय शिकलात तुम्ही?

"अरे, काय शिकलो नाही, ते विचार. मला..."

- बरं बरं, काय शिकला नाहीत? आणि का हो काही शिकला नाहीत? काही लोचा झाला काय सर?
- तुमची आवडती गाणी कुठली हो?
“मला कोणतंही संगीत आवडतं. शास्त्रीय, उपशास्त्रीय, शांताबाई, रिक्षावालापासून... तुम्हाला काय पाहिजे ते.”
- हम्मा हम्मा, प्लीज...
“इक हो गये हम और तुम, हम्मा ऽऽऽहम्माऽऽऽ”
- व्वा! अप्रतिम!
“अरे, हीच तर शास्त्रीय संगीताची जादू आहे. माझं काम फक्त त्याचा प्रसार करणे. बघा या लाईव्ह कार्यक्रमात केवढं काय काय सादर केलं मी!”
- (३ बदाम) खरंच फारच रॉकिंग आहात तुम्ही!
- सर, आता जरा रॉक म्युझिक होऊन जाऊ दे कसं!


सुहास किर्लोस्कर

**क. वरील फेसबुक संवादात अनेक इंग्रजी शब्द आले आहेत. त्या शब्दांच्या जागी तुम्हाला मराठी शब्द वापरता येतील का? गटात चर्चा करून उताऱ्याचे पुनर्लेखन करा.**

**ख. फेसबुकसारख्या माध्यमांवर गायक-वादकांकडून प्रत्यक्ष (लाईव्ह) संगीत ऐकणे आणि गायक-वादकांच्या मैफलीत त्यांच्यासमोर बसून संगीत ऐकणे यांत एक श्रोता म्हणून रसास्वादाच्या दृष्टीने काही फरक पडतो, असे तुम्हाला वाटते का? असल्यास कोणता?**



## ८ पुढे दिलेल्या सर्व गोष्टी कलाप्रकारात समाविष्ट करता येतील का? त्यात तुम्हाला आणखीही काही गोष्टींची भर घालता येईल का? तुमचे मत सांगून तुम्हाला तसे का वाटते ते सांगा.



कला म्हणजे
... वास्तुविशारदाने काढलेला आराखडा
... लिओनार्डो द विंची याच्या ‘मोना लिसा’चं हास्य
... एखाद्या पंचतारांकित हॉटेलातील खानसाम्याने बनवलेला पदार्थ
... अतिशय कुशलतेने शिवलेला कोट
... एका छोट्या मुलाने केलेलं पेन्सिल स्केच
... एक पारितोषिकप्राप्त लघुपट
... एक जाहिरात
... बाथरूममध्ये तुम्ही गुणगुणता ते गाणं



... एक टांगलेला कोरा कॅन्व्हास
... संग्रहालयात लावलेला, एका सुप्रसिद्ध छायाचित्रकाराने घेतलेला निसर्गदृश्याचा फोटो
... विणलेली साडी
... प्रवासी माहितीपत्रकातील निसर्गदृश्यांचे फोटो
... तुम्ही तुमच्या पूर्वीच्या सुट्टीत काढलेले निसर्गदृश्यांचे फोटो
... हाताने तयार केलेली सुबक कुंडी, ज्यात तुम्ही लावलेला गुलाब फुलला आहे
... तुम्ही करत असलेली तुमच्या साहेबांची नक्कल
... शिट्टीवर वाजवलेलं गाणं
... गणपतीची मूर्ती








९ एखादी गोष्ट कला या सदरात मोडण्यासाठी लावले जाणारे निकष तुम्ही स्वतंत्रपणे किंवा गटात एकत्र करा आणि ते वर्गात सादर करा.

१० तुम्हाला चित्र काढायला आवडते का? तुम्ही कोणत्या प्रकारची चित्रे काढता?




**११** **पुढे काही चित्रे दिली आहेत. त्यातील तुम्हाला खूप आवडलेल्या एका चित्रावर बोला. तुम्हाला ते चित्र का आवडले ते सांगा. तुम्हाला आवडलेल्या चित्राचे तुमच्या मते काय वैशिष्ट्य आहे? त्या चित्राच्या चित्रकाराविषयी आंतरजालावरून अधिक माहिती मिळवा.**


राजा रविवर्मा


नारायण श्रीधर बेंद्रे


एस. एच. रझा


वासुदेव कामत


एम. एफ. हुसेन


रवी परांजपे

## १२ कविता

### किलबिललेलें उजाडतांना

किलबिललेलें उजाडतांना
ओठ उगवतीचा थरथरला
गुलाबलेला ओललालसर.

तुडुंबलेले
संथ निळेपण
पसरत गेलें चार दिशांना
तांबुसवेडें.

हळूहळू मग नि:स्तब्धांतुन
स्वप्नें उडालीं गुलाल घेउन
लालचुटुकशा चोचीमध्यें,
पिंजर-पंखी,

आणिक नंतर
'आप'खुशीने अभ्र वितळलें,
उरलें केशर
आणि भराभर
उधळण झाली आकाशावर
आकारांची,
रंगदंगल्या.
नाहिं उमगलें
केव्हां सरला रजतराग हा,
ही अस्ताई,
आणि उमटला रौप्यतराणा
झगमगणाऱ्या जलद लयींतिल.
... असा विसरलों, विसावलों अन्
नीरवतेच्या गुप्त समेवर.



आणिक नंतर
न कळे कैशी,
मनांत माझ्या – कांहिं न करतां –
जाणिव भरली कृतार्थतेची.

विंदा करंदीकर

टीप : वरील कवितेत प्रचलित लेखन नियमांपेक्षा काही ठिकाणी वेगळ्या प्रकारचे लेखन दिसते. कवितेसाठी लेखनविषयक नियमांमध्ये सवलत घेता येऊ शकते.

**क. रंगांशी आणि ध्वनीशी संबंधित अनेक शब्द या कवितेत आले आहेत. त्यांची यादी करून ते पुढे दिलेल्या चौकटींमध्ये लिहा.**

| रंगांशी संबंधित | ध्वनीशी संबंधित |
| --- | --- |
| उदा॰ गुलाबलेला | उदा॰ किलबिललेल्या |

**ख. कवितेत 'थरथर', 'झगमग' हे शब्द आले आहेत. 'पापणीची थरथर', 'ताऱ्यांची झगमग' असाही आपण त्यांचा उपयोग करतो. यासारखेच अजून पाच शब्द सुचवा व ते ज्या शब्दाबरोबर वापरले जातात तेही लिहा.**

उदा॰ : मुलींची बडबड

ग. चित्रकला, संगीत, साहित्य या अभिव्यक्तीच्या माध्यमांचे परस्परांशी फार जवळचे नाते आहे. वरील कवितेच्या आधारे ते तुम्हाला उलगडून दाखवता येईल?


घ. तुमचा एखादा उत्कट अनुभव मांडण्यासाठी तुम्हाला अभिव्यक्तीचे कोणते माध्यम जवळचे वाटते? का?



## १३ प्रकाशाशी जुळले नाते



संवर्धनापूर्वीची स्टेन्ड ग्लास विंडो




संवर्धनानंतरची स्टेन्ड ग्लास विंडो

स्टेन्ड ग्लास (stained glass) ही एक नयनरम्य आणि मनोहारी कला आहे. काच आणि सूर्यप्रकाश ह्यांच्यातील प्रकाशाच्या खेळातून निर्माण होणारा एक चैतन्यमय दृश्य परिणाम स्टेन्ड ग्लासमधून साधला जातो. प्रत्येक ऋतूत, प्रत्येक हवामानात आणि दिवसाच्या प्रत्येक प्रहरात बदलणाऱ्या सूर्यप्रकाशात स्टेन्ड ग्लास क्षणाक्षणाला रूप पालटत असते. मुंबईतल्या 'द केनसेथ इलियाहू सिनेगॉग' या यहुदी प्रार्थनास्थळाच्या इमारतीतील स्टेन्ड ग्लास विंडो अद्वितीय आहे. या इमारतीच्या संवर्धनाचे काम २०१९मध्ये पूर्ण झाले. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे या संवर्धन प्रकल्पाला सांस्कृतिक वारसा संवर्धनाकरिता (Cultural Heritage Conservation) देण्यात येणारा युनेस्को एशिया-पॅसिफिकचा 'ॲवॉर्ड ऑफ मेरिट २०१९' हा पुरस्कार प्राप्त झाला. यातील स्टेन्ड ग्लास संवर्धनाचे काम यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या 'द ग्लास स्टुडिओ'च्या स्वाती चंदगडकर आणि सुमन वाडये यांच्याशी या प्रकल्पाबद्दल आणि एकूणच अशा कलाकृतींचे जतन व संवर्धन करण्याविषयी केलेली बातचीत.

**अंकिता** : नमस्कार स्वातीताई आणि सुमनताई. प्रतिष्ठेचा युनेस्को पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वप्रथम तुमचं अभिनंदन. सगळ्यात आधी आम्हाला स्टेन्ड ग्लासबद्दल थोडी माहिती सांगा ना!

**सुमनताई** : स्टेन्ड ग्लास ह्या कलेचा उगम सातव्या शतकात युरोपात झाला. पंधराव्या शतकापासून आधी चर्चच्या आणि नंतर घरांच्या सुशोभीकरणासाठी स्टेन्ड ग्लासचा वापर सुरू झाला.

**अंकिता** : 'द केनसेथ इलियाहू सिनेगॉग' आणि त्यातल्या स्टेन्ड ग्लासचं काय वैशिष्ट्य सांगता येईल?


स्टेन्ड ग्लास विंडोसहित द केनसेथ इलियाहू सिनेगॉग

**स्वातीताई** : मुंबईतलं 'द केनसेथ इलियाहू सिनेगॉग' हे भारतातल्या सर्वात प्राचीन यहुदी प्रार्थनास्थळांपैकी दुसऱ्या क्रमांकाचं प्रार्थनास्थळ आहे. मुंबईतील बगदादी आणि बेने इस्रायली यहुदींसाठी एकोणिसाव्या शतकात ह्या सिनेगॉगची निर्मिती झाली. या सिनेगॉगचं वैशिष्ट्य म्हणजे भारतातल्या यहुदी प्रार्थनास्थळांमध्ये स्टेन्ड ग्लास विंडो असलेलं हे एकमेव सिनेगॉग आहे. यातल्या स्टेन्ड ग्लास विंडोची निर्मिती इंग्लंडमध्ये झाली आहे आणि सन १८८४मध्ये ती भारतात दाखल झाली. ह्या स्टेन्ड ग्लास विंडोमध्ये मुकुटाकृती रचना असलेली तीन उंच समांतर पॅनल्स आहेत. ह्या मुकुट रचनेला 'ट्रेसरी' (tracery) म्हणतात. आकाराने ही विंडो १४ फूट उंच आणि १२ फूट रुंद आहे. यहुदी प्रतीकं आणि प्रतिमांनी सजविलेली ही स्टेन्ड ग्लास विंडो विलक्षण शोभिवंत आहे. ट्रेसरीमध्ये असलेल्या १२ नक्षीदार वर्तुळाकृती रचना (medallions) इस्रायलच्या १२ जमातींचं प्रतिनिधित्व करतात. प्रत्येक वर्तुळाकृती रचनेमध्ये यहुदी संस्कृतीमधल्या विशेष महत्त्वाच्या वनस्पती आणि फळाफुलांची रचना चित्रित केलेली आहे. ह्या सर्व चित्रकृती लाल, हिरव्या आणि कोबाल्ट निळ्या रंगांच्या काचांवर चित्रित केल्या आहेत.


स्टुडिओमध्ये संवर्धनाचे काम सुरू असताना

**अंकिता** : या स्टेन्ड ग्लास विंडोचं जतन करण्याची आवश्यकता का निर्माण झाली?

**स्वातीताई** : काळाच्या ओघात या स्टेन्ड ग्लास विंडोची अवस्था वाईट झाली होती. या विंडोचं अस्तित्वच धोक्यात आल्यामुळे त्यावर तातडीने संवर्धनात्मक उपाययोजना करणं आवश्यक होतं. म्हणून सिनेगॉगच्या विश्वस्त समितीने स्टेन्ड ग्लास विंडो संवर्धनाचा उपक्रम हाती घेतला.

**अंकिता** : या विंडोचं संवर्धन करताना तुम्हाला कोणत्या आव्हानांना सामोरं जावं लागलं?

**सुमनताई** : संवर्धनाचं काम अतिशय कमी वेळात पूर्ण करणं हे एक मोठं आव्हान होतं. प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली, तेव्हा पॅनल्स बांधकाम रचनेतून विलग करताना लक्षात आलेली गोष्ट म्हणजे, ती पॅनल्स चुन्याच्या मिश्रणाऐवजी (lime mortar) सिमेंट काँक्रीटच्या साहाय्याने दगडी बांधकामाच्या भिंतीत बसवली होती. त्यामुळे काचा तुटू न देता सुरक्षितपणे प्रत्येक पॅनल विलग करून ते ३० फुटांपेक्षा अधिक उंचीवरून खाली उतरवावं लागलं. पॅनल्सच्या खालच्या भागांवर डांबराचे अनेक थर दिलेले होते. त्यामुळे काचांवरील चित्रकामाला कोणतीही इजा होऊ न देता चित्रित काचांच्या पृष्ठभागावरचे डांबराचे डाग काढण्याचं कसोटीचं काम यशस्वीरित्या पार पाडावं लागलं.

**स्वातीताई** : अजून एक म्हणजे पूर्वी ह्या काचांवर दोन्ही बाजूंनी तैलरंगांचे शिंतोडे उडले होते. त्यामुळे मुलायम ब्रश आणि डिस्टिल्ड वॉटरच्या साहाय्याने काचांचा पृष्ठभाग अत्यंत काळजीपूर्वक स्वच्छ करावा लागला. विंडोच्या मधल्या पॅनलचा काही भाग डांबराच्या अनेक थरांमुळे पूर्णतः क्षतिग्रस्त झाला होता. ह्या भागाची संपूर्णपणे पुनर्निर्मिती करावी लागणार होती. मग जीर्णोद्धारतज्ज्ञ चित्रकाराने चित्रशैली व तंत्राप्रमाणे प्रत्येक काच हुबेहूब चित्रित केली. नंतर ह्या विंडोमध्ये एकूण ६४ नव्याने चित्रित केलेल्या काचांचे तुकडे असे बेमालूमरित्या बसविण्यात आले की, जुन्या आणि पुन्हा चित्रित केलेल्या नव्या काचांमधील फरक ओळखू येणार नाही. नंतर पॅनल्सवरील चिवट धूळ काळजीपूर्वक स्वच्छ केली. त्यामुळे स्टेन्ड ग्लास पॅनल्सनाही त्यांचं मूळचं तेज पुन्हा प्राप्त झालं. शेवटी एका विशिष्ट प्रक्रियेचा अवलंब करून पॅनल्स जलरोध सक्षम (waterproof) करण्यात आली आणि त्यांना त्यांच्या मूळ जागी परत बसवण्यात आलं.

**अंकिता** : हे काम तुम्ही दोघींनीच पूर्ण केलंत?

**स्वातीताई** : अगं नाही. हे एक सांघिक कार्य आहे. अनेक तज्ज्ञ एकत्रितरित्या ते पूर्ण करतात. ह्या जटिल आणि वेळखाऊ कामासाठी विलक्षण कौशल्य असावं लागतं आणि संयम बाळगावा लागतो. स्टेन्ड ग्लास संवर्धनासाठी जतनशास्त्रातल्या तज्ज्ञाची (consevator) आवश्यकता असते. जीर्णोद्धारतज्ज्ञ चित्रकाराचंही (restoration artist) ह्या प्रकल्पामध्ये महत्त्वाचं योगदान असतं. क्षतिग्रस्त किंवा गहाळ झालेल्या काचांवरील चित्रकामाच्या पुनर्निर्मितीचं अत्यंत जोखमीचं काम तो करतो. पॅनल्समध्ये काचा बसविणारे कारागीर (glaziers) हेसुद्धा संघाचे महत्त्वाचे सदस्य असतात. याशिवाय बांधकाम कंत्राटदार, संवर्धन वास्तुविद्याविशारद यांचीही यात मदत लागते.

**अंकिता** : वा! एवढ्या कलाकारांच्या हातभाराने पुनरुज्जीवित झालेली स्टेन्ड ग्लास म्हणूनच इतकी दिमाखदार दिसत असेल! या प्रकल्पाबद्दल आम्हाला माहिती दिल्याबद्दल तुम्हा दोघींचे आभार आणि पुढील कामगिरीसाठी शुभेच्छा.



खालच्या बाजूस डांबराचे डाग पडलेली संवर्धनापूर्वीची स्टेन्ड ग्लास



डांबराचे डाग काढल्यानंतरची स्टेन्ड ग्लास

**क. अधोरेखित शब्दाच्या जागी कंसातील दुसरा शब्द वापरून वाक्य पुन्हा लिहा.**

(उपयुक्त, हुबेहूब, बरहुकूम, हानी, लक्षात)

उदा॰ : प्राचीन कलाकृतीच्या अभ्यासकांना अशा तपशीलवार नोंदी उपयोगी ठरतात.

उत्तर : प्राचीन कलाकृतीच्या अभ्यासकांना अशा तपशीलवार नोंदी **उपयुक्त** ठरतात.

अ. ह्या सर्व बाबी मूळ चित्रकाचांशी जुळून याव्या लागतात.

आ. चित्रकाराने चित्रशैली व तंत्राप्रमाणे प्रत्येक काच जशीच्या तशी चित्रित केली.

इ. पॅनल्स बांधकाम रचनेतून विलग करताना ही गोष्ट निदर्शनास आली.

ई. प्राचीन कलाकृतींना पोहोचलेल्या क्षतीची कारणे समजून घेणे आवश्यक असते.

**ख. पुढे काही शब्दांच्या जोड्या दिल्या असून जोडीतील एक शब्द वापरून वाक्य दिले आहे. जोडीतील दुसरा शब्द वापरून त्याच वाक्यात आवश्यक तो बदल करून वाक्य पुन्हा लिहा.**

(कटकट – कटकटीचे, आवड – आवडीचे, सक्ती – सक्तीचे, सोय – सोयीचे, ओळख – ओळखीचे)

उदा॰ : जोखीम – जोखमीचे

वेगाने गाडी चालवण्यात **जोखीम** असते.

उत्तर : वेगाने गाडी चालवणे **जोखमीचे** असते.

अ. चटपटीत पदार्थांची अनेकांना आवड असते.

---------------------------------------------------------------------------------------

आ. दुपारी झोपेतून उठून फोन घ्यायचा म्हणजे कटकट होते.

---------------------------------------------------------------------------------------

इ. दुचाकी चालवताना हेल्मेट घालायची सक्ती केली आहे.

---------------------------------------------------------------------------------------

ई. घरबसल्या बँकेच्या खात्यात पैसे जमा करता येणे ही मोठीच सोय आहे.

-------------------------------------------------------------------------------------------

उ. त्यांची माझी खूप जुनी ओळख आहे.

-------------------------------------------------------------------------------------------

**ग. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. 'द केनसेथ इलियाहू सिनेगॉग' इमारतीमधल्या स्टेन्ड ग्लास विंडोचं वैशिष्ट्य काय आहे?

२. स्टेन्ड ग्लासचं जतन आणि जीर्णोद्धार हे सांघिक कार्य कसं आहे, ते सांगा. त्यात कोणाकोणाचा सहभाग असतो?



## १४ आयुष्याची मौल्यवान माती

विनायक पांडुरंग करमरकर (१८९१-१९६७) यांनी घडवलेलं छत्रपती शिवाजीमहाराजांचं पहिलं अश्वारूढ शिल्प त्या काळी म्हणजे १९२८मध्ये विलक्षण गाजलं. साडेतेरा फूट उंचीचा ब्राँझमधील एकसंध अश्वारूढ पुतळा हा आधुनिक भारतीय स्मारक शिल्पांतील एक चमत्कारच मानला जातो. केवळ चमत्कारच नव्हे, तर शास्त्रशुद्ध व अत्यंत दर्जेदार कलात्मक आविष्कारही मानला जातो. या अश्वारूढ शिल्पातून एक असामान्य लढवय्या सेनानी, क्षत्रियकुलावतंस, स्वराज्यसंस्थापक, जाणता राजा आणि राजधर्म व नैतिक अधिष्ठान जपणारा महापुरुष अशी शिवछत्रपतींच्या व्यक्तिमत्वाची सर्वच वैशिष्ट्यं अभिव्यक्त होतात. या शिल्पानं शिवाजीमहाराजांची त्यांच्या लौकिकाला साजेशी एक सार्थ व समर्थ प्रतिमा निर्माण केली. त्यासोबतच आजही अशक्य वाटणारं, हा अश्वारूढ पुतळा ब्राँझ धातूमध्ये एकसंध ओतण्याचं आगळंच आव्हानही पेललं. त्यामुळे आधुनिक भारतीय स्मारकशिल्पांच्या इतिहासात सुरुवातीच्या काळातच करमरकरांनी एक मानदंड निर्माण केला. त्यांचं हे योगदान कायमच स्मरावं लागेल.

करमरकरांचं शिल्पकलेतील असामान्य कौशल्य, सर्व वैशिष्ट्यांसहित व्यक्तीचं साधर्म्य व्यक्त



करण्याचं सामर्थ्य वादातीत होतं. प्रत्यक्ष व्यक्तीच समोर असल्याचा अनुभव त्यांची शिल्पं देतात. त्यांच्या शिल्पात कमालीचं व्यक्तिसाधर्म्य, कौशल्य व कलात्मक आविष्काराचा सुरेख संगम आढळतो. हे सर्व प्राप्त करण्याची उपजत प्रतिभा व कलागुण त्यांच्याकडे होते. परिणामी ते व्यावसायिक दृष्ट्याही अत्यंत यशस्वी ठरले. त्या अनुषंगानं येणारी प्रसिद्धी, पैसा व मानसन्मान या सर्वांसकट स्वतःच्याच दिमाखात जगले. कामात कोणत्याही प्रकारची तडजोड न करता ते आयुष्यभर सातत्याने उत्कृष्ट दर्जाची शिल्पनिर्मिती करत राहिले. म्हणूनच अत्यंत यशस्वी स्मारक शिल्पकार म्हणून करमरकर गाजले. विशेष म्हणजे त्यांनी अगदी स्वान्त:सुखाय अशी कलात्मक व्यक्तिशिल्पंही सातत्यानं साकारली. परिणामी आधुनिक

भारतीय शिल्पकलेच्या इतिहासात आणि वास्तववादी शैलीत स्मारकशिल्प व कलात्मक व्यक्तिशिल्पं करणाऱ्या शिल्पकारांमध्ये विनायक पांडुरंग करमरकरांचं नाव एक श्रेष्ठ शिल्पकार म्हणून घ्यावंच लागेल. त्यासोबतच एक सहृदय कलावंत म्हणूनही करमरकर प्रसिद्ध होते. अत्यंत परखड व कोणाचीही भीडभाड न बाळगता बोलणारे स्पष्टवक्ते, अशीही त्यांची ख्याती होती. त्याचंच प्रत्यंतर देणारी ही एक आख्यायिका...

एकदा करमरकरांची ख्याती ऐकून एका संस्थानाचे महाराज आपल्या लवाजम्यासकट त्यांच्या स्टुडिओत आले. त्यांनी करमरकरांचं काम बघितलं. काम महाराजांच्या पसंतीस उतरलं. त्यांनी करमरकरांना आपल्यासाठी शिल्पं घडवण्याची विनंती केली व किंमत विचारली. करमरकरांनी सांगितलेली किंमत ऐकताच महाराजांनी शिल्पकलेची चिरफाड सुरू केली. त्यांनी विचारलं की, "ही शिल्पं कशाची बनवणार?" "ब्राँझची" असं उत्तर मिळताच ब्राँझची किंमत विचारली. करमरकरांनी ती सांगितली व त्यापूर्वी मातीचं शिल्प घडवून, त्याचा प्लास्टर मोल्ड काढून त्याच्या साहाय्यानं लॉस्ट वॅक्स पद्धतीनं शिल्पाचं ब्राँझमध्ये रूपांतर करावं लागतं, हेसुद्धा सांगितलं.

हे ऐकताच महाराज मातीची, प्लॅस्टरची, मेणाची अशा सर्व किमती विचारू लागले. करमरकरांनी शांतपणे सर्व किमती सांगितल्या. त्या सर्व रकमांची बेरीज केल्यावरही बरीच मोठी रक्कम उरत होती. ती कशासाठी, असा असमंजस प्रश्न त्या राजानं विचारला. त्यावर करमरकर म्हणाले की, "सर्व गोष्टींच्या किमती मी सांगितल्या, पण शिल्प घडवताना एक फार मौल्यवान अशी चिमूटभर माती त्यात घालावी लागते. त्यासाठी ती उरलेली रक्कम आवश्यक आहे." हे ऐकताच मोठ्या उत्सुकतेनं महाराजांनी पुढचा प्रश्न विचारला की, "ही कोणती माती?" यावर करमरकर उत्तरले... "आम्ही कलावंत आमच्या आयुष्याची जी माती करतो, त्यातल्या चिमूटभर मातीची ती किंमत आहे."



विनायक पांडुरंग करमरकर

शिल्पकार करमरकरांनी दिलेलं हे उत्तर कलावंताच्या जीवननिष्ठेची जाणीव करून देणारं तर होतंच; पण त्यातून एका कलावंताच्या आयुष्यातील एक दाहक वास्तव आणि विदारक सत्यही व्यक्त होत होतं.

सुहास बहुळकर

**क. कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा पुढे दिलेल्या वाक्यांत उपयोग करा.**

(भीडभाड न ठेवणे, तावून सुलाखून निघणे, झोकून देणे, डगमगून जाणे, चिरफाड करणे)

उदा॰ : "दिलीपशेठ, अहवाल तयार करताना मुद्द्यांची हवी तेवढी ---------- ----------. पण तो सादर करताना परिपूर्णच असला पाहिजे."

उत्तर : "दिलीपशेठ, अहवाल तयार करताना मुद्द्यांची हवी तेवढी **चिरफाड करा.** पण तो सादर करताना परिपूर्णच असला पाहिजे."

अ. प्रकल्प मुदतीत पूर्ण करण्यासाठी निखिलने स्वत:ला कामात अगदी ---------- ---------- होते.

आ. संसदेत भाषण करताना कोणाचीही ---------- ---------- ---------- बोलणे हे आमच्या मतदारसंघातील खासदाराचे वैशिष्ट्य होते.

इ. गेल्या वर्षी अचानक आलेल्या संकटाने राघव ---------- ----------.

ई. लेखी परीक्षा, मग मुलाखत अशा सर्व टप्प्यांतून ---------- ---------- ----------शिवाय सनदी अधिकारी होता येत नाही.

**ख. पुढे दिलेल्या विशेषणांच्या व नामांच्या योग्य जोड्या जुळवा.**

उदा. : अतूट – विश्वास

| विशेषणे | नामे |
|---|---|
| अ. अपार | (क) मत |
| आ. उत्कट | (ख) घडामोड |
| इ. क्लेशदायक | (ग) चित्रण |
| ई. दर्जेदार | (घ) आठवण |
| उ. प्रत्ययकारी | (च) वर्तन |
| ऊ. असमंजस | (छ) कर्तृत्व |
| ए. असामान्य | (ज) भावना |
| ॲ. नाट्यपूर्ण | (झ) करुणा |
| ऐ. मौल्यवान | (ट) साहित्य |
| ओ. परखड | (ठ) वेळ |

**ग. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. आधुनिक भारतीय स्मारकशिल्पांच्या इतिहासात करमरकरांनी साकारलेलं शिवाजीमहाराजांचं स्मारकशिल्प महत्त्वपूर्ण का ठरलं?

२. स्मारक शिल्पकार म्हणून करमरकर यांचं काय वैशिष्ट्य होतं?

३. कलावंताच्या 'आयुष्याची चिमूटभर माती' याचा तुम्हाला समजलेला अर्थ काय आहे?



## १५ करा आणि शिका

**क. तुम्ही एखाद्या संगीत मैफलीला गेला आहात का? तिथले एकूण वातावरण, गायन, प्रेक्षकांचा प्रतिसाद, तुमचा अनुभव याबाबत १५ ते २० वाक्यांमध्ये एक अभिप्राय तयार करा व वर्गात सादर करा.**

**ख. 'सांगली वस्तुसंग्रहालय' ही चित्रफीत पाहा.**

**चित्रफीतीच्या अनुषंगाने तुमच्या दोन सहाध्यायींची मुलाखत घ्या. तुम्ही त्यांना पुढील प्रश्न विचारू शकता. त्यांची उत्तरे वर्गात सादर करा. तसेच प्रश्नांच्या आधारे या विषयावरील तुमची भूमिकाही मांडा.**

अ. तुम्ही चित्रप्रदर्शनांना / वस्तुसंग्रहालयांना नियमितपणे भेटी देता का?

आ. तुमच्या परिसरातील कलादालनांची नावे तुम्हाला सांगता येतील?

इ. चित्रकला, शिल्पकला या कलांबद्दलची अभिरुची कशी निर्माण करता येईल असे तुम्हाला वाटते?

## उत्तरसंच

**४. क.** अ. सांस्कृतिक आ. अल्पावधीत इ. आंतरराष्ट्रीय ई. अलोट
उ. चोख ऊ. आखीवरेखीव ए. भव्य ॲ. आकर्षक ऐ. गुणवत्ता
ओ. उदयोन्मुख ऑ. बुजुर्ग औ. सांगीतिक

**५. क.** अ. होते आ. होत होते इ. होते ई. होता उ. होत होती
ऊ. गेला ए. राहिले

**५. ख.** अनेक उत्तरे शक्य. अ. अभिजात संगीत - कर्णमधुर, शास्त्रीय, पाश्चात्य, भारतीय
आ. रत्नजडित दागिना - किमती, हिरेजडित, सोन्याचा, मौल्यवान
इ. अचाट क्षमता - प्रचंड, शारीरिक, बौद्धिक, अफाट, विलक्षण
ई. जिवापाड कष्ट - अपार, खूप, प्रचंड उ. लोभस व्यक्तिमत्त्व - प्रेमळ, प्रभावी, उमदे

**५. ग.** अ. नृत्यात निपुण असलेल्या मोहिनीने स्नेहसंमेलनात लावणी नृत्य पेश केले.
आ. पानिपतच्या तिसऱ्या लढाईत मराठी सैन्याची पीछेहाट झाली.
इ. वाढदिवसाच्या निमित्ताने जमलेल्या सर्व पाहुण्यांनी जेवणाचा मनसोक्त आस्वाद घेतला.
ई. बाजीप्रभू देशपांडे, तानाजी मालुसरे, येसाजी कंक, बहिर्जी नाईक या सर्वांचे स्वराज्य निर्मितीत मोलाचे योगदान होते.
उ. नवीन आर्थिक धोरणामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेचा चेहरामोहरा बदलला.
ऊ. पॅरिसच्या लूव्र म्युझियममध्ये मोना लिसाच्या चित्राकडे सर्व पर्यटक आकृष्ट होतात.
ए. अथर्व टी॰व्ही॰ पाहण्यात इतका मश्गूल होता, की मी तिथे जाऊन उभी राहिल्याचं त्याला कळलंच नाही.

**६.** १. इ २. आ ३. आ ४. इ ५. अ

**१३. क.** अ. ह्या सर्व बाबी मूळ चित्रकाचांबरहुकूम व्हाव्या लागतात.
आ. चित्रकाराने चित्रशैली व तंत्राप्रमाणे प्रत्येक काच हुबेहूब चित्रित केली.
इ. पॅनल्स बांधकाम रचनेतून विलग करताना ही गोष्ट लक्षात आली.
ई. प्राचीन कलाकृतींना पोहोचलेल्या हानीची कारणे समजून घेणे आवश्यक असते.


**१३. ख.** अ. चटपटीत पदार्थ अनेकांच्या आवडीचे असतात.
आ. दुपारी झोपेतून उठून फोन घेणे कटकटीचे होते.
इ. दुचाकी चालवताना हेल्मेट घालणे सक्तीचे केले आहे.
ई. घरबसल्या बँकेच्या खात्यात पैसे जमा करता येणे मोठे सोयीचे आहे.
उ. ते माझ्या खूप जुन्या ओळखीचे आहेत.

**१४. क.** अ. झोकून दिले आ. भीडभाड न ठेवता इ. डगमगून गेला
ई. तावून सुलाखून निघाल्या

**१४. ख.** अ. झ आ. ज इ. घ ई. ट उ. ग ऊ. च ए. छ ॲ. ख
ऐ. ठ ओ. क

# ८ साहित्य विविधा









मराठी भाषा महाराष्ट्राच्या पिढ्यान्‌पिढ्यांचे सांस्कृतिक भरणपोषण करत आलेली आहे. मराठी भाषेतील लिखित साहित्याचा आरंभ आपल्याला तेराव्या शतकात घेऊन जातो. तेराव्या शतकात म्हाईंभट्ट यांनी संकलित केलेला 'लीळाचरित्र' हा मराठीतील पहिला ग्रंथ प्राचीन मराठी साहित्याचा आरंभ मानला जातो. त्यानंतर कालानुक्रमे निर्माण झालेले महानुभाव संप्रदायाचे साहित्य, ज्ञानेश्वरीसह इतर संतसाहित्य, शाहिरी काव्य, पंडिती काव्य, पोवाडे, बखर वाङ्‌मय यांचा समावेश प्राचीन मराठी साहित्यात होतो.

सन १८१८पासून अर्वाचीन मराठी साहित्याचा कालखंड सुरू होतो. या कालखंडावर सुरुवातीला संत साहित्य आणि पंडिती काव्याचा प्रभाव होता; परंतु, केशवसुतांची आधुनिक आत्मपर कविता प्रसिद्ध झाली आणि तिने मराठी कवितेला नवा दृष्टिकोन दिला. पुढे इंग्रजी भाषेशी संपर्क, शिक्षणप्रसार, स्वातंत्र्यपूर्व काळातील वातावरण, स्वातंत्र्यलढा, मग स्वातंत्र्योत्तर काळ अशा सर्व घडामोडींचे प्रभाव आणि पडसाद उमटून साहित्यनिर्मिती अधिकाधिक जोरकसपणे घडू लागली आणि मराठी साहित्यक्षेत्र चहूअंगांनी समृद्ध झाले. इथल्या मातीतल्या जाणिवा शब्दबद्ध होऊ लागल्या. अनेक प्रतिभावंत साहित्यिकांनी साहित्यलेखनात नवनवे प्रयोग केले. काव्य, नाटक, कादंबरी, कथा, विनोद, लघुनिबंध, प्रवासवर्णन, बालसाहित्य, चरित्र, आत्मचरित्र, समीक्षा, व्याकरणग्रंथ, इतिहासलेखन, विज्ञानविषयक लेखन अशा विविधांगांनी बहरलेले साहित्य आज मराठी भाषेचे एक समृद्ध दालन म्हणून ओळखले जाते.

मराठी भाषा शिकण्याच्या या उपक्रमात या सहाव्या पातळीपर्यंत आपण भाषेचे व्याकरण आणि तिचे उपयोजन शिकलो. कोणत्याही भाषेच्या वैशिष्ट्यांचा उत्तम परिपोष तिच्यातील साहित्यात दिसतो. त्या साहित्याचा आस्वाद घेता आला, तर ती भाषा शिकल्याचा खरा आनंद मिळतो. असे अनेक नमुने आधीच्या पातळीच्या पाठांमध्येही समाविष्ट आहेतच; पण, या आठव्या पाठामध्ये विविध प्रकारचे साहित्य, काही उतारे, कथा, कविता, पाठपृष्ठ मजकूर, इ. केवळ वाचनासाठी, आस्वादासाठी दिले आहेत. हे लेखन वाचून साहित्यास्वादाचा निखळ आनंद मिळावा आणि वाचक अधिकाधिक साहित्य वाचण्यासाठी प्रेरित व्हावा हाच मुख्य उद्देश आहे. अर्थात, आवश्यकतेनुसार या लेखनाचे प्रकट वाचन, भाषिक अभ्यास किंवा त्यातील काही विषयांवर वर्गात चर्चा करता येईल.

## अनुक्रम


| | |
|---|---|
| १. | लेखणी<br>*शंकर वैद्य* |
| २. | ग्रंथशोध<br>*अरुण टिकेकर* |
| ३. | राजकारणातील भाषा<br>*ग. प्र. प्रधान* |
| ४. | लग्न<br>*जी. ए. कुलकर्णी* |
| ५. | मनातल्या उन्हात<br>*श्रीनिवास विनायक कुलकर्णी* |
| ६. | माझा पहिला गुरू<br>*द. ग. गोडसे* |
| ७. | दगडांचे सौंदर्य<br>*बा. भ. बोरकर* |
| ८. | फिनिक्सच्या राखेतून उठला मोर<br>प्रस्तावना : *निखिलेश चित्रे* |
| ९. | आई<br>*गुरुनाथ धुरी* |
| १०. | बाप आणि लेक<br>*गौरी देशपांडे* |
| ११. | चक्रीवादळ<br>*प्रभाकर पेंढारकर* |
| १२. | हंस अकेला<br>*मेघना पेठे* (पाठपृष्ठ) |
| १३. | जाई-जुई<br>*अरुणा ढेरे* |
| १४. | सुवर्णयुगाचे महावस्त्र, ऐश्वर्याचे प्रतीक - पैठणी<br>*माधव गडकरी* |
| १५. | महाराष्ट्राचा चिंतामणी<br>*नरेंद्र जाधव* |
| १६. | शुभ्र काही जीवघेणे<br>*अंबरीश मिश्र* (पाठपृष्ठ) |
| १७. | स्मरणी<br>*मनमोहन* |

## १ लेखणी

***शंकर वैद्य*** *(१९२८-२०१४) लेखक, कवी, समीक्षक. सहजसोपी शब्दरचना हे यांचे वैशिष्ट्य.*
*सर्वत्र संचार करणाऱ्या लेखणीच्या सामर्थ्याचे वर्णन कवीने केले आहे.*

कागदावरी जे निळसर दोरे दिसती
मी त्यात ओविते सुंदर अक्षर मोती
त्या निळसर तारांवरी बसविते मी ग
शब्दांच्या सुंदर कबूतरांची रांग

मी वाढविते ग शोभा त्या रेघांची
अडकवुन झुंबरे त्यावरती शब्दांची
त्या रेघोट्यांच्या शिंक्यावरति भरून
शब्दांचे मधुघट ठेवी मी टांगून

साहित्यिक-शाहिर-लेखक-कवि-सम्राट
या पदव्या दिधल्या मी – मी विद्यापीठ!
पदचिन्हे माझी उठली नर्तन करिता
त्या तुम्ही बोलता वेद-बायबल-गीता

मी सर्व लिप्यांची अन् लिखिताची जननी
ग रसारसांचे सागर माझ्या वदनी
टिंबात माझिया सर्व कलांची राज्ये
श्वासावर माझ्या भुरभुरती साम्राज्ये!

मम एका अधरी अमृत दुसऱ्या वीष
कुणि अमर तयाने होती कुणि निःशेष
मज म्हणून घेऊन चित्रगुप्त रात्रीचा
गगनावर लिहितो जमाखर्च विश्वाचा!

टीप : छंदोबद्ध कवितेसाठी निराळे लेखननियम अनुसरले जातात.



## २ ग्रंथशोध

***अरुण टिकेकर*** *(१९४४-२०१६) संपादक, लेखक, इंग्रजी साहित्याचे अभ्यासक. वृत्तपत्रीय सदरलेखन, लेख, प्रवासवर्णन असे विविध लेखन.*
*ग्रंथप्रेमी माणसाची लक्षणे आणि स्वतःचे ग्रंथप्रेम याबाबत लेखकाने इथे लिहिले आहे. 'अक्षरनिष्ठांची मांदियाळी' या पुस्तकातून हा उतारा घेतला आहे.*

मुंबईतील काळबादेवी रोडवरील 'न्यू अँण्ड सेकंडहॅण्ड बुक शॉप' हे एक अजबघर होतं. ग्रंथप्रेमीला इथं कधी काय मिळू शकेल, हे ठरवून सांगता यायचं नाही. भिंतींना लागून ठेवलेल्या ग्रंथांच्या थप्प्याच्या थप्प्यांमधून इच्छुकाला हवं असलेलं पुस्तक या दुकानातली कर्मचारी मंडळी नेमकं कसं हुडकून काढतात, याचं मला सुरुवातीला आश्चर्य वाटत असे. भरपूर वेळा तो ग्रंथसंग्रह न्याहाळल्यानंतर व मालकांच्या संमतीनं उलथापालथा केल्यावर त्यातलं इंगित* कळलं होतं. ग्रंथ मांडून ठेवण्याच्या बेशिस्तीतही एक प्रकारची शिस्त होती. ती शिस्त ध्यानी आल्यानंतर आम्ही - म्हणजे मी, सुधीर कसबेकर अन् धीरूभाई हरिया हे तिघे मित्रसुद्धा - दुकानातल्या कर्मचाऱ्यांइतकेच पुस्तक शोधण्यात तरबेज झालो होतो. अनुभवी शाळामास्तराची किंवा प्राध्यापकाची नजर उत्तरपत्रिकेतली नेमकी चूकच शोधते ना, तसं आमचंही झालं होतं. तिथंच आमच्या नजरा तीक्ष्ण बनल्या. हवं ते पुस्तक नेमकं हुडकून काढू लागल्या. आम्ही जसजसे तीक्ष्ण नजरेचे झालो, तसतशी आमच्या आवडीची, विषयांची पुस्तकं तिथं आम्हाला मिळू लागली अन् आमची घरं पुस्तकांनी भरत गेली. ते आवडते ग्रंथ हाताळत, चाळत, अभ्यासत आम्ही वयानं प्रौढ कधी झालो, हे आमचं आम्हालाच कळलं नाही. आज घरातला एकेक ग्रंथ हाती घेतला की तो कोठे मिळाला, केवढ्याला मिळाला, तो मिळण्यापूर्वी त्याच्यासाठी किती खस्ता* खाल्ल्या होत्या, तो घरच्या ढिगाऱ्यात दिसेनासा झाला होता तेव्हा जिवाची किती घालमेल झाली होती, असा सारा इतिहास नजरेसमोर येतो.

ग्रंथ जितका जुना अन् दुर्मीळ तितका त्याच्याविषयी जिव्हाळा अधिक. आपल्या मुलांपैकी एखादा अशक्त, दुर्बळ असला की त्याच्याविषयी अधिक ममत्व* वाटतं ना, त्यातलाच प्रकार. ग्रंथ जितका जुना अन् दुर्मीळ, तितके त्याच्यातील शब्द अधिक बोलके होतात. पान उघडलं की त्यातून फुलपाखरांसारखे उडत बाहेर येतात, बागडत बागडत डोक्यात अलगद शिरतात. त्या ग्रंथाचा लेखक तुमच्याशी संवाद साधू लागतो. काळाची परिसीमा* नाहीशी होते. जुन्या टाइपातून, जुन्या बांधणीतून, जुन्या शब्दप्रचारांतून त्या त्या काळात सहज शिरल्याची भावना होते. या अनुभवाचं वर्णन करता येणं अवघड आहे. प्रचिती*, प्रत्यक्षानुभव हाच खरा. अमृतानुभवच* तो एक प्रकारचा.

माझ्या घरात आज दाटीवाटीनं राहिलेल्या कित्येक ग्रंथांच्या अशा कहाण्या सांगता येतील. या कहाण्या इतरांना सांगून त्यांना त्यांचं महत्त्व वाटणारही नाही कदाचित. प्रत्येक छंदाचं असंच असतं. छांदिष्टाला ज्याचं महत्त्व वाटतं ते इतरांना तसं वाटेलच असं नाही. म्हणूनच तर छांदिष्ट मिजासखोर* असतो. स्वत:च्या मिजाशीत तो जगतो.

**शब्दार्थ**

इंगित = गुपित

खस्ता खाणे = परिश्रम करणे

ममत्व = आपलेपणा, माया

परिसीमा = मर्यादा

प्रचिती = प्रत्यक्ष अनुभवणे, जाणणे

अमृतानुभवच = अमृताचा अनुभव, दिव्य अनुभव

मिजासखोर = गर्व असलेला, ऐट असलेला

## ३ राजकारणातील भाषा

*__ग. प्र. प्रधान__ (१९२२-२०१०) ज्येष्ठ लेखक, संपादक, प्राध्यापक, समाजवादी विचारवंत, महाराष्ट्र राज्याच्या विधान परिषदेचे १८ वर्षे आमदार आणि ३ वर्षे विरोधी पक्षनेता असा कार्यकाळ.*
*राजकारणी लोकांच्या भाषेतले बारकावे खुसखुशीत भाषेत उलगडून दाखवणारा हा त्यांचा लेख 'भाषा आणि जीवन' या त्रैमासिकाच्या 'उन्हाळा : १९८५' या अंकात प्रसिद्ध झाला होता. त्यातील हा संपादित अंश.*

भाषा हे एक महत्त्वाचे साधन आहे म्हणून साध्याच्या पूर्ततेसाठी राजकीय क्षेत्रात जाणते नेते भाषेचा उपयोग प्रभावीपणे करतात. राजकीय क्षेत्रात नेत्यांना सतत भाषणे करावी लागतात आणि वक्तृत्वाला महत्त्व असतेच; परंतु राजकारणातील कसोटीच्या क्षणी भाषण कसे केले जाते, यापेक्षा काय बोलले जाते व कोण बोलतो, याचेच महत्त्व अधिक असते. एस. एम. जोशी यांचे भाषण वक्तृत्वाच्या अलंकारांनी नटलेले नसते, आणि मोठे बांधेसूदही नसते. असे असूनही लोकांच्या मनावर त्यांच्या भाषणाचा प्रभाव पडतो. याचे कारण त्यांचे शब्द हे सुस्पष्ट विचार आणि त्याहीपेक्षा त्यांच्या अंत:करणातील तळमळ यांचा आविष्कार करीत असतात. राजकारणात श्रोत्यांना जिंकायचे असते आणि म्हणून नेत्यांना भाषा हे शस्त्र लखलखीत ठेवावे लागते.

**राजकीय डावपेचांची भाषा**

चळवळीच्या व निवडणुकीच्या काळातील संघर्षापेक्षा शांततेच्या काळातील सत्तासंघर्षाचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे असते आणि त्यामध्ये राजकीय डावपेचांना फार महत्त्वाचे स्थान असते. या डावपेचांना अनुरूप असलेल्या भाषेचे स्वरूपही डावपेचातूनच घडलेले असते. मुरब्बी* राजकीय मुत्सद्दी स्वत:च्या मनाचा थांग लागणार नाही, अशा रीतीने भाषेचा कौशल्याने वापर करतात.

राजकीय डावपेच खेळताना भाषा हे मनोगताच्या आविष्कारापेक्षा मनातील कपट दडविण्याचे साधन बनते. या संदर्भात एका विनोदी लेखकाने स्त्रियांची शब्द वापरण्याची रीत व राजकारण्यांची शब्द वापरण्याची रीत यांची मोठी मनोरंजक तुलना केलेली आहे. तो लेखक म्हणतो, 'स्त्री ज्या वेळी 'नाही' म्हणते. त्या वेळी तिच्या मनात असते – 'कदाचित'. ती ज्या वेळी 'कदाचित' म्हणते, त्या वेळी तिच्या मनात होकार असतो; आणि तिने सरळ होकार दिला, तर ती शालीन स्त्रीच नव्हे – असे म्हटले पाहिजे. राजकारण्यांची रीत याच्या बरोबर उलट असते! राजकीय मुत्सद्दी ज्या वेळी 'हो' म्हणतो, त्या वेळी त्याच्या मनात असते 'कदाचित'; तो ज्या वेळी 'कदाचित' म्हणतो, त्या वेळी त्याच्या मनात नकार असतो आणि त्याने जर सरळ नकार दिला तर तो मुत्सद्दीच नव्हे.' स्त्री व राजकीय मुत्सद्दी यांच्यातील फरक या लेखकाने मांडला असला तरी त्यामधून स्त्री व मुत्सद्दी यांच्यातील महत्त्वाचे साम्यही लक्षात येते. ते म्हणजे दोघेही मनात जे आहे, ते दडवून त्याच्या उलट बोलत असतात.

एके काळी राजकारणात पल्लेदार भाषणे केली जात. आता मात्र मोजके पण स्पष्ट बोलणारा पुढारी लोकांना अधिक आवडतो. आधुनिक काळात जीवनाला जी गती आली आहे, तिच्यामुळे शब्दबंबाळापेक्षा रोखठोक सत्यकथन, विधानाला पुष्टी देणारी नेमकी आकडेवारी यांचे महत्त्व वाढले आहे. यामुळे राजकारणातील भाषेचे स्वरूप काहीसे रूक्ष होत आहे; पण तरीही राजकारणातील संघर्षात आक्रमक शैली आणि खोचक विनोद यांना स्थान आहेच.

तसेच कसोटीच्या क्षणी ध्येयवादी नेत्यांच्या अंत:करणापासून आलेल्या आणि अंत:करणाला

जाऊन भिडणाऱ्या शब्दांचे महत्त्व कधीच कमी होणार नाही. शैलीच्या मर्यादा ओलांडणारे असे शब्द हेच राजकारणातील भाषेचे वैभव आहे. त्याचबरोबर सत्तासंघर्षात वापरावयाचे घणाघाती शब्द आणि वाटाघाटीत बोलण्याची गुळगुळीत फसवी विधाने हेही राजकारणातील भाषेचे ठसठशीत अलंकार आहेत.

**शब्दार्थ**

मुरब्बी = राजकारणात मुरलेला

शब्दबंबाळ = शब्दांचा खूप जास्त आणि अनावश्यक वापर ज्यात असलेले

पुष्टी देणारी = बळकटी देणारी

घणाघाती = घणाने प्रहार केल्याप्रमाणे, आक्रमक (घण म्हणजे लोखंडावर प्रहार देण्याचे हत्यार)



## ४ लग्न

***जी. ए. कुलकर्णी*** *(१९२३-१९८७) लेखक, प्राध्यापक. कथा, अनुवाद, पत्रलेखन, मुलांसाठी कथा. जीवनाच्या गूढ, विलक्षण, रहस्यमय अंगांचे समर्थ चित्रण करणारे कथालेखक म्हणून महत्त्वाचे स्थान.*

*पारंपरिक रीतीने 'लग्न ठरवणे' या विषयाभोवती फिरणारी 'कुसुमगुंजा' या संग्रहातील साठ-सत्तरच्या दशकातल्या वातावरणातील ही कथा. कथेचा शेवट एक अनामिक हुरहुर लावून जातो.*

बरेच दिवस घरात गडबड होती. पुष्कळशी नवी माणसे येत. सोप्यावरच्या मोठ्या जाजमावर चहा-फराळ होत असे. दादा, आई, मामा अनेक ठिकाणी जात व त्या ठिकाणी सगळ्यांना भरपूर चहा मिळे. घरी मामाच्या लग्नाच्या गोष्टी चालल्या होत्या. मग एक दिवस सगळेच जण सारवट* गाडीत बसले व जवळच्या खेड्यात जायला निघाले. आनंदाला गाडीत समोरच्या खिडकीपाशी जागा मिळाली, आणि मग त्याचे आत चाललेल्या बोलण्यावरचे लक्षच उडाले.

गाडी ज्या घरापुढे थांबली, ते घर रुंद पण जुने होते व त्याला माडी नव्हती. गाडीतून माणसे खाली उतरताच रुमाल* बांधलेल्या, अंगावर लाल काठाचे उपरणे घेतलेल्या एका पोक्त* गृहस्थांनी त्यांना किंचित वाकून नमस्कार केला व त्यांना आत बोलावले. येथेही आत सोप्यावर जाजमच होते. पण त्यावर मध्यभागी दोऱ्याने पगडी-पट* काढला होता. सोप्यालाच एका कोपऱ्यात एक पांढरे शुभ्र वासरू बांधले होते व ते येणाऱ्याजाणाऱ्याकडे स्वच्छ काळ्या गारगोटीसारख्या डोळ्यांनी उत्सुकतेने पाहत होते. आनंदाला ते वासरू फार आवडले व त्याला बरोबर घेऊन, त्याचा पिवळा दोर हातात घेऊन बाहेर वाऱ्यात खूप हुंदडून यावे असे त्याला वाटले.

थोड्या वेळाने नवे निळे लुगडे नेसलेली एक कोवळी मुलगी बाहेर आली व खाली मान घालून समोर बसली. दादांनी, मामाने तिला पुष्कळ प्रश्न विचारले. दादांनी तर तिच्याकडून एक मराठी पुस्तक वाचवून घेतले. ती आत गेल्यावर रुमाल बांधलेल्या गृहस्थांनी ताटातून कपबश्या आणून ठेवल्या. कपबश्यांचे टवके गेले होते, पण चहा चांगला, खूप साखरेचा होता. मग त्या मुलीनेच एका लहान ताटातून आंब्याच्या

फोडी आणून ठेवल्या. पण सगळ्यांनी आंबा नको म्हणताच आनंदाला फार आश्चर्य वाटले, आणि थोडा रागही आला. त्यांनी कुणी तरी घेतल्याखेरीज त्याला स्वत:ला आंबा मिळणार नव्हता. पण त्या गृहस्थांनी अचानक त्याच्याच पुढे ताट धरताच, त्याला नकळत त्याचा हात झटकन पुढे झाला व त्याने दोन-तीन फोडी उचलून आपल्या चहाच्या बशीत ठेवून घेतल्या. आई आतल्या सोप्यावर पण उंबऱ्याजवळच बसली होती. मामा हसल्यावर तीदेखील हसली होती हे खरे, पण आता घरी गेल्यावर चांगला शेक मिळणार* हे आनंदाने ओळखले. कारण तिच्या त्या हसण्यात आतले आणखी एक चोपछडी* हसणे होते. नंतर त्या गृहस्थांनी आणखी दोन फोडी कौतुकाने त्याच्या बशीत ठेवल्या. आनंदाने आता सारे लक्ष आंब्याकडेच वळवले. जर मारच खायचा आहे, तर तो रिकाम्या पोटी खाण्यापेक्षा पोटात आंबे ठेवूनच खाल्लेला बरा याबद्दल त्याला कसलीही शंका नव्हती. आंबा अतिशय गोड होता व त्याचा गर जिभेवर येताच विरघळून जात होता. थोड्या वेळाने त्याने पाच स्वच्छ पातळ साली बशीत ठेवल्या व चिकट हाताकडे पाहत वर पाहिले.

"तुला हात धुवायचा आहे का? मग न्हाणीतच जाऊन स्वच्छ धुऊन ये," ते गृहस्थ प्रेमळपणाने म्हणाले, "विमल, याला न्हाणीत तांब्याभर पाणी दे."

आत आईसमोरून जाताना आनंदाने आईकडे पाहिले नाही, तरी तिच्या डोळ्यांची झळ* त्याला जाणवलीच. नवे लुगडे नेसून मघा* खाली मान घालून बसलेली मुलगी पुढे आली व आणखी दोन सोपे ओलांडत त्याला घेऊन न्हाणीघरापाशी आली.

"हे न्हाणीघर होय?" त्याने विचारले.

तिने मान हलवली. पण ती हळूच म्हणाली, "आपण परसात जाऊ. तेथे डोणीत* पाणी आहे आणि परसात आवळेदेखील आहेत."

परसात एका डोणीत स्वच्छ पाणी होते. ते त्याच्या हातावर घालत ती म्हणाली, "तू मामाचा फार लाडका आहेस का?"

"तर काय!" आनंद म्हणाला, "काल संध्याकाळी मी भोवरा पाहिजे म्हणालो, तर रात्री येताना मामाने भोवरा आणि जाळी आणून दिली."

"मग माझं एक काम कर," ती कळवळलेल्या आवाजात म्हणाली, "त्यांना म्हणावं आता कसंही एकदा होय म्हणून टाका. मला येथून सोडवा म्हणावं. जात्याच्या दगडासारखी झाले आहे मी या घरात. माझ्यामुळे माझ्या खालच्या सगळ्या बहिणींची लग्नं अडकली आहेत."

आनंदाला फारसे काही समजले नाही, पण त्याने जाणतेपणाने मान हलवली. तिने नव्या लुगड्याने त्याचे हात टिपले, तेव्हा त्याचा रेशमी वास त्याला फार आवडला. तिने दोनचार आवळे त्याच्या खिशात घातले व आत येताना पुन्हा म्हटले, "विसरू नको हं! आणि इतर कुणाला सांगू नको."

सारवट गाडी गावी परत आली तेव्हा रात्र बरीच झाली होती. जेवणानंतर आनंदाला एकदम पेंगुळल्यासारखे झाले व तो झोपण्यासाठी माडीवर गेला. मामा गच्चीत उभा होता. आनंदाने गडबडीने त्याला निरोप सांगितला व तो अंथरुणाकडे वळला.

"असं म्हणाली ती? ठीक. पण आईला सांगू नको त्यातलं काही," मामा सांगू लागला. तो पुढे काही म्हणायच्या आतच आनंद अंथरुणात आडवा झाला होता.

नंतर मामाचे लग्न दुसऱ्याच एका मुलीशी पुण्याला मोठ्या थाटाने झाले. नवी मामी चांगली होती. तिच्या हातात खूप दागिने होते. आता त्या गोष्टीला फार वर्षे होऊन गेली.

आता खुद्द आनंदाच्या लग्नाच्या गोष्टी घरात चालू आहेत. कुठे तरी गेले, आणि चहाबरोबर कधी तरी आंबा आला, की त्याला हातातील फोड तशीच खाली ठेवावीशी वाटते व एकदम हुरहुर लागते : खेड्यातल्या त्या रेशमी लुगड्यातल्या मुलीचे पुढे काय झाले असेल बरे?

**शब्दार्थ**

सारवट = तीन-चार माणसांना बसायची सोय असलेली छप्पर असलेली बैलगाडी
रुमाल = पुरुषांनी डोक्याला बांधण्याचे एक विशिष्ट प्रकारचे पागोटे
पोक्त = वयाने मोठी आणि अनुभवी, समंजस व्यक्ती
पगडी-पट = दोऱ्याने विणलेल्या नक्षीचा प्रकार
शेक मिळणे = मार मिळणे
चोपछडी = मार किंवा छडीचे फटके
झळ = चटका
मघा = मघाशी
डोणी = पाणी साठवण्याचे दगडी भांडे किंवा लहान दगडी टाकी



## ५ मनातल्या उन्हात

***श्रीनिवास विनायक कुलकर्णी*** *(१९३४- ) लेखक, संपादक. 'डोह', 'सोन्याचा पिंपळ' असे मराठी साहित्यविश्वात गाजलेले ललित लेखसंग्रह. मराठीतील ललित लेखन समृद्ध करून ते अधिक मोकळे आणि लवचीक करण्याचे श्रेय 'डोह' (१९६५) या लेखसंग्रहाकडे जाते. लहान मुलांच्या निरागस भावविश्वाचे वर्णन करणारी चित्रदर्शी शैली हे त्याचे वैशिष्ट्य आहे.*

*बालपणी लेखकाने अनुभवलेल्या निसर्गाचे, माणसांचे, प्राण्यांचे वर्णन 'डोह' या संग्रहामध्ये येते. त्यातील 'मनातल्या उन्हात' या लेखातील अंश इथे घेतला आहे. यात उन्हाचे उजळ रूप तर दिसतेच, पण दुसरीकडे त्याला मृगजळानेही घेरलेले दिसते.*

पौष पहाटेच्या गारव्याने ओठ फुटायचे. ओठांवरून पांघरूण उतरायचे नाही. पण आई उठलेली कळायचे. केव्हाहून उठायची ती. झोपही असायची नि जागही असायची. दुलईतून खिडकीकडे डोकावावे तेव्हा झुंजूमुंजू झालेले असायचे. आधी झांजा वाजायच्या नि मग झुंजूमुंजू व्हायचे. देवाकडे नुकतीच काकडआरती संपलेली असायची. थोरल्या आईच्या* दुलईत अधिकच गुरगटून घ्यायचे. मघाशी असलेले वडाखालचे सामसूम आता डोळे चोळायला लागलेय असे वाटायचे. चिंचेखालचे आमचे घर. मोठीच्या मोठी पुढे चिंच, पुढे तीहून थोरला वड... दारासमोरचे सारे आवार 'वडाखालचे' म्हणून ओळखले जायचे; एवढा त्याचा अवाढव्य विस्तार. सगळीकडे झाडेच झाडे – हिरवीगार.

उन्हे यायची. सावकाश. ती काही लवकर उठायची नाहीत. हळूहळू उतरत यायची. पण एकदा येऊन उतरली की मग झडझडून पंख झाडायची नि उंच होत जायची. ती यायची उगवतीच्या दारातनं तांबूसहिरव्या मळ्यांना जागे करीत; डोहाला गुदगुल्या करीत; अलीकडल्या आळशी डगरीला भेडसावीत;

देवळाच्या कळसाला आल्याचे कळवीत; पाना-पानातनं वाट काढीत; मोठ्या मोठ्या झाडांच्या पोटांना बोट लावीत – नि मग सगळे वेगळेच होऊन जायचे. झळझळीत दिसायचे. आई सांगायची, "पहिल्यांदा मी इथं आले एका मार्गशीर्षातल्या सकाळी नि हे सारं पाहिल्यावर डोळे निवले.* वाटलं, किती छान ठिकाणी आपण राहायला आलो आहोत." आईने पहिल्यांदा पाहिलेले ते गावाचे रूप माझ्या डोळ्यांपुढे येते. त्यावर ऊन्ह कसे पडले असेल ते दिसते.

ती उन्हे पिंपळपाराच्या मोकळ्या जागेत येऊन थांबायची. मग उन्हाला पाठ द्यायला* म्हणून थोरली आई मला बोटाला धरून घेऊन यायची.

थोरल्या आईच्या अंगासारखे मऊसर ऊबदार ऊन्ह अंगावर घेताना चांगले वाटायचे. उन्हे खायला आणखी कुणी कुणी यायचे. थोरल्या आईशी बोलत राहायचे. माझ्याकडे पाहायचे. साऱ्या आवारात वडाची लालभडक वडफळे टपटपत असायची. त्यांतले पिवळे पिवळे रव्यासारखे कण मातीवर विखरायचे. त्यांवरही ती उन्हे पडायची. ती फळे मटकवावी असे वाटे. उन्हात लांब लांब सावल्या पडायच्या. मला त्या सावल्यांचे निराळे जग, त्यांची निराळी भाषा आहे असे वाटायचे. माणसाइतके जिवंतपण त्यात जाणवायचे. मी त्या उन्हाची उत्कंठेने वाट पाहायचो. ऊन्ह तेव्हाच्या उत्कंठेची अजूनही अपूर्वाई करते. कधीतरी ते अवचितसे येते. पुढे येऊन पसरते. हसते. हरवलेल्या सावल्यांतून निघून गेलेल्या थोरल्या आईला भेटवते. अलिप्ततेतून एक जवळीक जिव्हारी भिडवते.

मनाचे नि उन्हाचे पहिले नाते आठवते ते असेच जुने. समोरून कोवळेपिवळे उन्ह यायचे. पूर आल्यासारखे. उन्ह नि अंधार यांचे मनांतले अस्तित्व उघडमिटीसारखे जाणवायचे. डोळे उघडणे म्हणजे ऊन्ह – मिटणे म्हणजे अंधार.

उंच उन्हे चिंचेवरून अंगणात यायची. चिंचेचा, अंगणांत पडलेला पिवळा केशरी मोहर त्या उन्हाने करपून जायचा. दारात आमची काळीपांढरी कपी कुत्री उन्हाची उभी राहायची. काळा नि पांढरा रंग सुचवणाऱ्या त्या दोन अक्षरांचे नाव तिला कुणी ठेवले होते नकळे*. थोराड हाडाच्या त्या उभार-लांबार कुत्रीवर थोरल्या आईचे मोठे प्रेम होते. लांबोडक्या जबड्यातून लाल खरखरीत जीभ बाहेर काढून ल्हा-ल्हा करीत ती दगडी कट्ट्याच्या पायऱ्यांवर उभी राहायची. तिच्या तोंडातून एकएक थेंब पडायचा. थोरली आई तिचे सारे नियमाने करायची. ती मोठी शहाणी होती एवढेच आता आठवते. ती कशी, कुठे, केव्हा नाहीशी झाली कुणास ठाऊक. तिच्या नाहीशा होण्याच्या काळातच, वडाखाली उन्ह खायला येणारी भागीरथीबाईही अशीच एक दिवस न कळता दिसायची थांबली होती.

वरनं उन्ह जळत असले तरी आमच्या पांढऱ्या गाऱ्याच्या मातीच्या* घरात थंड असायचे. उन्हाळ्यामध्ये, रांजणात राहणाऱ्या पाण्याला वाटावे तसे वाटायचे, दारे लावली की गडद काळोख व्हायचा. कोपऱ्यात असलेली मोरी स्वच्छ नि थंड असायची. तिच्या काळ्या, गुळगुळीत, उतरत्या, गार फरशीवरून उन्हाच्या वेळी घसरत राहावे वाटायचे. मोरीच्या तोंडातून तेवढा एक चिवचिवता, मंद तांबूस-पोपटी प्रकाश येई. नंदादीपाइतका शीतळ. त्या उन्हातल्या काळोखाला आलेली शीतळाई त्या नंदादीपाचीच आहे असे वाटे. तो प्रकाश कशात तरी भरून ठेवावा अशी इच्छा होई. [...]

उन्हाळ्यातल्या जळत्या वेळी जेवणे उरकलेली असायची. आई दमून पडलेली असायची, भगभगीत उन्ह रणरणत असायचे – बघवायचे नाही असे. मी मागचे दार उघडायचा नि आईची डुलकी नेमकी मोडायची. आई म्हणायची, "किती दमवशील रे! झोप उन्हाचा." पण माझे लक्षच नसायचे. मी विस्मयाने चकित झालेला असायचा. पश्चिमेकडे पाहावे तो दूरवरचे सारे गाव पाण्यात तरंगलेले दिसायचे. लाटा पुढे

यायच्या. आडवी सडक बुडायची. [...] ती बुडली तर बुडली; पण त्या कुरळ्या लाटा आणखी पुढे यायला लागलेल्या असत. आरतीच्या* रानात जोडीने उभ्या असलेल्या दोन गूढ बाभळीही लाटांत विरघळायला लागत. मग माझा धीर सुटायचा. [...]

... आणि ते उन्हातले पाणी खालतीच येत असायचे. थोड्या वेळाने पाहावे तो अनसयाच्या घराला लागलेले असायचे. दोन बाभळींवर धार पडलेली असायची. मी आईला घाबऱ्याघाबऱ्या बोलवायचा. मग आई रागारागाने उठायची. मला घेऊन जायची. दडपून झोपवत सांगायची, “अरे, ते काही खरं नाही पाणी. ते चावट ऊन आहे नं, ते फसवतंय. कोवळी कोवळी हरणं आशेनं लागतात मागे त्याच्या. पळतात... पळतात... कुठ्ठं त्यांना पाण्याचं टिपूसही भेटत नाही.”

**शब्दार्थ**

थोरली आई = आजी
पाठ द्यायला = पाठ शेकवायला
गाऱ्याची माती = भिंतीला गिलावा देण्यासाठी पाणी, चुना, शेण, गवत इ॰चे मिश्रण
आरती = रानाचे स्थानिक नाव
निवले = तृप्त झाले; शांत झाले; गार झाले
नकळे = माहीत नाही

## ६ माझा पहिला गुरू

***द॰ ग॰ गोडसे** (१९१४-१९९२) - चित्रकार, नेपथ्यकार, समीक्षक, लेखक, प्राध्यापक. कलापरंपरा, लोककला यांविषयी लेखन.*

*एका ऐटदार घोड्याच्या चित्राने लेखकाला लहानपणी जी भूल पाडली, ती आयुष्यभर कशी कायम राहिली याविषयी वर्णन यात आले आहे. ‘नांगी असलेले फुलपाखरू’ या पुस्तकातील ‘माझा पाचवा गुरू’ या लेखातून हा अंश घेतला आहे.*

अक्षर म्हणजे रेखेचे गुंडाळे, असे रामदासांनी एके ठिकाणी वर्णन केले आहे. साहित्यापुरते ते खरेच आहे. मात्र चित्रकाराचे आद्याक्षर म्हणजे एखाद्या मदालस* रेखेची अंगडाई.* तिच्या वेल्हाळ* अळोख्यांचे प्रथम दर्शन हीच त्यांची पहिली अक्षरओळख. त्या दर्शनाने बेभान होऊन त्या ऊर्वशीच्या मागे धावणे – अविश्रांत धावत राहणे – हाच त्याचा नंतरचा जन्मभरचा उद्योग. या वेधवतीने ज्या प्रतिमेत त्याला प्रथम दर्शन दिले असेल, ती प्रतिमा त्याचा पहिला गुरू.

आज आठवते त्यावरून चित्रकलेतला माझा पहिला गुरू होता, सचित्र इसापनीतीच्या पुस्तकातले घोड्याचे एक चित्र. त्या पुस्तकातल्या एका गोष्टीत काढलेल्या ऐटदार घोड्याचे रेखाचित्र त्या वेळी मला एवढे आवडायचे की, त्या घोड्याची, त्या वेळी माझ्या पाटीवर मी शेकडो प्रतिचित्रे रेखाटली असतील. त्यातलेच एखादे जर चांगले जमले आहे असे वाटले की, तसेच ठेवून त्याकडे मी अगदी तासन्‌तास पाहत बसे.

खरे म्हणजे त्या वेळी आमच्या घरीही एक उमदा घोडा होता. उंच, बहाडा*, ऐटदार, खास एका बलुची सौदागराकडून* घेतलेला. स्वारीला अवघड, मांड* ओळखणारा. अनेक चाली चालण्यात तरबेज.

माझ्या आजोळीसुद्धा असेच उत्तम घोडे ठेवलेले. ही सारी घोडी, लहानपणी मन मानेल तशी फेरली. राघोभराऱ्यागत* त्यावरून वाटेल तेवढ्या रपेटी मारल्या. अनेक गाव-गावठाणे पार केली. वऱ्हाडातली प्रसिद्ध पयोष्णी नदी ही त्या वेळची आमची सिंधू. आमच्या मजलीची* हद्द; वडीलधाऱ्यांची अटक; पण घोडदौडीचा त्या वेळचा कैफच असा बेलगाम की, अनेक वेळा आम्ही पयोष्णी पार करून, पल्याडच्या काबूलकंधारात उतरत होतो. सारांश, अनेक घोड्यांवरून स्वारी केली... परंतु पाटीवर काढलेल्या 'ह्या' घोड्याची सर ह्यांपैकी एकालाही नाही असे वाटे.

– त्या उच्चै:श्रवाची* जातच वेगळी होती.

पुढे घरचे, आजोळचे सारे घोडे यथाकाल थकले, म्हातारे झाले, निकालात निघाले, पण पाटीवरच्या घोड्याची पाठ मात्र मी आजतागायत सोडली नाही. त्याचे ते सुरेल खिंकाळणे, रचनातीत सुरांच्या मधुर आलापीत अजूनही कधी कधी आठवणीने साद घालून अस्वस्थ करते. त्याचा वंश अजूनही माझ्या चित्रांतून तसाच अखंड चालू आहे; त्याच ऐटीत. त्याच खानदानीने. आपल्या मूळ पुरुषाची आब* आणि आठवण राखीत. आजपर्यंत किती तरी घोडे चितारले असतील! एखादे घोडदळ उभे करता येईल एवढे. नाना तऱ्हेचे, नाना रंगढंगांचे, सम्राट रघूच्या* अश्वमेधीय विजयी वारूपासून* छत्रपती शिवाजीराजांच्या कृष्णा (की कल्याणी!) घोडीपर्यंत. संताजीच्या झंझावाती घोडदौडी रेखाटल्या; वरातीपुढे ठुमकत चालणाऱ्या नखरेल कोतवाली घोड्याचा आदा उतरवला*. घोड्यावरचे पहिले प्रेम अजून तसेच कायम आहे. आज आठवणी लिहितानासुद्धा हातातल्या घोड्यावरची मांड पूर्वीइतकीच पक्की आहे. 'अरबी फिरविणारे' इतिहासात अनेक झाले, त्यांच्या अश्वप्रेमाचा बोभाटा फार. मीही माझ्या मगदुराने या देखण्या प्राण्यावर तेवढेच प्रेम केले आहे; त्याच्या राजस खानदानी रूपभेदाचे इमानाने आलेखन करून, त्याच्या रुबाबाला, इभ्रतीला कुठेही धक्का लागणार नाही यांची दक्षता बाळगून. प्रसंगवशात* मृत घोडे काढले खरे; परंतु मुर्दाड* घोडे काढण्याचे पाप अजून ह्या हातांनी कधी केले नाही. आणि याला कारण? ... इसापनीतीतल्या माझ्या पहिल्या गुरूच्या पाक*अरबी घाटाचे पहिले प्रसन्न दर्शन. रेखीव, नीटस, नेटके. दृष्टीने धरून बसावे असे देखणे; सुरत पाक.

रेखा नागिणीने पाडलेली ही पहिली भूल!

**शब्दार्थ**

मदालस = मादक, सुंदर
अंगडाई = अळोखे पिळोखे, शरीराच्या मोकळ्या हालचाली
वेल्हाळ = प्रिय, सुंदर, गोड
ऊर्वशी = पुराणकथेतील एक अप्सरा
वेधवती = आकर्षक
सौदागर = व्यापारी
मांड = बैठक
मजली= टप्पा
बहाडा = धिप्पाड
आब = डौल, तेज
राघोभरारी = रघुनाथ बल्लाळ पेशवे यांना त्यांच्या वेगवान युद्धकौशल्यामुळे पडलेले नाव
उच्चै:श्रवा = ऐकण्याची उच्च क्षमता असलेला; देवांचा राजा इंद्र याच्या घोड्याचे नाव
सम्राट रघू = रामाने ज्या वंशात जन्म घेतला त्याचा मूळ पुरुष
वारू = घोडा
आदा उतरवला = माज उतरवला
मगदूर = क्षमता
प्रसंगवशात = कधीकधी
मुर्दाड = निगरगट्ट, भावविरहित
पाक = पवित्र

## ७ दगडांचे सौंदर्य

***बा. भ. बोरकर** (१९१० - १९८४) कवी, लेखक, शिक्षक, संपादक, आकाशवाणीवर कार्यक्रम आयोजक म्हणून सेवा. कविता, कादंबऱ्या, लघुनिबंध, अनुवाद व चरित्र लेखक. सौंदर्यपूजक वृत्तीचे कोकणी व मराठी भाषेतील महत्त्वाचे कवी. निसर्ग आणि प्रेम हे त्यांच्या कवितांचे प्रमुख विषय. आनंदयात्री कवी अशी ओळख.*

*फुलांइतकेच दगडांमध्येही दडलेले सौंदर्य लेखकाने इथे उलगडले आहे. 'चांदण्याचे कवडसे' या १९८२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या ललित लेखसंग्रहातून हे लेखन घेतले आहे.*

फुलांइतकाच मला दगडांचाही शौक आहे. फुले मला झाडावरच अधिक सुंदर वाटतात. तेथून ती खुडायला माझे मन घेत नाही; पण फुलांच्या दिवसांत बस जेव्हा म्हार्दोळला थांबते, तेव्हा जाई-बकुळीचा एखादा सर किंवा एखादा बटमोगरीचा गजरा मी जरूर विकत घेतो आणि मनगटाभोवती गुंडाळतो. कधी सोनचाफ्याचे केवळ एक फूल देठाला धरून फिरवीत राहण्यासाठी अख्खा पुडा विकत घेतो. फुले मी विकत घेतो; पण ती घरातल्या वापरासाठी, माझ्यासाठी नव्हे. पण दगड-गोटे मला मनापासून आवडतात; कधी त्यांच्या आकारामुळे, तर कधी प्रकारांमुळे. कधी त्यांच्या रूपावरून, तर कधी त्यांच्या वर्णावरून. केवढा तरी वेळ मी ते न्याहळीत राहतो. पण तेवढ्याने माझे समाधान होत नाही. मी त्यांतले निवडक घरी घेऊन येतो. आजवर मला आवडलेले दगडगोटे मला घरी आणता आले असते, तर एव्हाना माझ्याकडे एक नमुनेदार अश्म-संग्रह तयार झाला असता. आवडलेले सगळेच दगड काही उचलून आणता येत नाहीत. आणि ते नेटकेपणाने मांडायला घरात आणि घराभोवती आपल्याला हल्ली ऐसपैस जागा तरी कुठे आहे? मी म्हणतो, एका अर्थी हे बरेच आहे! त्यामुळे आपल्याला स्मृतीत त्यांचा संग्रह करता येतो. आठवून त्यांचा आनंद घेता येतो.

उन्हाळ्यात नदीच्या आणि पाणवठ्याच्या पात्रांत मी नाना तऱ्हांचे दगडगोटे पाहिले आहेत. त्यांतल्या तुळतुळीत गोल व लंबगोल गोट्यांकडे आपले चटकन लक्ष जाते; पण बारकाईने पाहिले, तर कधी त्यांत आपल्याला अनेक विलोभनीय रूपाकारांचे दगड आढळतात. एखादा दगड कासवासारखा असतो, एखादा पालीसारखा, एखादा बैलासारखा, तर एखादा कुत्र्यासारखादेखील. मला वाटते, असले दगड पाहूनच माणसाला शिल्पाची कला सुचली असावी. अश्मयुगात माणसाने आपले जीवन सुखाचे करून घेण्यासाठी चुलीसाठी तीन दगड मांडण्यापासून मृताचे थडगे बांधण्यापर्यंत दगडाला नाना तऱ्हांनी वापरले. त्यांची भांडीकुंडी केली. औते* -हत्यारे बनवली आणि त्यांचे दागदागिनेदेखील घडवले. खडक कोरून किंवा दगडांच्या भिंती रचून आपल्या निवाऱ्याची सोय केली. पण कोणत्याही युगातला माणूस घेतला, तरी त्याच्या प्राथमिक गरजा भागल्यानंतर त्याला आपल्या सृजनशीलतेला आणि पूजावृत्तीला वाट करून दिल्याशिवाय राहवत नाही. फुरसद मिळाली, तशी तो लेणी खोदू लागला; शिल्पे कोरू लागला, घरांना कलात्मक आकार देऊ लागला. शिल्प आणि स्थापत्य या दोन्ही कला झरीप्रमाणे* अशा दगडांतूनच फुटल्या. आणि विज्ञानाचा उगम झाला, तोही माणसाने दोन दगडांची चकमक करून त्यांपासून विस्तव उत्पन्न केला आणि दगडापासून पहिले चाक तयार केले, या गोष्टीतूनच.

एक सबंध युग दगडाने माणसाचे जीवन परोपरीने सुखाचे केल्यामुळे आणि त्याच्या सृजनतेला कला आणि विज्ञान यांचे उमाळे आणण्यामुळे त्याला दगडच देव वाटला आणि पूजेचा त्याने छंद घेतला, तर आश्चर्य नाही. [...] अश्मयुगातील आपल्या पितरांनी दगडावर जे उदंड प्रेम केले आहे, ते आपल्या

रक्तात अजून खेळत असावे. त्याचमुळे त्याच्याविषयीचा पूजाभाव ठिकठिकाणी असा प्रगट होत असलेला दिसतो. तोच भाव माझ्यात सौंदर्यभाव होऊन वावरत असावा.

आपल्याकडचा जांभा* दगड जितका जुना होतो, तितका तो मला अधिक सुंदर वाटतो. बोरीच्या आमच्या वाड्याच्या पाठीमागच्या टेकडीवर पन्नास पावलांची चढण काढल्यावर अशा दोन अजस्र खडकांनी एक भलेमोठे प्रवेशद्वारच तयार केले आहे. वेळीअवेळी मी त्या कमानीच्या माथ्यावर बसून ज्ञानेश्वरी वाचलेली आहे आणि तेथून अर्धीअधिक बोरी पाहून घेतली आहे.

सह्याद्रीच्या घाटातला काळानिळा कातळ माझ्या नजरा बांधून ठेवतो. मला त्यात मराठी माणसाचा स्वभाव दिसतो. त्याचा पुरुषार्थ दिसतो. तो पाहता पाहता मला महाराष्ट्रातले किल्ले दिसू लागतात. [...]

गोविंदाग्रजांनी 'बकुळफुलांच्या, प्राजक्ताच्या दळदारी* देशा' या शब्दांनी महाराष्ट्राला गौरविले, याचे मला मोठेसे कौतुक वाटत नाही; पण ते त्याला 'राकट, कणखर दगडांच्या देशा' अशा विशेषणांनी संबोधतात, तेव्हा मी हरखतो आणि महाराष्ट्राच्या या दगडांविषयीचा त्यांचा भक्तिभाव आणि सौंदर्यभाव मला विलक्षण मोह घालतो.

**शब्दार्थ**

औते = शेतकामाची अवजारे

जांभा = कोकणात सापडणारा तांबूस दगड

झरी = लहान झरा

दळदार = कसदार, सत्त्व असलेला



## ८ फिनिक्सच्या राखेतून उठला मोर

***प्रस्तावना : निखिलेश चित्रे*** *(१९७५- ) पुस्तकाची प्रस्तावना हाही एक साहित्यऐवज आहे. त्यातून कधी लेखकाचा त्या साहित्यकृतीच्या निर्मितीमागील हेतू प्रकट होतो, तर कधी एखाद्या जाणकाराने केलेले त्या साहित्यकृतीचे मूल्यमापन.*

*जयंत पवार हे प्रसिद्ध कथाकार, नाटककार, नाट्यसमीक्षक आणि पत्रकार होते. त्यांच्या 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' या कथासंग्रहाला साहित्य अकादमी पारितोषिक मिळालेले आहे. वाचू या लेखक आणि दिग्दर्शक निखिलेश चित्रे यांनी त्या कथासंग्रहाला लिहिलेल्या प्रस्तावनेतील हा अंश.*

समकालीन जागतिक आणि हिंदी कथासाहित्याच्या या पार्श्वभूमीवर जयंत पवार यांचा हा पहिला कथासंग्रह प्रसिद्ध होणं, ही आजच्या मराठी कथेसंदर्भात महत्त्वाची घटना आहे. ऐंशीच्या दशकानंतर मराठीत महानगरी संवेदनेची कथा हळूहळू लुप्तप्राय होत गेली. [...] ती केवळ नि:सत्त्व मध्यमवर्गीय मध्यममार्गी कथांपुरती शिल्लक उरली. [...]

मराठी साहित्यात पवार यांचं घराणं कोणतं, हे शोधण्याचा प्रयत्न समीक्षक करतील; तो करणं गरजेचंही आहे. पण पवारांच्या कथा वाचताना त्यांची संवेदनशीलता, भाषिक अभिव्यक्ती आणि पात्रांची सामाजिक पार्श्वभूमी हे सगळं भाऊ पाध्यांच्या जवळचं असल्याचं जाणवतं. स्वत: जगलेलं आणि

अनुभवलेलं, बेचैन करणारं वास्तव समूहमानसाद्वारे कथेत व्यक्त करणं हे या दोघांचंही ठळक वैशिष्ट्य. मात्र पवार यांच्या कथांमधून उभं राहणारं भाषिक व्यक्तिमत्त्व हे अत्यंत मौलिक आणि त्यांचं स्वत:चं आहे. त्यांच्या कथांमधलं वास्तव 'घडवलेलं' किंवा कृत्रिम नाही, त्यामुळे त्यांची भाषाही तशी नाही. आधी फॉर्म निश्चित करून ते कथा लिहीत नसल्यामुळे त्यांच्या कथांचा आशय स्वतःचा आकार घेऊनच व्यक्त होतो.

पवारांची कथा ही महानगरी संवेदनेची कथा आहे असा उल्लेख मघाशी केला. म्हणजे नक्की काय? ऐंशीच्या दशकानंतर मुक्त अर्थव्यवस्थेमुळे झपाट्यानं पसरलेली जागतिकीकरणाची लाट महानगरांवर थेट आदळली आणि मग गावा-खेड्यापर्यंत पोहोचली. त्यामुळे जागतिकीकरण आणि त्यातून जन्मलेला चंगळवाद* याचे थेट परिणाम मुंबईसारख्या महानगरांवर दिसायला लागले. उत्पादकांनी नवनवीन गरजा निर्माण करून त्या मध्यमवर्गीयांमध्ये पेरल्या. त्या पूर्ण करण्यासाठी मध्यमवर्ग आणि कनिष्ठ मध्यमवर्ग ऊर फुटेस्तोवर धावत सुटले. याच लाटेत मुंबईतलं गिरणगाव* उद्ध्वस्त होऊन त्या जागी टोलेजंग चकचकीत मॉल्स उभे राहिले. गिरणी कामगारांची कुटुंबं विस्थापित होऊन वसई-विरार किंवा कर्जत-खोपोलीपर्यंत विखुरली. पवारांची कथा याच गिरणगावात घट्ट मुळं रोवून उभी आहे. त्यांच्या ज्या कथेत गिरणगाव प्रत्यक्ष नाही तिथेही ते अंत:स्तरावर* आहेच आणि त्याचं असं असणं जास्त भयावह आहे.

गिरणगावची शोकांतिका भेदकपणे साकारणारी 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' ही या संग्रहातली शीर्षककथा. कामगार लढ्याची शोकांतिका आणि त्याचा जागतिकीकरणाशी असलेला संबंध त्याच्या संपूर्ण व्यामिश्रतेसकट* व्यक्त करणारी ही कथा पवारांच्या कथालेखनाचा केंद्रबिंदू म्हणून पाहता येईल. निवेदनाची शैली, काळात मागे-पुढे सरकणारा निवेदन-प्रवाह आणि आशयातून सहजस्फूर्त ऊर्जेनं उमलून आलेला फॉर्म या सगळ्या दृष्टीनं ही गेल्या दशकभरातली महत्त्वाची कथा ठरावी. [...]

जयंत पवार हे 'कथा' या माध्यमाच्या नव्या शक्यता तपासून पाहणारे गंभीर लेखक आहेत. कोणत्याही चांगल्या लेखकाला पछाडणाऱ्या जन्म, मृत्यू, दु:ख, क्रौर्य, हिंसा या गोष्टी पवारांच्या कथेत निव्वळ 'थीम्स'पुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर लेखकाच्या सतत सुरू असलेल्या चिंतनाचे विषय म्हणून समोर येतात. पवारांची कथा वाचकाला जगण्याच्या धुमश्चक्रीत मध्यमभागी आणून उभे करते. आयुष्याच्या कोलाहलात एकमेकांमध्ये मिसळलेले आवाज कान देऊन ऐकण्याचा प्रयत्न करते. या कथा म्हणजे व्यक्तीच्या समाजात जगण्याचे दस्तऐवज आहेत. समाजात जगताना होणारे आनंद आणि त्रास त्यांच्या संपूर्ण व्यामिश्रतेसकट या कथा वाचकापुढे मांडतात. आजच्या मराठी साहित्यात पवारांची उपस्थिती आश्वासक आणि अधिक अपेक्षा निर्माण करणारी आहे.

**शब्दार्थ**

चंगळवाद = भौतिक सुखांचा अधिकाधिक उपभोग घेण्याची वृत्ती, चैनी वृत्ती
गिरणगाव = गिरणी कामगारांची वसाहत
अंत:स्तर = आतली पातळी; अप्रत्यक्ष अस्तित्व
व्यामिश्रता = विविध स्तर असलेले, मिश्र

## ९ आई

***गुरुनाथ धुरी*** *(१९४२- ) कवी, लेखक, चित्रकार, संपादक, अध्यापक. 'ग्लोरिया', 'समुद्रकविता' हे कवितासंग्रह. प्रतिमांचा सार्थ वापर करणारे चिंतनशील लेखक म्हणून प्रसिद्ध.*

*केवळ एका विशिष्ट वासातूनही आपण भूतकाळाच्या एका छोट्या कालखंडात, आठवणींच्या प्रदेशात प्रवेश करू शकतो, याचे संवेदनशील वर्णन पुढील लेखनात केले आहे. 'आदिकाळोख' या ललित लेखसंग्रहातील 'गंधे कोंदाटले जग' या लेखातील हा अंश आहे.*

नव्या दिल्लीच्या लोदी गार्डन्समधून रात्रीच्या वेळी भटकताना एक असा रस्ता मला सापडला की, दुतर्फा असलेल्या झाडांनी जवळजवळ झपाटलेच! थंडीचे दिवस. या दिवसांत शरीरातले रक्तप्रवाह अगदी अतिशय वेगाने वाहू लागतात, आणि सर्वच ज्ञानेंद्रिये प्रखर होतात. तिथून जाताना अकस्मात कसला तरी अत्यंत खमंग वास सुटल्याचे जाणवले. नुसता खमंगच नव्हे, तर ओळखीचा वाटला मला तो वास. हा वास दूरवरच्या भूतकाळातून येत होता. पण ती ओळख शोधल्याशिवाय मन स्वस्थ बसणार नव्हते. हा वास जसा काही रहस्यच होऊन आला होता माझ्यासाठी. तो वास तिथे कसा आला, कुठून आला, त्याने मला निर्जन रस्त्यावर कसे गाठले, कळेना! आजूबाजूला तर वस्तीही नव्हती. झाडांच्या गर्दीतून एखादी झोपडी दिसते का पाहिले, तर तशी काहीही खूण आढळली नाही.

दुसऱ्या दिवशी ऑफिसात हे सांगितले, तेव्हा त्या रस्त्यावरची ती विशिष्ट जातीची पुरातन झाडे सूर्यास्तानंतर उच्छ्वास सोडतात आणि त्यांतून भाकऱ्या भाजल्याचा खरपूस वास येतो असे सहकारी म्हणाले. केवळ भाकरी भाजतानाचा वास तो काय, आणि त्यामुळे मी इतके अस्वस्थ व्हावे? निश्चितच त्यामागे कोणती तरी आर्त आठवण असली पाहिजे. तो वास पक्का मनात रुजवून स्मृती टोकापर्यंत ताणली तेव्हा फटकन एक दरवाजा उघडला. एक अर्धवट काळोखी खोली. वरच्या कौलारू छपराला काचेचे एक कौल नसते तर सर्व खोली काळोखानेच भरून गेली असती अशी. एक तीनचार वर्षांचा मुलगा रडत असलेला आणि त्याची आई डोळ्यांतले अश्रू ढाळीत चुलीवर भाकऱ्या भाजीत बसलेली. एखाद्या चित्रपटातील दृश्यासारखे भूतकाळाच्या काळोखात मला हे दृश्य दिसले आणि मीच हरवलेल्या मला पाहू लागलो. कुठलाही फोटो देऊ शकला नसता, असे दुःखाचे विलक्षण भावदर्शन घडवणारा माझ्या आईचा चेहरा मला स्मृतीत दिसला. त्याच वेळी माझ्या वडिलांची मुंबईत नोकरीसाठी चाललेली वणवण, घरी काका-काकूंची, आत्यांची ऐकून घ्यावी लागणारी बोलणी, मुंबईला एकाकी जीवनातील वडलांचा वाह्यातपणा कानावर आल्यामुळे आईचे ते मला पोटाशी घेऊन मुळुमुळु रडणे, सारे काही बोलके झाले. आज मामा-मामी नाहीत, काका-काकू आहेत – पण फार बदललेली. आईही जाऊन आता बरीच वर्षे लोटलीत. पण त्या सर्वांचे चेहरे, अगदी त्यांच्या चेहऱ्यावरील प्रत्येक सुरकुती आणि प्रत्येक भावदर्शन मी माझ्या मनात जागवू शकलो. त्या वयात मी संस्कारविहीन होतो, अजाण होतो. व्यवहाराची धूळ माझ्या संवेदनांवर साचली नव्हती. काय स्वीकारावे आणि स्वीकारू नये याची चिकित्सा करीत बसण्याचे ते वय नव्हते. संवेदना प्रखर होत्या. मला भूक जितकी प्रखरपणे जाणवत होती तितकाच तो भाकरीचा वासही तीव्रपणे जाणवत होता. डोळ्यांना तिथल्या रंगरेषा भिडत होत्या. शेणाने सारवलेल्या जमिनीचा थंड खरखरीत स्पर्श जाणवत होता. निव्वळ एका विशिष्ट वासातून मी भूतकाळाच्या एका छोट्या कालखंडातच नव्हे, तर इतरही संवेदनांत आठवणींच्या मदतीने प्रवेश केला होता. त्या संवेदनांच्या एकत्र येण्यातून एकेक प्रसंग उभा राहत गेला; त्याच्या मागचे-पुढचे वास्तव सोबत घेऊन! [...]

अलीकडेच, शेजारच्या छोट्या मुलीने शाळेतून येताना वेचून आणलेली फुटपाथवर पडलेली चाफ्याची फुले माझ्या टेबलावर ठेवली. ओंजळीत घेऊन मी ती दीर्घ हुंगून घेतली. तो वास खूप खोल मस्तकात भिनला मात्र – फटदिशी एका वास्तवाचा दरवाजा उघडला. मी मनानेच इस्पितळामागे असलेल्या शवघराशेजारच्या जागेत उभा राहिलो. आजूबाजूला सर्वत्र चाफ्याची झाडे नि त्यावर पानापानांतून फुललेली पांढरी, पिवळी, लालसर चाफ्याची फुले. त्या वातावरणात त्या फुलांचा हळुवार सुगंध कोंदाटून राहिला होता. रखरखीत पांढरी दुपार, पांढरीशुभ्र इमारत, पांढऱ्याशुभ्र वेषात धावपळ करणाऱ्या नर्सेस नि हॉस्पिटलचे कर्मचारी, पांढरीच इनॅमलची उपकरणे... सगळे कसे लख्ख दिसू लागले. हळूहळू बाह्य आवरण सैल होऊन कळी फुलून यावी तसे ते भूतकाळातील वातावरण जन्माला येऊ लागले. खरेच, तो एक जन्मच होता – अंतर्मनातल्या एका जुन्याच जगाचा नव्याने झालेला जन्म! हळूहळू शवघरातून शुभ्र स्ट्रेचरवरून शुभ्र चादर ओढलेली आई आली. हे असे शुभ्र मरण समोर नि सभोवार चाफ्याची शुभ्रच फुले फुललेली. त्या सुगंधाची संवेदना मला नुसती आईची आठवण करून देत नाही, तर प्रत्यक्ष आईपर्यंत घेऊन जाते. आसमंतातल्या झाडाचे पानन्‌पान, फूलन्‌फूल मला दिसते, रंग दिसतात. त्यावेळी झाडांवर बसून कावकाव करीत त्या निर्जन शांततेच्या काचेला चरे पाडणारे कावळे दिसतात, ऐकू येतात. चादरीत गुंडाळलेल्या आईला पाहताच मला मिठी मारून नि खांद्यावर डोकं टेकून रडणाऱ्या धाकट्या भावाचा स्पर्श जाणवतो, त्या स्पर्शातली अगतिक थरथर नि गदगदलेले हुंदके जाणवतात. अनुभवलेला एक जीवनाचा रसरशीत तुकडा त्याच्या सर्व बारकाव्यांनिशी साक्षात होतो. माझ्या अंतर्मनात नकळत टिपलेले वास्तव त्या वासाने तेव्हा साक्षात होते.

## १० बाप आणि लेक

***गौरी देशपांडे*** *(१९४२-२००३) कथा, कादंबरी, ललित लेख, स्फुट लेखन, भाषांतर, कविता. व्यक्तिस्वातंत्र्याचा आणि त्यातूनच ओघाने येणाऱ्या स्त्रीस्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी लेखिका.*
*महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या घराण्याचा प्रागतिक विचारांचा वारसा लाभलेल्या लेखिका गौरी देशपांडे यांनी दिनू, म्हणजे आपले वडील दिनकर कर्वे यांच्याशी असलेल्या नात्याचा घेतलेला हा वेध. 'बापलेकी' या पुस्तकातून हा भाग घेतला आहे.*

माझ्या बालबुद्धीप्रमाणं इरू*, दिनू*, गाडगीळकाका* ही सकाळी उठून, आम्हांला हाकलून, आपापल्या कामांसाठी घराबाहेर निघून जाणारी माणसं होती. जसे आम्ही शाळांमधून जायचो तशीच. पण एकदा आम्ही शाळांमधून आणि ते सर्व कामांवरून घरी आले, की कुणामध्ये काहीच भेद नसे. आमच्या घरी पत्त्यांचा फड पडला, की गाडगीळ-आठवले-कर्वे मंडळी आण्णाआजोबांसह* त्यात सामील. (गटार-उपशीमध्ये* हार खायला आजोबांना मुळीच आवडत नसे!) आमचे चेंडू घरी बनवलेले; चिखल, वाळू एकत्र करून, त्यांचा गोळा करून त्यावर अनेक आच्छादनं घालून, अखेर क्रोशानं जाळी बनवून तयार केलेले. आम्ही गोलाकार उभे राहून वा बसून तसे तीन-चार, वेगवेगळ्या परिघांचे चेंडू या हातातून त्या हाती भराभर फेकत असू. तेव्हा माझे वडील जरूर तिथं हजर असत, इतकंच नाही तर ती क्रोशाची जाळी बनवताना, चिखलाचा

गोळा बनवताना त्याला आईच्या जुन्या पातळाची खोळ घालतानाही. बाजारात जाऊन विकत घेतलेली खेळणी आमच्याकडे नव्हती. मला एक डोळे उघडमीट करणारी भावली* बाजारातून विकत आणून दिली गेली कारण मी ती मिळण्यासाठीची अट – रामरक्षा पाठ करणं – ही पुरी केली. पण त्याहीपलीकडे आम्हांला जे भांडार मिळालं त्याची शब्दांत गणना करणं अशक्य आहे. ते भांडार म्हणजे पुस्तकं. माझ्या आयुष्यात पुस्तकांचं महत्त्व काय आहे ते मी प्रकाश नारायण संतांच्या ओघवत्या वाणीत सांगू शकणार नाही; पण फक्त इतकंच म्हणायचंय, की पुस्तकं होती म्हणून मी आहे!

माझे आई-वडील अखंड पुस्तकांत बुडलेले असत, पुस्तकांबद्दल एकमेकांशी आणि मित्र-मैत्रिणींशी बोलत असत. आणि ही सर्व पुस्तकं त्यांच्या त्यांच्या विषयांशी असंलग्न. पुस्तकांवर प्रेम करायचं हे वडिलांनी शिकवलं की आईनं, की आप्पाआजोबांनी (रँग्लर परांजपे) हे मी कसं सांगू शकेन?

पण आता खात्रीनं एक सांगू शकेन, की मला झाडा-वनस्पतींचं, फुला-फळांचं जे वेडच आहे त्याचे जनक माझे वडील. आमच्या त्या लॉ कॉलेज रोडवरच्या घराच्या बागेत काय काय होतं! आणि जे आमच्याकडे नव्हतं ते शेजारी गाडगीळकाकांकडे होतं – म्हणजे त्या काळी तरी, आमच्याकडेच! वडिलांनी मोगऱ्याच्या सर्व जाती लावल्या होत्या – मोतिया, जाई-जुई, कुंदा-चमेली, सायली, बटमोगरा, साधा मोगरा, मदनबाण. [...] माझ्या वडिलांची बाग हा माझा फार मोठा ठेवा आहे. साऱ्या देशभर हिंडून त्यांनी तिच्यासाठी वृक्षवेली जमवल्या आणि त्यांची अगदी सोयऱ्यांसारखी निगा राखली. काय-काय होतं त्या बागेत! उगीच नाही मी तिला ‘जादूनगरी’ म्हणत. [...] आणि त्या सगळ्यांची माहिती कधी तरी, त्यांना पाणी घालण्याचं काम माझ्याकडून करून घेताना, त्यांनी सांगितली असणार – नाही तर आज जगभर झाडांच्या प्रेमानं, झाडांना हात लावत, त्यांच्या सावलीत, त्यांच्या सहवासात मी अपार आनंदाचे तासन्तास का काढले असते? सगळ्या जगातून सापडेल ते बी जमा करून वाढवायचे प्रयत्न का केले असते? [...]

दिनू स्वतः मुळीच ‘कडक’ नव्हता, पण त्याची ‘तत्त्वं’ फार कडक होती. उदाहरणार्थ, आमच्या वेळी नियम होता की तिमाही, सहामाही, नऊमाही यांपैकी निदान दोन परीक्षांत पास झाल्याखेरीज वार्षिक परीक्षेला बसण्याचा ‘फॉर्म’ विद्यार्थ्यांना मिळत नसे. ते प्रिन्सिपल असताना कित्येक विद्यार्थी डॉक्टरांची सर्टिफिकिटं घेऊन येत, आपण त्या तिन्ही परीक्षांच्या वेळी आजारी पडलो होतो हे दाखवायला. वडील त्यांना शांतपणं सांगायचे, तुमच्या आजाराबद्दल मला पूर्ण सहानुभूती आहे; पण तुम्ही तीन परीक्षांना बसला नाहीत, म्हणजेच नापास झालात ही वस्तुस्थिती आहे. [...] मला त्याच्या तत्त्वनिष्ठेत कडकपणा आढळला तरी माणुसकीचा अभाव आढळला नाही. या तत्त्वनिष्ठेचं लोण* माझ्यापर्यंत पोचलं. [...] त्यामुळे पुढे माझी नोकरीच गेली. पण माझ्या वडिलांना माझा अभिमान वाटला असता हा विचार, आवडतं काम करता येत नाही या खंतीवर सतत फुंकर घालतो. आपण जे काम पत्करलं ते इमानेइतबारं, ‘टू द बेस्ट ऑफ वन्स ॲबिलिटी’ केलं पाहिजे ही त्यांची खात्री. त्यांचं तत्त्व त्यांनी कधी बोलून दाखवलं नाही, कधी आम्हाला प्रवचनं दिली नाहीत; पण त्यांच्या वागण्या-बोलण्यातून ते सर्व झिरपत माझ्यापर्यंत पोचलं.

आणखी काही झिरपत माझ्यापर्यंतच नाही, तर आमच्या मुलीबाळींपर्यंतही पोचलंय हळूहळू, असं गेल्या काही वर्षांच्या विचार-आठवणींतून समजत गेलं. त्याचे पायरव*, प्रतिबिंब माझ्या लिखाणात फार न शोधताही आढळतात.

माझं लिखाण वाचल्यावर वाचक मला नेहमी विचारतात तो प्रश्न : “स्त्री आणि पुरुष समान आहेत, (किंबहुना स्त्रियाच श्रेष्ठ आहेत!) हे तुमच्या डोक्यात आलंच कसं? महर्षींमुळं* का?” तर त्याचं उत्तर, “नाही; माझ्या वडिलांमुळं!” असं आहे. [...] कदाचित, स्त्रियांना मानानं वागवणं, त्यांना शक्य तितक्या

संधी उपलब्ध करून देणं, त्यांची दु:खं, भार शक्य तितके दूर करायला बघणं यांचं बाळकडू वडिलांना महर्षींकडून मिळालं असण्याची शक्यता आहे; पण हे विचार माझ्यापर्यंत पोचले ते माझ्या वडिलांचं रोजचं सहज वागणं बघून.

आयुष्यात आलेल्या कुठल्याही स्त्रीला त्यांनी नेहमी मानाची, बरोबरीचीच वागणूक दिली : घरकाम करणाऱ्या स्त्रियांना, कुटुंबातल्या स्त्रियांना, सहकारी स्त्रियांना, शेजारी स्त्रियांना, लहान-थोर सर्वच स्त्रियांना. अगदी, मी साताठ वर्षांची असल्यापासून, म्हणजे आठवतंय तेव्हापासूनच म्हणायचं, त्यांनी मला बरोबरीनं वागवलं. मला काही समजावण्यात 'चुका दाखवणं', 'दोष देणं', 'पायरीची जाण देणं' असल्या गोष्टी कधी नव्हत्याच. स्वत:बरोबर मला पुढं घेऊन जाण्याचाच फक्त भाव होता. स्वत:ला जे कालगतीप्रमाणं अधिक ज्ञान मिळालं होतं ते माझ्या पदरात टाकण्याची धडपड होती.

अखेरच्या आजारात, तो जराजर्जर* असताना, मी दिनूजवळ काही दिवस होते. [...] डोळे उघडून एकदम तो म्हणाला, "गौरी!" त्याच्या शेजारी येऊन मी विचारलं, "काय रे? काही हवंय?" तर हसून नकारार्थी मान हलवून त्यानं विचारलं (चेहऱ्यावर हसू होतंच), "मरणार आहे ना मी आता?"

त्यानंच वाढवलेल्या; सत्य, तार्किक-तात्त्विक विचार, आणि त्या विचारांना शेवटापर्यंत नेटानं नेऊन जे 'साध्य-सिद्ध' सापडेल त्याचा स्वीकार करण्याच्या त्याच्या शिकवणुकीतून आयुष्य जगण्याचा प्रयत्न करत असणाऱ्या मला त्या निर्वाणीच्या क्षणी खोटं बोलणं, गुळमुळ करणं* शक्य नव्हतं. त्याच्या हातावर आपला हात ठेवून म्हणाले, "हो." त्यानं माझा हात जरासा दाबला आणि मग तो म्हणाला – माझ्याकडे हसतमुखानं बघत म्हणाला, "बरंय तर मग!"

तो वारला त्या प्रत्यक्ष क्षणी मी हजर नव्हते, पण त्याची खंत मला टोचत नाही, कारण त्याच्या इतर मुली, नाती, इ॰ इ॰ हजर होत्याच की.

वडिलांचं ऋण फिटत नसतं. ते नुसतं पुढं ढकलायचं. तेही मी त्यांच्या नातींपर्यंत ढकललंय. आता काय होतं ते बघायला कोण जगणारेय? एक दिवस त्यांच्याच नातींपैकी कुणाला तरी मी विचारणारेय : "मरणार आहे ना मी आता?" तेव्हा, आजोबांच्या वंशजांना साजेसं उत्तर त्या देतील ही आशा. आणि त्यांच्याप्रमाणंच "बरंय तर मग!" असं म्हणून मी होत्याची नव्हती व्हायला तोंड देईन हीही आशा!

**शब्दार्थ**

इरू = इरावती कर्वे, गौरी देशपांडे यांची आई

दिनू = दिनकर कर्वे

गाडगीळकाका = अर्थतज्ज्ञ धनंजयराव गाडगीळ

गाडगीळ-आठवले = कर्वे यांचे शेजारी

आण्णाआजोबा, महर्षी = महर्षी धोंडो केशव कर्वे, गौरी देशपांडे यांचे आजोबा, दिनकर कर्वे यांचे वडील

गटार-उपशी = पत्त्यांचा एक खेळ

फड = अड्डा, एकत्र जमणे

भावली = बाहुली

असंलग्न = संबंधित नसणे

पायरव = पायांचा आवाज

जराजर्जर = आजारामुळे थकलेले

गुळमुळ करणं = स्पष्ट न सांगणं

## ११ चक्रीवादळ

***प्रभाकर पेंढारकर** (१९३३-२०१०) लेखक, चित्रपट दिग्दर्शक. 'रारंगढांग', 'अरे संसार संसार' 'चक्रीवादळ' या कादंबऱ्या.*

*चक्रीवादळाची भयानकता आणि मानवी मनोव्यापार यांचे समर्थ चित्रण 'चक्रीवादळ' या कादंबरीत येते. वादळाने भिरकावलेल्या अनेक आयुष्यांमधील काहींची ही हृदय हेलावून टाकणारी कहाणी.*

रेल्वेच्या नकाशात चिराला आणि बापटला ही गावं एकमेकांना चिकटून असल्यासारखी दिसतात. सुदैवानं चिराला ते बापटला ही रेल्वेची टेलिफोन-लाइन पाऊस सुरू झाल्यावरही काही वेळ चालू होती. रिझर्वेशन क्लार्क हरी अय्यरनं चौकशी केली, तेव्हा त्याला काही वेळापूर्वी १० डाउन एक्सप्रेसनं बयानपट्टी सोडल्याचं समजलं. पण त्यानंतर गाडी कुठं आहे हे समजेना. टेलिफोन चालत नव्हते. ड्यूटी संपली तशी त्याच्या बरोबरची माणसं घरी परतली. हरी मात्र ऑफिसातच बसून राहिला. एक्सप्रेस येईपर्यंत तो इथंच थांबणार होता. गाडीची वेळ केव्हाच होऊन गेली होती. गाडी केव्हा येईल ह्याची खबर नव्हती. वाट पाहून हरीचा दम निघाला. आता स्टेशनात दोनचार माणसं सोडली तर कोणीच उरलं नव्हतं.

पावसाचे थेंब छपरावर पडत तसा मशिनगनच्या गोळ्यांसारखा आवाज होत होता. वीज-पुरवठा बंद झाल्यानं खोलीत अंधार दाटला होता. हरी समोरच्या टेबलवर पाय ठेवून डोळे मिटून बसला होता. वाट पाहून थकल्यानं त्याला केव्हा झोप लागली हे समजलंच नाही.

एकदम मोठ्यांदा आवाज झाला. हरी दचकून जागा झाला. त्यानं वर पाहिलं; आकाश दिसत होतं. क्षणभर त्याला समजेना. मघा तर आपण खोलीत होतो. मग डोक्यावर आकाश कसं? आणि एकदम त्याच्या लक्षात आलं, खोलीचे पत्रे उडून गेले आहेत. पाऊस आता खोलीत कोसळत आहे. टेबल, खुर्च्या, कागद, फाइल्स सगळं भिजत आहे. घाईघाईनं हरी टेबल सरकवणार; इतक्यात टी॰सी॰ आत आला. म्हणाला, "कुठं सरकवणार तू हे टेबल? बाहेर पाहिलंस काय?"

हरी प्लॅटफॉर्मवर आला आणि त्याला स्टेशन ओळखता येईना. प्लॅटफॉर्मवरच्या छपराचा एकही पत्रा शिल्लक उरला नव्हता. लोखंडी उभे खांब आणि त्यावर उघडे आडवे गर्डर्स. सिनेमाच्या जाहिराती लावलेल्या लोखंडी चौकटीही गायब. फार काय, प्लॅटफॉर्मवरच्या पंख्यांची पाती अदृश्य झालेली आणि मधले लोखंडी गट्टू तेवढेच राहिलेले. हे...हे बापटला स्टेशन? रेल्वेचे रूळ तरी जागेवर आहेत काय? आणि आपण ज्या एक्सप्रेसची वाट पाहत आहोत तिचे डबे पाचोळ्यासारखे कुठं फेकले तर गेले नाहीत ना?

हरीचे पाय कापू लागले. त्यानं भिंतीचा आधार घेतला. गळ्याशी आवंढा आला. पोटात भीतीनं खड्डा पडला. पहिल्या बाळंतपणासाठी गेलेली त्याची बायको दोन महिन्यांच्या मुलीला घेऊन ह्या गाडीनं परत येत होती. ती कुठं असेल आता?

मछलीपटनम्‌पासून फार तर दहाएक मैलांवर कोमिली खेडं. मुख्य रस्त्यापासून आतल्या बाजूला. त्यामुळं जगाशी संबंध कमी. गावात दोन-चार पक्की बांधलेली घरं सोडली तर बाकी सर्व झोपड्या. रस्ता मातीचा, कच्चा. रहदारी फारशी नाहीच. झोपड्यांत वीजही नाही. त्यामुळं कोमिली गावाला बाहेर उडालेल्या हाहाकाराची कल्पना नव्हती. असा जोराचा पाऊस आणि सोसाट्याचा वारा वर्षातून एकदोनदा कोमिलाला तडाखा देऊन जातो. त्या वेळी आपापल्या झोपड्यांत विझलेले कंदील उशाशी ठेवून सकाळ होण्याची वाट पाहत बसून राहायचं. तसं हे माहितीचं, त्यामुळं आजही कोमिली गावात चिडीचूप.

गावाच्या एका बाजूला पोचय्याची लहानशी झोपडी होती. एका कोपऱ्यात. अंधारातच तो अंगावर

चादर पांघरून बसला होता. त्याची कारभारीण अंगाची मुटकुळी करून ओलसर जमिनीवर पडलेली होती. अंधारात दुसरं काही करण्याजोगंही नव्हतं. त्यांच्या दोन्ही मुलींची लग्नं होऊन त्या सासरी गेल्या होत्या. मुलगा टेनालीला नोकरी करत होता. सुटीच्या दिवशी तो कधी तरी कोमिलीला येऊन जाई. आपल्या आई-वडिलांना चरितार्थासाठी काही पैसे ठेवून जाई.

पोचय्याची झोपडी खिळखिळी झालेली होती. ह्या पावसात ती रात्र संपेतो टिकाव धरेल असं आता पोचय्याला वाटेना. आता इथून बाहेर पडायलाच हवं असं त्यानं ठरवलं. तो म्हातारीला म्हणाला,

"चल, आपण इथून निघू या."

"कुठं जायचं?"

"गावाबाहेर चर्च आहे. तिथं जाऊ या."

म्हातारीला झोपडी सोडवेना. पोचय्या थांबायला तयार होईना. मग म्हातारीनं त्या अंधारातच सामान जमा करायला सुरुवात केली. भात शिजवायला एक ॲल्युमिनियमचं भांडं, दोन ताटल्या, पांघरायची चादर, एक पंचा. कोमिलीच्या कोणत्याही झोपडीत ह्यांपेक्षा आणखीन काय सामान असणार? दोघं बाहेर पडणार, एवढ्यात झोपडीचं छप्पर उडून गेलं.

त्या पावसात म्हातारी झोपडीत काही उरलं का पाहत होती. समोर दिसत तर काही नव्हतं; पण पाय निघत नव्हता. पोचय्यानं तिचा हात धरला आणि दोघं चालू लागली. झोपडीत भिजायचं, बाहेरही भिजायचं, हे कोमिलीनं स्वीकारलेलं होतं. ज्या पंचवीस-तीस झोपड्या होत्या, त्यांतली आता एकही शिल्लक नव्हती. ह्या कोसळणाऱ्या पावसात कोमिली वाहून गेली होती.

गावाबाहेरचं चर्च शंभरएक वर्षांपूर्वी बांधलं होतं असं म्हणतात. इमारत दगडी होती. छपरावर लाल मंगलोरी कौलं इतके पावसाळे जाऊन टिकून होती. फाटकापासून चर्चच्या इमारतीपर्यंत थोडंच अंतर; पण सोसाट्याच्या वाऱ्यामुळं आणि कोसळणाऱ्या पावसामुळं दोघांना चालता येणं कठीण झालं. दोघं कशीबशी चर्चच्या दरवाजाजवळ पोहोचली. पोचय्यानं दारावर थाप मारली आणि मग जोरानं दरवाजा ठोठवायला सुरुवात केली. दार उघडलं गेलं. भिजून चिंब झालेली दोघं आत गेली. आत पाहतात तर सगळी कोमिली आणि आजूबाजूची खेडी इथं जमा झालेली. एवढं मोठं चर्च; पण ते भरून गेलं होतं.

चौथऱ्यावर उभा असलेला फादर लोकांना धीर देत होता. मोठी मेणबत्ती लावत होता. काही क्षणांत ती विझून जाई आणि फादर ती परत लावी. "प्रभूवर विश्वास ठेवा, शांत राहा" म्हणून फादर सांगत होता.

मेणबत्तीच्या प्रकाशात पोचय्यानं पाहिलं. सगळेच एकमेकांच्या चांगल्या परिचयाचे. गेली कित्येक वर्षं कोमिलीत राहिलेले; पण आता कोणीच एकमेकांशी काही बोलत नव्हते. त्यांच्या घरादाराबरोबर त्यांचे शब्दही वाहून गेले होते. ह्या वादळानं त्यांच्या दुःखाची परिसीमा ओलांडलेली आणि त्यांना मुकं करून सोडलेलं.

पोचय्याच्या बायकोला राहवेना. हुडहुडी भरलेल्या आवाजात तिनं पोचय्याला विचारलं,

"तेनालीला असाच पाऊस असणार का?"

"तर काय मग?"

"तिथं व्यंकट आहे."

"तो झोपडीत नाही, पक्क्या घरात राहतो आहे."

"ते तरी ह्या पावसात टिकेल ना?"

"गप! उगा भलत्या शंका काढू नकोस!"

म्हातारी गप्प झाली. पोचय्याही गप्प झाला. पण अशीच भीती प्रत्येकाच्या मनात. कुणाच्या मनात त्यांच्या मुलाबद्दल, मुलीबद्दल, थोडं दूर राहणाऱ्या आई-वडिलांबद्दल, नातवंडांबद्दल. घर वाहून गेलं. सारं सर्वस्व हरवलं, तरीही असे कुठं कुठं धागे मनी असतात. त्यांच्याबद्दलची मनोमनी दाटलेली अस्वस्थता.

आणि एकदम आकाश फाटल्यासारखा विजेचा कानठळ्या बसवणारा आवाज आला. जणू ती वीज चर्चवरच कोसळली. त्या आवाजानं सगळ्यांच्या मनात दाटलेली अस्वस्थतेची वेगवेगळी कारणं क्षणात बाजूला सारली; आणि एकाच विचारानं त्या सर्वांना ग्रासलं : हे चर्च ह्या पावसात आज रात्री टिकणार आहे का? उद्याची सकाळ आपण पाहणार आहोत काय? पुराच्या प्रवाहात सापडावेत तसे ह्या विचारांत सगळेच वाहत निघाले; आणि कशाचा आधार घ्यावा असं काही हाताला सापडेचना.

ह्या मन:स्थितीतून ते बाहेर आलेच नाहीत.

त्या विजेच्या कडकडाटानंतर चर्चची ती शंभर वर्षांपूर्वीची इमारत कोसळली; आणि सगळी कोमिली त्याखाली गाडली गेली.



## १२ हंस अकेला

***मेघना पेठे*** *(१९५८- ) कवयित्री, लेखिका. वेगवेगळ्या कोनातून स्त्रियांचे जगणे संवेदनशीलतेने त्यांनी चित्रित केले. 'हंस अकेला' हा त्यांचा गाजलेला कथासंग्रह. त्याच्या पाठपृष्ठावरील हा मजकूर. 'उड जायेगा हंस अकेला' या संत कबीर यांच्या भजनाचा संदर्भ या शीर्षकात येतो.*

तसं तर काल उत्कटपणे 'जगलेलं' सारं तितक्याच ताजेपणानं आपल्या नजरेसमोर आजही उभं असतं – नवे अर्थ हाती घेऊन!

लक्षात येत असतं की, आपला बहुतेकांचा भोवताल वरवर सारखाच आहे, पण तरीही प्रत्येकाचं प्राक्तन निराळं, निर्णय निराळे, स्वीकार-नकार निराळे, कारण इथं प्रत्येक व्यक्ती दुसरीहून निराळी! स्वतंत्र!

माणसाच्या जगण्यात प्रातिनिधिक असं काही नाही.
अगदी आपणसुद्धा आयुष्यातल्या वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळे असल्याचं अनुभवत असतोच की! जितकी आपली 'उमजण्या'ची ताकद मोठी तितकं आपलं 'भंगणं' अधिक!

'उमजून' घेण्याच्या मनानं मांडलेल्या या खेळात म्हणूनच सोबत उरते ती फक्त एकाकीपणाची तीव्र वेदना! जाणिवेच्या अथांग आकाशात झेप घेऊ पाहणारा प्रत्येक हंस अकेला आहे, तो या अर्थानंच!

## १३ जाई-जुई

*अरुणा ढेरे (१९५७- ) कविता, कथा, कादंबरी, ललित गद्य, व्यक्तिचित्रे, अनुवाद, समीक्षा, लोकसाहित्य असे विविधांगी लेखन. ९२व्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष. कुटुंबजीवन, निसर्ग, प्रेम हे विषय मुख्यत्वे हाताळतात. ऐंशी - नव्वदच्या दशकातील महत्त्वाच्या कवयित्री.*
*'रूपोत्सव' या ललितसंग्रहातील हा लेख. जाई-जुईसारख्या सुवासिक फुलांबाबत आपल्या तरल भावना आणि काही कवितांचे धागे अरुणा ढेरे यांनी इथे गुंफले आहेत.*

कवी ना॰ धों॰ महानोरांनी गोळा केलेली पळसखेडची लोकगीतं वाचत होते. महानोरांच्या कवितेतले किती तरी सुरूप शब्द, सुंदर कल्पना आणि सुरेल लयी यांचं उगमस्थान कोणतं, हे जसं ही गाणी वाचताना उलगडतं ना, तसं आणखीही खूप काही मिळून जातं. त्या दिवशी असंच झालं. एका ओवीगुच्छातली सुरुवातीचीच ओवी वाचताना मी थबकले. इतकी नाजूक, इतकी घमघमती ओवी मी पूर्वी जणू वाचलीच नव्हती, असा तिनं मोह घातला.

माळ्याच्या मळ्यात, नुस्ती माळीन एकली
जाईच्या फुलांची – इनं काचोळी गुंफली

मळा माळ्याचा आहे. त्यानं जिवाभावानं फुलवलेला! आज मात्र तिथे माळीण एकटीच आहे. नुस्ती एकटी आहे! तिच्या एकटेपणाचं हे विशेषणसुद्धा पहा ना, कसं बोलकं आहे! असा नुसता एकटेपणा अतिमृदू असतो. फार तरल असतो. मला विलक्षण वाटलं ते हे की, या एकटेपणाची – नुस्त्या एकटेपणाची अशी तरल जात पकडण्याचं सामर्थ्य जे भल्या भल्या कवींनाही असतंच असं नाही, ते या खेड्यांतल्या अडाणी बायकांच्या शब्दांत कसं सहज आलं आहे! [...]

हरवलेल्या प्रेमाची अशी अवघड हुरहुर जाईच्या फुलांनीच तर सांगावी! मेघदूतातल्या* यक्षानं नव्हे का मेघाजवळ आपल्या दूरच्या प्रियेचं वर्णन करताना तिला दंवारलेल्या* जाईचीच तर उपमा दिली आहे! तिचं विरहार्त मोहक रुपडं जाईशिवाय दुसरं कोण उपमेनं तोलणार?

पाच पाकळ्यांचं हे शुभ्र फूल (जस्मिनम् ग्रँडीफ्लोरम) जुईपेक्षा जरा मोठं असतं हे खरं, पण तरी त्याचं सुकुमारपण जराही उणावत* नाही. नुसत्या नजरेनं कोमेजतील, इतकी नाजुक ही फुलं! पाकळ्या जुईपेक्षा जरा रुंद. आकारानंही मोठ्या. संध्याकाळी वेलीवर या कळ्या एकामागून एक उमलतात ना, तेव्हा त्या गंधानं काळजात एक दुखरी कळ उठते. जगण्याच्या ओघात मागे पडलेलं आणि प्रयत्नपूर्वक दूर केलेलं किती तरी पुन्हा जिवाला बिलगतं. अशा वेळी ती जाई, जाई राहत नाही. आपल्याच मनाचं ते वेगळं रूप बनतं. ग्रेससारखा संवेदनशील कवी बहुधा अशाच वेळी गुणगुणला असेल...

जाईबाई, तुम्ही सांगा मनातले पाप
कळ्यांचीही फुले होती कशी आपोआप?

खरं तर जाई, जुई, चमेली, सायली, नेवाळी – ही सगळी एकाच जातीची फुलं. एकेकटं फुलायला यांना आवडत नाही. जुईचं तर नावच मुळी जूथिका किंवा यूथिका आहे. यूथ म्हणजे समूह. झुपका म्हणू या आपण. झुपक्यानं फुलणारी ती जुई. जाईजुईच्या वेलीसुद्धा किती देखण्या असतात. घराच्या कुंपणावर, प्रवेशद्वारीच्या कमानीवर किंवा मुद्दाम बांधलेल्या मंडपावर पसरलेल्या या लवलवत्या हिरव्या पानांच्या, शिडशिडीत बांध्याच्या वेली किती सुंदर दिसतात, हे तुम्ही पाह्यलं असेल. मग त्या हिरव्यागार रंगामधून संध्याकाळच्या वेळी रांगोळीच्या ठिपक्यांसारखी शुभ्र, सुवासिक फुलं उमलत जातात ती थेट उत्तर-रात्रीपर्यंत उमलती असतात.

जुईची बहरलेली वेल पाहणं हा एक भाग्ययोगच आहे. तीन दलं असलेली पानं, मधल्या जरा लांबट दलानं पानाच्या आकाराला दिलेली स्वतःची मोडणी, नाजूक लवलवीत फांद्या आणि अगदी इवल्याशा पाच शुभ्र पाकळ्यांची फुलं. पावसाच्या सुरुवातीलाच तिच्या बहराला सुरुवात होते. तिच्याभोवती भिरभिरणाऱ्या पावसाच्या तुषारांमध्ये तिचा गोड कोवळा गंध भरून जातो. कवी अनिलांनी असंच तिचं एक अंगनिथळतं रूप एका दशपदीत* गुंफलं आहे.

मादकता जाते मार्दवी विरून
सौंदर्य सोज्वळाआड दडते
सोलीव सुखाचे स्वप्नच एक
जिवाला जागेपणी पडते

हे सोलीव सुखाचं स्वप्न, कित्येक शतकांपूर्वी, रामगिरीवर विरहोत्कंठित एकांतवास भोगणाऱ्या कालिदासाच्या यक्षानं एकदा जागेपणीच पाहिलं होतं. पाण्यानं भरलेल्या कृष्णमेघाला आपला दूत म्हणून पाठवताना, अलकेपर्यंतचा* सगळा मार्ग या यक्षानं डोळ्यांपुढे आणला. त्याला ओघानंच आठवला अवन्तीचा* प्रदेश. तिथले वननद्यांचे प्रवाह त्याला आठवले आणि तीरांवरची उद्यानंही आठवली. तिथं बहरलेल्या फुलांची आठवण करताना त्याला प्रथम आठवली ती जुईची सुंदर जाळी. कुसुमाग्रजांनी भाषांतर केलं आहे...

रम्य जुईचे पुढे ताटवे राननदीच्या तिरी
भिजतिल कलिका, शिंपडता तू
नाजुक पहिल्या सरी

या नाजूक पहिल्या सरीचं आणि जुईचं नातं काही वेगळं आहे, हे खरंच! आता परवा-परवाची गोष्ट आठवा ना! ज्येष्ठातले पहिले काळे ढग आकाशात आले तेव्हाची गोष्ट! तुमची आणि माझीही. पाऊस आला आला म्हणताना एकदम सर येतेच. मातीचा वास घरादारांतून, वाड्यावाड्यांमधून दरवळून उठतो. संध्याकाळी घरी परतायच्या वेळीही मध्येच एखादी सर गिरकी घेत उतरते – पार भिजवून टाकते. छत्रीचं ओझं आणलं नाही, याचं बरं वाटतं मनाला! तशा गार मनानं पाय उचलताना एखाद्या कोपऱ्यावरून एक कोवळा, पण अतिमधुर वास येतो. पाय नकळत थबकतात. एखादं इटुकलं पोर हातातला गजऱ्याचा झुपका एकदम पुढे करतं. तो पावसाळ्यातला पहिलावहिला जुईचा गजरा हाती घेताना मन कसं सायीचं झालं होतं, आठवतंय ना? [...]

पांढरा शुभ्र फ्रिलचा फ्रॉक घालून एखादी हसरी चिमुरडी जर तुमच्या पुढ्यात उभी राहून म्हणाली की, 'माझं नाव सायली!' तर आवडेल ना? सायलीचं नाजूकपण तसंच आहे. चमेली जशी जाईची जुळी बहीण, तशी सायली जुईची बहीण आहे. तशी सारख्याच आकाराची, सारख्याच रंगाची ही सुवासिक फुलांची वेल. जुईसारखीच तीन दलांची हिची पानं. पण जुईसारखं मधलं दल लांबट नसतं. तेही इतर दोन पानांएवढंच असतं आणि फूल जाईसारखंच अतिकोवळं! इंदिराबाईंसारखी कवयित्री या कोवळेपणाची काळजी करत पावसालाही दटावते -

नको नको रे पावसा,
असा धिंगाणा अवेळी
घर माझे चंद्रमौळी*
आणि दारात सायली

खरंच, या फुलांशी दंगामस्ती नयेच करू. फक्त एखाद्या कोवळ्या मूडमधे केसांत त्यांचा अर्धउमलता गजरा माळावा. बस्स! आणि अशी मागणी सगळी फुलं थोडीच करतात? पण सायली करते. जुई-जाई-चमेलीही करते. ही सगळी संध्याकाळी उमलणारी फुलं. दिवसभरचे व्यापताप दूर करून संधिप्रकाश पसरत येतो – रात्रीच्या निवांत प्रहरांच्या गळ्यात हलकेच आपले हात टाकतो आणि त्यांच्या कुशीत मिटून जातो. या हलक्या संधिकालीन गारव्याच्या शिरशिरत्या वेळी उमलतात ही सगळी फुलं. त्यांची कोवळीक, त्यांचा दुखवून सुखावणारा वास आणि त्यांची चांदणी उमलण – या सगळ्या सगळ्यांचा जो सूक्ष्म तरल आनंद होतो ना, त्याचं वर्णन करताच नाही यायचं. करू नयेही.

फक्त कधी कुणाला फारा दिवसांनी भेटताना चार जाई-जुईची फुलं द्यावी, कधी निरोपाचा हात हलवताना जाई-जुईचा झुपका पुढे आलेला असावा, कधी अगदी एकटं असताना जाई-जुईवरचं चांदणं सोबतीला घ्यावं अन् कधी वेलीवर मनसोक्त फुललेली ही फुलं घनदाट गंधानं दरवळताना काहीबाही आठवून रडू आलं, तर रडावंही...

आयुष्यातल्या सगळ्या कोवळेपणाचं रूप म्हणजे ही फुलं, हे कळण्याच्या वेळा नेहमी थोड्याच येतात?

**शब्दार्थ**

दवारलेल्या = दवाने भिजलेल्या

मेघदूत = महाकवी कालिदासाचे प्रसिद्ध संस्कृत काव्य

अलका = देवांचा खजिनदार कुबेर याची राजधानी

अवन्ती = मध्य प्रदेशातील उज्जैन या शहराचे प्राचीन नाव

चंद्रमौळी = छतातून चंद्रप्रकाश आत येणारे, मोडकळीस आलेले, गरीब

उणावणे = कमी होणे

दशपदी = दहा ओळींची कविता



## १४ सुवर्णयुगाचे महावस्त्र, ऐश्वर्याचे प्रतीक – पैठणी

***माधव गडकरी*** *(१९२८-२००६) संपादक, लेखक. वृत्तपत्रीय लिखाणातून आपल्या चतुरस्र लेखणीने गडकरी यांनी विविध विषयांना स्पर्श केला.*

*या लेखात पैठणी या महाराष्ट्राच्या पारंपरिक वस्त्राची श्रीमंती त्यांनी वर्णन केली आहे.*

रसिकराज खाडिलकरांच्या 'भाऊबंदकी'मधील ही आनंदीबाई. या पेशवेकालीन स्त्रीचे ऐश्वर्य, तिचा थाट, ते करारी व्यक्तिमत्त्व व ते अजोड कर्तृत्व अनुपम अभिनयाने व तितक्याच साजशृंगाराने दुर्गाबाई खोटे यांनी रंगभूमीवर अमर केले. लफ्फेदार पदराची व रुंद काठाची भरजरी पैठणी नेसून ही आनंदीबाई रंगमंचावर आली की गतकालातील जरतारी जीवनाची एक झलकच नजरेपुढे चमकून जाई.

परंतु पैठणनगरीचे हे महावस्त्र पाहण्यासाठी आपल्याला आता नाटकाकडे वळावे लागते. तीन मजली व नऊवारी पैठण्या नेसलेल्या आणि नाकात मोत्यांची झोकदार नथ घातलेल्या विलासी व्यक्तिमत्त्वाच्या स्त्रिया आज दिसताहेत तरी कुठं? [...]

मूळ वस्त्र गर्भरेशमी, पदर संपूर्ण जरीचा आणि तसेच घसघशीत रुंद काठ हे या पैठणीचे त्रिगुण. अस्सल सोन्याचांदीचा उपयोग करण्यात येत असल्यामुळे जरीवरची चमक इतरत्र कुठेही न आढळणारी. त्यात ही भरजरी वेलबुट्टी दोन्ही बाजूंनी पारखून घ्यावी. तिला उलट, सुलट अशी बाजू नाही. वर्षानुवर्षे लोटली तरी हे महावस्त्र कधी फिक्के पडणार नाही की त्या जरीची चमक जराही कमी होणार नाही. या विणकरांनी या पैठणीबरोबरच पितांबर, शेले व मंदील अशा विविध वस्त्रांचे 'नंबरी सणंग' येथे तयार केले व समृद्ध जीवनाचे दर्शन काही पिढ्यांना घडविले.

शालिवाहन राजाने व चालुक्य राजानेही या कलेची मोठी काळजीपूर्वक जपणूक केली. शके १६००पर्यंत स्थानिक साळी व कोष्टी यांच्याकडे ही कला होती. त्यानंतर मोमीन आले व त्यांनी ही कला हस्तगत केली. पेशवाईच्या ऐन भरभराटीच्या काळात पैठणीचे भाग्य आणखी उजळले व मजल्यांच्या भाषेत तिचे मोल सांगितले जाऊ लागले. सोन्याचांदीच्या भरघोस वापराने ती वजनदार होऊ लागली. 'पैठणी झोक पुढे जगला' असे वर्णन शाहिरी काव्यात येऊ लागले व चार मजली पैठणी नेसून ती प्रियतमा कविरायाची वाट पाहू लागली. अस्सल सुवर्णातील वेलबुट्टी व फुले यांचे नक्षीकाम जिच्या पदरावर व काठावर केले आहे अशी सोळा हात लांब व चार हात रुंदीची पैठणी त्या वेळी तयार होत होती. पदरात 'असावली' हा पदर खास वैशिष्ट्याचा समजला जाई. त्यावर प्रामुख्याने रुईची फुले असत. पैठणीचे एकंदर वजन साडेतीन शेरांपर्यंत असे. [...] १३० नंबरी रेशीम वापरून तीन तोळे सोने घातलेल्या पैठण्या राजघराण्यात गेल्याची नोंद येथील सावकारांच्या जुन्या वह्यांत सापडते. [...]

हिरवा, पिवळा, लाल व करडकुसुंबी हे पैठणीचे खास रंग, हे रंग करडीच्या मुळांपासून तयार करीत. या रंगांना नुसते आकर्षण नसे, तर एक विशेष सुवासही येई. रंगारी रेशमावर पक्क्या रंगाचा हात फिरवीत. सोनार सोन्याचांदीचे पत्रे ठोकून एकजीव करण्याचे जे काम करीत त्यांना चपडे असे नाव होते. त्यांच्या हातोडीला मठार म्हणत. या मठारव्याने पत्रे ठोकून ते एकजीव केले जात. या मठारव्यावर व ऐरणीवर हिरकणीच्या पाण्याची विशिष्ट क्रिया केलेली असल्यामुळे पत्र्यांना विशेष चमक येई. लगदेकरी या पत्र्यांच्या तारा सफाईने ओढीत. तारकशी त्या बारीक तारा कौशल्याने काढून देत व त्या सुबक तारा चाकांवर गुंडाळून कारागिरांच्या हवाली वाटवे करीत.

विणकरांच्या या सहकाऱ्यांची ती जुनी निवासस्थाने त्याच नावांनी अजूनही पैठणमध्ये ओळखली जातात. करडीच्या फुलांच्या परागाची जिथं खरेदी-विक्री होई ती रंगार हट्टी, तसेच ताराठी, जराठी, साळवाडा, मोमीनवाडा हे जुन्या वैभवाचे साक्षीदार अजूनही तिथे पहुडले आहेत.

काळ जसा बदलला तसे पैठणीचे हे वैभवही लोपले. [...] लोकांची संपन्न स्थिती व भरजरी पोषाख वापरण्याची हौस यांना ओहोटी लागली व त्यामुळे पैठणीचे ऐश्वर्यच काय, परंतु वस्त्राच्या नावालाही विपरीत अर्थ आला. 'पैठणी आग्रह' म्हणजे 'पोकळ आग्रह असा नवा अर्थ पडत्या अमदानीनं या महावस्त्राला दिला'. "मल्लिके, त्याच्या वचनावर भरवसा ठेवू नकोस. त्याचे ते सगळे पैठणी प्रेम आहे", असा इशारा आगरकरांच्या 'विकारविलसित'मध्ये मल्लिकेची सखी तिला देऊ लागली. पैठणी विरत गेली व शब्दांचे अर्थ असे फिरत गेले.

## १५ महाराष्ट्राचा चिंतामणी

***नरेंद्र जाधव** (१९५३- ) अर्थतज्ज्ञ, लेखक, पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू.*
*कुशल प्रशासक, अनेक भाषांचे जाणकार असलेले डॉ॰ चिंतामणी द्वारकानाथ अर्थात सी॰ डी॰ देशमुख यांची शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती वर्ष २०२१मध्ये साजरी झाली. त्यानिमित्त 'लोकसत्ता'निर्मित 'महाराष्ट्राचा चिंतामणी' या विशेषांकाच्या प्रकाशनाच्या वेळी आयोजित कार्यक्रमातील नरेंद्र जाधव यांचे भाषण संपादित स्वरूपात.*

असामान्य बुद्धिमत्ता, अत्यंत सुसंस्कृत मन, विलक्षण ऋजुता आणि व्यापक आर्थिक-सामाजिक जाणिवा यांचा अनोखा संगम होऊन संपन्न झालेलं व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ॰ चिंतामणराव द्वारकानाथ अर्थात सी॰ डी॰ देशमुख!

चिंतामणरावांची थोरवी नेमकी कशात आहे? मुंबई विद्यापीठाने १९१२ साली घेतलेल्या मॅट्रिक परीक्षेत सार्वकालिक सर्वोच्च गुण त्यांनी मिळवले हे त्यांचे मोठेपण आहे का? किंवा केम्ब्रिज विद्यापीठात पदवीसाठी वनस्पतीशास्त्र विषयात सर्वोच्च गुणांनी उत्तीर्ण होऊन, त्या विद्यापीठाचा सर्वोच्च पुरस्कार त्यांनी मिळवला ही त्यांची थोरवी आहे का? वयाच्या केवळ २२व्या वर्षी 'आयसीएस' या अत्यंत कठीण परीक्षेत गुणांचा उच्चांक नोंदवत ते सर्वप्रथम आले आणि वयाच्या अवघ्या ४१व्या वर्षी ब्रिटिश सरकारने त्यांना 'सर' ही उपाधी देऊन त्यांचा गौरव केला, ही त्यांची महती आहे का? तर माझ्या मते, या सर्व प्रश्नांचे उत्तर 'नाही' असेच आहे. त्यांचे श्रेष्ठत्व याहून वेगळ्या अंगाने आहे.

ब्रिटिश सरकारने प्रस्थापित केलेल्या 'इंडियन सिव्हिल सर्व्हिसेस्' अर्थात 'आयसीएस'ची (आजची आयएएस) ही अत्यंत कठीण परीक्षा १९१८ साली सी॰ डी॰ देशमुख उत्तीर्ण झाले. ही इंडियन सिव्हिल सर्व्हिस ही ना भारतीय, ना मुलकी होती आणि ती 'सर्व्हिस' – सेवा – तर कदापिही नव्हती. सनदी अधिकारी म्हणून सी॰ डी॰ देशमुख यांनी बहुधा प्रथमच ही प्रतिमा बदलून टाकली. समाजहितदक्ष कार्यकुशल प्रशासक कसा असायला हवा, याचा कालातीत मापदंड आपल्या कर्तृत्वातून घालून दिला. हीच चिंतामणरावांची खरी थोरवी आहे असे मला वाटते.

शिक्षण, आरोग्य, महसूल, वित्त अशा अनेक महत्त्वाच्या विभागांचे सचिव अर्थात प्रमुख या नात्याने त्यांनी पथदर्शी कामगिरी बजावली. ही विविध सरकारी पदे चिंतामणरावांनी अक्षरशः भूषविली म्हटले तर वावगे ठरू नये. म्हणजे या पदांमुळे ते मोठे झाले असे नाही, तर त्यांच्यामुळे ही पदे मोठी झाली. या सगळ्या अनुभवातून एक महान अर्थ-प्रशासक म्हणून चिंतामणरावांचा उदय झाला.

रिझर्व्ह बँकेचे तिसरे आणि पहिले भारतीय गव्हर्नर म्हणून त्यांची नियुक्ती झाली. या पदावर त्यांची सहा वर्षांची कारकीर्द राहिली आहे. गव्हर्नर म्हणून चिंतामणरावांनी देशाला अनेकांगांनी मोठे योगदान दिले. स्वातंत्र्योत्तर देशाच्या आर्थिक विकासाला पोषक अशा वित्तीय संरचनेच्या दिग्दर्शनाचे काम त्यांनी केले. स्वतंत्र भारताच्या वित्तीय संरचनेची पायाभरणी करणारे शिल्पकार म्हणून चिंतामणरावांची वादातीत सर्वश्रेष्ठ भूमिका राहिली आहे.

### अगणित संस्थांचे संवर्धन

विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी पाच वर्षे काम केले. १९६२पासून १९६७पर्यंत, म्हणजे वयाच्या ७१व्या वर्षापर्यंत, दिल्ली विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून त्यांची कारकीर्द राहिली. त्यानंतरही त्यांनी अनेक संस्थांची उभारणी केली. 'संस्थासंवर्धक' म्हणून त्यांची भूमिका विलक्षण महत्त्वाची

आहे. स्थापनाच नव्हे, तर जोपासना करून त्या संस्थांच्या भरणपोषण, संवर्धनाचीही त्यांनी काळजी घेतली. अशा अगणित संस्थांची यादी सांगता येईल. उदाहरणार्थ, दिल्लीतील इंडिया इंटरनॅशनल सेंटर ही त्यांची निर्मिती. तसेच इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन आदी संस्थांच्या जोपासनेचे काम चिंतामणरावांनी केले.

चिंतामणरावांना अनेक भाषा अवगत होत्या. पण त्यांचे विशेष प्रेम होते ते मराठी, इंग्रजी, संस्कृत, फ्रेंच आणि जर्मन या भाषांवर. कालिदासाच्या 'मेघदूतम्' या खंडकाव्याचा त्यांनी मराठीत अनुवाद केला आहे. महात्मा गांधीजींची काही वचने त्यांनी श्लोकबद्ध केली आहेत. हिंदू धर्मग्रंथांचा आणि बौद्ध धर्माचा त्यांचा गाढा व्यासंग होता. त्यांनी भगवद्गीतेवर भाष्य लिहिले, तसेच धम्मपदावरीलही त्यांचे भाष्य प्रसिद्ध झाले आहे.

(शब्दांकन : सचिन रोहेकर)



## १६ शुभ्र काही जीवघेणे

***अंबरीश मिश्र*** *(१९५५- ) पत्रकार, लेखक, अनुवादक.*

*कलाक्षेत्रातील सात कलंदर व्यक्तिमत्त्वांचा ताकदीने वेध घेणाऱ्या 'शुभ्र काही जीवघेणे' या पुस्तकाचे हे पाठपृष्ठ. हे शीर्षक म्हणजे पु. शि. रेगे यांच्या 'गंधरेषा, या कवितेतील एक ओळ आहे.*

कलेचा प्रवास धुंद करणारा असतो.
यश, कीर्ती, मान-सन्मान ही या प्रवासातली रमणीय विश्रामस्थळं असतील;
परंतु प्रतिभेचा धूप जाळणारे मनस्वी कलावंत जीवनार्थाचं मंथन करण्यातच मग्न असतात.
'शुभ्र काही जीवघेणे' शोधत असतात.
आपल्या प्रासादिक कलागुणांनी साहित्य, नाट्य, संगीत अन् सिनेमाचा परिसर उजळून काढणारी सात कलंदर व्यक्तिमत्त्वं या पुस्तकाला रेलून उभी आहेत.
प्रत्येकाचं जगणं भिन्न.
प्रत्येकाच्या आयुष्यातल्या हालचाली अगदी वेगळ्याच.
ईर्ष्या, वासना अन् प्रेरणांची गुंतागुंत अनोखी.
प्रत्येक जण म्हणजे एक स्वायत्त कलाकृतीच.
परंतु प्रतिभेच्या वरदानाने आणि नितांत अस्वास्थ्याने सगळेच भारून गेलेले.
'लस्ट फॉर लाईफ'ने निथळत राहिले.
'जीवातळी आंथरितू आपुला जीवू' या आंतरिक प्रेरणेने सळसळत राहिले.
यांपैकी काहींना यशाने वरलं.
काहींना नशिबाने हुलकावण्या दिल्या, तर काही मानभंग होऊन आडवळणाच्या शेवटाला विव्हळत राहिले.
परंतु आयुष्यातल्या या चढ-उतारांमुळे यांपैकी कुणाचीच प्रतिभा म्लान झाली नाही, जगण्याची रग ओसरली नाही.

## १७ स्मरणी

***मनमोहन*** *(१९११-१९९१) मूळ नाव गोपाळ नरहर नातू. कवी, लेखक. लोककवी म्हणून प्रसिद्ध. बालपणापासून म्हातारपणापर्यंतच्या आयुष्याचा पट इथे कवीने उलगडला आहे.*

बोल बोबडा स्मरतो पहिला
स्मरते पहिली 'श्री' पाटीतिल
स्मरते पहिली उष्टी कैरी
तिळगुळ चांदीच्या वाटीतिल

जत्रेतुन फिरताना सुटला
हात आइचा हातामधला
जगात चुकलो पुढे कितिकदा
तसा न कधि डळमळला डोळा

मजला रडणे ठाउक झाले
नी हृदयाची ओळख पटली
मजला हसणे ठाउक झाले
नी रडण्याची किम्मत कळली

जीवन – नाटक! इथे विविधता
पडद्यावरती चितारलेली
गुंडाळुन वर जाइ बाग ही
घरे झपाझप खालि घसरली

होइ शहाणे म्हातारेपण
जाता जाता मरणापाशी
आणि पुन्हा निर्बुद्ध होउनी
येउन – पोचे जन्मापाशी

टीप : वरील कवितेत काही ठिकाणी प्रचलित लेखननियमांपेक्षा ऱ्हस्व-दीर्घ वेगळे दिसत आहेत. कवितेसाठी आवश्यकतेनुसार लेखननियमांमध्ये सवलत घेता येते.

## उत्तम साहित्यकृती आणि त्यांचे तितकेच उत्तम अभिवाचन ऐकण्यासाठी काही दुवे

१. मधुराणी प्रभुलकर - फुलराणी आणि पैठणी या कवितांचे अभिवाचन
https://youtu.be/rYzDRRl77ME

२. अविनाश नारकर - ऐश्वर्या नारकर - पपा - व. पु. काळे यांच्या कथेचे अभिवाचन
https://youtu.be/vTovAwrLwhk

३. सोनाली कुलकर्णी - भूमी - आशा बगे यांच्या कादंबरीचे अभिवाचन
https://youtu.be/I7lUR6BzBow

४. सचिन खेडेकर - बनगरवाडी - व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबरीचे अभिवाचन
https://youtu.be/ZzReA_PrE2k

५. पुष्कर श्रोत्री - अर्थ - प्रकाश नारायण संत यांच्या कथेचे अभिवाचन
https://youtu.be/UV2lKsLTExU

६. चिन्मय मांडलेकर - पक्क्या मामा - स्वलिखित
https://youtu.be/xpSK3Rm7QU0

७. कवितेचे पान - वैभव जोशी आणि संदीप खरे
https://youtu.be/yxZmteCYIiA

८. लीना भागवत - फ्यू: - मंगला गोडबोले
https://youtu.be/S-2UOB2Xwdw

९. अजित भुरे - अनंताश्रम - जयवंत दळवी
https://youtu.be/UZjmaBGwl68

१०. सचिन खेडेकर - तोकोनामा - प्रभाकर पाध्ये
https://youtu.be/q299XKvpx9o

११. शुभांगी गोखले - सिलिसबर्गची पत्रे - विश्राम बेडेकर
https://youtu.be/UJuH5OJA1SM

१२. चिन्मयी सुमित - कालचा एपिसोड - मंगला गोडबोले
https://youtu.be/CdLTV_g_fO

१३. अतुल परचुरे, विजय केंकरे - कवितावाचन
https://youtu.be/WiZzlwVc9-8

# ऋणनिर्देश

| | | | |
|---|---|---|---|
| अभिजित रणदिवे | आशिष सावंत | नेहा ठोंबरे | विजया देव |
| अमित वरंडेकर | कलिका मेहता | प्रज्ञा दळवी | वैशाली करमरकर |
| अद्वैत जोशी | गुरूदत्त कामत | प्रियंका काटकर | श्वेता रेडेकर |
| अनिल गोहिल | जयश्री हरि जोशी | मधुरा गावंडे | सुनंदा महाजन |
| अंजली भागवत | ज्योती नारळकर | मयुरेश नारळकर | सुपर्णा कुलकर्णी |
| अन्वया सरदेसाई | तारा गोपीनाथ | मोहन आगाशे | संकेत देशपांडे |
| आनंद काटीकर | निष्का प्रधान | वर्षा माने | |

पु. ल. देशपांडे-नीलिमा गुंडी-द. दि. पुंडे-प्र.ना.परांजपे-गजेंद्र देवडा-अविनाश बिनीवाले-इंदिरा संत, वीणा संत-चेतन एरंडे, प्रीती एरंडे-मारुती चितमपल्ली-बा. भ. बोरकर-सुचेता कडेठाणकर-भीमसेन जोशी-वसंत काळपांडे-कौशल इनामदार-ए. आर. रहमान, वंदना अत्रे-सुहास कुलकर्णी-मिलिंद चंपानेरकर-अच्युत गोडबोले-माधवी ठाकूरदेसाई-अरविंद वैद्य-मृदुला बेळे-मो. रा. वाळंबे-मधुकर केशव ढवळीकर-शांता शेळके-सुनीता देशपांडे-वैशाली करमरकर-महेश एलकुंचवार-माधवराव चितळे-श्री. बा. जोशी-प्रकाश गोळे-माधव आचवल-पु. श्री. लेले-दिलीप कुलकर्णी-गुरू ठाकूर-अतुल देऊळगावकर-व्यंकटेश माडगूळकर-दुर्गा भागवत-रेखा इनामदार साने-कुसुमाग्रज-निपुण धर्माधिकारी-महेश एलकुंचवार-विजया मेहता-दिवाकर-चैतन्य कुंटे-वा. गो. आपटे-सुहास लिमये-सतीश आळेकर-सुहास किर्लोस्कर-विंदा करंदीकर-स्वाती चंदगडकर-सुमन वाडये-सुहास बहुळकर-विशाल वाडये-शैलजा शेवडे-अरुणा ढेरे-ग. प्र. प्रधान-श्रीनिवास कुलकर्णी-गुरुनाथ धुरी-गौरी देशपांडे-जी. ए. कुलकर्णी-द. ग. गोडसे-अरुण टिकेकर,मनीषा टिकेकर-प्रभाकर पेंढारकर-माधव गडकरी-मेघना पेठे-अंबरीश मिश्र-नरेंद्र जाधव-निखिलेश चित्रे-मनमोहन-शंकर वैद्य-सतीश सोळांकूरकर-कृष्णमेघ कुंटे-अंजली जोशी-हेरंब कुलकर्णी- दिनेश गुणे-नीलांबरी जोशी-अमोल उदगीरकर-शरद तांदळे-मधुगंधा कुलकर्णी-आनंद नाडकर्णी-रेणू दांडेकर-समीरण वाळवेकर-रघुनाथ माशेलकर-किरण पुरंदरे-संदीप खरे-भास्कर चंदावरकर-श्रीराम लागू- सुधीर गाडगीळ-गिरीश कुबेर-राहुल देशपांडे-किशोरी आमोणकर-शशि व्यास-अभिजित घोरपडे-जीवनप्रकाश कुलकर्णी-रामचंद्र तिवारी-सुधीर फडके-जितेंद्र अभिषेकी-अशोक केळकर-चिन्मय धारूरकर-प्रवीण दवणे-विठ्ठल कामत-अनघा मोडक-उपेंद्र लिमये-रोहित नरवडे-लोकसत्ता-साप्ताहिक सकाळ-मुंबई तरुण भारत-लोकमत-विवेकानंद चित्रकला महाविद्यालय-लोकमान्य सेवा संघ-आयुका-मराठी विज्ञान परिषद-राजहंस प्रकाशन-रोहन प्रकाशन-मौज प्रकाशन-अभिजित प्रकाशन-पद्मगंधा प्रकाशन-पॉप्युलर प्रकाशन-मॅजेस्टिक प्रकाशन-प्रसाद प्रकाशन-नितीन प्रकाशन-साधना प्रकाशन-उन्मेष प्रकाशन-प्रफुल्लता प्रकाशन-मेहता पब्लिशिंग हाउस-लोकवाङ्मय गृह-परचुरे प्रकाशन-कॉन्टिनेन्टल प्रकाशन-सुमंगल सांस्कृतिक प्रकाशन-मैत्रेय प्रकाशन-ज्योत्स्ना प्रकाशन-सुरेश एजन्सी-महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन-चंद्रकला प्रकाशन-परंधाम प्रकाशन-रामकृष्ण मठ प्रकाशन-वरदा प्रकाशन-साहित्य प्रसार केंद्र-मराठी अभ्यास परिषद-रसिक आंतरभारती प्रकाशन-हिंदुस्थान प्रकाशन संस्था-आकाशवाणी सोलापूर

# संदर्भसूची


| | |
|---|---|
| खाणे : एक भाषिक व्यवहार | नीलिमा गुंडी, *खाणे : एक भाषिक व्यवहार*, भाषाभान, उन्मेष प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली २००८ |
| भाषेतील बदल | प्र.ना. परांजपे, *जीवनाला आकार देणारी भाषा*, भाषेतून भाषेकडे भाषांतराकडे..., प्रफुल्लता प्रकाशन, पुणे २०१७ |
| एक एक जे अक्षर | द. दि. पुंडे, *एक एक जे अक्षर नवे तू शिकसी*, भयंकर सुंदर मराठी भाषा, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, आवृत्ती तिसरी २००८ |
| पेपर (कविता) | इंदिरा संत, *पेपर*, बाहुल्या, मौज प्रकाशन गृह, मुंबई, आवृत्ती दुसरी १९८५ |
| होम स्कूलिंग | चेतन एरंडे, प्रीती एरंडे, *'होम स्कूलिंग' मुलांचं 'शाळाबाह्य' शिक्षण*, लोकसत्ता, १८ जुलै, २०२० चतुरंग पुरवणी, २०२० |
| पक्षी जाय दिगंतरा | मारुती चितमपल्ली, *पक्षी जाय दिगंतरा*, पक्षी जाय दिगंतरा, प्रकाशक : भा. ल. कुलकर्णी, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर १२, आवृत्ती दुसरी १९८९ |
| रूपकळा (कविता) | बा. भ. बोरकर, *रूपकळा*, मौज दिवाळी अंक १९७७ |
| गोबीकन्या सुचेता | सुचेता कडेठाणकर यांची मुलाखत, शब्दांकन : वंदना अत्रे, *गोबीकन्या* वेचक वेधक, रसिक आन्तरभारती प्रकाशन, पुणे. आवृत्ती पहिली २०१७ |
| राष्ट्रीय शैक्षणिक धोरण | वसंत काळपांडे, *आता वेध अंमलबजावणीचे*, दै. सकाळ ९ ऑगस्ट २०२० |
| दशक'क्रिया | अग्रलेख, *'दशक'क्रिया'*, लोकसत्ता १ जानेवारी २०२० |
| गणित | अच्युत गोडबोले, माधवी ठाकूरदेसाई, *प्रास्ताविक*, गणित, मनोविकास प्रकाशन, पुणे |
| काळभान | वैशाली करमरकर, *आदिप्रेरणांचे झरोके*, संस्कृतिरंग, राजहंस प्रकाशन पुणे, आवृत्ती दुसरी, २०१३ |
| ऋतुहीन (कविता) | गुरू ठाकूर, *ऋतुहीन*, साप्ताहिक सकाळ दिवाळी अंक २०१९ |
| काझिरंगा | व्यंकटेश माडगूळकर, *काझिरंगा आणि मानस*, जंगलांतील दिवस, मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे, आवृत्ती सहावी २०१५ |
| मोहक मार्तंड | *मोहक मार्तंड*, अग्रलेख, लोकसत्ता १९ ऑगस्ट २०२० |
| एका गायकाचे फेसबुक लाईव्ह | सुहास किर्लोस्कर, *एका गायकाचे फेसबुक लाईव्ह*, फेसबुक |
| आयुष्याची मौल्यवान माती | सुहास बहुळकर, *शिल्पकार करमरकर*, आयुष्याची मौल्यवान माती, राजहंस प्रकाशन, पुणे, २०१५ |
| म्हणींची लज्ञत | शैलजा शेवडे, *म्हणींची लज्ञत*, व्हॉट्सॲप वरून |
| मनातल्या उन्हात | श्रीनिवास कुलकर्णी, *मनातल्या उन्हात*, डोह, मौज प्रकाशन, मुंबई, आवृत्ती चौथी १९८९ |
| दगडांचे सौंदर्य | बा. भ. बोरकर, चांदण्याचे कवडसे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९८२ |
| शुभ्र काही जीवघेणे | अंबरीश मिश्र, *शुभ्र काही जीवघेणे पुस्तकाचे पाठपृष्ठ*, शुभ्र काही जीवघेणे, राजहंस प्रकाशन |
| फिनिक्सच्या राखेतून उठलाय मोर | निखिलेश चित्रे, *पुस्तकाची प्रस्तावना*, फिनिक्सच्या राखेतून उठलाय मोर, लोकवाङ्मय गृह, पुणे |
| स्मरणी | मनमोहन, *स्मरणी*, आदित्य, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७१ |
| कुरुंदकर आणि मी | हेरंब कुलकर्णी, *नरहर कुरुंदकरांकडे पाहिल्यावर स्वत:चे खुजेपण अधिकच तीव्रतेने जाणवते*, अक्षरनामा मराठी ऑनलाईन फीचर्स |
| भाषा आणि भाषेची लवचीकता | पु. ल. देशपांडे, *द्वितीय जागतिक मराठी परिषद, मॉरिशस, येथे केलेले अध्यक्षीय भाषण (२६-४-१९९१)*, मित्रहो! संपादिका: शांता शेळके, परचुरे प्रकाशन, मुंबई, आवृत्ती चौथी २०१३ |

| | |
|---|---|
| समाजमाध्यमे | गजेंद्र देवडा, *समाज माध्यमे : प्रभाव आणि उणिवा*, मुंबई तरुण भारत, ९ एप्रिल २०१८ |
| आदेश | अविनाश बिनीवाले, *आदेश*, बोलू कवतिकें, राजहंस प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, २००५ |
| जिद्द | भीमसेन जोशी, *जिद्द*, निवडक कालनिर्णय, सुमंगल सांस्कृतिक प्रकाशन, आवृत्ती चौथी. २०१० |
| चित्र'कथा | कौशल इनामदार, *चित्तरकथा १*, क्षितीज जसे दिसते, मैत्रेय प्रकाशन, मुंबई, आवृत्ती पहिली, २०१२ |
| संगीत व तंत्रज्ञान | ए. आर. रहमान मुलाखत: वंदना अत्रे, *गिन गिन तारे मैने उंगली जलायी है...*, लोकमत दीपोत्सव दिवाळी अंक २०१९ |
| भारतीय वैज्ञानिक व त्यांचे शोध | सुहास कुलकर्णी, मिलिंद चंपानेरकर (संपादित), *विज्ञान - संशोधन*, यांनी घडवलं सहस्रक, रोहन प्रकाशन, पुणे २००६ |
| डॉ. कमला सोहोनी | अरविंद वैद्य, *आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पहिल्या भारतीय महिला शास्त्रज्ञ डॉ. कमला सोहोनी*, प्रज्ञावंत भारतीय १, रोहन प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली २०१७ |
| बौद्धिक संपदा | मृदुला बेळे, *ज्ञानफळांच्या राखणीसाठी व पेटंट*, कथा अकलेच्या कायद्याची, राजहंस प्रकाशन, पुणे २०१७ |
| पैठणी (कविता) | शांता शेळके, *पैठणी*, गोंदण. अभिजित प्रकाशन १९७५ |
| सोबत | सुनीता देशपांडे, आहे मनोहर तरी, मौज प्रकाशन गृह, मुंबई |
| वाडा | महेश एलकुंचवार, *गहकुटं विसंगितं*, वाचू आनंदे – संपादक माधुरी पुरंदरे, ज्योत्स्ना प्रकाशन, पुणे |
| काळ - एक कल्पना | श्री. बा. जोशी, *निमित्त १८ जूनचे*, उत्तम मध्यम. श्री. बा. जोशी. पद्मगंधा प्रकाशन, आवृत्ती पहिली २०१० |
| पिलू | प्रकाश गोळे, *पिलू*, निसर्ग आणि माणूस, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे |
| प्रकाश | माधव आचवल, *प्रकाशाचे संगीत*, किमया, मौज प्रकाशन गृह, मुंबई |
| प्रकाश निराळ्या दृष्टिकोनातून | पु. श्री. लेले, *प्रकाश - निराळ्या दृष्टिकोनातून*, प्रकाश, प्रसाद प्रकाशन, पुणे |
| आंतरिक पर्यावरणाची हानी | दिलीप कुलकर्णी, *ऊर्जा : वर्तमानाची ऐतिहासिक पार्श्वभूमी*, ऊर्जा-संयम, राजहंस प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली २०१४ |
| कर्ब उत्सर्जन कसे कमी करायचे? | अतुल देऊळगावकर, *ॲडल्टस् आर शिटींग ऑन अवर फ्युचर!*, लोकमत दीपोत्सव दिवाळी अंक २०१९. |
| गोठवलेलं दूध | दिलीप कुलकर्णी, *गोठवलेलं दूध*, दैनंदिन पर्यावरण, राजहंस प्रकाशन, पुणे, आवृत्ती दुसरी १९९५ |
| बचत : साबणाची आणि पाण्याची | दिलीप कुलकर्णी, *बचत : साबणाची आणि पाण्याची*, दैनंदिन पर्यावरण, राजहंस प्रकाशन, पुणे, आवृत्ती दुसरी १९९५ |
| सहभोजन | दिलीप कुलकर्णी, *सहभोजन*, दैनंदिन पर्यावरण, राजहंस प्रकाशन, पुणे, आवृत्ती दुसरी १९९५ |
| नाटक | पु. ल. देशपांडे, *नाटक*, एक शून्य मी, मौज प्रकाशन गृह मुंबई, आवृत्ती बारावी २०१३ |
| नट, नाटक आणि नाटककार | महेश एलकुंचवार, *सहा. २८ ऑक्टोबर २०१२. अनंत भालेराव स्मृती पुरस्कार स्वीकारताना. औरंगाबाद*, सप्तक, राजहंस प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली २०१४ |
| तालमीला सुरुवात | विजया मेहता, *बेबीचं जग*, झिम्मा : आठवणींचा गोफ, राजहंस प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली २०१२ |
| किलबिललेले उजाडताना (कविता) | विंदा करंदीकर, *किलबिललेले उजाडताना*, धृपद, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, आवृत्ती पहिली १९५९ चौथे पुनर्मुद्रण २००७ |
| हिराबाई | पु. ल. देशपांडे, *हिराबाई*, गणगोत, मौज प्रकाशन गृह, गिरगाव, मुंबई |

| | |
|---|---|
| जाई-जुई | अरुणा ढेरे, *जाई-जुई,* रूपोत्सव, सुरेश एजन्सी, पुणे, १९८८ |
| आई | गुरुनाथ धुरी, *गंधे कोंदाटले जग,* आदिकाळोख. मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई |
| बाप आणि लेक | गौरी देशपांडे, *हिशेब,* बापलेकी, मौज प्रकाशन गृह मुंबई, आवृत्ती तिसरी २००५ |
| लग्न | जी. ए. कुलकर्णी, *लग्न,* कुसुमगुंजा, परचुरे प्रकाशन |
| माझा पहिला गुरू | द. ग. गोडसे, *माझा पाचवा गुरू,* नांगी असलेले फुलपाखरू, पॉप्युलर प्रकाशन, आवृत्ती पहिली १९८९ |
| ग्रंथशोध | अरुण टिकेकर, *ग्रंथशोध,* अक्षरनिष्ठांची मांदियाळी, रोहन प्रकाशन, आवृत्ती तिसरी २०१२ |
| चक्रीवादळ | प्रभाकर पेंढारकर, चक्रीवादळ, मौज प्रकाशन गृह, गिरगाव, मुंबई. |
| सुवर्णयुगाचे महावस्त्र - पैठणी | माधव गडकरी, *सुवर्णयुगाचे महावस्त्र, ऐश्वर्याचे प्रतीक - पैठणी,* असा हा महाराष्ट्र (भाग पहिला) मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई १९८८ |
| महाराष्ट्राचा चिंतामणी | नरेंद्र जाधव, *महाराष्ट्राचा चिंतामणी,* लोकसत्तातर्फे प्रकाशित महाराष्ट्राचा चिंतामणी या अंकातून |
| शिक्षणाचे तत्त्वज्ञान | शिक्षण. स्वामी विवेकानंद. रामकृष्ण मठ प्रकाशन, धंतोली, नागपूर,आवृत्ती पंधरावी २०१३ |
| महात्मा गांधींचे शिक्षण विचार | महात्मा गांधी, गांधी विचार दर्शन : शिक्षण विचार, अकोलकर ग. वि. महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन, पुणे १९९४ |
| शिक्षकाचा खरा धर्म कोणता? | जे. कृष्णमूर्ती, *शिक्षकाचा खरा धर्म कोणता?,* जीवनभाष्ये खंड दुसरा अनुवाद : विमलाबाई देशपांडे, चंद्रकला प्रकाशन, पुणे, आवृत्ती तिसरी २०१३ |
| शिक्षण विचार | आचार्य विनोबा भावे, *शिक्षण विचार.* विनोबा भावे. परंधाम प्रकाशन. पवनार, वर्धा, आवृत्ती नववी २००० |
| औदुंबर | मो. रा. वाळंबे, *औदुंबर,* सुगम मराठी व्याकरण व लेखन, नितीन प्रकाशन, पुणे, आवृत्ती चौपन्नावी २०१९ |
| पुरातत्त्वाची वाटचाल | मधुकर केशव ढवळीकर, *परिशिष्ट पुरातत्त्वाची वाटचाल,* भारताची कुळकथा, राजहंस प्रकाशन, पुणे, आवृत्ती दुसरी २०१८ |
| निसर्ग आणि उत्सव | माधवराव चितळे, *जलसंस्कृतीची भारतीयता,* मराठी अभ्यास परिषदेचे त्रैमासिक भाषा आणि जीवन, वर्ष ३७, अंक ४, दिवाळी २०१९ |
| सांस्कृतिक पर्यावरण | मधुकर केशव ढवळीकर, *सांस्कृतिक पर्यावरण,* भारताची कुळकथा, राजहंस प्रकाशन पुणे, आवृत्ती दुसरी २०१८ |
| मुंबईत वसंतागम | दुर्गा भागवत, *मुंबईत वसंतागम,* भावसंचित, दुर्गा भागवत, शब्द पब्लिकेशन. बोरिवली मुंबई, २०१५ |
| वाक्प्रचारांच्या गोष्टी | वा. गो. आपटे, मराठी भाषेचे संप्रदाय व म्हणी, वरदा प्रकाशन, आवृत्ती चौथी २०१६ |
| श्रीराम लागू यांची सुधीर गाडगीळ यांनी घेतलेली मुलाखत | *ध्वनिफीत,* आकाशवाणी सोलापूर यांच्या संग्रहातून |
| स्वर्गातील आत्मे | दिवाकर (शंकर काशिनाथ गर्गे), *स्वर्गातील आत्मे,* दिवाकरांच्या नाट्यछटा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे |
| महाराष्ट्रातील संगीत महोत्सव | चैतन्य कुंटे, *प्रस्तावना,* शिल्पकार चरित्रकोश (चित्रपट- संगीत खंड ७, भाग २) संपादक : चैतन्य कुंटे, माधव इमारते. साप्ताहिक विवेक. (हिंदुस्थान प्रकाशन संस्था), मुंबई, आवृत्ती पहिली २०१४ |
| रेषेचे लाघव | शांता शेळके, *रेषेचे लाघव,* धूळपाटी, सुरेश एजन्सी, पुणे |
| राजकारणाची भाषा | ग. प्र. प्रधान, *राजकारणाची भाषा,* मराठी अभ्यास परिषदेचे त्रैमासिक - भाषा आणि जीवन, वर्ष ३, अंक २, उन्हाळा, १९८५, साधना साप्ताहिक व प्रकाशन |

| | |
|---|---|
| निसटलेले क्षण... | कृष्णमेघ कुंटे, *निसटलेले क्षण...*, एका रानवेड्याची शोधयात्रा, राजहंस प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली २००२ |
| हंस अकेला | मेघना पेठे, *हंस अकेला*, हंस अकेला, राजहंस प्रकाशन, पुणे |
| लेखणी | शंकर वैद्य, *लेखणी*, असंग्रहित |


## दुवे


| | |
|---|---|
| मधुगंधा कुलकर्णी यांची डॉ. आनंद नाडकर्णी यांनी घेतलेली मुलाखत, *ध्वनिफीत* | https://www.youtube.com/watch?v=-cYicUT_GLA&list=RDCMUCwZit5ah1vBwbpeQV55VRIA&start_radio=1&t=0 |
| विज्ञान गीत (कविता) शंकर वैद्य, सतीश सोळांकूरकर, *विज्ञान गीत*, मराठी विज्ञान परिषद यांची वेबसाईट | https://www.mavipamumbai.org/vidnyan-geet/ |
| डॉ. रघुनाथ माशेलकर यांची मुलाखत, *दृश्यफीत* | https://www.youtube.com/watch?v=q5bX86NyZ54 |
| पावसाचा अंदाज, *ध्वनिफीत* | https://www.youtube.com/watch?v=q4kTMjFpOJg |
| प्रायोगिक नाटक म्हणजे नेमकं काय?<br>निपुण धर्माधिकारी | http://natakwagaire.blogspot.com/2015/06/blog-post_98.html |
| बिगरी ते मॅट्रिक<br>पु. ल. देशपांडे, *ध्वनिफीत* | https://www.youtube.com/watch?v=GizlrfGUpms |
| हरितात्या<br>पु. ल. देशपांडे, *ध्वनिफीत* | https://www.vibby.com/watch?vib=7kSESBf_K |
| किरण पुरंदरे, *दृश्यफीत* | https://www.youtube.com/watch?v=j-CwfmCxjnc& |
| भास्कर चंदावरकर, *ध्वनिफीत* | https://www.youtube.com/watch?v=4_Fc_e0L66I |
| विजया मेहता यांची गिरीश कुबेर यांनी घेतलेली मुलाखत, *दृश्यफीत* | https://youtu.be/-W_gLPJc004 |
| किशोरी अमोणकर यांची शशी व्यास यांनी घेतलेली मुलाखत, *दृश्यफीत* | https://youtu.be/XYU3Sj1xXcM |
| राहुल देशपांडे यांचे भाषण, *ध्वनिफीत*, 'अस्तित्व' बी.एम.सी.सी. | https://www.youtube.com/watch?v=Ntu_z8WAraM&feature=youtu.be |
| वारली चित्रकला, सौजन्य : विवेकानंद चित्रकला महाविद्यालय कराड | mweditor@marathiworld.com https://marathiworld.com/varlichitrakala |
| स्नेहवन, दिनेश गुणे, *लोकसत्ता* | https://www.loksatta.com/vishesh-news/sarva-karyeshu-sarvada-2018-snehawan-organization-in-maharashtra-1966535/ |
| समाजमाध्यमे, रोहित नरवडे, *ध्वनिफीत* | https://youtu.be/Qf4Wc3eQFk0 |
| रूपकळा (काव्यवाचन), सुनीताबाई देशपांडे, *दृश्यफीत* | https://www.youtube.com/watch?v=x2eVgD72Pbk |

| | |
|---|---|
| रेणू दांडेकर यांची समीरण वाळवेकर यांनी घेतलेली मुलाखत, *ध्वनिफीत* | https://www.youtube.com/watch?v=vuULd9WcuaE |
| भाषाविज्ञान, अशोक केळकर, *ध्वनिफीत* | https://www.youtube.com/watch?v=dUgz8873Ssg |
| इंटरनेट ऑफ थिंग्ज, *ध्वनिफीत* | https://www.youtube.com/watch?v=t7ekZwCiZRo&feature=youtu.be |
| गीत - आकाशी झेप घे रे पाखरा, गीतकार जगदीश खेबुडकर, गायक व संगीतकार - सुधीर फडके, *ध्वनिफीत* | https://www.youtube.com/watch?v=mYvSHjO9LXA |
| गीत (सरीवर सर), संदीप खरे, *ध्वनिफीत* | https://www.youtube.com/watch?v=4ojdvkA1lyY |
| काटा रुते कुणाला (गीत), *ध्वनिफीत* | https://www.youtube.com/watch?v=3bVbAD-Ws6E&feature=youtu.be |
| सांगली वस्तुसंग्रहालय - एक परिचयपट (महाराष्ट्र पुरातत्त्व विभाग), *दृश्यफीत* | https://www.youtube.com/watch?v=HPP0Pcmt_k0 |
| प्रश्नपत्रिका १ *ध्वनिफीत* १ - अरुणा ढेरे - स्त्रीसाहित्य | https://youtu.be/p6oxaRDyDFU (१८.१० - २०.२७ = २.१७) |
| प्रश्नपत्रिका १ *ध्वनिफीत* २ - अरुणा ढेरे - साहित्यसंमेलन | https://youtu.be/GpD-QNph_BU (४२.२० - ४४.२९ = २.०९) |
| प्रश्नपत्रिका १ *ध्वनिफीत* ३ - शासकीय अनुवाद | https://youtu.be/KGrsWJNrFbc (६.३८ - ७.१२ = १.१४) |
| प्रश्नपत्रिका १ *ध्वनिफीत* ४ - शासकीय अनुवाद | https://youtu.be/KGrsWJNrFbc (१.०९.४९ - १.११.३६ = १.४७) |
| प्रश्नपत्रिका १ *ध्वनिफीत* ५ - चिन्मय धारूरकर | https://youtu.be/05xWKF3BATU (५६.४९ - ५९.१६ = २.२७) |
| प्रश्नपत्रिका २ - *ध्वनिफीत* १ - प्रवीण दवणे | https://youtu.be/oXiXGHtuqwI (२.५० - ४.५० = २.००) |
| प्रश्नपत्रिका २ - *ध्वनिफीत* २ - विठ्ठल कामत | https://youtu.be/7I06TdNhK3w (०.४१-२.०६ = १.२५) |
| प्रश्नपत्रिका २ - *ध्वनिफीत* ३ - अनघा मोडक | https://youtu.be/LDgh7goIVE0 (०.०९-२.०१ = १.५२) |
| प्रश्नपत्रिका २ - *ध्वनिफीत* ४ - बातम्या | https://youtu.be/WqTyrkUWbUo (०.०० - ०.२४ = ०.२४) |
| प्रश्नपत्रिका २ - *ध्वनिफीत* ५ - उपेंद्र लिमये | https://youtu.be/qnZIu4h4n08 (१.५५ - ३.४८ = १.५७) |

## Orientation for My Marathi Level 6

- Course material
- An integrated communicative approach
- Systematic and effective learning of the language
- For young and adult learners
- For classroom study as well as for self learners
- Language skills: Understanding, speaking, reading, writing Marathi

## The set contains:

1. Orientation material
2. Practice Book
3. Audio & audio-visuals
   https://mu.ac.in/mymarathi6

**Visit us:** www.rmvs.marathi.gov.in


मुंबई विद्यापीठ
UNIVERSITY OF MUMBAI

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI

9 789354 075162

**Price:** Rs. 1250 | 25 USD | 20 EUR